# एस . वाय . बी . ए .

# इतिहास - मराठा सत्तेचा उदय

# घटक १

## मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी

**अनुक्रमणिका –**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ इस्लामी राजवटीचा कालखंड

१.२.२ सामाजिक व धार्मिक जीवन

१.२.३ मराठी संस्थानिक

१.२.४ शहाजी राजे भोसले

१.२.५ जिजाबाई

१.२.६ दादोजी कोंडदेव

१.२.७ शिवाजींचे शिक्षण

१.२.८ शिवाजींचे बालपण

१.२.९ शिवाजींचे मावळ प्रदेशावरील लक्ष

१.२.१० स्वराज्य कार्यास प्रारंभ

१.२.११ नवी मोहीम

१.२.१२ शहाजी राजांना अटक व शिवाजींच्या विरोधातील मोहीम

१.२.१३ जावळीचे चंद्रराव मोरे प्रकरण

१.२.१४ जावळी विजयाचे परिणाम

१.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.४ सारांश

१.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.६. पारिभाषिक शब्द

१.७. संदर्भ सूची


### १.० उद्दिष्टे –

भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व म्हणून मराठयांच्या इतिहासाचा कालखंड ओळखला जातो. मराठयांचे साम्राज्य केवळ दक्षिण हिंदुस्थानच्या भुप्रदेशात अस्तित्वात आले असले तरी त्यांचा परिणाम हा थेट उत्तरेपर्यंत जाऊन पोहोचलेला होता. दिल्लीच्या

तख्तावर विराजमान मोगल बादशहासुध्दा मराठ्यांच्या या उदयामुळे व वाढत्या सामर्थ्यामुळे चिंतीत झालेला होता. त्यामुळेच त्याने दक्षिणेवर वेळोवेळी मोहिमा काढून येथील नवनिर्मित साम्राज्य उलथवून टाकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अशा या मध्ययुगीन कालखंडावर परिणाम करणाऱ्या व दक्षिणेतील एका महत्त्वाच्या साम्राज्याचा वेध घेण्यासोबतच त्या साम्राज्याच्या उदयाची पार्श्वभूमी शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर अध्ययनार्थींना यातून खालील माहिती मिळण्यास मदत होईल.

१.मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी जाणून घेता येईल.

२.शिवपूर्व काळातील राजकीय, सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे अध्ययन करता येईल.

३.मराठा सत्तेच्या उदयात शहाजी , जिजाबाई व दादोजी कोंडदेव यांची भूमिका जाणून घेता येतील.

४.हिंदवी स्वराज्य स्थापनेकामी शिवाजी महाराजांच्या प्रारंभिक हालचालींची माहिती होईल.

५.मराठा सत्तेच्या सशक्त वाटचालीचा या निमित्ताने मागोव घेता येणे शक्य होईल.

## १.१ प्रस्तावना

दक्षिण भारतातील एक प्रमुख राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. या प्रदेशात प्रामुख्याने मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या अधिक असल्याने त्याला मराठी भाषिकांचा प्रदेश म्हणूनही ओळखले जाते. या प्रदेशाच्या वैशिष्टपूर्ण भौगोलिक रचनेमुळे तसेच येथील लोकांच्या इतिहासाची व त्यांच्या जडणघडणीची एक वेगळी ओळख दिसून येते. या प्रदेशाला सह्याद्री पर्वताच्या उंच कडेकपारींमुळे एक वेगळे वैशिष्टे प्राप्त झालेले आहे. किंबहुना सह्यादी पर्वतराजीमुळेच या प्रदेशाचे कोकण, घाटमाथा व देश असे तीन नैसर्गिक विभाग पडलेले असल्याचे जाणवतात. घाटमाथा व मावळ या भागात अनेक दुर्गम डोंगरी किल्ले असल्याने मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास घडविण्याच्या कामी या भागाने महत्त्वाची भुमिका बजावलेली आहे. किंबहुना संरक्षणाच्या दृष्टीनेही हा भाग अत्यंत महत्त्वाचा समजला जात असे.

तुरळक पाऊस, बेताची सुपिक जमीन यामुळे जगण्यासाठी या प्रदेशातील लोकांना बरीच धडपड करावी लागे. कित्येक नैसर्गिक आणि इतर आपत्तींशी त्यांना झगडावे लागे. त्यामुळे येथील लोक काटक, कष्टाळू, स्वतंत्र बाण्याचे आणि लढाऊ वृत्तीचे बनले आहेत. डोंगराळ मुलूख, टेकड्या, दऱ्याखोरी यामुळे या प्रदेशाला नैसर्गिक संरक्षण मिळाले आहे. विपूल सागर किनारपट्टीमुळे अरब, पोर्तुगिज, फ्रेंच, इंग्रज इत्यादी परकीयांचे या प्रदेशात आगमन होऊन येथील लोकांची बाह्य जगाशी ओळख झाली. या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे लढाऊ वृत्तीच्या, निर्भय आणि स्वतंत्र बाण्याच्या मराठ्यांनी १७ वे आणि १८ वे शतक आपल्या पराक्रमाने गाजविले.

इ.स.पूर्व तिसऱ्या शतकापासून ते इ.स.च्या तिसऱ्या शतकापर्यंत महाराष्ट्राच्या भूमीवर सातवाहनांची अधिसत्ता होती. पैठण ही सातवाहनांची राजधानी म्हणून ओळखली जात असे. इ.स. तिसऱ्या शतकात सातवाहनांची सत्ता लयास जाऊन अभीर, त्रैकुटक, वाकाटाक, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार आदी राजसत्ता महाराष्ट्रात बाराव्या शतकापर्यंत अधिराज्य करीत होत्या. मोगलांच्या आगमनापूर्वची महाराष्ट्रातील महत्त्वाची सत्ता म्हणजे यादवांची सत्ता होय. इ.स.१२९६ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने यादवांचा पराभव केला. त्यानंतर जवळपास चारशे वर्ष महाराष्ट्रावर इस्लामी सत्तेचे वर्चस्व राहिलेले दिसून येते.

## १.२. विषय विवेचन –

### १.२.१ इस्लामी राजवटीचा कालखंड–

झियाउद्दीन बरणी या मुस्लिम इतिहासकाराच्या मते अल्लाउद्दिन खिलजीच्या स्वारीपूर्वी महाराष्ट्रातील लोकांनी मुस्लिमांचे नावही ऐकलेले नव्हते. अल्लाउद्दीन हा पहिला मुस्लिम आक्रमक होता, जो विंध्याद्री व नर्मदा नदी पार करून प्रथम दख्खन देशात आला व त्याने आपल्या पहिल्याच स्वारीत अभूतपूर्व यश संपादन केले. इ.स.१२९६ मध्ये तो केवळ २५ दिवस देवगिरीच्या राज्यात होता. पण त्याने या अल्पावधीतच यादवांना त्याचे मांडलिक बनविले . त्यासोबतच त्यांने या प्रदेशाची मोठ्या प्रमाणावर लूट केली . त्याने या प्रदेशाचे नैतिक सामर्थ्य संपुष्टात आणून यादवांवर अत्यंत अपमानास्पद असा तह लादला होता.

फेरिस्ता या मुस्लिम इतिहासकाराच्या मते त्याने यादववंशीय रामदेव राजाकडून खंडणीच्या रुपाने सहा मण सोने, सात मण हिरे, माणके, मोती, एक हजार मण चांदी, रेशीम आणि इतर मौल्यवान कपड्यांच्या ४०० गाठी घेतल्या होत्या. अल्लाउद्दिन खिलजी यांच्या निर्देशानुसार मलिक काफूर या त्याच्या सेनापतीने प्राय: संपूर्ण दख्खन क्षेत्र इस्लामी नियंत्रणाखाली आणला होता. या प्रदेशावर खिलजी घराण्यानंतर तुघलकांची सत्ता होती पुढे १३४७ मध्ये बहामनी सत्तेचे या प्रदेशावर नियंत्रण प्रस्थापित झाले होते.

इ.स. १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना दक्षिणेच्या भूप्रदेशात झाली असली तरी त्यांच्या कालखंडात मात्र युध्दे, अंतस्थ यादवी, राजकीय अनास्था व आर्थिक अस्थिरता यासोबतच विजयनगरच्या साम्राज्यासोबत सततचा संघर्ष यांनी भरलेला होता. बहामनी सत्ता जवळपास २०० वर्ष अस्तित्वात असली तरी त्यांना या प्रदेशावर पूर्णपणे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करता आलेले नव्हते. त्यातच या सत्तेत सरदारांचे प्राबल्य अधिक वाढल्यामुळे त्यांच्यातील भांडणे पराकोटीला गेलेली होती. पर्यायाने बहामनी सत्ता कुमकुवत बनत गेली व त्यातूनच पुढे १५ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात बहामनी साम्राज्याची शकले होऊन इ.स. १४९० मध्ये अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि वऱ्हाडची इमादशाही ही स्वतंत्र राज्ये स्थापन झाली. लवकरच इ.स.१५१२ मध्ये गोवळकोंड्याची कुतुबशाही व इ.स. १५२६ मध्ये बिदरची बरीदशाही यांची स्वतंत्र सत्ता केंद्रे निर्माण झाली.

या सर्व पाचही राज्यात मराठी मुलख विभाजित झालेला होता. याशिवाय खानदेशच्या

भूप्रदेशावर फारूकी राजांची राजवट होती. इ.स.१६०१ मध्ये अकबराने फारूकी सत्ता आपल्या वर्चस्वाखाली आणली असली, तरी याच कालावधीत पोर्तुगीजांनी गोव्यातील त्यांचे स्थान बळकट केले होते व मराठी मुलुखावर त्यांचे नियंत्रण निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. थोडक्यात, शिवपूर्व कालात महाराष्ट्रावर इस्लाम, मुघल आणि पोर्तुगीज या सत्तांचा प्रभाव असल्याचे लक्षात येते.

बहामनी सत्तेच्या विभाजनातून निर्माण झालेल्या ५ शाह्यांमधील वऱ्हाडातील इमादशाही इ.स.१५७४ मध्ये तर बिदरची बरीदशाही इ.स. १६१९ मध्ये संपुष्टात आली. असे असले तरी उर्वरीत अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अद्यापही त्यांचे वर्चस्व राखून होते. निजामशाहीच्या अधिपत्याखालील क्षेत्रात महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, नगर, आणि मराठवाड्यातील काही प्रदेशाचा समावेश होता तर आदिलशाहीच्या अधिपत्याखाली कोकणचा भूप्रदेश होता. कुतुबशाहीकडे कृष्णा–गोदावरी नद्यांमधील बराच मराठी प्रदेश होता तर खानदेश व वऱ्हाडवर मोगलांचे तर कोकणातील काही भागावर पोर्तुगीजांचे अधिपत्य होते.

## १.२.२ सामाजिक व धार्मिक जीवन –

यादव कालखंडानंतर दख्खन क्षेत्रात इस्लामी सत्तेचे वर्चस्व असले तरी या प्रदेशातील जनता बहुसंख्य हिंदूधर्मीय होती. पर्यायाने अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा , वऱ्हाड व बिदर येथील राजांना प्रशासनाच्या सुव्यवस्थेसाठी हिंदूंची सातत्याने गरज भासत असे. त्यामुळे मंत्रिपदे, लष्करी अधिकाराच्या जागा, आर्थिक क्षेत्रातील महत्त्वाच्या जागा या हिंदूंकडे असत. लष्करात तर प्रामुख्याने हिंदू लोकांचाच भरणा अधिक प्रमाणात होता. विजापूरच्या आदिलशाहीच्या सैन्यात इतरांच्या तुलनेत हिंदूंची संख्या अधिक होती. सतराव्या शतकाच्या प्रारंभी मराठे सरदार हे मुस्लिम सरदारांपेक्षा अधिक प्रबळ म्हणून गणले जात होते. त्यामुळे साहाजिकच दरबारातील मानाच्या जागी त्यांची नियुक्ती होणे क्रमप्राप्त होते.

दख्खन क्षेत्रातील इस्लामी राजवटीत या काळी अंतर्गत कलह व यादवी यांचा मोठया प्रमाणात शिरकाव झालेला होता. बाहेरून आलेले व स्थानिक मुस्लिम यांच्यात सातत्याने संघर्षाची स्थिती असे. त्याचा परिणाम येथील राजसत्तेवर पडत असे. परिणामी या सर्व परिस्थितीमुळे मराठ्यांना स्वातंत्र्याची जाणीव होऊ लागली असावी. या मराठा सरदारांच्या हाती त्यांच्या जहागिरीतील गडकोट होते. त्यामुळे या अंदाधुंदीच्या काळात प्राय: स्वतंत्र राजे म्हणून हे सरदार वागत. ते कधी मुसलमानांची तर कधी मुघलांची चाकरी करीत होते.

या काळात जमीन महसूल व हिशोबाची जबाबदारी मुख्यत: मराठ्यांच्या हाती होती. वरिष्ठ अधिकारी सामान्यत: हिंदू असत. ब्राह्मणांना पोतदार (खजिन्याचे काम), लेखनिक, कारकून, मुत्सद्दी अशा जागा मिळत. तसेच राजदूत आणि मंत्री या हुद्यांवरही प्रसंगी त्यांची नेमणूक होत असे. पहिला इब्राहिम आदिलशहा याला तर परदेशी मुसलमानांपेक्षा हिंदू लोक अधिक पसंत होते. पहिला अली आदिलशहा हा हिंदू संन्याशी, पुरोहित यांच्याशी तात्त्विक चर्चा करण्यात विशेष रस घेत असे व त्यांना तो उदार हस्ते मदतही करीत असे.

दुसरा इब्राहिम शहा तर सरस्वतीचा भक्त होता आणि हिंदूमध्ये तो जगद्‌गुरू म्हणून ओळखला जात असे. त्याची फर्मानेदेखील 'अज पूजा सरस्वती' या अक्षरांनी सुरू होत असत. या पातशहांनी धार्मिक सहिष्णूतेचे धोरण स्वीकारले होते. हिंदू देवालयांना त्यांनी उदार हस्ते देणग्या दिल्या होत्या.

हिंदूचे एक सर्वश्रेष्ठ तीर्थक्षेत्र पंढरपूर हे आदिलशहाच्या राज्यात होते. अफझलखानाच्या स्वारीपर्यंत म्हणजे इ.स.१६५८-५९ पर्यंत त्या देवालयाला मुसलमानांकडून कसलाही उपसर्ग झालेला नव्हता. पुरोहित वर्गाला धर्माचरण करण्यास स्वातंत्र्य होते. या वर्गाला मुसलमानांनी दिलेली वृत्ती पुढे शिवाजीनेही चालविली. हिंदूंच्या दैनंदिन जीवनात मुसलमांनाकडून विशेष हस्तक्षेप होत नसे. विशेषत: ग्रामीण जीवनावर तर मुसलमानी संस्कृतीचा कुठलाही प्रभाव पडलेला आढळत नाही. हिंदू-मुसलमान हे दोन समाज एकत्र नांदत असल्याने या दोन संस्कृतीचा परस्पर परिचय होणे स्वाभाविक होते. फारसी भाषा, आचार-विचार यांचा जसा मराठ्यांवर पगडा पडलेला होता, तसाच मुसलमानांवर हिंदू संस्कृतीचा प्रभाव पडलेला होता. मुसलमानांमध्ये देखील संत कवी निर्माण झाले होते. त्यांनी मराठीतून रचना केली होती. हुसेन अंबरखानची गीतेवरील मराठी टिका, शेख मुहम्मदाचा योग संग्राम इत्यादी ग्रंथ प्रसिध्द आहेत.

मुस्लिम लोक जितके येथील सामाजिक जीवनाशी समरस झाले होते, तितके पोर्तुगीज मात्र समरस झालेले नव्हते. सक्तीचे धर्मांतर हे त्यांच्या राज्याचे प्रमुख ध्येय होते. कारण गोव्यातील काही पूर्ण गावेच्या गावे त्यांनी ख्रिश्चन करून घेतली होती. ख्रिस्ती धर्मगुरूंनी काही प्रमाणात मराठीतून लेखन केले असले, तरी त्यांचे लिखाण हिंदूधर्माविषयी नव्हते. फादर स्टिफेनचा ख्रिस्ती पुराण हा मराठी धर्मग्रंथ ख्रिश्चन धर्माचा पुरस्कार करणारा होता.

महाराष्ट्र ही संताची भूमी म्हणूनही ओळखली जाते. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकाराम , रामदास आदी महान संतकवी या भूमीत होऊन गेले. परकीय राजवटीखाली आपला धर्म काहीसा संकटात आहे याची जाणीव त्यांना होती. मातृभाषेतून धर्माची शिकवण लोकांना देण्याचा उपक्रम त्यांनी केला. स्वधर्म रक्षणासाठी स्वराज्याची आवश्यकता आहे, याची जाणीव संतांनी जनतेला करून दिली होती. मुसलमान धर्माचा एकच पंथ म्हणजे सुफी पंथ. या पंथीयांनी काही धर्मस्थळांचा ताबा घेतला होता. महाराष्ट्रात मुसलमान जरी सामान्यत: सहिष्णू वृत्तीचे होते तरी त्यांनी काही मंदिराची नासधूस केली होती. उदाहरणार्थ पुणे जिल्ह्यातील घोडे या गावातील मशिदीतील शिलालेखात असे स्पष्ट म्हटले आहे की, मीर मुहम्मद इमान याने ३३ देऊळे तोडून या मशिदीचा पाया घातला होता. नाशिक येथे तर सुफींचा प्रभाव बराच होता. यामुळेच संतांना आपल्या धर्माची शिकवण देण्याची आवश्यकता भासली असावी. जाती जातीतील विषमता कमी करून मराठयांमध्ये ऐक्याची भावना निर्माण करण्याची महान कामगिरी या संतांनी केली होती. संतांची कामगिरी ही केवळ एका विशिष्ट वर्गापुरती मर्यादित नव्हती तर ती समाजातल्या सर्व थरांपर्यंत जाऊन पोहोचलेली होती. या त्यांच्या कार्यामुळेच शिवाजी महाराजांना स्वातंत्र्यांचे बीजारोपण करणे शक्य झाले.

प्राचीन काळापासून गाव व खेडे हे सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू

होते. काही साहसी लोकांनी स्वयंभूपणे अथवा राजाज्ञेवरून जंगले तोडून साफसफाई करून जमीन लागवडीस आणली असावी आणि त्यातूनच खेड्यांची वसाहत झाली असावी असे स्थुलमानाने म्हणता येईल. शेती हा प्रमुख व्यवसाय होता. खेडेगावात जे इतर लहान सहान व्यवसाय असत ते प्रामुख्याने शेतीव्यवसायाला पूरक असेच असत. जमीन हेच निर्वाहाचे प्रमुख साधन असल्याने ज्यांना गावात जमीन तेच गावचे प्रमुख रहिवाशी असत. यात प्रामुख्याने गावचे वंशपरंपरागत अधिकारी म्हणजे पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे,  महाजन, देशमुख, देशपांडे इत्यादी वतनदार मंडळी , जमीनीचे मालक ज्यांना मिरासदार म्हणून ओळखले जाई याशिवाय ग्रामसेवक अथव बलुतेदार यांचा यात समावेश होता. काही कामानिमित्त अथवा मोलमजूरी करून निर्वाहासाठी गावात येऊन राहिलेल्या लोकांना उपरी म्हणत.

समाजात चातुर्वर्ण्य व्यवस्था रुढ होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र हे प्रमुख वर्ण आणि मुसलमान व रानटी अनार्य असे हिंदूबाह्य दोन लोकसमूह होते. भारतावर जरी मुस्लिम शासकांची सत्ता होती तरी गावची वतनदार मंडळी ही स्वतंत्र व आपल्या मुलूखाचे मालक होते. आपल्याला अधिक वैभव प्राप्त व्हावे म्हणून ते यवनांची चाकरी करीत असत. पण अशा नोकरीमुळे गावच्या स्वामित्वास बाधा येत नसे. या काळात मराठा समाजातील दुसरा वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा होता. त्यांना मराठा कुणबी या नावाने सुध्दा ओळखले जात असे. हे शेतीखेरीज लष्करी चाकरीही करीत. त्यांना लष्करात मानाच्या जागाही मिळालेल्या होत्या. वैश्य वर्गातील लोक सामान्यत: व्यापार व शेतीव्यवसाय करीत व ते राजकारणात फारसा भाग घेत नसत. मराठा कुणब्यांखेरीज शुद्र कुणब्यांचा एक वर्ग समाजात होता. ते मोलमजुरीची व वाणिज्यादी कामे करीत असत. शहाजींच्या सैन्यात कुणब्यांचा भरणा अधिक होता.शेतीच्या मौसमात ही मंडळी शेतीच्या कामात व्यस्त असत व तदनंतर ते शिपाईगिरीच्या कामात मग्न होण्यात आनंद मानत असत.

१६ व्या शतकाच्या दुसऱ्या अर्धशतकात विजयनगरचे हिंदू शासकांचे  साम्राज्य नष्ट झाल्याने मराठ्यांना यवनांच्या चाकरीशिवाय अन्य मार्ग उरलेला नव्हता. महाराष्ट्रातही मुस्लिम समाजातही त्यावेळी तीन गट होते. त्यात पहिला गट हा इराण, तुराण,अरबस्तान व अफगाणिस्तान येथून येणारे अस्सल मुसलमान यांचा होता. याच अस्सल मुसलमानांचे संबंध येथील स्त्रियांशी येऊन जी मुसलमानी प्रजा निर्माण झाली तो दुसरा वर्ग म्हणून ओळखला जात होता. या वर्गातील मुसलमानांना दख्खनी म्हणून ओळखले जात असे. तर तिसरा वर्ग हा बाटलेल्या हिंदूंचा होता. ज्यांना जबरदस्ती, सत्ता, लालच व नाईलाजाने धर्म बदलावा लागला होता. या वर्गाला समाजात सातत्याने उपेक्षेची वागणूक मिळत होती. धर्म बदलल्यामुळे हिंदू त्यांच्याकडे तिरस्काराने पाहात तर मुसलमान हे त्यांना कमी प्रतीचे म्हणून त्यांची अवहेलना करीत. या तीन वर्गांपैकी पहिल्या दोन वर्गाचे  निजामशाही व आदिलशाहीच्या साम्राज्यात सातत्याने खटके उडत होते. त्यामुळे त्यांना पर्याय व प्रतिशह देणारा तिसरा पक्ष म्हणून मराठ्यांकडे पाहिले जात असे.

### १.२.३ मराठी संस्थानिक –

शिवपूर्वकालात महाराष्ट्रात छोटे छोटे संस्थानिक होते. रामनगर, बागलाण, जव्हार,

फलटण, जत, मुधोळ, सावंतवाडी, सौंधे, प्रभानवल्ली, श्रृंगारपूर, जावळी हे हिंदू व मराठा संस्थानिक शहाजीच्या काळात महाराष्ट्रात होते. मात्र मुसलमानी सत्तेला शह देण्याचे कार्य त्यांच्या हातून होत नव्हते. फलटण, जत, मुधोळ, जावळी, सावंतवाडी येथील संस्थानिक आदिलशाही, निजामशाही किंवा मुघलांकडे मनसबदार म्हणून चाकरी करीत होते. परंतू शहाजीला त्यांचे सहकार्य नव्हते. सौंधे, प्रभानवल्ली , श्रृंगारपूर ही संस्थाने डोंगराळ मुलूखात असल्याने मुसलमानी राजवटीचा त्यांना उपसर्ग होत नसे. ते एका अर्थाने स्वतंत्र राजे म्हणूनच वावरत असत. निजामशाही व मोगलांच्या सरहद्दीवरील रामनगर व बागलाण ही संस्थाने अत्यंत दुर्बल होती.

सर्व हिंदू संस्थानिकांनी एकत्र येऊन महाराष्ट्राचा राजकीय कारभार आपल्या हाती घेण्याची महत्त्वाकांक्षा यांच्यात नव्हती. आहे त्या परिस्थितीत समाधान मानण्याची जणू त्यांची वृत्ती होती. कित्येक वेळा तर त्यांची सत्ता नष्ट होऊ नये म्हणून मुस्लिम सत्ताधिकाऱ्यांकडून होणारा अपमानही ते निमुटपणे सहन करीत. मराठे संस्थानिकांवरच आपले अस्तित्व अवलंबून आहे , याची जाणीव ठेवून इस्लामी सत्ताधिशही त्यांना फारसे त्रास देत नसत. मराठे संस्थानिकांनाही त्यांचे वैभव नष्ट होईल अशी भिती सातत्याने वाटत असल्याने ते सहसा सत्ताधिशाच्या विरोधात वाकडे पाऊल टाकण्याची हिमंत करीत नसत . या सर्व कारणांमुळे त्यांचा फौजफाटा व सैन्य हे अत्यंत सुमार दर्जाचे बनलेले होते. अशा वेळी मराठी सत्तेच्या उदयाला एक नवी पहाट दिली ती शहाजी राजे भोसले यांनी.

## १.२.४ शहाजी राजे भोसले

शहाजींचे वडील मालोजी हे निजामशाहीचे मनसबदार होते .त्यांच्याकडे वेरूळ येथील पाटीलकी आणि देशमूखी होती. तसेच भीमा नदीच्या परिसरातही त्यांची वतनवाडी होती. मालोजी हे अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यांनी शिखर शिंगणापूरच्या शंभूमहादेवांच्या देवालयासाठी मोठा तलाव बांधला होता. इ.स.१६०६ मध्ये इंदापूर येथे झालेल्या लढाईत ते मृत्यु पावले होते. त्यांच्यानंतर शहाजी हे निजामशाहीच्या दरबारात मनसबदार म्हणून रूजू झाले. इ.स. १६२४ मध्ये मुघल आणि विजापूर यांच्या संयुक्त सेनेने निजामांवर आक्रमण केले. त्यावेळी भातवडी येथील युध्दात शहाजीने मोठा पराक्रम गाजविला होता. मात्र पुढे शहाजी राजेंचे निजामशाहीच्या सत्ताधिकाऱ्यांशी न पटल्याने त्यांनी आदिलशाहीच्या सेवेत जाणे पसंत केले.

आदिलशाही सेवेत त्यांना सरलष्कर हा मानाचा हुद्दा मिळाला होता. या ठिकाणी शहाजी राजांनी केवळ चार वर्षांचा काळ व्यतित केला नाही तोवर इ.स.१६२८ मध्ये दुसरा आदिलशाह याचा मृत्यु झाला व त्याच्यानंतर आदिलशाहीतील अंतर्गत दुफळी समोर आल्याने शहाजीराजांनी पुन्हा एकदा निजामशाहीच्या सेवेत जाणे पसंत केले. निजामशाहीत दाखल झाल्यानंतर त्यांनी विजापूराच्या विरोधातील मोहिमेत पुणे परगणा जिंकून घेतला. हाच पुणे परगणा पुढे मराठा साम्राज्याच्या उभारणीचा पाया ठरला.

शहाजीराजे निजामशाहीच्या सेवेत असतांनाच निजामशाहीने शहाजींचे सासरे लघुजी जाधव यांचा खून केल्याने शहाजीराजे नाराज होऊन इ.स.१६३० मध्ये मोगलांच्या सेवेत

जाऊन दाखल झाले. त्यावेळी त्यांना केवळ पंचहजारी मनसबदार म्हणून नियुक्ती मिळाली. ही मनसब त्यांच्या कर्तबगारीनुसार कमी दर्जाची असल्याने ते पुन्हा एकदा निजामशाहीच्या सेवेत परतले. यावेळी निजामशाहीची परिस्थिती बदलेली असल्याने येथे शहाजींच्या पराक्रमाला बराच वाव मिळाला. इ.स.१६३३ मध्ये त्यांनी अहमदनगर जवळच्या पेमगिरी येथे निजामशाहीतील एका अल्पवयीन वारसाला गादीवर बसविले व पुढे त्याच्या संरक्षणासाठी कोकणातील माहुली किल्ल्यावर त्याला योग्य संरक्षण दिले. या अल्पवयीन वारसदाराला संपविण्यासाठी मुगल व आदिलशाहीच्या सैन्याने या किल्ल्यावर हल्ला चढविला. पराक्रमाची शर्थ करुनही जेव्हा विजय शक्य नाही हे लक्षात आल्यावर शहाजी राजांनी मुगलांना शरण जाणे पसंत केले. यानंतर इ.स. १६३३ मध्ये मुगलांनी अहमदनगरचे राज्य खालसा केले. पर्यायाने शहाजी राजांना पुन्हा एकदा आदिलशाहीच्या सेनेत रूजू होणे भाग पडले.

## १.२.५ जिजाबाई –

शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व घडविण्यास ज्या दोन व्यक्ती महत्त्वाच्या होत्या, त्यात त्यांच्या मातोश्री जिजाबाई व कारभारी दादोजी कोंडदेव यांचा आवर्जून उल्लेख कराव लागतो. जिजाबाई या लघुजी जाधव यांच्या कन्या होत्या. अगदी बालवयात त्यांचा विवाह शहाजीराजांसोबत झाला होता. शहाजी राजांचे जीवन धावपळीचे असल्याने जिजाबाईच्या जीवनालाही स्थिरता प्राप्त झालेली नव्हती. अशाच धावपळीत शिवनेरी किल्ल्यावर इ.स.१६३० मध्ये शिवाजी महाराजांचा जन्म झाला होता. जुन्नरचे किल्लेदार हे शहाजींचे व्याही (संभाजीचे सासरे) होते. त्यांच्याजवळ जिजाबाईला ठेवून आश्रयाचे व संरक्षणाचे चांगले स्थान शहाजींनी निवडले होते. लघुजी जाधवांचा खून झाल्याने जिजाबाईचा माहेरचा आधारही तुटला होता. अशातच शहाजी राजांनी कर्नाटकात असतांना तुकाबाई या दुसऱ्या स्त्रीशी लग्न केले असल्याने त्यांच्या पतीचा सततचा मोठा आधारही त्यांच्यापासून काही प्रमाणात दूर गेला होता.

जिजाबाई वृत्तीने अत्यंत धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांनी अनेक गुणी लोकांना आश्रय देऊन त्यांना आपलेसे केले होते. त्या सातत्याने गुणी व सदाचारी लोकांचा आदर सत्कार करीत. जिजाबाईंना एकूण सहा मुले झाली होती. परंतु त्यातील शिवाजी व संभाजी ही दोनच मुले वंशवर्धक झाली. इतर चारही मुले अल्पायुषी ठरली होती. थोरला मुलगा संभाजी हा जाणता झाल्यावर शहाजीराजांसोबत राहू लागल्याने त्याचा सहवास कमी होत गेल्याने जिजाबाईंचा जीव शिवाजीभोवती केंद्रित झालेला होता आणि एक आई म्हणून ते स्वाभाविकही होते.

शहाजीराजे आदिलशाहीच्या सेवेत दाखल झाल्यानंतर जिजाबाई बाल शिवाजीसह पुण्यात वास्तव्यास राहू लागला. मधला काही काळ त्या बंगलोरला शहाजी राजांसोबतही होत्या. मात्र शिवाजी १२ वर्षांचे झाल्यानंतर मात्र त्या जणू पुण्यातच स्थायिक झाल्या. त्यांनीच शिवाजी महाराजांना नीतीमत्तेचे व शौर्य आणि कणखरतेचे धडे दिले होते. त्यांनीच शिवाजीला हिंदवी स्वराज निर्माण करण्याची प्रेरणा दिली होती. एवढेच नव्हे स्वराज्याच्या स्थापनेपासून ते राज्याभिषेकापर्यंत त्या शिवाजी महाराजांचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून भूमिकाही

बजावलेली होती.  शिवाजी महाराज आग्र्याला कैदेत असतांनाही  त्यांनीच स्वराज्याची सर्व सूत्रे समर्थपणे सांभाळलेली होती. मोगलांचे काबीज केलेले किल्ले परत घेण्याच्या कार्यामागे त्यांचीच प्रेरणा होती. अशा मराठी राज्याचे स्वप्न पाहून ते प्रत्यक्षात निर्माण करण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या जिजाऊंचे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या स्वप्नपूर्तीनंतर केवळ १२ दिवसातच निधन झाले होते.

## १.२.६ दादोजी कोंडदेव –

दादोजी कोंडदेव हे पाटस परगण्यातील मलठाणचे कुळकर्णी होते. शहाजींच्या जहागिरीच्या व्यवस्थेची जबाबदारी त्यांच्याकडे होती. इ.स.१६३६ च्या मोगल–आदिलशहा तहामुळे दक्षिणेत बराच काळ असलेला संघर्ष थांबून काही प्रमाणात शांतता निर्माण झाली होती. शहाजीच्या आग्रहाखातर विजापूर दरबाराने शहाजीला पुणे व सुपे या प्रांताची जहांगिरी दिली. मात्र आदिलशहाने कर्नाटकाच्या कामगिरीची जबाबदारी शहाजीच्या खांद्यावर टाकल्याने या जहागिरीची व्यवस्था पाहाण्यास शहाजीला शक्य नसल्याने त्यांनी या प्रांताची जबाबदारी दादोजी कोंडदेव यांच्याकडे सोपविली होती.

इ.स.१६३७ मध्ये दादोजींनी पुणे जहागिरीची व बाल शिवाजी आणि जिजाबाई यांच्या देखभालीची जबाबदारी स्वीकारली. शिवाजींचे लष्करी शिक्षण याच दादोजी कोंडदेवांच्या देखरेखीखाली झाले होते. इ.स.१६३०–१६३६ या काळात झालेल्या सततच्या युध्दांमुळे पुणे प्रांताची दुर्दशा झालेली होती. अशातच इ.स. १६३०–३१ मध्ये येथे मोठा दुष्काळ पडलेला होता. त्यानंतर विजापूरचा वजिर मुरार जगदेव याने या प्रांतावर स्वारी करून येथे धुळधाण उडविली होती. या साऱ्या परिस्थितीत दादोजी कोंडदेवसारख्या अनुभवी कारभाऱ्याने मात केली. इतकेच नव्हे तर शिवाजीसाठी एक वाडा बांधण्यासाठी जागा तयार करून एक नवी पेठ वसवली व त्यास शिवापूर हे नांव दिले. या गावाशेजारी मोठी आमराई लावून दादोजीने फळांची सुबत्ता केली.

दादोजी कोंडदेव यांनी  पुणे, इंदापूर, सुपे या शहाजींच्या परगण्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली होती. पुणे जहागिरीची जबाबदारी आल्यावर त्यांनी येथेही अमुलाग्र असा बदल घडवून आणला होता. शिवाजी जेव्हा बंगलोरहून परत आले, त्यावेळी दादोजींनी बारा मावळ प्रदेश आपल्या अधिपत्याखाली आणून त्यावर शिवाजीची सत्ता प्रस्थापित केली होती. अशा कर्तबगार दादोजींचा  मार्च १६४७ मध्ये  मृत्यु झाला. जिजाबाई आणि दादोजी कोंडदेव यांच्या प्रेरणा या शिवाजी महाराजांना स्वराज्याच्या उभारणीसाठी उपयुक्त ठरलेल्या होत्या.

## १.२.७ शिवाजींचे शिक्षण –

शिवाजींच्या काळात केवळ लिहून व वाचून शिक्षण घेणे एवढे क्षेत्र मर्यादित नव्हते. बौध्दिक शिक्षणासोबतच शारीरिक शिक्षण व लष्करी शिक्षणाचे धडे शिवाजीला मिळालेले होते. झाडावर चढणे,डोंगर चढणे, दऱ्याखोऱ्यात उड्या मारणे, कुस्ती खेळणे, घोड्यावर बसून रपेट मारणे , विविध प्रकारचे शस्त्रास्त्रे चालविणे यांचेही शिक्षण शिवाजीला मिळालेले

होते. शिवाजीला केवळ मराठी भाषाच नव्हेतर अनेक भाषा माहित असाव्यात असे दिसते. त्यांना फारसीचे ज्ञान होते. बालपणी काही काळ ते बंगरूळला गेल्यामुळे त्यांना कानडीचाही परीचय असावा असे वाटते. त्यांना हिंदी भाषा येत असावी.

शिवाजीच्या शिक्षणासंदर्भात कवी परमानंद यांनी 'शिवभारतात' नमूद केले आहे की, शिवाजी सहा वर्षाचा झाल्याबरोबर त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली गेली होती. त्यांना पंतोजीच्या मांडीवर बसवून अक्षरओळख करून देण्यात आली होती. शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे हे स्वत: विद्वान होते व विद्वानांचे आश्रयदाते सुध्दा होते. जयराम पिंडे, संगीत मकरंदकार देव इ. अनेक विद्वान शहाजीच्या पदरी होते. 'राधामाधवविलासचंपू' नुसार शहाजीच्या पदरी ७० विद्वान असल्याची माहिती मिळते. शहाजी स्वत: संस्कृत भाषेचे निष्णात होते. शहाजीचे ज्येष्ठ पुत्र संभाजी हे सुध्दा संस्कृतज्ञ होते. त्याचा परिणाम शिवाजी महाराजांवरही झालेला होता. शिवाजीही संस्कृत प्रेमी होते. त्यांची मुद्रा ही संस्कृत भाषेतच तयार करण्यात आलेली होती. त्यांनी सुध्दा अनेक कवींना आपल्या राज्यात आश्रय दिलेला होता.

शिवाजीच्या शिक्षणासंबंधी दोन मोठया इतिहासकारांनी फार मोठे गैरसमज निर्माण केले आहेत. शिवाजीच्या हस्ताक्षरातील अस्सल पत्र उपलब्ध झालेले नसल्याचा आधार घेत ग्रॅन्ट डफ व सर जदूनाथ सरकार या दोन इतिहासकारांनी शिवाजी निरक्षर होते, त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते असे प्रतिपादित केले आहे. मात्र तत्काळात कोणत्याही राजाने स्वत:च्या हाताने पत्र लिहिण्याची पध्दत नव्हती. दरबारात या कामी लेखनिक नियुक्त असत. त्यामुळे शिवाजी निरक्षर होते असे समजणे योग्य ठरणार नाही.

## १.२.८ शिवाजींचे बालपण-

शिवाजींच्या जन्माच्या वेळी शहाजी राजांना शिवनेरीवर उपस्थित राहाता आले नव्हते. शिवाजीची पहिली सहा-सात वर्षे शिवनेरी, पेमगिरी, माहुली इत्यादी ठिकाणी गेली. शिवाजीच्या लहानपणीच्या लीलांचे कवी परमानंदांनी शिवभारतात वर्णन केलेले आहे. शिवाजीचे बालपण पुण्यातल्या लालमहालात गेले. याच ठिकाणी मातोश्री जिजाबाईचे संस्कार या बालमनाला प्रेरित करीत होते. रामायण- महाभारताच्या कथांतून नीतीबोध होत राहिला. रामायणाच्या कथेतून, रामाच्या आदर्शातून आदर्श राजवटीविषयीचा विचार स्पष्ट होत गेला. लोककल्याणकारी राजा ही संकल्पना बाल वयातच त्यांच्या मनातच निश्चित रुप घेऊ लागली होती.

इ.स. १६४१ मध्ये शिवाजी जिजाबाईसह बंगळूरला गेले होते. याठिकाणी जवळपास एक वर्ष त्यांचे वास्तव्य होते. तद्नंतर १६४२ मध्ये शहाजींच्या परवानगीने शिवाजी पुन्हा पुणे व सुपे प्रांताकडे परतले. यावेळी पुणे आणि सुपे प्रांताच्या व्यवस्थेसाठी लागणारी आवश्यक मदत व विश्वासू गण शहाजीने शिवाजीसोबत दिले होते.

## १.२.९ शिवाजींचे मावळ प्रदेशावरील लक्ष -

शिवाजी पुण्यात येताच त्यांनी बारा मावळांचा प्रदेशाकडे त्यांचे लक्ष केंद्रित केले. बारा

मावळ म्हणजे त्याकाळी साधारणत: पुण्याच्या पश्चिमेकडे असलेली बारा खोरी होत. हा प्रदेश शहाजींच्या मूळ जहागिरीत समाविष्ट नव्हता. परंतु दादोजी कोंडदेव हे सुभेदार या नात्याने या प्रदेशाची व्यवस्था पाहात होते. दादोजीने या मुलुखाची उत्तम व्यवस्था केलेली होती. चोर-दरोडेखोरांचा बंदोबस्त करून लोकांना निर्भयता प्रदान केली होती. त्यामुळे या परिसरातील जनता दादोजींच्या कारभारावर खूश होती. याच मावळच्या प्रदेशातील हिरडस येथील देशमुख कृष्णाजी नाईक बांदल हा बंडखोरी करीत होता. त्यास दादोजीने शिक्षाही केली होती. त्यामुळे या प्रदेशातील देशमुखांची कर्तबगारी शिवाजींच्या लक्षात आली होती.

शिवाजीने जहागिरीच्या मुलुखातील बळकट व दुर्गम किल्ल्यांचे महत्त्व चांगलेच ओळखले होते. त्यांनी पडक्या व निरुपयोगी किल्ल्यांची डागडुजी करून प्रथम त्यांचा वापर सुरू केला. आपण नवीन काही वेगळे करीत नसून केवळ प्रदेशातील कारभाराच्या दृष्टीने आवश्यक तजविज करीत आहोत, असाच देखावा त्यांनी केला होता.

दुर्गम व डोंगराळ अशा या प्रदेशात स्वराज्याची पायाभरणी करता येईल अशी खूणगाठ याच वेळी शिवाजींनी मनात बांधली असावी व त्यातूनच त्यांनी बारा मावळ आणि आजूबाजूचे डोंगर व दऱ्या हे त्यांचे कार्यक्षेत्र असेल असे शिवाजींनी निर्धारीत केले असावे. याचाच परिणाम असा झाला की, मावळांतील मर्द मराठे शिवाजी भोवती जमू लागले. शेकडो वर्षांच्या पारतंत्र्याला मूठमाती देण्याचे वारे या प्रदेशात वाहू लागले. कान्होजी जेधे, दादाजी नरसप्रभू, येसाजी कंक, बाजी पालसकर, सुर्याजी काकडे असे किती तरी कर्तबगार तरूण शिवाजीं भोवती जमा झाले. किल्ले जिंकण्याची महत्त्वाकांक्षा शिवाजींच्या मनात निर्माण झाली.

तिकडे विजापूर दरबारात कारस्थानांना ऊत येऊ लागला होता. मोगल आणि आदिलशहा यांच्यामध्ये फारसे सख्य नव्हते. अशा परिस्थितीत नूतन राज्य निर्माण करण्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा शिवाजीसारख्या असामान्य कर्तृत्त्ववान पुरूषांत जागृत झाली असल्यास नवल नाही. अद्वितीय साहस आणि विलक्षण मुत्सद्देगिरी या गुणांच्या जोरावर शिवाजीने खंबीरपणे एक एक पाऊल पुढे टाकण्याचे योजले.

### १.२.१० स्वराज्य कार्यास प्रारंभ -

शिवाजींनी स्वराज्य कार्यास केव्हा प्रारंभ केला याच्या तपशीलात जाताना असे लक्षात येते की, शिवाजींनी प्रथम त्यांच्या जहागिरीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सरहद्दीवरील किल्ले जिंकून घेण्याचे धोरण स्वीकारले होते. मात्र दादोजी कोंडदेव यांच्या मृत्युपूर्वी शिवाजींनी एखादा किल्ला जिंकुन घेतला किंवा नाही, याबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाही. दि. ३० मार्च , १६४५ रोजी आदिलशहाने दादाजी नरसप्रभू यांना पाठविलेल्या फर्मानात रोहिडा किल्ला शिवाजींनी ताब्यात घेतल्याची माहिती आढळून येत असले, तरी हे फर्मान फारसे विश्वसनीय नसल्यामुळे शिवाजींनी रोहिडा किल्ला आपल्या अधिपत्याखाली आणला होता की नाही हे सांगणे कठीण आहे.

१७ एप्रिल, १६४५ ला दादाजी नरसप्रभू देशपांडेंना लिहिलेल्या शिवाजींच्या एका पत्रात पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो. ''श्रीरोहिडेश्वर तुमेच खोरियातील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रिलगत स्वयंभू आहे. त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे......हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे.'' छ. शिवाजीचा ध्येयवाद स्पष्ट करणाऱ्या या पत्रात हिंदवी स्वराज्याचा उल्लेख आढळतो. मात्र हे पत्र सुध्दा संशयास्पद असल्याचे इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांचे मत आहे. यासंदर्भात आपटे, शेजवलकर, ग.ह.खरे यांचेही असेच मत असल्याने इ.स. १६४५ मध्ये शिवाजींनी स्वराज्यकार्यास प्रारंभ केला होता हे दर्शविण्यारा दुसरा कोणताही पुराव उपलब्ध नाही. मात्र २८ जानेवारी १६४६ चे शिवाजीचे न्यायनिवाड्याविषयक एक पत्र उपलब्ध झाले आहे. या पत्रावर शिवाजी महाराजांची मुद्रा आढळते.

''प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता

शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते''

पत्राच्या अखेरीस मर्यादेयं विराजते ही दुसरी मुद्रा दिसून येते.

शिवाजींची ही मुद्रा म्हणजे त्याच्या स्वराज्य कार्याचा प्रारंभ झाल्याची साक्ष आहे. राज्यभिषेकानंतरही शिवाजी महाराजांनी हीच मुद्रा उपयोगात असल्याचे तत्कालीन कागदपत्रांवरून स्पष्ट होते. त्यामुळे १६४६ पासून शिवाजीच्या कार्याला प्रारंभ झाला असे मानता येते.

## १.२.११ नवी मोहीम–

दादोजी कोंडदेव यांच्या मृत्युनंतर शहाजींच्या जहागिरीची संपूर्ण जबाबदारी युवा शिवाजीकडे आली होती. यावेळी पुणे परगण्यात एकंदर २८८ गावे होती. शिवाय इंदापूर आणि सुपे हे दोन परगणे शहाजींच्या जहागिरीत मोडत होते. आपले कार्य सुकर व निष्कटंक होण्याच्या दृष्टीने जहागिरीच्या सरहद्दीवरील किल्ले ताब्यात घेतले पाहिजेत असा विचार शिवाजीने केला असावा. किल्ल्याशिवाय जहागिरीला सुरक्षितता लाभणे अशक्य होते. कारण किल्ल्याचे अधिकारी हे शहाजीचे नोकर असले तरी त्यांच्यावर सरळ अधिकार हा आदिलशहाचा होता.

महाराष्ट्राचा मुलूख आपल्या अधिपत्याखाली आणावयाचा असल्यास त्या मुलुखातील किल्ले आपल्या ताब्यात असले पाहिजे हे शिवाजींनी पूर्णपणे ओळखले होते. जहागीर जरी असली तरी त्या जहागीरीतील किल्ले मात्र पादशहाच्या ताब्यात असत. तेव्हा प्रथम आपण किल्ले काबीज केले पाहिजेत असे शिवाजींनी ठरविले. किल्ले जिंकण्यासाठी शिवाजीचे धोरण वैशिष्ट्यपूर्ण होते. किल्लेदाराला वश करून, रक्ताचा थेंब न सांडता किल्ले ताब्यात घेण्याचे धोरण त्यांनी अंगीकारले होते. पुण्याचा हवालदार बापूजी मुदगल नऱ्हेकर आणि सिंहगडचा किल्लेदार सिध्दी अंबर यांच्याशी स्नेह जोडून शिवाजींनी कोंढाणा उर्फ सिंहगड हा किल्ला ताब्यात घेतला.

इ.स.१६४७ मध्ये त्यांनी पुरंदरचा किल्लाही मोठ्या कौशल्याने आपल्या अधिपत्याखाली

आणला होता. हा किल्ला जिंकतांना पुरंदरचा किल्लेदार निळकंठराव याच्या मृत्युनंतर त्याच्या तीन मुलांमध्ये निर्माण झालेल्या भांडणाचा शिवाजीने लाभ घेतला होता. पुरंदर ताब्यात आल्यावर शिवाजींनी  त्या तिघा भावांना चांबळी गाव इनाम देऊन त्यांचा सन्मान केला व त्यांच्याशी सख्य जोडले होते. अशा प्रकारे केवळ युक्ती प्रयुक्तीच्या जोरावर शिवाजीने सिंहगड व पुरंदर हे दोन महत्त्वाचे किल्ले ताब्यात घेतले. ही हकीकत कळल्यावर आदिलशहाला शिवाजीच्या हेतूविषयी शंका आली. कदाचित या कृत्यामागे शहाजींचाच हात असावा, असा संशयही आदिलशहाच्या मनात निर्माण झाला होता.

शहाजींविषयी आदिलशहास संशय येण्याचे आणखी एक कारण होते. खुद्द शहाजी आदिलशहाच्या नोकरीस कंटाळलेले होते. डिसेंबर १६४७ मध्ये त्यांनी  गोवळकोंड्याच्या कुतुबशहास पत्र लिहून कुतुबशाहीत सेवेत येण्याचा मानस व्यक्त केला होता. स्वत: कुतूबशहाने ही हकिकत आदिलशहास कळविली होती. त्यामुळे आदिलशहाचा जळफळाट झाला होता. एका बाजूने शहाजीच्या या हालचाली व दुसऱ्या बाजूने शिवाजीने स्वीकारलेले आक्रमक धोरण हे आपल्याला तापदायक होईल याची कल्पना आदिलशहास आली होती. त्यामुळे शहाजीला पकडून आणण्यासाठी आदिलशहाने मुस्ताफाखान व बाजी घोरपडे यांना पाठविले.

## १.२.१२ शहाजी राजांना अटक व शिवाजींच्या विरोधातील मोहीम –

२५ जुलै , १६४८ रोजी जिंजीजवळ शहाजीराजे  बेसावध असताना मुस्ताफाखानाने त्यांना पकडले. कर्नाटकातच काही दिवस कैदेत ठेवल्यानंतर अफझलखानाने शहाजींच्या पायात बेड्या घालून त्यांना विजापूरला आणले.  शहाजीला कर्नाटकात कैद केल्यानंतर आदिलशहाने शहाजीची दोन्ही मुले संभाजी व शिवाजी यांच्याविरूध्द सैन्य पाठविण्याचा निर्णय घेतला. जणू शिवाजीच्या या आक्रमक हालचालीबद्दल भोसले घराण्यालाच धारेवर धरण्याचा पवित्रा आदिलशहाने घेतलेला होता.

आदिलशहाच्या आदेशानुसार फत्तेखान हा सरदार शिवाजीं विरूध्द चालून आला. त्याने प्रथम खळदबेलसर हे ठिकाण हस्तगत करून तेथे तळ ठोकला. तेथून बाळाजी हैबतराव याला पुरंदरकडे रवाना केले. या वेळी शिवाजी महाराज पुरंदर किल्ल्यावर वास्तव्यास होते. बाळाजी हैबतराव शिरवळ या गावापर्यंत आल्यानंतर त्याने येथील गढीत त्यांच्या सैन्याच्या मुक्कामाची योजना आखली. मात्र शिवाजींचे सेनापती कावजी मल्हार याने या गढीत मुक्कामी असलेल्या बाळाजीच्या सैन्यावर हल्ला चढविला. यावेळी कावजी बरोबर भिमाजी वाघ, गोदाजी जगताप, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर असे नामांकित मराठे सरदार होते. शिरवळ येथे झालेल्या लढ्याचा रोचक वृत्तांत शिवभारतकारनी नमूद करून ठेवला आहे. या लढ्यात बाळाजी हैबतराव ठार झाला आणि मराठ्यांनी आदिलशहाविरोधात पहिला विजय संपादन केला.

बाळाजी हैबतराव ठार झाल्याचे समजताच स्वत: फत्तेखान मोठ्या त्त्वेषाने पुरंदरच्या दिशेने निघाला. त्याच्यासमवेत मुसेखान, फलटणचे निंबाळकर, घाटगे इत्यादी मातब्बर सरदार होते. फत्तेखानचे सैन्य पुरंदरच्या पायथ्याशी येताच शिवाजीच्या लोकांनी गडावरून

जबरदस्त मारा सुरू केला. फत्तेखानाच्या सैन्याने प्रतिहल्ला करण्याचा निकराने प्रयत्न केला. या चकमकीत मुसेखान ठार झाला. त्यामुळे पुरंदर किल्ला जिंकणे दुरापास्त आहे हे ओळखून स्वत: फत्तेखानाने पळ काढला. पर्यायाने हर्षित झालेल्या मराठ्यांनी आदिलशाही सैन्याचा बेलसरपर्यंत पाठलाग केला. या लढ्याचा वृत्तांत शिवभारत या समकालीन ग्रंथात असल्याने तो एक विश्वसनिय पुरावा गणला जातो.

शिवाजींना नेस्तनाबूत करण्यासाठी आलेल्या फत्तेखानची पूर्ण फजिती झाली होती तर तिकडे बंगलोरलाही आदिलशाही सेनेच्या पदरी अपयशच आले. आदिलशहाने फरहादखान आणि तानाजी दुरे यांना शहाजींचा थोरला मुलगा संभाजी याच्याविरूध्द सैन्यासह पाठविले होते. परंतू संभाजीने पराक्रमाची शर्थ करून त्यांना माघारी पिटाळून लावले होते.

आदिलशहाच्या फौजेचा पराभव केल्यानंतर आदिलशहाच्या अटकेत असलेल्या शहाजी राजांच्या सुटकेसाठी शिवाजींने स्वतंत्रपणे प्रयत्न सुरू केले. यावेळी मोगलांचा दक्षिणेचा सुभेदार म्हणून मुराद हा कार्यरत होता. शिवाजींनी त्याच्याशी संधान बांधण्याचा प्रयत्न केला. मुरादकडून आदिलशहावर दडपण आणावयाचे व शहाजीची सुटका करावयाची अशी शिवाजीची भूमिका होती. परंतु प्रत्यक्षात मुराद आणि शिवाजी यांच्यामधील बोलणी पूर्ण होण्यापूर्वीच आदिलशहाने शहाजीची सुटका केली.

शहाजीसारख्या बलाढ्य सरदाराला फार दिवस कैदेत ठेवणे शहाणपणाचे ठरणार नाही, याची जाणीव आदिलशहाला होती.कारण शहाजीसारख्या प्रबळ सरदाराबाबत आदिलशाहीच्या दरबारातील इतर काही मराठे सरदार या प्रकरणामुळे नाराज झाले होते. किंबहुना ज्या पध्दतीने बेड्या घालून मुस्तफाखान आणि अफझलखान यांनी शहाजींना विजापूर दरबारात हजर केले तेही आदिलशहास आवडले नव्हते. मुस्तफा आणि अफझल यांनी केलेले अपराध माझेच आहेत असे आदिलशहा शहाजींना म्हणाल्याची नोंद शिवभारतने केली आहे. शहाजीच्या सुटकेसाठी कोंढाणा, बंगलोर व कंदर्पी हे तीन किल्ले आपल्या ताब्यात द्यावेत, अशी अट आदिलशहाने घातली. ही अट संभाजी आणि शिवाजी यांनी मान्य करून शहाजींची सुटका करुन घेतली. बंगलोर व कंदर्पी हे किल्ले शहाजीच्या कर्नाटक जहागिरीमधील होते. संभाजीने ते देण्याचे कबूल केले. कोंडाणा किल्ला मात्र शिवाजीने मोठ्या कौशल्याने हस्तगत केला असल्यामुळे हा दुर्गम किल्ला आदिलशहाच्या ताब्यात देतांना शिवाजी अस्वस्थ झाले होते. परंतू या अवघड प्रसंगात एक पाऊल मागे घेतल्याशिवाय पर्याय नव्हता.

पुण्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोंढाणा किल्ल्याचे महत्त्व असाधारण होते.त्यामुळे हा किल्ला शिवाजीकडून मागून घेण्यात आदिलशहाची निश्चितच दूरदृष्टी होती. यामुळे शिवाजींच्या हालचालींना प्रतिबंध करण्यासाठी शहाजींना कैद करणे किंवा त्याच्यावर दडपण आणणे हा हुकूमी उपाय आपल्याजवळ आहे याची आदिलशहाने याप्रसंगी खातरजमा करून घेतली असावी.

शिवाजी महाराजांनाही हा सौदा तसा महागात पडला नाही. कारण कोंढाणा गेला तरी पुरंदर त्यांच्या अधिपत्याखाली होता. पुढील हालचाली करण्याच्या दृष्टीने दुर्गम अशा

पुरंदरचा आश्रय शिवाजीला उपयुक्त ठरणार होता. शिवाजीच्या महत्त्वाकांक्षी वृत्तीची आदिलशहास कल्पना आलेली होती. म्हणून शहास प्रतिशह या दृष्टीने पुणे परगण्यास लागून असलेल्या वाई प्रांताची सुभेदारी आदिलशहाने अफझलखानास दिली. दरम्यान पुणे परगण्यालगतच असलेल्या जावळीच्या खोऱ्यात एक नवीन समरप्रसंग उदभवला.

### १.२.१३ जावळीचे चंद्रराव मोरे प्रकरण –

जावळीच्या प्रदेशावर दौलतराव मोरे यांचा अंमल होता. या मोरे घराण्यातील कर्ते पुरूष चंद्रराव हा पिढीजात किताब धारण करीत. म्हणून जावळीचे मोरे चंद्रराव मोरे या नावानेच इतिहासात ओळखले जातात. शिवाजींनी स्वराज्यकार्यास प्रारंभ केला, त्यावेळी दौलतराव मोरे निपुत्रिक मृत्यु पावले . त्यामुळे त्याच्या पत्नीने शिवतरकर मोऱ्यापैकी यशवंतराव यास दत्तक घेऊन जहागीरीचा ताबा घेतला. शिवाजींनी या दत्तक पुत्रास पाठिंबा दिला. जावळीच्या मोरे घराण्यातील इतर पुरूषांपैकी काहींनी यशवंतरावांचा अधिकार अमान्य करून जहागिरीसाठी भांडण उकरुन काढले.

याच सुमारास अफजलखान वाईचा सुभेदार झालेला होता.जावळीच्या प्रदेशात शिवाजींचे वर्चस्व वाढू नये म्हणून अफझलखानाने यशवंतरावांची जहांगिरी हिसकावून घेण्याचा घाट घातला. स्वत: यशवंतराव मतलबी वृत्तीचा असल्यामुळे शिवाजींपेक्षा आदिलशाहीशी नमून वागणे त्याने मान्य केले. आपण शिवाजींचे शत्रू आहोत असे भासविण्यास त्याने सुरूवात केली. ही गोष्ट लक्षात येताच अफझलखानाने त्याचा विचार बदलला आणि यशवंतरावाला उत्तराधिकारी म्हणून मान्यता दिली. पुढे इ.स. १६५५ मध्ये आदिलशहाने कर्नाटकातील अंदाधुंदी दूर करण्यासाठी अफझलखानाला कनकगिरीला पाठविले.

इकडे जावळीत राहून शिवाजींच्या मार्गात विघ्ने आणण्याचा प्रयत्न यशवंतराव करू लागला. शिवाजींचा सहकारी असलेल्या सिलिंबकर देशमुखांशी यशवंतरावाने गुंजण मावळच्या देशमुखीवरून वाद उकरुन काढला. वेगवेगळे निमित्त करून त्याने शिवाजींच्या मुलूखातही हल्ले करण्यास कमी केले नाही. इतकेच नव्हे तर शिवाजींच्या प्रदेशातील गुन्हेगारांनाही आश्रय देण्यामध्ये त्याने पुढाकार घेतला. आपल्या सहकार्याच्या बळावर चंद्रराव बनलेल्या या मोऱ्यांची कृतज्ञता पाहून शिवाजींना चिड येणे स्वाभाविक होते. अशातच मोसे खोऱ्यातील गाव कुलकर्णी रंगो त्रिमल याने सिंदळकी केल्यामुळे शिवाजीने त्यास शासन देण्याचे ठरविले. मात्र रंगो त्रिमल हा चंद्ररावाच्या आश्रयाला गेला. असे प्रकार वारंवार वाढू लागल्याने आता यशवंतरावाचे पारिपत्य केल्याशिवाय पर्याय नाही याची शिवाजींना खात्री पटली.

जावळी प्रदेशाची चारी बाजूंनी कोंडी करण्याचे ठरवून शिवाजींनी , जेधे, सिलींबकर इत्यादी देशमुख व संभाजी कावजी महालदार यांची या कार्यासाठी नेमणूक केली. शिवाजींच्या लोकांनी चारी बाजूंनी हल्ला केलेला पाहून यशवंतराव त्याच्या बाजी व कृष्णाजी या दोन मुलांसह रायरीच्या किल्ल्याकडे पळून गेला. त्यामुळे जानेवारी १६५६ मध्ये जावळी शिवाजींच्या अधिपत्याखाली आली. त्यानंतर शिवाजींचे सैन्य चंद्ररावच्या पाठलागावर रायरीकडे गेले. रायरी हा अत्यंत दुर्गम किल्ला असल्यामुळे जवळजवळ तीन महिने यशवंतरावाने

शिवाजींच्या सैन्याला दाद दिली नाही. मात्र शेवटी त्याने हतबल होऊन सिलींबकर देशमुखांमार्फत शिवाजींसोबत तह केला आणि याच तहानूसार रायरीचा किल्ला हा मे, १६५६ मध्ये शिवाजींच्या अधिपत्याखाली आला.

यशवंतरावाने रायरीच्या तहानूसार वरकरणी शिवाजींशी जरी सख्य जोडले होते , तरी आतून तो शिवाजींचा द्वेष करीत असे. अशातच मुधोळकर घोरपड्यांशी संधान बांधून त्याने शिवाजीं विरूध्द हालचाली सुरू केल्या. आता चंद्ररावांना क्षमा करणे व त्याच्या या कृत्यांकडे दुर्लक्ष करणे आपल्यालाच घातक ठरेल हे लक्षात घेऊन शिवाजींनी २७ ऑगस्ट, १६५६ रोजी यशवंतरावास ठार केले. अशाप्रकारे शिवाजीने यशवंतरावाचे पारिपत्य करून जावळीवर वर्चस्व मिळविले.

जावळीच्या खोऱ्यावर वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे शिवाजींचा दरारा वाढणे स्वाभाविकच होते. रायरीचा बळकट किल्ला अधिपत्याखाली आल्यामुळे कोकणातील महाड वगैरे भागावर वर्चस्व गाजविण्याची संधी शिवाजींना प्राप्त झाली. याचाच परिपाक म्हणजे शिवाजींच्या प्रदेश विस्ताराला या जावळी प्रकरणापासून प्रारंभ झाला.प्रथमत: शिवाजींनी जावळी भागातील लोकांचा विश्वास संपादन करण्यात यश प्राप्त केले. त्यानंतर त्यांनी पार घाटाजवळ प्रतापगड या नावाचा नवा किल्ला निर्माण करून शिवाजींनी एकाप्रकारे जावळी खोऱ्याला संरक्षण प्रदान केले.

जावळी हस्तगत केल्यानंतर ९ सप्टेंबर, १६५६ रोजी शिवाजींनी संभाजी मोहितेकडून वडिलोपार्जित सुपे परगणा घेतला. भविष्यात आदिलशहा आणि मोगल या दोन बलाढ्य सत्ताधिशांशी संघर्ष होऊ शकतो याचे भान ठेवत शिवाजींनी सावधगिरीचे राजकारण सुरू केले होते. जावळीचा मुलूख ताब्यात आल्यामुळे घाटमाथ्याप्रमाणे कोकणपट्टीचा काही भाग शिवाजींच्या स्वराज्यात समाविष्ट झाला होता. त्यामुळे शिवाजींच्या राज्याची सरहद्द थेट समुद्रापर्यंत जाऊन भिडली. यावेळी पश्चिम किनाऱ्यावर जंजिऱ्याचा सिध्दी जौहर आणि गोव्याचे पोर्तृगिज यांचे वर्चस्व होते. इंग्रज, फ्रेंच आणि डच या पाश्चात्यांच्या व्यापारी वखारीही पश्चिम किनाऱ्यावरील मोक्याच्या बंदरात होत्या. शिवाजींचा राज्यविस्तार समुद्रापर्यंत झाल्यामुळे या परकीय व्यापाऱ्यांशी आणि गोवेकर पोतृगिज व जंजिऱ्याच्या सिध्दी यांच्याशी संबंध येणे अपरिहार्य होते.

शिवाजींनी चंद्रराव मोरे यांचे परिपात्य केल्याची गंभीर दखल विजापूरकरांनी घेतलेली नव्हती. कारण तसा चंद्रराव मोरे हा आदिलशाहीशी फटकून वागत होता तर वाईचा सुभेदार अफझलखान हा तेरदळकडे मोहिमेवर गेलेला होता. त्यामुळे परस्पर चंद्ररावांचा काटा निघाला अशी समजूत आदिलशाहने करून घेतलेली असावी. तसेच यावेळी महंमद आदिलशहा हा असाध्य आजाराने बिछान्यावर खिळलेला होता. त्यामुळे आदिलशाही दरबारात अंतर्गत दूही माजलेली होती.याचा फायदा घेत शिवाजीने जावळीचे प्रकरण साध्य केले होते.

## १.२.१४ जावळी विजयाचे परिणाम –

जावळी विजयाचे अतिशय दुरगामी परिणाम शिवाजीच्या कर्तबगारीवर झाल्याचे

आपणांस  पुढील इतिहासाच्या अध्ययनावरून लक्षात येते. आपणाला न मानणाऱ्या व विरोध करणाऱ्या माणसाशी कसे वागावे याची चुणूकच या निमित्ताने शिवाजींनी दाखवून दिली होती. स्वराज्याला केलेला विरोध व शत्रूशी हातमिळवणी या गोष्टी कधीही सहन केल्या जाणार नाहीत व या गोष्टी घडून आल्यास अत्यंत कडक शासन केले जाईल, हेच या कृतीने शिवाजींनी स्पष्ट केले होते.

जावळीच्या मोऱ्यांचे राज्य शिवाजीच्या अधिपत्याखाली आल्याने त्यांच्या मुलूखाच्या सीमा विस्तारल्या गेल्या. किंबहुना दक्षिण व पश्चिमेकडे जाण्याची वाट या निमित्ताने खुली झाली होती. राज्य वृध्दीपेक्षा स्वराज्य संरक्षणाच्या दृष्टीनेही या मुलुखाला विशेष असे महत्त्व होते. देशातून कोकणात जाण्याचे घाटमार्ग व खिंडी ताब्यात आल्याने वाहतूकीवर व व्यापाऱ्यावर नियंत्रण बसवता आले. त्यातून उत्पन्नाचा एक नवा मार्ग खुला झाला. यासोबतच शिवाजींच्या अधिपत्याखालील प्रदेशाची सीमा थेट समुद्रापर्यंत जाऊन भिडली. त्यातून त्यांचा इंग्रज, पोर्तृगीज, डच इत्यादी परकीयांशी संबंध आला. त्याचा सकारात्मक परिणाम असा झाला की , शिवाजींना नाविक दल उभारण्याची यातून उर्मी प्राप्त झाली. इतकेच नव्हेतर जावळीच्या राज्यात पिढ्यान् पिढ्या साचत आलेली मोठी संपत्ती शिवाजींच्या ताब्यात आली. पुढे याच पैशाच्या जोरावर त्यांना आपल्या सैन्याची वृध्दी करता आली व त्यातून संरक्षण व्यवस्था अधिक दृढ करणे त्यांना शक्य झाले. याच जावळी विजयाचा एक परिणाम म्हणजे शिवाजींनी  पारघाट व रणतोंडी घाट निभेद्य  राहावा म्हणून घाटाच्या टोकावर प्रतापगड या नवीन किल्ल्याच्या उभारणीची जबाबदारी त्यांनी मोरोपंत पिंगळे यांच्यावर सोपविली. हाच प्रतापगड पुढे शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला उभारी देणारा ठरला.

१६५३ मध्ये मोगल बादशहा शहाजहान याचा पुत्र औरंगजेब हा दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला असला तरी मराठ्यांच्या किरकोळ उपद्व्यापेक्षा त्याने आदिलशाही आणि कुतुबशाही गिळंकृत करण्याकडे अधिक लक्ष दिलेले होते. जावळीची व्यवस्था लावल्यानंतर शिवाजींनी  कर्नाटकावर स्वारी करण्याचा धाडसी बेत आखला. त्याप्रमाणे इ.स. १६५६ च्या नोव्हेंबर महिन्यात शिवाजींनी कर्नाटकात भरारी मारली. नेमक्या याच सुमारास म्हणजे ४ नोव्हेंबर, १६५६ रोजी महंमद आदिलशहाचा मृत्यु झाला. त्याच्या जागी आलेल्या अली आदिलशहाने इसलासखान याची नेमणूक करून शिवाजीच्या कर्नाटकातील हालचालींना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला असता तरी शिवाजींनी  इ.स. १६५८-५९ मध्ये कर्नाटकावर स्वारी करून आदिलशाहीपुढे जरब निर्माण केली होती.

कोकण प्रांतात कुडाळ येथे लखम सावंत हा देसाई होता. आदिलशहाचे स्वामित्व त्याने मान्य केलेले होते. परंतु त्याची वृत्ती बंडखोरीची असल्यामुळे वेळ पडल्यास तो आदिलशाहीची ताबेदारी झुगारून स्वतंत्रपणे वर्तन करीत असे. आदिलशहाने कोकण प्रांताची व्यवस्था लावण्यासाठी रुस्तुमजा याची नेमणूक केली होती. कोकण प्रांतावर नेमणूक होताच रुस्तुमजाने लखम सावंताचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेतले. कुडाळकर सावंतांनी निकराचा प्रतिकार सुरू केला. परंतु रुस्तुमजापुढे त्यांना माघार घ्यावी लागली. सावंताच्या ताब्यातील रांगणा किल्ला घेऊन रुस्तुमजाने त्याची  पकड अधिक दृढ केली.

तेव्हा शिवाजींचे साह्य घेण्याचा विचार सावंताच्या मनात आला. मराठा तितुका मेळवावा या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या शिवाजींना ही सुवर्णसंधी वाटली. त्यामुळे त्यांनी सावंताच्या मदतीसाठी आपले सैन्य पाठविले व त्यांचा गेलेला मुलुख परत मिळवून दिला. पुढे याच लखम सावंताने ५ मार्च, १६५९ रोजी शिवाजीशी तह करून शिवाजीचे स्वामित्व मान्य केले.

## १.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. शिवाजी पूर्व काळातील सामाजिक व धार्मिक स्थितीबाबत विवेचन करा.

२. शहाजीराजे यांच्याबाबत माहिती लिहा.

३. शिवाजींचे बालपण व शिक्षणाबाबत माहिती द्या.

४. स्वराज्य निर्मितीतील शिवाजींच्या प्रारंभिक हालचालींचा वेध घ्या.

५. जावळीचे मोरे प्रकरण व त्यातून शिवाजीला झालेला फायदा याबाबत विवेचन करा.

## १.४ सारांश

अत्यंत प्रतिकुल परिस्थितीला सामोर जाऊन शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची मुहर्तमेढ रोवली असल्याचे आपल्याला वरील विवेचनावरून लक्षात येते. विजयनगर सारख्या सामर्थ्यशाली सत्तेच्या अस्तानंतर पुन्हा एकदा हिंदूचे साम्राज्य त्यांनी दक्षिणेत उभे

केले होते. निजामशाही व आदिलशाहींशी सातत्याने संघर्षाची भूमिका घेतली तर कधी सामोपचाराचे धोरण स्वीकारीत दोन पाऊले मागे येण्याचा समंजसपणा ही त्यांनी दाखवून दिला होता. साम दाम दंड भेद ही निती अवलंबून त्यांनी मावळ व जावळीच्या प्रांतावर वर्चस्व निर्माण करून मराठी साम्राज्याला संरक्षण प्रदान करण्याचा प्रयत्न केला होता. इतकेच नव्हेतर शहाजीराजेंच्या मनात असलेल्या स्वराज्याची मुहर्तमेंढ महाराष्ट्राच्या भूमीत उभारून त्यांनी त्या स्वराज्याच्या कार्याला मोठी भरारी दिलेली होती. आई जिजामाता, दादोजी कोंडदेव यांच्यासह त्यांच्या शब्दाला मान देत मराठी स्वराज्याच्या निर्मितीसाठी मिळालेले मावळ प्रांतातील युवा शूर सहकारी यांच्या बळावर शिवाजीला मराठी साम्राज्याची मुहर्तमेढ रोवता आली आणि इतिहासाच्या एका नव्या पर्वाला या निमित्ताने सुरूवात झाल्याचे आपल्याला पाहाता येते.

## १.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. मराठ्यांचा इतिहास | – | संपादक अ.रा. कुलकर्णी व ग.ह. खरे |
| २. मराठ्यांचा इतिहास | – | अ.रा. कुलकर्णी व प्र.न. देशपांडे प्र.न. |
| ३. मराठेकालीन संस्था व विचार | – | प्राचार्य आर.डी.गायकवाड व इतर |

## १.६ पारिभाषिक शब्द –

फेरिस्ता – मोगलांच्या दरबारातील नोंदी घेणारा तथा गुलशने इब्राहिम या ग्रंथाचा लेखक

बहामनी साम्राज्य – दक्षिणेतील मुसलमानी सत्ता , हसन गंगू बहामनी हा संस्थापक

कानडी – कर्नाटक प्रांतात बोलली जाणारी भाषा

बारा मावळ – पुण्याच्या पश्चिमेकडे असलेली बारा दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश

## १.७. संदर्भ सूची


१. महाराष्ट्र संस्कृती , सहस्त्रबुध्दे पु.ग. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९४

२. मध्यकालीन भारत, सतीशचंद्र, ओरियंन्ट ब्लैकस्वॉन, नवी दिल्ली , २०१०

३. मध्ययुगीन भारत, आचार्य कृ.अ. व आपटे भा.कृ. , साहित्य प्रसार केंद्र, नागपूर , १९७८

४. मध्यकालीन भारत, संपादक हरिश्चंद्र वर्मा, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २००७

५. मध्ययुगीन भारताचा इतिहास , देशमुख मा.म., विश्वभारती प्रकाशन, नागपूर, १९९८

६. छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, प्रमुख संपादक, डॉ.जयसिंगराव पवार, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, २०११

७. मराठ्यांचा इतिहास, संपादक कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१०

८. मराठ्यांचा इतिहास, कुलकर्णी अ.रा. व देशपांडे प्र.न. ,स्नेहवर्धन पब्लिशिंग, पुणे - १९९९

९. मराठेकालीन संस्था व विचार , प्राचार्य गायकवाड आर.डी. व इतर, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर, १९८७

१०.महाराष्ट्राचा सामाजिक- सांस्कृतिक इतिहास, प्रा.शेणोलीकर ह.श्री व देशपांडे प्र.न. , के सागर प्रकाशन, पुणे , २००६

११.रायगडची जीवनकथा, आवळसकर शांताराम विष्णू , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई -२००८

१२.युगद्रष्टे छत्रपती शिवाजी, कुलकर्णी गो.रा., श्रीसंत सीतारामबुव वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण, २००२

१३.शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास , सुभाष पाटील व इतर, पुनम प्रकाशन, कंधार, २०११

१४.छत्रपती श्री शिवाजी महाराज, कदम रा.आ. राजमयूर प्रकाशन, पुणे, २००६

# घटक २

# शिवाजीचे आदिलशाहीराज्याशी संबंध

**अनुक्रमणिका**

**२. ० घटकाची उद्दिष्टे**

**२. १ प्रस्तावना**

**२. २ विषय विवेचन**

**२. २. १ – शिवाजीचे आदिलशाही राज्याशी संबंध**

**२. २. २ – जावळी प्रसंग**

**२. २. ३ – अफझलखान मोहिम**

**२. २. ४ – सिध्दी जौहरची पन्हाळा मोहिम**

**२. ३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम**

**२. ४ सारांश**

**२. ५ पारिभाषिक शब्द शब्दार्थ**

**२. ६ संदर्भसूची**

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१.शिवाजींनी जावळी प्रदेशावर का स्वारी केली ते अभ्यासता येईल.

२.जावळी पेचप्रसंग समजून येईल.

३.जावळी विजयाचे महत्व विशद करता येईल.

४.आदिलशाही दरबाराने शिवाजी विरोधात अफजलखानाची नियुक्ती का केली ते समजेल.

५.अफजलखान पेचप्रसंग अभ्यासता येईल.

६.अफजलखान पेचप्रसंगाचे परिणाम सांगता येतील.

७.मराठयांच्या इतिहासातील अफजलखान पेचप्रसंगाचे महत्व समजेल.

८.सिध्दी जौहरची पन्हाळा मोहिम अभ्यासता येईल.

९.शिवाजींनी पन्हाळा किल्यावरून कशी सुटका करून घेतली हे समजेल.

## २.१ प्रस्तावना

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महत्वपूर्ण घटना म्हणून मराठा सत्तेच्या स्थापनेकडे पाहिले जाते. शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन मराठयांनी स्वतंत्र राज्य स्थापन केले. स्वतंत्र राज्य स्थापनेची सुरूवात तोरणा किल्ला जिंकून शिवाजींनी केली. आदिलशाही सत्तेच्या उत्तरेकडील प्रदेश म्हणजे पुणे, सुपे, चाकण व इंदापूर हे प्रदेश महंमद आदिलशहाने शहाजींना जहागिरी म्हणून दिला होता. पण आदिलशहाने बंगलोर व आसपासचा प्रदेश शहाजींना अगोदरच दिला होता. त्यामुळे शहाजींचे वास्तव्य बंगलोरलाच होते. १६३६ पासून शहाजींच्या पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या प्रदेशाचा मुखत्यार म्हणून दादोजी कोंडदेव कारभार पहात होता. इ. स. १६४२ मध्ये बंगलोरहून शिवाजी व जिजाबाई पुण्यास परतले. पुण्यातील कार्यात शिवाजींना मदत करण्यासाठी शहाजींनी आपल्या विश्वासातील काही माणसे शिवाजींबरोबर पाठवली होती. याविषयी सभासद म्हणतात, 'ते समयी राजियांस वर्षे बारा होती. बराबर शामराव नीलकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत, नारोपंत दीक्षितांचे चुलतभाऊ, मुजुमदार दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ सबनीस ऐसे देऊन दादाजीपंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केले.' शिवाजी बंगलोरहून पुण्यास आल्यानंतर बारा मावळे आपल्या वर्चस्वाखाली आणले. हा प्रदेश शहाजींच्या मुळ जहागिरीत नव्हता असे सभासदाने नमूद केले आहे. ही बारा मावळे व आसपासचा डोंगर, दऱ्यांचा प्रदेशाची निवड शिवाजींनी आपल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यासाठी केली. कान्होजी जेधे, बाजी पासलकर, सूर्यराव काकडे, येसाजी कंक, जिवा महाल, दादाजी नरस प्रभू, बापूजी मुदगल नऱ्हेकर देशपांडे, तानाजी मालुसरे असे कर्तृत्ववान व्यक्ती शिवाजीसोबत आले. त्यांच्या समवेतच रायरेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ शिवाजींनी घेतली. डोंगर दऱ्यांचा प्रदेश व मावळयांच्या साथीमुळे स्वराज्य स्थापनेची इच्छा शिवाजींच्या मनात निर्माण झाली. अद्वितीय साहस आणि विलक्षण मुत्सद्देगिरीच्या जोरावर शिवाजींनी स्वराज्यस्थापनेकडे वाटचाल सुरू केली

२८ जानेवारी १६४६ रोजींचे न्यायनिवाडाविषयक शिवाजींचे पत्र उपलब्ध आहे. या पत्रावर शिवाजींची पुढीलप्रमाणे मुद्रा होती.

'प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णूविश्ववंदिता!!

शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते!!'

शिवाजींची ही मुद्रा त्यांच्या स्वराज्य कार्याचा प्रारंभ झाल्याची साक्ष होती. शिवाजींनी राज्याभिषेकानंतरही हिच मुद्रा राज्यकारभारामध्ये वापरली होती. ही अष्टकोनी स्वराज्यमुद्रा देववाणी संस्कृतमध्ये होती. प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे हळूहळू क्रमाने वाढणारी व विश्वाने वंदिलेली शहाजीपुत्र शिवाजी याची ही मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी विलसत आहे. असा त्याचा अर्थ आहे.

## २.२. विषय विवेचन

## २.२.१ शिवाजीचे आदिलशाही राज्याशी संबंध

तत्कालीन परिस्थितीत स्वराज्यस्थापनेसाठी किल्यांना फार महत्व होते. एका

अर्थाने त्या त्या प्रदेशातील राजकीय केंद्रे म्हणून किल्यांकडे पाहिले जात होते. किल्यावरून आसपासच्या प्रदेशावर देखरेख व नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. परंतु जहागिरीतील किल्यावर शहाजींचे वर्चस्व नव्हते. किल्यावरील अधिकारी शहाजींचा हुकूम मानत नसत. कारण आदिलशहा आपल्या विश्वासातील व्यक्तींची नियुक्ती किल्लेदार म्हणून करत असे. किल्लेदार आपल्या कामासाठी थेट आदिलशहास जबाबदार होता. जहागिरदारांना किल्लेदाराच्या माध्यमातून शह बसावा, जहागिरदाराने आपल्याविरोधात बंड करू नये तसे झाले तर त्याची अगाऊ माहिती किल्लेदाराच्या माध्यमातून आपणास मिळावी हा त्यामागचा उद्देश होता. जहागिरीतील बळकट व दुर्गम किल्यांचे महत्व शिवाजींनी अचूकपणे ओळखले होते. शिवाजींना जहागिरीच्या संरक्षणाच्या दृष्टीने व स्वराज्य स्थापनेच्या दृष्टीने किल्यांचे महत्व अनन्यसाधारण वाटत होते. त्यामुळेच जहागिरीतील व जहागिरीच्या आसपासचे किल्ले जिंकून घेण्यावर शिवाजींनी भर दिला. त्यासाठी वेगवेगळया युक्त्यांचा वापर त्यांनी केला. शिवाजींनी १६४५ मध्ये आदिलशाही सत्तेवर तोरणा किल्ला घेऊन पहिला प्रहार केला. तोरणा किल्यावर शिवाजींना गुप्त धनाची प्राप्ती झाली. या धनाचा उपयोग शिवाजींनी जवळच्या मुरबदेव डोंगरावर राजगड किल्ला बांधण्यासाठी केला. राजगड किल्ला हा शिवाजींच्या राज्याची पहिली राजधानी. १६४६ ते १६५६ या काळात आदिलशाही सुलतान मुहंमद आदिलशहा आजारी पडल्यामुळे आदिलशाही दरबारात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. याचा फायदा घेऊन शिवाजींनी किल्ले व आसपासचा प्रदेश जिंकून घेण्यावर भर दिला. पुण्याचा हवालदार बापुजी मुद्गल नऱ्हेकर आणि सिंहगड किल्याचा किल्लेदार सिद्दी अंबर यांच्याशी स्नेह जोडून शिवाजींनी कोंढाणा किल्ला ताब्यात घेतला. पुण्यापासून जवळच असलेल्या चाकण येथील भुईकोट किल्याचा (संग्रामदुर्ग) फिरंगोजी नरसाळ हा किल्लेदार होता. शिवाजींनी फिरंगोजी नरसाळ यास आपलेसे करून घेतले आणि चाकणच्या किल्यावर वर्चस्व प्रस्थापित केले. फिरंगोजी नरसाळ यालाच शिवाजींनी चाकणचा किल्लेदार म्हणून नियुक्त केले.

१६४८ च्या दिवाळीत पुरंदरचा किल्ला मोठया युक्तीने शिवाजींनी आपल्या वर्चस्वाखाली आणला. महादजी निळकंठराव हा पुरंदर किल्याचा किल्लेदार होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा निळोजी याने जहागिरीचे व किल्यांचे अधिकार आपल्या हाती घेतले. त्याचे भाऊ पिलाजी व शंकरजी त्यामुळे नाराज झाले. पिलाजी व शंकरजी यांनी वडिलांच्या संपत्तीत आपणास वाटा मिळावा म्हणून शिवाजींकडे धाव घेतली. पुरंदर किल्यावर सुरू झालेल्या गृहकलहाचा शिवाजींनी अतिशय चातुर्याने फायदा करून घेतला. पुरंदर किल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने ही सुवर्णसंधी वाटली. दिवाळी साजरी करण्यासाठी शिवाजी व जिजाबाई शिबंदीसह पुरंदर किल्यावर गेले. शिवाजींच्या योजनेची माहिती निळोजीस नसल्याने तो बेसावधच होता. निळोजीने या सर्वांचे किल्यावर स्वागत केले. शिवाजींनी निळोजीस, शंकरजी व पिलाजी या तिघांनाही जेरबंद केले व पुरंदर किल्ला आपल्या ताब्यात घेतला. चार दिवसानंतर सर्वांची सुटका करून पुरंदरच्या परिसरातील चांबळी गाव इनाम देऊन सन्मानाची वस्त्रे दिली. शिवाजींनी तिघांनाही आपल्या लष्करी सेवेत सामावून घेतले.

शिवाजींनी तोरणा, कोंढाणा, पुरंदर हे बळकट किल्ले जिंकून घेऊन आदिलशाही सत्तेला उघड उघड आवाहान दिले. शिवाजींनी दिलेले उघड आवाहान व कर्नाटकातील शहाजींच्या हालचालीमुळे विजापूर दरबार अस्वस्थ झाला. शिवाजींच्या कारवाईमागे शहाजींचा हात असावा असा संशय आदिलशहाला आला. डिसेंबर १६४७ मध्ये गोवळकोंडयाच्या कुतूबशहाने आदिलशहास शहाजींनी आपण आदिलशाही सोडून कुतूबशाहीत येतो असे पत्र पाठवल्याचे सांगीतले. त्यामुळे शहाजींविषयीचा आदिलशहाचा संशय अधिकच वाढला. याचा फायदा अफझलखान, मुस्तफाखान यांनी घेऊन शहाजी विरोधी आदिलशहाचे मन अधिकच कलुषित केले. शिवाजींनी स्वीकारलेले आक्रमक धोरण व शहाजींच्या हालचाली आपणास त्रासदायक होतील याची कल्पना आदिलशहाला आली. आदिलशहाने शहाजींना अटक करण्याचा आदेश देताच जुलै १६४८ मध्ये मुस्तफाखानाने मुधोळच्या बाजी घोरपडयाच्या मदतीने जिंजीजवळ शहाजींना अटक केली. शहाजींच्या पायात बेडया घालून अफझलखानाने शहाजींना विजापूर दरबारात आणले. आदिलशहाने शहाजींचे दोन्ही मुले शिवाजी व संभाजींचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. शिवाजींचा बंदोबस्त करण्यासाठी फत्तेखान तर संभाजींचा बंदोबस्त करण्यासाठी फऱ्हादखान यांची नियुक्ती केली. संभाजीने फऱ्हादखानाचा पराभव केला.

शिवाजींचे वास्तव्य पुरंदरवर असल्याने फत्तेखानाने खळदबेलसर येथे तळ ठोकला व बाळाजी हैबतराव याला पुरंदरकडे पाठविले. आदिलशाही सैन्याने आपल्यावर हल्ला करण्याच्या अगोदर आपणच प्रतिहल्ला करून आदिलशाही सैन्याला धक्का देण्याचा निर्णय शिवाजींनी घेतला. बाळाजी हैबतराव शिरवळ येथे असतानाच शिवाजींचा सेनापती कावजी मल्हार याने हल्ला केला. या हल्यात बाळाजी हैबतराव ठार झाला. या हल्यात कावजी मल्हार सोबत भिमाजी वाघ, गोदाजी जगताप, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर हे मराठे सरदार होते. मराठयांनी शिरवळची गढी काबीज करण्याबरोबरच शिरवळ प्रांताचा खजीनाही लुटला. हातघाईच्या झालेल्या लढाईत बाळाजी हैबतराव ठार झाला. त्यामुळे आदिलशाही सैन्य सैरावैरा पळत सुटले. आदिलशहाबरोबर समोरासमोरच्या लढाईत मराठयांनी मिळविलेला हा पहिला विजय होय. बाळाजी हैबतराव ठार झाल्याचे समजताच फत्तेखान पुरंदर किल्यास आला. शिरवळच्या विजयामुळे मराठयांचा आत्मविश्वास मोठया प्रमाणात वाढला होता. फत्तेखानासोबत मुसेखान, फलटणचे बाजी निंबाळकर, मताजी घाटगे हे अनुभवी सरदार होते. पुरंदरच्या पायथ्याशी फत्तेखान आल्यानंतर मराठयांनी किल्यावरून जबरदस्त मारा सुरू केला. किल्यावरून होणाऱ्या माऱ्याला न जुमानता मुसेखान मराठयांना प्रतिकार करत होता. यामध्ये मुसेखान ठार झाला. पुरंदर किल्ला जिंकणे अशक्य आहे हे ओळखून फत्तेखान पळून गेला. मराठयांनी फत्तेखानाचा बेलसरपर्यंत पाठलाग केला. फत्तेखानाच्या सैन्याची जबरदस्त हानी तर झालीच पण आदिलशाही सैन्यावर पराभवाची नामुष्की सहन करावी लागली.

फत्तेखानाचा बंदोबस्त केल्यानंतर शिवाजींनी शहाजींच्या सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. मोगल बादशहा शहाजहान याचा मुलगा मुराद मोगल साम्राज्याच्या दक्षिण सुभ्याचा कारभार पहात होता. मुरादकडे आपला जासूद पाठवून मोगल बादशहाने शहाजींच्या सुटकेसाठी

विजापूरच्या सुलतानावर दडपण आणावे असे सुचविले. पण मे १६४९ मध्ये शहाजींची सुटका आदिलशहाने केल्यामुळे मोगलांच्या मध्यस्थीची गरजच पडली नाही. शहाजीसारख्या बलाढय सरदारास जास्त दिवस कैदेत ठेवणे योग्य होणार नाही याची जाणीव आदिलशहास झाली. शिवाय शहाजी हे आदिलशहाशी एकनिष्ठ असल्याची जाणीव विजापूर दरबारातील शहाजींच्या हितचींतकानी आदिलशहास करून दिली. त्याचबरोबर शहाजी व त्याची संभाजी व शिवाजी हे मुले मोगलसत्तेला जाऊन मिळाल्यास आदिलशाहीसत्ता धोक्यात येईल याची जाणीवही आदिलशहाला झाली होती. शहाजींची कैदेतून मुक्तता करून आदिलशहाने त्यांना खिलत, पूर्वीची जहागिरी व महाराज हा किताब दिला. शहाजींच्या सुटकेच्या मोबदल्यात शिवाजींनी आदिलशहाचा जिंकलेला कोंढाणा किल्ला व कर्नाटकातील शहाजींच्या वर्चस्वाखालील बंगळूर व कंदर्पी हे किल्ले आदिलशहास परत देण्याची अट घालण्यात आली. ही अट मान्य करून शिवाजींनी कोंढाणा किल्ला आदिलशहाच्या स्वाधीन केला. वडिलांच्या सुटकेसाठी कोंढाणा किल्ला आदिलशहाला देऊन एक पाद्बल मागे घेण्याचे धोरण शिवाजींनी स्वीकारले. शिवाजींच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या हालचाली आपणास त्रासदायक ठरतील याची कल्पना आदिलशहाला आली होती. त्यामुळे शिवाजींना शह देण्यासाठी आदिलशहाने वाई प्रांताचा सुभेदार म्हणून बलाढय सरदार अफझलखानाची नियुक्ती केली. त्यामुळे शिवाजींच्या हालचालींना जरब बसली

### २.२.१. उपमुद्दा– जावळी प्रसंग

शिवाजींच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशालगत लागूनच चंद्रराव मोरेंची जावळी जहागिरी होती. जावळीचा हा डोंगराळ प्रदेश अनेक दऱ्याखोऱ्यांनी, घनदाट जंगलांनी, हिंस्त्र श्वापदांनी व्यापलेला होता. जावळी हा दुर्गम व अजिंक्य निसर्गदत्त प्रदेश होता. जावळी प्रदेशावर चंद्रराव मोरेंचे वर्चस्व होते. चंद्रराव मोरे विजापूरकरांचे पिढीजात जहागिरदार होते. जवळजवळ नऊ पिढयांपासून जावळी प्रदेशात त्यांनी आपले वैभव वाढविले होते. मोरेंकडे जवळपास दहा ते पंधरा हजार सैन्य होते. महाड पासून ते महाबळेश्वरपर्यंतचा डोंगरी भाग व बहुतांश सातारा जिल्हा त्यांनी काबीज केला होता. जावळीच्या जंगलमय प्रदेशातून परिचीत व सराईत माणसांनाही वाट काढता येत नसे. देशावरून कोकणात जाणाऱ्या खिंडी, घाट व वाटा जावळीच्या दुर्गम प्रदेशातून जात होत्या. जावळीच्या दुर्गम प्रदेशावर आदिलशहाचेच वर्चस्व होते. आदिलशहाने हा प्रदेश १६ व्या शतकाच्या सुरूवातीला मोरेंना जहागिरी म्हणून दिला. त्याचबरोबर मोरेंना चंद्रराव हा किताबही दिला. मोरे घराण्यातील अधिकाररूढ कर्ता पुरूष स्वत:ला चंद्रराव हा किताब धारण करत असे. मोरे हे स्वत:ला चंद्रगुप्त मौर्यांचे वंशज समजत असत. विजापूरच्या आदिलशहाचे नाममात्र वर्चस्व मान्य करून ते सार्वभौम सत्ताधीशांप्रमाणे वागत असत व आसपासच्या देशमुखांवर जबरदस्ती करत असत. मोरेंनी दुर्गम व सुरक्षित समजले जाणारे जावळी हे ठिकाण आपल्या जहागिरीची राजधानी म्हणून निवडले. विजापूरच्या आदिलशहाचे वर्चस्व मान्य करून आपल्या प्रदेशात एखाद्या राजाप्रमाणे मोरेंचे वास्तव्य होते. पिढयानपिढया जावळी प्रदेशावर राज्य करून मोरेंनी मोठया प्रमाणात संपत्ती जमविली होती.

शिवाजींनी स्वराज्यकार्यास सुरूवात केली तेंव्हा दौलतराव मोरे याचे जावळी प्रदेशावर

वर्चस्व होते. दौलतराव मोरे १६४८ च्या सुमारास निपुत्रीक अवस्थेत मरण पावला. दौलतरावाच्या मृत्यूनंतर गादीवर कोणी यावे यावरून मोरे घराण्यात यादवीसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. त्याच्या पत्नीने शिवतरकर मोरेपैकी यशवंतरावास दत्तक घेऊन जहागिरीचा ताबा घेतला. मोरे घराण्यातील काही व्यक्तींनी हे दत्तकविधान अमान्य करून यशवंतरावाचा जावळी प्रदेशावरील अधिकार अमान्य केला. शिवाजींनी स्वराज्यकार्यात यशवंतरावाची मदत होईल या उद्देशाने यशवंतरावास पाठिंबा दिला. शिवाजींनी यशवंतरावास दिलेल्या पाठिंब्यामुळे जावळी प्रदेशात शिवाजींचे वर्चस्व निर्माण होईल या भितीने वाई प्रदेशात असलेल्या अफझलखानाने यशवंतरावास विरोध केला. शिवाजींच्या पाठिंब्यामुळे सत्तेवर आलेल्या यशवंतरावास पायउतार करून जावळीच्या प्रदेशावर आदिलशाही दरबाराच्या वतीने दुसऱ्या मोरेंची नियुक्ती करण्याचे नियोजन अफझलखान करू लागला. अफझलखानाच्या या कारवाईची माहिती यशवंतरावास झाली. यशवंतराव हुशार असल्याने अफझलखानाशी जुळवून घेण्याचा त्याने निर्णय घेतला. कारण अफझलखानाशी शत्रूत्व त्याला नको होते. अफझलखानास खुष करण्यासाठी शिवाजींचे आपण शत्रू आहोत हे अफझलखानास दाखवून देण्याचा त्याने प्रयत्न सुरू केला. आपल्या सहकार्याने चंद्रराव बनलेल्या यशवंतरावाचा कृतघ्नपणा शिवाजींना आवडला नाही. स्वराज्याचा विस्तार व संरक्षणाच्या उद्देशाने जावळी प्रदेश जिंकणे शिवाजींना गरजेचे वाटत होते. अफझलखानाशी यशवंतरावाने जुळवून घेतल्याने व अफझलखानाने यशवंतरावास दिलेल्या पाठिंब्यामुळे काही काळ शांत बसण्याशिवाय शिवाजींसमोर दुसरा पर्यायच नव्हता. १६५५ मध्ये कर्नाटकातील अंदाधुंदी दूर करण्यासाठी आदिलशहाने अफझलखानास कनकगिरीला पाठविले. या संधीचा फायदा घेऊन यशवंतरावाचा बदला घेण्याचे शिवाजींनी ठरविले.

### जावळी प्रदेशावरील स्वारीची कारणे

१६५६ मध्ये शिवाजींनी जावळी प्रदेशावर स्वारी करून तो प्रदेश जिंकून घेतला. त्यासाठी पुढील कारणे कारणीभूत ठरली.

१. शिवाजींना जावळी प्रदेश जिंकून आपल्या स्वराज्याचा विस्तार करावयाचा होता. स्वसंरक्षणाच्या दृष्टीने जावळी प्रदेश अतिशय उपयुक्त प्रदेश होता. हा प्रदेश जिंकल्यास स्वराज्याचा विस्तार कोकण किनारपट्टीपर्यंत होणार होता.

२. जावळी प्रदेशावर पिढयान पिढया मोरे घराण्याचे वर्चस्व होते. संपन्नतेच्या दृष्टीने जावळी प्रदेश उपयुक्त होता. मोरे घराण्याकडे मोठया प्रमाणात संपत्ती होती. ही संपत्ती मिळवून स्वराज्याची तिजोरी समृध्द करण्याचा शिवाजींचा विचार होता.

३. जावळीवरील आक्रमणामागे अफझलखानास पर्यायाने आदिलशाही सत्तेस शह देण्याचा शिवाजींचा हेतू होता.

४. जावळी प्रदेशात रायरी हा बळकट व दुर्गम किल्ला होता. स्वराज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने रायरीचे महत्व शिवाजींना वाटत होते.

५. यशवंतराव मोरेचा कृतघ्नपणाही शिवाजींच्या जावळीवरील आक्रमणास कारणीभूत ठरला. वास्तविक पहाता शिवाजींच्या सहकार्यामुळेच यशवंतरावास जावळीची जहागिरी

मिळाली होती. परंतु अफझलखानाने विरोध करताच शिवाजींचे सहकार्य विसरून यशवंतराव अफझलखानाच्या पक्षात सामील झाला होता.

६. शिवाजींच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात यशवंतराव विघ्ने आणत होता. आदिलशहाने शिवाजींचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविलेल्या बाजी शामराज यास यशवंतरावाने सहाय्य केले. याचा राग शिवाजींना आला होता.

७. मुसे खोऱ्यातील गावकुलकर्णी रंगो त्रिमल वाकडे याने एका विधवा ब्राम्हण स्त्रीवर अत्याचार केला होता. शिवाजींकडून होणाऱ्या कठोर शिक्षेच्या भितीने त्याने जावळी प्रदेशाचा आश्रय घेतला. आपल्या प्रदेशातील गुन्हेगाराला यशवंतराव आश्रय देतो याचा राग शिवाजींना आला.

८. यशवंतरावाने शिवाजींच्या प्रदेशात घुसखोरी केली. चिखलीचा पाटील रामजी वाडकर याचा पाठलाग करत यशवंतरावाने शिवाजींच्या प्रदेशात घुसून रामजी वाडकरास ठार मारले.

९. गुंजन मावळचा हैबतराव सिलीमकर देशमुख हा शिवाजींचा पक्षपाती होता. हैबतरावास त्रास देण्यासाठी यशवंतरावाने गुंजन मावळच्या देशमुखीबाबत वाद उकरून काढला.

१०. स्वराज्यस्थापनेच्या कार्यात मराठयांमध्ये एकजूट व्हावी असा प्रयत्न शिवाजी करत होते. परंतु यशवंतराव मोरेंनी शिवाजींच्या या धोरणास विरोध केला. याचा राग शिवाजींना आला.

११. महाडपासून ते महाबळेश्वर पर्यंत चंद्रराव मोरेंची जहागिरी होती. शिवाजींचे धोरण केवळ चंद्रराव मोरेंचा पराभव करणे एवढेच मर्यादित नव्हते. तर मोगल आणि आदिलशहाला धुळ चारणे हेही होते. त्यासाठी जावळी प्रदेश उपयुक्त होता.

१२. शिवाजींच्या दृष्टीने आदिलशाही दरबारातील राजकीय परिस्थितीही अनुकूल होती. महंमद आदिलशहा आजारी असल्याने आदिलशाही दरबारात कट कारस्थानांना उत आला होता. अफझलखान जरी वाईस असला तरी त्याचेही लक्ष आदिलशाही दरबाराकडेच होते. अशातच आदिलशहाने अफझलखानास कर्नाटकात पाठविल्यामुळे तर शिवाजींच्या दृष्टीने परिस्थिती अधीकच अनुकूल झाली.

वरील वेगवेगळया कारणावरून शिवाजी व यशवंतराव यांच्यातील संबंध दिवसेंदिवस बिघडत गेले. यशवंतरावाचा कायमचा बंदोबस्त केल्याशिवाय पर्याय नाही याची जाणीव शिवाजींना झाली. त्यामुळेच यशवंतरावाचा बंदोबस्त करण्याचा निर्णय शिवाजींनी घेतला.

**जावळीवर आक्रमण**

जावळीत राहून शिवाजींच्या मार्गात विघ्न आणण्याचे काम यशवंतराव करू लागल्याने यशवंतरावाचा बंदोबस्त करणे शिवाजींना आवश्यक वाटले. सामोपचाराचे सर्व मार्ग संपल्यावर यशवंतरावाचा बंदोबस्त करण्यासाठी शिवाजींनी लष्करी ताकदीचा वापर करण्याचे ठरविले. दरम्यान १६५५ मध्ये वाई प्रांताचा सुभेदार अफझलखानही आदिलशहाच्या

आदेशानुसार कर्नाटकात गेला. जावळी जिंकून घेण्याची योग्य वेळ हिच आहे असे शिवाजींना वाटले. रघुनाथ बल्लाळ, कान्होजी जेधे, संभाजी कावजी, सूर्यराव काकडे, सीलिमकर देशमुख, बांदल देशमुख यांची नियुक्ती या कामासाठी शिवाजींनी केली. शिवाजींच्या लोकांनी एकाच वेळेस चारही बाजूंनी हल्ला केला. त्यामुळे यशवंतरावाची चांगलीच कोंडी झाली. यशवंतराव मोरे, प्रतापराव मोरे, हणमंतराव मोरे, बाबजीराऊ व मुरारबाजी देशपांडे यांनी शिवाजींच्या सैन्याला जोरदार प्रतिकार केला. यामध्ये हणमंतराव मोरे मारला गेला तर प्रतापराव मोरे विजापूरास पळून गेला. यशवंतराव मोरे व मुरारबाजी देशपांडे यांनी अखेरचा प्रतिकार करून पाहिला. पण त्याचाही उपयोग झाला नाही. शिवाजींच्या सैन्याचा प्रतिकार करणे अवघड आहे याची जाणीव यशवंतरावास झाली. स्वत:चा व आपल्या मुलांचा जीव वाचवण्यासाठी यशवंतराव बाजी व कृष्णाजी या दोन मुलासह रायरी (रायगड) किल्यावर पळून गेला. जानेवारी १६५६ मध्ये शिवाजींनी जावळी प्रदेशावर वर्चस्व प्रस्थापीत केले. जिंकलेल्या प्रदेशाची प्रशासकीय व्यवस्था लावली. जावळीचा सुभेदार म्हणून कृष्णाजी बाबाजी याची नियुक्ती केली. यशवंतरावाचे पूर्ण पारिपत्य केल्याशिवाय या प्रदेशात शांतता निर्माण होणार नाही हे जाणून रायरी किल्यावर आश्रयास गेलेल्या यशवंतरावास पकडण्यासाठी शिवाजींच्या सैन्याने रायरी किल्यास वेढा दिला. जवळपास तीन महिने हा वेढा सुरू होता. किल्ला लढवणे दिवसेंदिवस अवघड होत असल्याचे पाहून यशवंतरावाने सिलींबर देशमुखामार्फत शिवाजींशी संपर्क साधला व रायरी किल्ला मे १६५६ मध्ये शिवाजींच्या हवाली केला. यशवंतराव मोरेस शिवाजींनी नजरकैदेत ठेवले. जावळी प्रदेश व रायरीसारखा बळकट किल्ला आपल्या हातून गेल्याचे दु:ख यशवंतराव मोरेस वाटत होते. त्यामुळे मुधोळकर घोरपडयाशी संधान साधून शिवाजींच्या विरोधात हालचाली करण्यास त्याने सुरूवात केली. याची जाणीव शिवाजीस होताच शिवाजींनी ऑगस्ट १६५६ मध्ये यशवंतरावास व त्याच्या दोन्ही मुलास ठार केले.

### जावळी विजयाचे महत्व

मराठयांच्या इतिहासात जावळी विजयास महत्वपूर्ण स्थान आहे. स्वराज्य स्थापनेकडे वाटचाल करणाऱ्या शिवाजींची राजकीय व लष्करी जीवनातील ही पहिलीच सर्वात मोठी मोहिम होती. जावळी विजयाचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१. जावळीवरील विजयामुळे जावळीचा समृध्द, संपन्न व दुर्गम प्रदेश शिवाजींच्या वर्चस्वाखाली आला. स्वराज्याच्या दृष्टीने ही महत्वपूर्ण घटना होती.

२. जावळीवरील विजयामुळे स्वराज्याचा विस्तार होऊन स्वराज्याची सीमा कोकण किनारपट्टीपर्यंत पोहचली. शिवाजींचा परकीय व्यापाऱ्यांशी संबंध येण्यास सुरूवात झाली. त्यामुळे शिवाजींना अधिक सावधपणे राजकारण करावे लागणार होते.

३. जावळीवरील विजयामुळे लष्करी व व्यापारीदृष्टया महत्वपूर्ण असलेल्या घाटावर शिवाजींचे वर्चस्व प्रस्थापीत झाले. कोकणातून देशाकडे होणाऱ्या व्यापार व इतर हालचालीवर नियंत्रण राखणे शिवाजींना शक्य झाले.

४. संपन्न जावळी प्रदेशावर मोरे घराण्यातील नऊ पिढयांनी राज्य केले होते. त्यांनी

जमा केलेली सर्व संपत्ती शिवाजींच्या हाती आली. त्यामुळे स्वराज्याचा खजिना समृध्द झाला. या संपत्तीचा उपयोग शिवाजींनी स्वराज्यस्थापनेच्या कार्यात केला.

५. जावळीसारखा दुर्गम व स्वराज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने उपयुक्त असलेला प्रदेश व रायरी (रायगड), चंद्रगड, मकरंदगड, सोनगड, चांभारगड हे किल्ले शिवाजींच्या वर्चस्वाखाली आले. शिवाजींनी राज्याभिषेकावेळी स्वराज्याची राजधानी म्हणून रायगड/रायरी किल्याची निवड केली.

६. शिवाजींच्या जावळीवरील विजयामुळे लष्करी सामर्थ्यात वाढ झाली. यशवंतराव मोरेकडील काही सैन्य शिवाजीला येऊन मिळाले. जावळी प्रदेशातील मुरारबाजी देशपांडे आपल्या त्रिंबकजी, शंकरजी, संभाजी व महादजी या चार बंधूसह शिवाजींकडे आला.

७. जावळी प्रदेशासारखा दुर्गम, अजिंक्य व बळकट प्रदेश चंद्रराव मोरेसारख्या प्रतिष्ठित व पराक्रमी सरदाराचा पराभव करून जिंकल्यामुळे शिवाजींचा दबदबा व दरारा वाढला. या प्रदेशातील जनता नव्या आशेने शिवाजींकडे पाहू लागली.

## २. २. २. उपमुद्‌दा –अफझलखान मोहिम

स्वराज्य स्थापनेकडे शिवाजींनी आक्रमकपणे वाटचाल सुरू करून कोंढाणा, पुरंदर यासारखे बळकट किल्ले, जावळीसारखा जिंकलेला संपन्न व दुर्गम प्रदेश त्यामुळे आदिलशहा व शिवाजी यांच्यात संघर्ष होणे अपरिहार्य ठरले. कारण ज्या प्रदेशात म्हणजे पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या प्रदेशात शिवाजींनी स्वराज्यस्थापनेचा उद्योग सुरू केला होता तो प्रदेश आदिलशाही सत्तेचा होता. या प्रदेशातील शिवाजींचे स्वराज्यस्थापनेचे कार्य म्हणजे आदिलशाही सत्तेच्या दृष्टीने ते बंड होते. त्यामुळेच शिवाजींचा बंदोबस्त करणे आदिलशाही दरबारास गरजेचे वाटू लागले. जावळीसारखा दुर्गम व संपन्न प्रदेश शिवाजींनी जिंकल्यामुळे तर आदिलशाही दरबाराला शिवाजींची अधिकच काळजी वाटू लागली. १६४६ पासून महंमद आदिलशहा आजारी होता. त्यामुळे आदिलशाही दरबारात निर्माण झालेल्या अनागोंदीचा फायदा शिवाजींनी घेऊन स्वराज्याचा विस्तार करण्यावर भर दिला होता. १६५६ मध्ये महंमद आदिलशहाचा मृत्यू होऊन अली आदिलशहा हा नवा आदिलशाही सुलतान बनला. त्याला शिवाजींच्या वाढत्या कारवायांना, वाढत्या सामर्थ्याला आळा घालणे गरजेचे वाटू लागले. शिवाजींचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर आपल्या राज्याचे अस्तित्वच संपुष्टात येईल अशी भिती आदिलशहास वाटली. शिवाजींच्या आक्रमक हालचालीची भिती आदिलशाही दरबारास वाटू लागली. त्यामुळे शिवाजींचा बंदोबस्त करण्यासाठी एखादा पराक्रमी, बलिष्ठ सरदार पाठविणे आदिलशाहाला गरजेचे वाटले. शिवाजींचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी त्याने आदिलशाही दरबारातील बलाढय सरदार अफझलखान याची १६५९ मध्ये नियुक्ती केली. यामागे सुलतानाची आई बडीसाहिबा हिची कल्पना होती. बडी साहिबा ही महत्वकांक्षी, कर्तबगार, धोरणी, राजनीतिज्ज्ञ व कारस्थानी स्त्री होती. अली आदिलशहाला आदिलशाही सुलतान बनवून तिने समर्थपणे विजापूर राज्याचा कारभार पाहिला. औरंगजेबासारख्या प्रबळ व धुर्त बादशहाचा यशस्वीपणे तिने सामना केला. महंमद आदिलशहाच्या काळातील आदिलशाही दरबारातील गोंधळ

अली आदिलशहाला गादीवर बसवून व सत्ता आपल्या हाती घेऊन तिने नाहीसा केला. शिवाजींचा वेळीच बंदोबस्त केला नाही तर आदिलशाही सत्तेलाच शिवाजी आव्हान देईल याची जाणीव तिला झाली होती. त्यामुळे शहाजीला 'आपल्या मुलास आवरा' असे तिने सांगितले होते. शहाजीकडून असमर्थता व्यक्त झाल्यानंतर तिने शिवाजींचा कायमचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. शिवाजींना सामोपचाराने, कपट करून पकडावे व आदिलशाही दरबारात हाजर करावे अशी चर्चा तेंव्हा विजापूर दरबारात असल्याचे उल्लेख इंग्रजांच्या पत्रामध्ये सापडतात.

### अफझलखानाची नियुक्ती

शिवाजींच्या वाढत्या सामर्थ्याला आळा घालून कायमचा बंदोबस्त करण्यासाठी अली आदिलशहाने आदिलशाही दरबारातील बलाढय सरदार अफझलखान याची नियुक्ती केली. ही नियुक्ती करताना आदिलशाही दरबारातील प्रसंग कसा घडला हे सांगताना सभासद म्हणतात, 'बडी साहेबीण हिणे कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजीराजियावरि रवाना करावे म्हणोन पुसता कोणी कबूल केले नाही. अफझलखान वजीर याणी कबूल केले की, 'शिवाजी काय चढे घोडियानिशी जिवंत कैद करून घेऊन येतो' शिवाजींचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी अशा पध्दतीने अफझलखानावर देण्यात आली. शिवाजी शरण येण्याचे नाटक करील पण त्याच्यावर विश्वास न ठेवता शिवाजींचा कायमचा बंदोबस्त करण्याची आज्ञा अली आदिलशहा (दुसरा) अफझलखानास दिल्याची नोंद सलयद नुरूल्लाने आपल्या तारीख - इ - अली आदिलशाहीमध्ये केली आहे. अफझलखानास शिवाजीला आपण पकडू शकतो किंवा ठार मारू शकतो याची खात्री होती. तत्कालीन परिस्थित आदिलशाही दरबारात जे प्रबळ सरदार होते त्यामध्ये अफझलखानाचा समावेश होता. अफझलखानास भोसले घराण्याचा म्हणजेच शहाजी व शिवाजींचा सुरूवातीपासूनच द्वेष वाटत होता. आदिलशाही दरबारातील शहाजींना मिळणारा मानसन्मान, दरबारातील स्थान व शहाजींचे कर्तृत्व त्याला आवडत नव्हते. म्हणूनच आदिलशहाने कर्नाटकात शहाजींना कैद केल्यानंतर शहाजींच्या पायात बेडया घालून आदिलशाही दरबारात आणण्यात त्याने पुढाकार घेतला होता. कनकगिरीच्या लढाईत संभाजी मारला जाण्यास अफझलखानाचे धोरणच कारणीभूत ठरले होते. शिवाजींनी चंद्रराव मोरेचा पराभव करून जावळी प्रदेशात निर्माण केलेले वर्चस्व अफझलखानास आवडले नव्हते. तसेच शिवाजींनी कर्नाटकात तेरदळपर्यंत स्वारी केली होती. हा प्रदेश अफझलखानाच्या वर्चस्वाखाली होता. शिवाजींच्या या कारवाया व वाढत जाणारे सामर्थ्य अफझलखानास आवडले नव्हते. १६४९ ते १६५५ या काळात अफझलखान वाई प्रदेशाचा सुभेदार होता. त्यामुळे या प्रदेशाची माहिती त्याला होती. या सर्व पार्श्वभूमीचा विचार करूनच आदिलशाही दरबाराने शिवाजींचा बंदोबस्त करण्यासाठी अफझलखानाची नियुक्ती केली.

शिवाजींच्या विरोधात अफझलखानाची नियुक्ती करण्यामागे शिवाजींचा कायमचा बंदोबस्त करण्याचा हेतू आदिलशाही दरबाराचा होता. तत्कालीन कागदपत्रावरून आपणास याची कल्पना येते. १६ जून १६५९ रोजी आदिलशहाने कान्होजी जेधे यास जे फर्मान

पाठविले होते त्यामध्ये आदिलशहा म्हणतो, 'शिवाजीने निजामशाही कोकणातील मुसलमानांचा उच्छेद व लूट करून किल्ले हस्तगत केले, त्याचे पारिपत्यासाठी अफझलखानास रवाना केले आहे, तरी त्यास तुम्ही सामील होऊन शिवाजीचा पराभव करून निर्मूल फडशा करावा, त्याच्या लोकांस आश्रय न देतां ठार मारून या दौलतीचें कल्याण इच्छिणे.' आदिलशहाच्या या फर्मानावरून अफझलखानाच्या स्वारीमागचा हेतू स्वच्छपणे दिसून येतो. आदिलशहाकडून आलेले फर्मान कान्होजी जेधेंनी शिवाजीस दाखविले होते. तेंव्हा 'तुम्ही पातशाही हुकूम मोडून राहिले म्हणजे वतनास अपाये होईल. जिवावरी गोष्ट येऊन संकट पडले याकरता तुम्हीही जाणे' असे शिवाजींनी कान्होजी जेधेस सांगीतले. अशा अडचणीच्या परिस्थितीत कान्होजी जेधेंनी शिवाजींचा पक्ष शेवटपर्यंत सोडला नाही. उलट मावळ प्रदेशातील देशमुखांना एकत्र करण्यात कान्होजी जेधेंनी महत्वाची भूमिका निभावली. 'हे मऱ्हाष्ट्र राज्य आहे. अवघियानी हिमत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेने शेवा करावी.' असे सांगून देशमुखांना धीर दिला. कान्होजी जेधेंप्रमाणेच शिलिमकर, पासलकर, बांदल, ढमाले, मारणे, मरळ, डोहोर इ. देशमुखही शिवाजींकडेच राहिले. तत्कालीन डच कागदपत्रामध्येही शिवाजींना ठार मारण्याचा आदेश आदिलशहाने अफझलखानास दिल्याचे उल्लेख आहेत. अफझलखानाचे सामर्थ्य वाढवण्यासाठी, शिवाजींच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्यात मदत करणाऱ्या मावळातील अनेक देशमुखांना आदिलशहाने फर्माने पाठविली होती. त्यामागे या प्रदेशात शिवाजींना एकटे पाडण्याचा आदिलशहाचा हेतू होता. असे आदेशवजा फर्मान खंडोजी खोपडे यास येताच तो अफझलखानास जाऊन मिळाला.

**अफझलखानाची तयारी व मार्ग**

आदिलशहाने अफझलखानास शिवाजीविरोधी मोहिमेसाठी काय दिले हे सांगताना सभासद म्हणतात, 'पादशाहाजादी खुशाल होऊन वस्त्रे, अलंकार, हत्ती, घोडे, दौलत, इजाफा देऊन नांवाजिक बरोबर उमरात जमाव बारा हजार स्वार, खेरीज पायदळ रवाना केले.' म्हणजेच आदिलशहाने अफझलखानास पूर्ण तयारीनीशी शिवाजीविरोधात नियुक्त केले होते. अफझलखानाजवळ १२००० स्वार आणि १०००० पायदळ होते. ७० ते ७५ मोठया तर ३०० ते ४०० लहान पहाडी तोफा होत्या. प्रचंड दारूगोळा, मोठया प्रमाणात खजिना, हत्ती, उंट, घोडे सोबत दिले होते. सैन्य व शस्त्रास्त्राबरोबरच तोलामोलाचे सरदारही दिले होते. त्यामध्ये याकूतखान, रणदुल्लाखान, सिद्दी हिलाल, मुसेखान, अंबरखान, अंकुशखान, बाजी घोरपडे, कल्याणजी जाधव, प्रतापराव मोरे, मंबाजी जाधव, नाईकजी पांढरे, झुंझारराव घाटगे या व इतर अनेक सरदारांचा समावेश होता. शिवाजींचे पारिपत्य करण्यासाठी निघालेल्या अफझलखानास काहीही कमी पडणार नाही याची काळजी आदिलशहाने घेतली होती. अफझलखान वाईस येईपर्यंत अफझलखानाच्या सैन्याची संख्या पस्तीस हजारापर्यंत पोहचली होती.

संपूर्ण तयारी झाल्यानंतर अफझलखान सप्टेंबर १६५९ मध्ये वाईस आला. अफझलखान हिंदू धर्माचा कडवा विरोधक असल्याने प्रवासादरम्यान मार्गावरील धर्मस्थळांना उपद्रव देण्याचे धोरण त्याने स्वीकारले होते. विजापूरवरून वाईस येताना जागोजागी त्याने अत्याचार केले. सभासद बखरीमध्ये अफझलखानाने तुळजापूर व पंढरपूर येथील तीर्थस्थळांना

उपद्रव दिल्याचा उल्लेख आहे. तर अज्ञानदासाच्या प्रसिध्द पोवाड्यात अफझलखानाने तुळजापूर, माणेकेश्वर, करकंब, भोसे, पंढरपूर, शंभूमहादेव या धर्मस्थळांना उपद्रव दिल्याचा उल्लेख आहे. यामागे शिवाजींना डिवचण्याचा व आपली दहशत निर्माण करण्याचा त्याचा हेतू होता. पण शिवाजींनी अफझलखानाच्या या कारवायाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. फलटण जवळ मलवडी येथील बजाजी नाईक निंबाळकराला खानाने पकडले व हत्तीच्या पायाखाली देण्याची तयारी खानाने सुरू केली. यामागे शिवाजींना त्रास देण्याचा हेतू होता. कारण बजाजी नाईक निंबाळकर शिवाजींचा नातलग होता. शेवटी नाईकजी राजे पांढरे याने मध्यस्थी केली. साठ हजार होनांच्या बदल्यात बजाजी नाईक निंबाळकराची अफझलखानाने सुटका केली. विजापूरवरून अफझलखान वाईस येण्याचे कारण म्हणजे शिवाजींनी आपला मुक्काम रायगडावरून प्रतापगडावर हलविला होता. पुण्यातील मैदानी प्रदेशात खानाशी सामना करणे अवघड आहे हे ओळखून शिवाजींनी प्रतापगडावर स्थलांतर केले. वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या अवघड प्रदेशात खानास गाठून त्याचा पराभव करण्याचे शिवाजींनी ठरविले. अफझलखान शेवटी आपला पाठलाग करत या प्रदेशात येणार याची जाणीव शिवाजींना होती. लष्करी हालचालीच्या दृष्टीने, सुरक्षिततेच्या दृष्टीने व अफझलखानाचा हल्ला परतवून लावण्याच्या दृष्टीने हा प्रदेश योग्य होता. वाईच्या प्रदेशात जाण्याचा निर्णय अफझलखानाने विचारपूर्वक घेतला होता. वाईच्या प्रदेशाचा सुभेदार म्हणून अफझलखानाने काम केले होते. त्यामुळे या प्रदेशाची खडानखडा माहिति त्याला होती. जावळी प्रदेशाची बारीकसारीक माहिती असलेला प्रतापराव मोरे अफझलखानासोबत होता. त्यामुळे त्याच्याकडून अफझलखानास जावळी प्रदेशाची माहिती मिळत होती. शिवाय आदिलशहाच्या फर्मानावरून या भागातील अनेक देशमुख अफझलखानास मिळाले होते. शिवाजींबरोबरच्या संभाव्य युध्दात या सर्वांचा उपयोग अफझलखानास होणार होता.

अफझलखानाच्या रूपाने स्वराज्यावर फार मोठे संकट आले होते. अफझलखान कपटी, संशयी, मत्सरी आहे याची पूर्ण जाणीव शिवाजींना होती. अफझलखानाने शहाजींना बेड्या घालून आदिलशाही दरबारात आणताना दिलेली वागणूक, बंधू संभाजीच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेले खानाचे डावपेच, भोसले घराण्याविषयी खानाला वाटत असलेला मत्सर, १६३६ मध्ये कर्नाटकातील शिऱ्याचा राजा कस्तुरी रंगा याला भेटीस बोलावून केलेला दगाफटका या सर्वांची माहिती शिवाजींना होती. त्यामुळे अफझलखानाविरूध्दची तयारी शिवाजींनी अत्यंत बारकाईने केली होती. वाईस आल्यानंतर शिवाजींना प्रतापगडावरून खाली येण्यास भाग पाडण्यासाठी व लोकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी शिवाजींच्या प्रदेशात धुमाकूळ, जाळपोळ व लुटालूट सुरू केली. पुणे प्रदेशात सिद्दी हिलाल, सुपे प्रदेशात जाधव, शिरवळ प्रदेशात नाईकजी पांढरे, तळकोकणावर सैफखान तर सासवडकडे खराडे यांची रवानगी केली. या प्रदेशात दहशत निर्माण केल्यास शिवाजी आपणास आपोआपच शरण येईल अशी अफझलखानास खात्री होती. परंतु अफझलखानाच्या या कारवायांकडे शिवाजींनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. अफझलखानाच्या या उपद्रवांची माहिती गुप्तहेरामार्फत शिवाजींपर्यंत पोहचत होत्या. पण अफझलखानास प्रतिकार करून आपली लष्करी ताकद खर्ची घालण्यापेक्षा काही काळ शांत रहाण्याचे धोरण शिवाजींनी अंगीकारले.

**अफझलखानाची भेट व वध**

अफझलखानाचे सैन्य वाईपासून महाबळेश्वरपर्यंत पसरले होते. शिवाजींच्या प्रदेशात धुमाकूळ घातल्यानंतर आपल्या प्रतिकारासाठी शिवाजी मैदानात उतरेल हा अफझलखानाचा अंदाज पूर्णपणे चुकला. समोरासमोरच्या लढाईत कदाचित आपला टिकाव लागणार नाही असे वाटून शिवाजींनी अफझलखानाच्या विरोधात मुत्सद्देगीरीचा वापर करण्याचे ठरवले. अफझलखानाचा स्वराज्याच्या प्रदेशात धुमाकूळ सुरू असताना शिवाजी खानाविरूध्दच्या डावपेचांची, मोहिमेची आखणी करीत होते. आपण खानाचा प्रतिकार न केल्यास खान शेवटी जावळी प्रदेशात येणार याची जाणीव शिवाजींना होती. त्यादृष्टीने मावळ प्रांतातील किल्यांची चोख व्यवस्था शिवाजींनी केली होती. आपले सैन्य शिवाजींनी जावळी प्रदेशात ठिकठिकाणी सज्ज ठेवले होते. शिवाजी मैदानी प्रदेशात येत नाही हे पाहून अफझलखानाने शिवाजींची प्रत्यक्ष भेट घेऊन शिवाजींचा काटा काढण्याचे ठरवले. शिवाजींना आपल्या भेटीसाठी वाईस आणण्याचा अफझलखानाचा प्रयत्न होता. त्यासाठी अफझलखानाने आपला वकील कृष्णाजी भास्कर याला शिवाजींच्या भेटीसाठी पाठविले. शिवाजींशी झालेल्या भेटीत कृष्णाजी भास्कर अफझलखानाची भूमिका सांगताना म्हणतो, 'खानाचे सांगणे आहे की तुमचे वडिल व आम्ही एक पादशाहीचे चाकर. त्यांचा व आमचा भाईचारा पुरातन आहे. तुम्ही त्या पादशाहीतील उमराव असोन किल्ले, कोट घेतले, शहरे मारिता, पादशहास रूजू होत नाही....याजउपरि तुम्ही पादशाहाचे आज्ञेत सरळ चालले असता आम्ही सर्व गुन्हे माफ करवून हे मनसब सरंजाम व आणखी विशेष करून देण्याचा जिमा आमचा आहे यविशी पाहिजे तशी खातरजमा करून घ्यावी आणि भेटीस यावे.' खानाची ही भूमिका ऐकून शिवाजींनी कृष्णाजी भास्कर याच्याजवळ 'जसे महाराज तसे खान आपणास वडिल आहेत. त्यांची भेट अलबता घेऊ' असा निरोप पाठवला.

शिवाजींनी खानाच्या भेटीसाठी कृष्णाजी भास्कर याच्या बरोबरीने आपला पंताजी गोपीनाथ हा हुशार व धोरणी वकील पाठविला. खानास भेटून खानाचा अंतस्थ हेतू पहाणे, खानाच्या छावणीतून खरी माहिती काढणे ही महत्वाची जबाबदारी पंताजी गोपीनाथ याच्यावर सोपविण्यात आली होती. आपले काही गुप्तहेरही खानाच्या छावणीत पाठवून खानाच्या हेतूविषयी माहिती मिळवली. खानासोबत झालेल्या भेटीत व छावणीतून मिळालेल्या माहितीवरून खानाच्या मनात दगाफटका करण्याचा विचार आहे असे पंताजी गोपीनाथ याने शिवाजींना सांगीतले. त्यामुळे खानाची भेट वाईस जाऊन घेण्याचे शिवाजींनी टाळले. 'एवढ्या मोठया सैन्याशी सामना करण्याची ताकद माझ्यात नाही, झालेले अपराध पोटांत घालून खान जीवदान देतील, तर मी आपल्या ताब्यातील सर्व मुलूख सोडून देण्यास तयार आहे' असा निरोप आपल्या वकीलामार्फत पाठवून आपण घाबरलो असल्याचे शिवाजींनी भासवले. खानालाच जावळी प्रदेशात येऊन भेटण्याचे आमंत्रण दिले. एक वेळ भेटून मने जुळल्यानंतर खान जिथे भेटायला बोलावेल तेथे येऊन भेट घेऊ असे सांगीतले. शिवाजी घाबरल्यामुळे वाईस येण्यास तयार नाही. आपण जावळीस आल्यास आपणास शिवाजी भेटतील असे खानाच्या मनावर बिंबविण्यात आले. शिवाजी आपणास घाबरला आहे याचा खानाला खूपच आनंद झाला. खानाने रडतोंडीचा घाट उतरूण पारगावनजीक

छावणी दिली. शिवाजींनी आपले सैन्य जावळीच्या जंगलमय प्रदेशात मोक्याच्या ठिकाणी लपवून ठेवले. पंताजी गोपीनाथ व कृष्णाजी भास्कर यांनी १० नोव्हेंबर १६५९ वार गुरूवार हा भेटीचा दिवस ठरवला. भेट प्रतापगडाच्या माचीवर दुपारी होईल. दोघांनी भेटीसाठी सशस्त्र यावे. आपल्यासोबत दोनपेक्षा अधिक सेवक आणू नयेत. दोघांचे प्रत्येकी दहा अंगरक्षक सैनिक बाणाच्या टप्प्यावर उभे करावेत. दोघांचे बोलणे एकांतात व्हावे. अशा पध्दतीने दोन्ही बाजूंच्या वतीने तपशील ठरवण्यात आला. त्याचे तंतोतंत पालन करण्याचे ठरविण्यात आले. अफझलखानास शिवाजींना कधी भेटेन व आपला हेतू कधी साध्य होईल अशी घाई झाली होती. त्यामुळे खान गुरूवारी लवकरच प्रतापगडाच्या माचीवर उभारलेल्या शामियानात दाखल झाला. अफझलखानाने आपल्या बरोबर दोन हुद्देकरी व सय्यद बंडा हा धारकरी आणला होता. अफझलखान भेटीत आपणास दगा करणार याची जाणीव शिवाजींना होती. कारण अफझलखानाचा इतिहास तसा विश्वासघातकी होता. त्यामुळे भेटीसाठी जाताना शिवाजींनी पूर्ण तयारी केली होती. खानाने विश्वासघात केलाच तर स्वसंरक्षणाची तयारीही शिवाजींनी घेतली होती. त्यासाठी उजव्या हातात तलवार व बाहीत बिचवा, डाव्या हातात वाघनखे अशी व्यवस्था केली. तर कपड्यांच्या आतमध्ये चिलखत व फेट्याच्या आत शिरस्त्राण घातले होते. कंबरेस तलवार घेतली. संभाजी कावजी व जिवा महाल हे दोन हुद्देकरी शिवाजींनी सोबत घेतले होते. त्यांना पट्टा, फिरंग व ढाल दिली होती. जर खानाशी दोन हात करण्याची वेळ आलीच तर या शस्त्रांचा उपयोग व्हावा हा त्यामागचा उद्देश होता. संभाव्य भेटीत आपणास दगाफटका झालाच तर जिजाबाई, आण्णाजी दत्तो व बाळाजी आवजी यांना पुढे काय करावे याची व्यवस्थाही शिवाजींनी केली होती. 'आम्ही ही होड (पैज) आरंभिली आहे. श्री सिध्दीस नेईलच. कदाचित वाकडेही झाल्यास तुम्ही घाबरे न होता शत्रूस बुडवावे, राज्य रक्षावे.'

शिवाजी प्रतापगडाच्या माचीवर दाखल झाले. प्रतापगडाच्या माचीवर आल्यानंतर शिवाजींनी खानासोबत किती माणसे आहेत याची चौकशी केली. यावेळी खानासोबत सय्यद बंडा हा होता. शिवाजींनी हारकत घेताच सय्यद बंडास दूर उभे करण्यात आले. शिवाजींनी शामियानात प्रवेश केल्यानंतर दोन्ही बाजूंच्या वकीलांनी तत्कालीन दरबारी रीतिरिवाजानुसार एकमेकांच्या ओळखी करून दिल्या. शिवाजींना समोर पाहून खानाला खूपच आनंद झाला. शिवाजींना अलिंगन देण्यासाठी खान पुढे सरसाऊन हात पुढे केले. संकट आपल्या पुढे उभे आहे याची जाणीव शिवाजींना होती. अफझलखानाने शिवाजींना आपल्या बाहुपाशात घेतले व शिवाजीची मान डाव्या बगलेत जोरात आवळली. त्यानंतर खानाने आपल्या उजव्या हाताने शिवाजींच्या डाव्या कुशीत स्वत:कडील कट्यार खुपसले. शिवाजींनी अंगात चिलखत घातल्यामुळे खानाने केलेला वार निष्फळ ठरला. खानाने विश्वासघात केल्याचे शिवाजींच्या लक्षात आले. स्वत:च्याच जीवावर बेतल्यामुळे खानावर हात उगारणे शिवाजीस भाग पडले. खानाने आपल्यावर वार केल्याचे लक्षात येताच शिवाजींनी चपळाईने आपल्या हातातील तीक्ष्ण तलवार खानाच्या पोटात खुपसली. खानाने स्वसंरक्षणासाठी अंगात चिलखत घातली नसल्याने शिवाजींनी केलेला वार यशस्वी ठरून खानाची आतडी बाहेर आली. शिवाजींनी आपल्यावर केलेला वार यशस्वी झाल्याचे

पाहून खान जोरात ओरडला 'मारिले! मारिले! दगा दिधला. बेगी धावा' खानावर वार केल्याचे पाहून खानाचा वकिल कृष्णाजी भास्कर याने शिवाजीवर तलवारीचा वार केला. परंतु शिवाजींनी त्याला ठार केले. खानाच्या किंकाळण्याचा आवाज ऐकूण खानाचे अंगरक्षक धावून आले. सय्यद बंडा त्वेषाने शिवाजींवर चालून आला. शिवाजीवर वार करण्यासाठी उगारलेला सय्यद बंडाचा हात जिवा महालाने खांद्यापासून कापून काढला व त्याला ठार केले. अफझलखानाच्या भोयांनी खानाला पालखीत घालून परत जाण्यास सुरूवात केली. परंतु संभाजी कावजीने भोयांना ठार करून खानाचे शिर धडावेगळे केले. मोहिम फत्ते करून शिवाजींसह संभाजी कावजी व जिवा महाल प्रतापगडावर पोहोचले. शिवाजी व अफझलखान भेटीत घात कोणी केला हा एक चर्चेचा मुद्दा झाला आहे. फारसी साधनामध्ये शिवाजींनी अफझलखानाचा घात केला अशी माहिती आहे. तर मराठी साधनामध्ये अफझलखानाने घात केला असे उल्लेख आहेत. बुसातीनुस्सलातीन या ग्रंथात, ग्रॅन्ट डफच्या ग्रंथात व डच पत्रव्यवहारामध्ये शिवाजींनी अफझलखानाचा खून केला असे म्हटले आहे. ग्रॅंट डफने अफझलखान वधाचे वर्णन 'जाणून बुजून केलेला खून' असे केले आहे. तर सभासद बखर व इंग्रजी पत्रामधून खानाने शिवाजीवर प्रथम वार केला. शिवाजींनी स्वत:च्या रक्षणासाठी खानास ठार मारले अशी माहिती आहे. निजाम – उल – मुल्कच्या मीर आलम याने लिहिलेल्या ग्रंथात अफझलखान प्रसंगाची माहिती दिली आहे. या ग्रंथात अफझलखानानेच शिवाजीवर प्रथम वार केल्याची माहिती दिली आहे. खानाचा विश्वासघातकी स्वभाव, शिवाजीविषयी त्याला वाटणारा द्वेष पहाता खानानेच शिवाजीवर प्रथम वार केला असला पाहिजे.

शिवाजींनी अफझलखानास भेटायला जाण्याच्या अगोदरच आपल्या सैन्याची संपूर्ण तयारी केली होती. त्यामागे आदिलशाही सैन्याचे जास्तीत जास्त नुकसान करणे व आदिलशाही सैन्य स्वराज्यातून सहजासहजी बाहेर जाऊ नये हा हेतू होता. शिवाजींनी केलेल्या नियोजनानुसार मराठा फौज वेगवेगळया भागात विखुरली होती. नेताजी पालकर आपल्या सैन्यासह रणतोंडीच्या घाटावर सज्ज होता. जावळीतून वाईकडे जाणारे खानाचे सैन्य व वाईतील खानाचे सैन्य यांचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी नेताजी पालकराकडे देण्यात आली होती. मोरापंत पिंगळे, शामराजपंत रांझेकर व त्र्यंबक भास्कर यांना पारघाट व कोकणाकडील बाजू सांभाळण्याचे काम देण्यात आले होते. जावळीतील खानाचे सैन्य प्रतापगडाकडे अचानक निघाले तर त्यांना अडविण्याची जबाबदारी कान्होजी जेधे व बांदल देशमुख यांच्यावर सोपविण्यात आली होती. शिवाजींनी आपल्या सैन्याच्या केलेल्या नियोजनाचा फायदा त्यांना झाला. जावळीच्या जंगलमय प्रदेशात ठिकठिकाणी विखरून बसलेल्या मराठा सैनिकांना अफझलखानास ठार मारल्याची, मोहिम फत्ते झाल्याचे समजण्यासाठी तोफेच्या इशारतीचे आवाज देण्याचे ठरविण्यात आले होते. या इशारतीच्या आवाजानंतर मराठा सैन्याने आपल्यावर दिलेली जबाबदारी पार पाडण्याचे ठरविण्यात आले होते. प्रतापगडावर पोहोचल्यानंतर शिवाजींनी तोफेचा इशारतीचा आवाज करताच संपूर्ण तयारीनिशी दडा देऊन बसलेले मराठा सैन्य खानाच्या बेसावध असलेल्या सैन्यावर त्वेषाने तुटून पडले. मराठ्यांनी केलेल्या अचानक हल्यामुळे व खानाच्या वधाच्या बातमीमुळे

आदिलशाही सैन्य सैरावैरा पळत सुटले. मराठ्यांना प्रतिकार करण्याचे सामर्थ्यही त्यांच्यात राहिले नाही. नेताजी पालकर, कान्होजी जेधे, बाजी सर्जेराव, सिलींबकर देशमुख, येसाजी कंक, मोरोपंत पिंगळे, शामराजपंत रांझेकर, तानाजी मालुसरे, कोंडाजी वरखल, त्र्यंबक भास्कर यांनी अतुल पराक्रम गाजवला. 'शरण येतील त्यास जीवदान द्यावे, व्यर्थ रक्तपात करू नये' अशी ताकद शिवाजींनी आपल्या सैनिकास दिली होती. अफझलखानाचा मुलगा फाजलखान व मुसेखान, याकुतखान, हसनखान व अंकुशखान हे प्रतापराव मोरेंच्या मदतीने कसेबसे जावळीबाहेर पडले. मराठा सैन्यांनी याप्रसंगी महत्वपूर्ण भूमिका निभावली. युध्दात जखमी झालेल्या सैनिकांवर औषोधोपचार करण्यात आले. युध्दात कामी आलेल्या मराठा सैन्याच्या मुलांना नोकऱ्या दिल्या. शिवाजींचा विश्वासघात करणाऱ्या खंडोजी खोपडेस शिक्षा म्हणून त्याचा एक हात व एक पाय तोडण्यात आला. मराठ्यांचा झालेला अचानक हल्ला व खानाचा झालेला वध पाहून स्वत:कडील साहित्य तेथेच टाकून आदिलशाही सैन्य सैरावैरा पळून गेले. युध्दात पराक्रम गाजवणाऱ्या मराठ्यांना खास दरबार भरवून बक्षिसे देण्यात आली. अफझलखानाच्या वधानंतर एका वर्षाने शिवाजींनी एक जाहिरनामा काढून अफझलखानाचा वध होण्याअगोदर पुणे, सुपे, चाकण, इंदापूर व बारामती या प्रदेशात ज्या मुस्लीमांकडे व हिंदूकडे इनामे चालू होती ती तशीच पुढे सुरू ठेवली.

### अफझलखान विजयाचे महत्व व परिणाम

मराठ्यांच्या इतिहासात अफझलखान पेचप्रसंगास महत्वपूर्ण स्थान आहे. या पेचप्रसंगाचे महत्व विषद करताना सेतुमाधवराव पगडी म्हणतात, 'महाराष्ट्राचे राज्य १० नोव्हेंबर १६५९ रोजी खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले. कारण या मोहिमेत शिवाजींचा शेवट झाला असता तर स्वराज्यावर फार मोठे संकट कोसळले असते. अफझलखान विजयाचे महत्व पुढीलप्रमाणे विषद करता येईल.

१. आदिलशाही दरबारातील बलाढय सरदार अफझलखानाचा वध केल्यामुळे आसपासच्या प्रदेशात शिवाजींचा दबदबा व दरारा मोठ्या प्रमाणात वाढला. या प्रदेशातील जनता नव्या आशेने शिवाजींकडे आशेने पाहू लागली. शिवाजींचे राज्य आता भक्कम पायावर उभे झाले. शिवाजींनी मिळविलेला हा अभूतपूर्व विजय होता. या विजयामुळे शिवाजींच्या अंगभूत गुणांची, मुत्सद्देगिरीची, सेनापतीची, असामान्य नेतृत्वाची, धीरगंभीर स्वभावाची, धाडसाची व पराक्रमाची ओळख लोकांना झाली.

२. आदिलशाही दरबारामध्ये जे प्रबळ सरदार होते, त्यामध्ये अफझलखानाचा समावेश होता. अफझलखान शिवाजींचा सहज बंदोबस्त करेल असे आदिलशहास वाटत होते. परंतु शिवाजींनी अफझलखानाच्या केलेल्या वधामुळे व सैन्याच्या झालेल्या कत्तलीमुळे आदिलशाही दरबाराला प्रचंड धक्का बसला. विजापूर दरबाराची झोप उडाली. शिवाजीचा बंदोबस्त कसा करावा हा मोठा प्रश्न आदिलशहासमोर निर्माण झाला.

३. अफझलखानासारख्या बलाढय सरदाराचा वध केल्यामुळे मराठ्यांचा आत्मविश्वास प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढला. अफझलखानाच्या वधानंतर केवळ अठरा दिवसांनी म्हणजेच २८ नोव्हेंबर १६५९ रोजी पन्हाळ्यासारखा दुर्गम किल्ला मराठ्यांनी जिंकून घेतला. या

किल्ल्यावर शिवाजींचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे या किल्यावरून मराठ्यांना कोकणात उतरणाऱ्या दोन घाटांची नाकेबंदी करता येत असे.

४. अफझलखानाच्या वधामुळे व शिवाजींच्या कर्तत्त्वामुळे प्रभावित झालेले सिद्दी हिलाल, पांढरे, खराटे इ. अनेक सरदार शिवाजीस येऊन मिळाले. त्यामुळे मराठ्यांची लष्करी ताकद वाढली.

५. अफझलखान वधाचा मोगलांनाही धक्का बसला. भविष्यात शिवाजींच्या कारवायांना आपणासही तोंड द्यावे लागेल याची जाणीव त्यांना झाली.

६. अफझलखानाच्या छावणीत तोफखाना, दारूगोळा, जडजवाहिर, लष्करी साधनसामग्री मराठ्यांच्या हाती आली. खानाच्या छावणीतून मराठ्यांना ९५ हत्ती, ७० तोफा, ४००० घोडे, १२०० उंट, २००० कापडाच्या गाठी व दहा लाख रोख रक्कम मिळाली.

## २. २. ४ – सिध्दी जौहरची पन्हाळा मोहिम

बलाढय आदिलशाही सरदार अफझलखानाचा केलेला वध, अफझलखानाच्या वधानंतर केवळ अठरा दिवसांनी जिंकलेला पन्हाळ्यासारखा बळकट किल्ला व एकूणच शिवाजींनी आदिलशाही सत्तेविरूध्द स्वीकारलेले आक्रमक धोरण यामुळे विजापूर दरबार चिंताग्रस्त बनला. शिवाजींचा कसा बंदोबस्त करायचा हा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला. शिवाजींच्या आक्रमक कारवायांना आळा घालण्यासाठी व शिवाजींचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने तुंगभद्रेच्या काठी असलेल्या कर्नूलचा पराक्रमी परंतु बंडखोर वृत्तीचा सरदार सिद्दी जौहर याची नियुक्ती करण्यात आली. आदिलशहाने दरबार भरवून सिद्दी जौहरला मानाचा उंची पोषाख व सलाबतखान हा किताब देऊन सन्मान केला. शिवाजीविरूध्दच्या मोहिमेसाठी सिद्दी जौहर बरोबर फाजलखान, भाईखान, सिद्दी मसूद, बाजी घोरपडे, सादतखान, पीड नाईक, रूस्तुमजा, बडेखान या सरदारांनाही पाठवण्यात आले. सिद्दी जौहरबरोबर हे सरदार पाठवण्यामागे शिवाजींचा कायमचा बंदोबस्त करण्याचा हेतू होता. सिद्दी जौहरबरोबर पंधरा ते विस हजार घोडदळ, पस्तीस ते चाळीस हजार पायदळ होते. तोलामोलाचे सरदार व मोठे सैन्य घेऊन सिद्दी जौहरने शिवाजीविरूध्दची मोहिम हाती घेतली. पन्हाळा किल्यावर वास्तव्यास असलेल्या शिवाजींकडे यावेळी आठ हजार पायदळ होते. सिद्दी जौहरने २ मार्च १६६० रोजी पन्हाळा किल्यास वेढा दिला. राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांनी सिद्दी जौहरच्या मदतीसाठी हेन्री रेव्हींग्टन, मिघॅम, गिफर्ड व वेलजी यांच्याबरोबर 'एक तोफ व पन्नास तोफगोळे घेऊन रेव्हींग्टन मिघॅम, गिफर्ड व वेलजी यासह गेला, असा उल्लेख १६ एप्रिल १६६० च्या एका पत्रामध्ये आहे. इंग्रजांचा बावटा फडकवत इंग्रजांनी पन्हाळा किल्यावर तोफ डागली. इंग्रजांच्या या कारवाया तत्कालीन परिस्थितीत पहाण्याशिवाय शिवाजींसमोर दुसरा पर्याय नव्हता. या प्रदेशात पावसाळयात मोठया प्रमाणात पाऊस पडत असल्याने २ मार्च रोजी सिद्दी जौहरने दिलेला वेढा पावसाळा सुरू होताच ढिला होईल असे शिवाजींना वाटत होते. दरम्यानच्या काळात स्वराज्यावर आणखी एक संकट कोसळले. मोगल सरदार शाहिस्तेखान प्रचंड सैन्यासह स्वराज्यावर चालून आला. सोनवडी, सुपे,

बारामती, शिवापूर, सासवड व आसपासची गावे उध्वस्त करत मे १६६० मध्ये शाहिस्तेखान पुण्यात दाखल झाला. शिवाजींचे बालपण गेलेल्या लाल महालात शाहिस्तेखानाने वास्तव्य केले. सिद्दी जौहरचा वेढा सुरू असतानाच मोगलांच्या स्वराज्यावरील आक्रमणामुळे शिवाजी अधिकच चिंताग्रस्त झाले. सिद्दी जौहरचा पन्हाळयाचा वेढा शिथील करण्यासाठी नेताजी पालकरने थेट विजापूरवरच आक्रमण करून राजधानी विजापूरमध्ये दहशत निर्माण केली. पण याचा फारसा उपयोग झाला नाही. सिद्दी जौहरने सूर्यराव सूर्वे व जसवंतराव दळवी यांना विशालगडास वेढा देण्यास सांगीतले. या दोघांनी विशालगडास वेढा दिला. सिद्दी जौहरचा पन्हाळयाचा वेढा व मोगलांचे स्वराज्यावरील आक्रमण अशा दुहेरी संकटात शिवाजी सापडले होते. पन्हाळयाच्या वेढयातून निसटून गेल्याशिवाय तरणोपाय नाही याची खात्री शिवाजींना झाली.

**पन्हाळयावरून सुटका**

आपल्या दृष्टीने बनत जाणारी प्रतिकूल परिस्थिती पाहून शिवाजींनी जून १६६० मध्ये सिद्दी जौहरशी तहाचे बोलणे केले. त्यासाठी आपला वकील गंगाधरपंत यास सिद्दी जौहरकडे पाठविले. एका बाजूने सिद्दी जौहरशी तहाची बोलणी करायची व दुसऱ्या बाजूस गडावरून पलायन करण्याचे नियोजन शिवाजींनी सुरू केले. शिवाजींनी तहाचे बोलणे सुरू केल्यामुळे वेढ्यास शिथिलता आली. गस्तवाले काहीसे बेफिकीर झाले. शिवाजींनी आपला वकील गंगाधरपंत याच्या मार्फत 'आपण केलेले सर्व गुन्हे जर माफ होतील व सिद्दी जौहर कोणत्याही संकटातून वडिलपणे आपले संरक्षण करील तर आपण जातीने सिद्दी जौहरला भेटू व आपली सर्व मालमत्ता बादशहाच्या नावाने त्याचा स्वाधीन करू' असा निरोप पाठविला. शिवाजींशी तह होऊन गड आपल्या स्वाधीन होणार या बातमीने आदिलशाही सैन्य आनंदीत झाले. परिणामी वेढयामध्ये शिथीलता आली. याचा अचूक फायदा शिवाजींनी घेतला.

जुलै महिना उजाडला. मुसळधार पाऊस जोरदार कोसळू लागला. आपल्या निवडक लोकांसह सिद्दी जौहरच्या वेढयातून सहीसलामत बाहेर पडण्याचे नियोजन शिवाजींनी केले. त्यानुसार १३ जुलै १६६० वार शुक्रवार (आषाढ वद्य प्रतिपदा) रात्री शिवाजी आपल्या एक हजार पायदळ व दोन पालख्यांसह गडाबाहेर पडले. अंधारी रात्र, धो धो कोसळणारा मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट, वादळी हवा या सर्व प्रतिकुल परिस्थितीवर मात करत शिवाजी विशालगडाकडे निघाले. सिद्दी जौहर सावध होताच आपल्या पाठलागावर येणार याची जाणीव होती. अशा प्रतिकुल परिस्थितीत शिवाजींनी ४० मैल अंतर कापून विशालगडावर पोहचायचे होते. अंतर फार नव्हते, परंतु दुथडी भरून वहाणारे ओढे, गुडघाभर चिखल तुडवत पार करावे लागत असणारे अंतर व अवघड रस्ता या सर्वांवर मात करत आपल्या निवडक विश्वासू सहकाऱ्यांसह शिवाजींनी विशालगडाकडे मार्गक्रमण सुरू केले. शत्रू सावध झाल्यानंतर आपला पाठलाग करत येणार याची जाणीव शिवाजींना होती. त्यामुळे अधिकाधीक वेगाने विशाळगडाकडे शिवाजींनी मार्गक्रमण सुरू केले. शिवाजींनी गडावरून पलायन केल्याचे लक्षात येताच सिद्दी जौहरने आपला जावाई

सिद्दी मसऊदला शिवाजींच्या पाठलागावर पाठवले. प्रसंग मोठा अडचणीचा होता. गजापूरच्या खिंडीपर्यंत शिवाजी येऊन पोहचले. येथून विशाळगड आठ मैलाच्या अंतरावर होता. सिद्दी मसऊदचे घोडदळ वेगाने शिवाजींचा पाठलाग करत होते. अशा कठीण प्रसंगी बाजीप्रभू देशपांडे याने गजापूरच्या खिंडीत सिद्दी मसऊदचे सैन्य अडवण्याचा निर्णय घेतला. तोपर्यंत शिवाजींनी विशाळगडावर पोहचावे. गडावर पोहोचताच तोफेचे इशारतीचे आवाज करण्याचे ठरविण्यात आले. बाजीप्रभूच्या नेतृत्वाखालील मराठयांनी पराक्रमाची शिकस्त केली. मोठया शौर्याने बाजीप्रभू देशपांडेंनी गजापूरची खिंड अडवून धरली. मराठे व सिद्दी मसऊदची फौज यांच्यात तुंबळ युध्द सुरू झाले. 'प्रहर दीड प्रहर पावेतो फौज खिंड चढो दिधली नाही.' असे वर्णन ९१ कलमी बखरीत आहे. दरम्यानच्या काळात शिवाजींनी सूर्यराव सुर्वे व जसवंतराव दळवी या आदिलशाही सरदारांनी विशाळगडास दिलेला वेढा मोडून काढत विशाळगडावर पोहचले. गडावर पोहोचताच शिवाजींनी तोफेच्या इशारतीचे आवाज देताच बाजीप्रभू देशपांडेंनी कर्तव्यपूर्तीने प्राण सोडले. गजापूरची ही खिंड इतिहासात पावनखिंड म्हणून प्रसिध्द आहे. सिद्दी मसऊदने विशाळगडासही वेढा घातला. मराठयांनी मोठया जिद्दीने गड लढवला. शेवटी निराश होऊन विशाळगडाचा वेढा उठवून सिद्दी मसऊद परतला. जुलै अखेर शिवाजी विशाळगडावरून रायगडाकडे रवाना झाले. एकाच वेळी आदिलशहा व मोगल यांच्याशी संघर्ष नको म्हणून शिवाजींनी सिद्दी जौहरशी तह करून २२ सप्टेंबर १६६० रोजी पन्हाळा किल्ला विजापूरकरांच्या स्वाधीन केला. पन्हाळयावरून शिवाजींना पलायन करू देण्यात सिद्दी जौहरचाच हात असावा असा संशय आदिलशहास आला.

## २. ३. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम

१. शिवाजींनी जावळी प्रदेशावर स्वारी करण्याची कारणे सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

२. जावळी पेचप्रसंगाची सविस्तर माहिती सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३. जावळी विजयाचे महत्व विषद करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४. आदिलशहाने शिवाजीविरोधात अफझलखानाची नियुक्ती का केली ते सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

५. अफझलखान पेचप्रसंगाची सविस्तर माहिती सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

६. अफझलखान प्रसंगाचे मराठयांच्या इतिहासातील महत्व विषद करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

७. सिद्दी जौहरने घातलेल्या पन्हाळयाच्या वेढयाची माहिती सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

८. आदिलशहा व शिवाजी यांच्यातील संबंध सविस्तर स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

## २. ४ सारांश

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील महत्वपूर्ण घटना म्हणून मराठी सत्तेच्या स्थापनेकडे पाहिले जाते. शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी मराठी सत्तेची स्थापना व विस्तार घडवून आणला. मराठयांच्या दृष्टीने शिवाजींचे कार्य म्हणजे स्वराज्यस्थापना होती. तर आदिलशाही सत्तेच्या दृष्टीने शिवाजींचे हे कार्य म्हणजे बंडखोरी होती. शिवाजींचे स्वराज्यस्थापनेचे उद्योग ज्या प्रदेशात सुरू होते तो प्रदेश आदिलशाही सत्तेचा होता. त्यामुळे शिवाजी व आदिलशहा संघर्ष अपरिहार्य बनला. शिवाजींच्या कारवायांचा बंदोबस्त करण्यासाठी आदिलशहाने सुरूवातीस फत्तेखान या सरदाराची नियुक्ती शिवाजींच्या विरोधात केली. शिवाजींनी फत्तेखानाचा सहज पराभव केला. येथून शिवाजी व आदिलशहा यांच्यात प्रत्यक्ष संघर्षास सुरूवात झाली. शिवाजींनी स्वीकारलेल्या आक्रमक धोरणामुळे हा संघर्ष दिवसेंदिवस वाढतच गेला. शिवाजींनी जावळीचा आदिलशाही सरदार चंद्रराव मोरेंचा पराभव करून केलेला स्वराज्याचा विस्तार पाहून तर आदिलशहा अधिकच

काळजीत पडला. शिवाजींचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी बलाढय सरदार अफझलखान याची नियुक्ती केली. आदिलशाही दरबारातील जे प्रमुख प्रबळ व बलाढय सरदार होते त्यामध्ये अफझलखानाचा समावेश होत होता. अफझलखान शिवाजींचा सहजच बंदोबस्त करेल असे आदिलशहास वाटत होते. पण शिवाजींनी अफझलखानाचाही पराभव केला. त्यामुळे आदिलशहा अधिकच चिंताग्रस्त बनला. त्यानंतर आदिलशहाने सिद्दी जौहरची नियुक्ती शिवाजींच्या विरोधात केली. पण त्याचाही फारसा उपयोग झाला नाही. शिवाजींचे स्वराज्यस्थापनेचे कार्य दिवसेंदिवस वाढतच गेले. पुढे १६७४ मध्ये राज्याभिषेक करून शिवाजींनी आपल्या राज्यास कायदेशीर स्वरूप प्राप्त करून दिले. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील सोनेरी घटना म्हणून शिवाजींच्या राज्याभिषेकाकडे पाहिले जाते.

## २. ५ पारिभाषिक शब्द

१. जहागीर – राजाकडून मिळालेली इनाम जमीन

२. किल्लेदार – किल्ल्यावरील मुख्य अधिकारी

३. शिनंदी – हंगामी फौज

४. फर्मान – आज्ञापत्र, राजाज्ञा

५. स्वराज्य – लोकांच्या हितासाठी लोकमतास अनुसरुन चालवलेली राज्यपद्धती

## २.६ संदर्भसूची


१. बेंद्रे वा. सी., (द्वितीय आवृत्ती २०१३), छत्रपती शिवाजी महाराज पूर्वार्ध, कोल्हापूर, पार्श्व पब्लिकेशन्स.

२. सरदेसाई गोविंद सखाराम, (दुसरे पुनर्मुद्रण २०१०), मराठी रियासत खंड १, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन.

३. डॉ. कुलकर्णी अ. रा. (संपा.द्ध, ;२००७), जेधे शकावली – करिना, पुणे, डायमंड पब्लिकेशन.

४. पठाण यू. म. (संपा.), ;चतुर्थावृत्ती २००७) सभासद बखर, पुणे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस.

५. मेहंदळे गजानन भास्कर, (द्वितीय पुनर्मुद्रण २००७), श्री राजा शिवछत्रपती भाग १, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स,

६. डॉ. कुलकर्णी अ. रा., डॉ. देशपांडे प्र. न. (तृतीयावृत्ती) १९९९ (मराठ्यांचा इतिहास भाग पहिला) पुणे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस.

७. डॉ. कुलकर्णी अ. रा. खरे, ग. ह. (संपादक) २००६ मराठ्यांचा इतिहास खंड १, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

# घटक ३

# शिवाजी मुगल संबंध

## अनुक्रमणिका


**३.० उद्दिष्टे**

**३.१ प्रस्तावना**

**३.२ विषय विवेचन**

**३.२.१ शाहिस्तेखानाची स्वारी–**

३.२.१.१ कारणे

३.२.१.२ शाहिस्तेखानाच्या स्वारीचा घटनाक्रम

३.२.१.३ शाहिस्तेखानाच्या पराजयाचे परिणाम

**३.२.२ सुरतेची पहिली मोहिम–**

३.२.२.१ सुरतची निवड का केली

३.२.२.२ सुरत मोहिमचा घटनाक्रम

३.२.२.३ छत्रपती शिवाजी महाराज परकीय व्यापाऱ्यांना घाबरण्याचा बनाव

**३.२.३ मिर्झाराजे जयसिंगची मोहीम व पुरंदरचा तह**

३.२.३.१ कारणे

३.२.३.२ जयसिंगाची योजना

३.२.३.३ स्वारीचा घटनाक्रम

३.२.३.४ पुरंदरच्या तहाचे स्वरूप

३.२.३.५ पुरंदरच्या तहास संमती का दिली?

३.२.३.६ जयसिंग यशस्वी का झाला?

**३.२.४ आग्रा भेट व सुटका**

३.२.४.१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीची कारणे

३.२.४.२ आग्रा भेटीचा घटनाक्रम

३.२.४.३ आग्रा भेटीचे परिणाम

**३.२.५. इ.स.१६६६–१६७३ या काळातील मुघल व आदिलशाहीसत्तांशी संघर्ष.**

३.२.५.१ कारणे

३.२.५.२ मुगलाबरोबर संघर्ष (घटनाक्रम)

३.२.५.३ आदिलशाही बरोबर संघर्ष

**३.३ स्वयं–अध्ययन प्रश्न**

**३.४ सारांश**

**३.५ पारिभाषिक शब्द**

**३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके**

**३.७ सरावासाठी स्वाध्याय**

## ३.० उद्दिष्टे :

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर तुम्हांस खालीलप्रमाणे माहिती मिळेल

* शिवाजी-मुगल संघर्षातील शाहिस्तेखान, मिर्झाराजा जयसिंग यांच्याबरोबर शिवाजी महाराजांचा संघर्ष
* शिवाजी महाराजांची आग्रा भेट व सुटका
* सुरत शहरावरील प्रथम मोहिम
* शिवाजी-आदिलशाही संघर्षातील पन्हाळा किल्ल्यावरील विजय

## ३.१ प्रस्तावना

दक्षिणेत शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. याचा परिणाम दक्षिणेतील संपूर्ण राजकीय स्थितीवर झाला. स्वराज्याच्या स्थापनेने फक्त दक्षिणेतील राजकीय समीकरणेच बदलली नाहीत तर याचा मुगल-दक्षिण संबंधावर देखील मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला. या घटकात आपण शिवाजी-मुगल संबंधावर विवेचन केलेले आहे. दक्षिणेत १७व्या शतकात मुगलांकडून मराठी स्वराज्य नष्ट करण्यासाठी केलेल्या सर्व प्रयत्नांना मराठ्यांनी हाणून पाडले. यामुळे दक्षिणेत एक हाती सत्ता स्थापनेचे त्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

शिवाजी- मुगल संबंधाचे अध्ययन करण्याआगोदर आपण शिवाजी-मुगल संबंधाच्या इतिहासासाठी उपयोगी साधने व मराठ्यांच्या स्वराज्याच्या प्रदेशाच्या भौगोलिक स्थानाचा परिचय करून घेऊ.

साधने : महाराष्ट्रातील स्वराज्याचा प्रदेशात सह्याद्रीच्या डोंगर रांगा ज्याला पश्चिम घाट असे देखील संबोधले जाते, याचा समावेश होतो. तसेच पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील कोंकणचा प्रदेश अंतर्भुत होतो. सह्याद्रि पर्वताच्या माथ्यावरील भागास घाटमाथा व खाली पायथ्याशी असलेल्या प्रदेशास देश म्हटले जाते. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत

## ३.२ विषय - विवेचन

### ३.२.१ शाहिस्तेखानाची स्वारी- (इ.स.१६६०)

#### ३.२.१.१ शाहिस्तेखानाच्या स्वारीची कारणे :

औरंगजेबाने आपला राज्याभिषेक झाल्यानंतर फेब्रुवारी १६६० मध्ये आपला मामा व मुगल दरबारातील अमीर शाहिस्तेखान याची दक्षिणेकडे रवानगी केली. त्यानुसार शाहिस्तेखान आपली मोठी फौज व अधिकार घेऊन अहमदनगर, सुपे, होळ, शिरवळ, सासवड या मार्गाने पुण्याकडे निघाला. शाहिस्तेखानासारख्या सरदारास औरंगजेबाने दक्षिणेत नुकत्याच उदयास येत असलेल्या मराठी स्वराज्यावर का पाठवले? त्याची कारणे काय होती? हे आपण पाहू,

**१. छत्रपती शिवाजी महाराजांचा वाढता दरारा :**

औरंगजेब दक्षिणेत सुभेदार असतानाच छत्रपती शिवजी महाराजांनी स्वराज्य

उभारणीसाठी चालवलेल्या कारवायांनी तो सावध झाला होता. मात्र दिल्लीकडे उद्‌भवलेल्या वारसा युद्धाच्या प्रश्नामुळे त्यास ताबडतोब दक्षिणेतून दिल्लीकडे जावे लागले. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारवाया अधिक तीव्र केल्या. त्यामुळे मराठ्यांच्या साम्राज्याची ताकद दिवसेंदिवस वाढतच चालली. मराठ्यांच्या या वाढत चाललेल्या ताकदीमुळे मराठ्यांच्या स्वराज्याशेजारील आदिलशाह व मुगल आणि इतर सत्तांमध्ये छत्रपती  शिवाजी महाराजांचा दरारा वाढत चालला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वाढत चाललेल्या शक्तिमुळे दक्षिणेतील सत्तांमध्ये दरारा निर्माण झाला. छत्रपती शिवाजी महाराजांची ही वाढती ताकद भविष्यात मोगल बादशाहीलाच जाचक ठरणार आहे हे औरंगजेबाने ओळखले होते. म्हणून वेळीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारवायांवर नियंत्रण ठेवून त्यांचा दरारा संपवणे हे मोगली सत्तेला जरूरी वाटले होते.

### २. मोगली प्रदेशावर हल्ला :

छत्रपती  शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा विस्तार करताना बऱ्याच प्रदेशावर हल्ला करून ते आपल्या अधिकाराखाली आणले.  यामध्ये मोगलांच्या अधिकाराखाली असलेल्या प्रदेशाचाही समावेश होतो. त्यामुळे हे मोगलांना एक प्रकारचे आव्हानच होते. वेळीच जर शिवाजीच्या हल्ल्यास पायबंद घातला नाही तर दक्षिणेतील प्रदेश आपल्या हातातून पूर्णपणे निघून जाईल,  याची भीती औरंगजेबास वाटली म्हणून त्याने शाहिस्तेखानाची दक्षिणेतील मोहीम सुरू केली.

### ३. विजापूरच्या मदतीला प्रतिसाद :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य विस्तार करताना मोगलांच्या प्रदेशावर हल्ला करून ते काबीज केले. त्याप्रमाणे दक्षिणेतील स्वराज्याच्या शेजारील एक प्रबळ सत्ता विजापूरची आदिलशाही, याच्या प्रदेशावर देखील हल्ला करून ते स्वराज्य मिळविण्याचा क्रम लावला होता. त्यामुळे विजापूर दरबारातही छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अस्वस्थता पसरली होती. त्यातूनच विजापूर दरबारातील एक नामांकित व बलाढ्य सरदार अफझलखान याची नेमणूक शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी केली. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय बुद्धीचातुर्याने त्याला ठार केले.

यावरून शिवाजीचा बंदोबस्त करणे आपल्याकडून शक्य होणार नाही याची खात्री विजापूर दरबारास पटली व त्यांनी मोगलांना शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी मदत करण्याची विनंती केली. म्हणूनच औरंगजेबाने शाहिस्तेखानास मराठी स्वराज्यावर पाठविले.

### ४. मुगल विजापूर मैत्री करार :

दक्षिणेत मोगली सत्ता प्रबळ करण्यासाठी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी मोगल व विजापूरचा आदिलशाह यांच्यात एक करार झाला. या करारान्वये संकटसमयी उभयतांनी एकमेकांस साहाय्य करण्याचे मान्य केले होते. अफजलखानाच्या प्रकरणावरून आदिलशहाच्या हे लक्षात आले की शिवाजीवर नियंत्रण ठेवणे आपल्या शक्तिच्या

बाहेर आहे. त्यावेळी त्याने मोगल व आपल्यात झालेल्या करारानुसार शिवाजीचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबास विनंती केली. आपण कराराचा किती मान ठेवतो हे दाखविण्यासाठी औरंगजेबाने ही शाहिस्तेखानास दक्षिणेच्या मोहीमेवर पाठवले.

### ३.२.१.२ शाहिस्तेखानाच्या स्वारीचा घटनाक्रम :

### १. शाहिस्तेखानाची दक्षिणेकडे कूच :

औरंगजेबाद्वारे शाहिस्तेखानाची इ.स.१६५७ रोजी दक्षिणेच्या स्वारीसाठी नेमणूक झाली. तो जय्यत तयारी करून इ.स.१६६० रोजी दक्षिणेतील मोगलांच्या सत्तेचे केंद्र असलेल्या औरंगाबाद येथे मुक्काम करून एप्रिल १६६० रोजी पुण्याच्या दिशेने शिरवळ येथे येऊन पोहचला. त्या ठिकाणच्या प्रदेशाची लुट करीत मे १६६० रोजी शाहिस्तेखान पुण्यामध्ये येऊन दाखल झाला.

पुण्यामध्ये आल्यावर शाहिस्तेखानाने खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांच्या निवासस्थानात म्हणजेच लालमहालामध्ये आपला मुक्काम ठोकला. मात्र या ठिकाणी आपल्या गनिमी काव्याच्या हल्ल्याने मराठी सैन्यानी त्यास त्रस्त करून सोडले. त्यामुळे त्याने आपल्या आश्रयासाठी पुण्यापासून काही अंतरावरील चाकण या ठिकाणच्या मजबूत किल्यावर हल्ला चढविला.

### २. किल्लेदार फिरंगोजी नरसाळ याची स्वामीभक्ती व पराक्रम :

शाहिस्तेखानाने आश्रयासाठी सुरक्षित ठिकाण म्हणून चाकणच्या किल्यावर हल्ला चढविला. यावेळी या किल्ल्याचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा हा होता. त्याने शाहिस्तेखानाने केलेल्या हल्ल्यास मोठ्या शौर्याने प्रत्युत्तर दिले. आपल्याकडील सीमित युद्ध साहित्याच्या जोरावर शाहिस्तेखानाकडील मोठे युद्धसाहित्य, तोफा, सैनिक आदिंचा प्रतिकार करताना शौर्याची पराकाष्ठा केली. कारण त्याला माहित होते कि शाहिस्तेखानाच्या रूपाने हे संकट फक्त आपल्यावरच नाही तर संपूर्ण स्वराज्यावरच आले आहे. त्यामुळे स्वराज्याच्या रक्षणासाठी आपला प्राण गेला तरी बेहत्तर. मात्र किल्ला शाहिस्तेखानाच्या हाती लागता कामा नये. या विचारानेच प्रभावित होऊन फिरंगोजी व त्याच्या सैन्याने किल्ला बराच काळ लढविला. यात शाहिस्तेखानाच्या सैन्याचे मोठे नुकसान झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा फिरंगोजी नरसाळासारखा साधा किल्लेदार आपल्या प्रचंड फौजेस इतका त्रास देऊ शकतो, तर प्रत्यक्ष शिवाजी किती पराक्रमी असेल. याची प्रचिती शाहिस्तेखानास फिरंगोजीच्या पराक्रमावरून आली. त्यामुळे असा पराक्रमी वीर आपल्या बाजूने असावा. यासाठी फिरंगोजीस आपल्या सेवेत रुजू होण्यासाठी मोठ्या धनाचे व जहागिरीचे आमिष शाहिस्तेखानाने दाखविले. पण फिरंगोजी हा स्वराज्याचा स्वामिनिष्ठ शिपाई असल्याने त्याने शाहिस्तेखानाचे धन व जहागिरी नाकारली व निकराने किल्ला लढवत राहिला. मात्र काही काळानंतर शाहिस्तेखानाच्या प्रचंड फौजा व साधनसामुग्री यापुढे असल्यामुळे अल्प फौज व अल्प साधनसामुग्री असल्यामुळे फिरंगोजीस माघार घ्यावी लागली.

### ३. मराठ्यांशी समेटाचा विचार :

फिरंगोजीशी लढताना जरी शेवटी किल्ला हाती आला असला तरी शिवाजीशी सामना करणे व त्यास आपल्या अंकित आणणे किती अवघड आहे, हे शाहिस्तेखानास चाकण प्रकरणावरून कळून चुकले होते म्हणूनच त्याने असे लढून स्वत:चे नुकसान करून घेण्यापेक्षा शिवाजीबरोबर समेट करण्याचा विचार त्याच्या मनात आला व तसे त्याने औरंगजेबास कळविलेदेखील. मात्र औरंगजेब हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या दक्षिणेत वाढत असलेल्या सत्तेचा पूर्ण निप्पात करून हा प्रश्न कायमचा संपवून टाकण्याचा विचार करत होता. त्यासाठी त्याने शाहिस्तेखानाच्या मदतीस जसवंतसिंहासारखे पराक्रमी सरदार व मोठा दारूगोळा पाठविला होता. म्हणून त्याने शाहिस्तेखान-शिवाजीबरोबरील समेटाचा प्रस्ताव फेटाळून लावला. व शाहिस्तेखानास शिवाजीचा कायमचा बंदोबस्त करण्याचा आदेश पाठविला.

त्यानुसार शाहिस्तेखान आपल्या सैन्य व सरदारांस स्वराज्याच्या प्रदेशात पाठवून स्वत: पून्हा पूण्यामध्ये लालमहालात छावणी करून राहिला. व तेथूनच मोहीमांचे संचलन करू लागला.

### ४. करतलबखान व रायबागन यांचा पराभव : (इ.स.१६६१)

छत्रपती शिवाजी महाराजांची चारही बाजूने कोंडी करण्यासाठी शाहिस्तेखानाने पुण्यामध्ये स्वत: छावणी देऊन राहिला. त्याने आपल्या फौजा स्वराज्याच्या प्रदेशात धुमाकूळ, लुटालूट करण्यासाठी पाठविल्या. त्याचाच एक भाग म्हणून मराठ्यांचे दक्षिण कोकणातील प्रदेश काबीज करण्यासाठी इ.स. १६६१ मध्ये करतलबखान यास मोठ्या फौजेनिशी कोकणात पाठवले. यावेळी करतलबखानाबरोबर विशेष म्हणजे माहूरच्या देशमुखाची विधवा पत्नी रायबागन ही सेनानी देखील मोगलांच्या बाजूने स्वराज्याचा प्रदेश काबीज करण्यासाठी उत्तर कोकणातील मोहीमेवर होती.

करतलबखान व रायबागन यांच्या संयुक्त फौजा दक्षिण कोकणकडे जात असताना त्यांची खबर मराठ्यांना लागली. त्यामुळे कोकणासारखा महत्वाचा प्रदेश वाचविण्यासाठी खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांनीच कोकणच्या मार्गातील उंबरखेड या ठिकाणी करतलबखान व रायबागनच्या फौजेस गाठून निकराचा हल्ला केला. सैन्याची मोठी कत्तल घडवून आणली व मोठी लूट हस्तगत केली. या लुटीचा एक भाग म्हणजे छत्रपती महाराजांनी रायबागन या स्त्री सेनानीची लढाई संपल्यानंतर एक स्त्री व सेनानी म्हणून पूर्ण आदर ठेवला. करतलबखानाच्या फौजेचा पूर्ण पाडाव केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी पुढील जबाबदारी नेताजीवर सोपवून स्वत: दक्षिण कोकणच्या बंदोबस्तासाठी गेले.

### ५. शाहिस्तेखानाचा पलटवार :

करतलबखान व रायबागन यांच्या उंबरखिंड घाटातील पराजयाने शाहिस्तेखान अतिशय संतापून गेला. त्याने मराठ्यांच्या सैन्याकडून झालेल्या नाचक्कीचा सूड घेण्यासाठी आपल्या सरदारास अधिकची फौज देऊन पून्हा दोनच महिन्यात कोकणातील मराठ्यांच्या प्रदेशावर

हल्ला चढवला. उत्तर कोकणातील पेणपासून कल्याण भिवंडीपर्यंतच्या प्रदेशावर हल्ला करून जवळजवळ संपूर्ण प्रदेश आपल्या अधिकाराखाली आणला.

त्याचप्रमाणे घाटावरील रहिमतपूरपासून ते कोकणातील चौलपर्यंतच्या प्रदेशात अक्षरश: लुट आरंभली. ज्या ठिकाणी लढाईने काम होत नव्हते त्या ठिकाणी त्याने जहागिरी व रोख रकमेचे आमिष दाखवून फितुरीद्वारे प्रदेश हस्तगत केले. अशा या चौफेर लुटालुटीमुळे आधिच थोड्या संख्येने असलेल्या मराठी सैन्याला एकाच वेळी स्वराज्याच्या मुलखात शत्रुचा प्रतिकार करणे अशक्य होऊ लागले. त्यामुळे बराचसा प्रदेश शाहिस्तेखानाने गिळंकृत केला. यामुळे मराठ्यांचा आत्मविश्वास देखील कमी होऊ लागला. छत्रपती शिवाजी महाराजांनी या संकटातून बाहेर पडण्यासाठी शक्तीपेक्षा युक्तीने प्रयत्न सुरू केले.

## ६. शाहिस्तेखानाचा हल्ला : (५ एप्रिल १६६३)

शाहिस्तेखानाच्या सैनिकांनी स्वराज्याच्या सर्व प्रदेशावर एकाच वेळी चालवलेल्या हल्ल्यामुळे मराठी सैन्याचे मनोबल कमी होऊ लागले. हे मनोबल वाढविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी झाडाच्या फांद्या तोडण्यापेक्षा प्रत्यक्ष मूळावरच घाव घालण्याचा विचार पक्का केला. म्हणजे संपूर्ण स्वराज्यात धुमाकुळ घालणाऱ्या एक-एक सरदारावर हल्ला करून त्यांना नामोहरम करण्यापेक्षा खुद्द शाहिस्तेखानावर हल्ला करण्याचा निर्धार केला व तशातच एक अफलातून, अकल्पित योजना तयार केली.

या योजनेद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या हेरांमार्फत पुण्यातील लालमहालात शाहिस्तेखानाच्या निवासाची तसेच त्या ठिकाणी असलेल्या सुरक्षा व्यवस्थेची बारीकसारीक माहिती जमा केली. तसे पाहता लालमहाल हा छत्रपती शिवाजी महाराजांचेच निवासस्थान असल्यामुळे तेथील चोरवाटा, सर्व वाटा यांची त्यांना बारिक माहिती होतीच. मात्र शाहिस्तेखान पुण्यात आल्यापासून त्याने आपल्या सुरक्षेच्या दृष्टीने लालमहालात बरेच बदल करून घेतले होते. त्यामुळे हल्ल्याच्या वेळी जराजरी चूक झाली तरी जीवावर बेतणारे होते. व ते स्वराज्याला परवडणारे नव्हते. त्यामुळे हल्ल्याच्या यशस्वीतेत बिलकुल चूक नको. म्हणून त्यांनी आधीच सर्व बारीकसारीक माहिती आपल्या हेरांकरवी जमा केली. तसे शिवाजी महाराज कधी गाफिल राहतच नसत. परंतु आत्मविश्वासही ठेवित नसत. हे यावरून स्पष्ट होते.

गुप्तहेरांकडून मिळालेल्या माहितीवरून महाराजांनी शाहिस्तेखानावर हल्ला करण्याची एक प्रभावी योजना बनवली. त्यानुसार महाराजांकडील दोन-चार माणसे आपण पहारेकरी असल्याचे भासवून सरळ शाहिस्तेखानाच्या मुक्कामाच्या ठिकाणी म्हणजेच लालमहालात आधीपासूनच पोहचले. ठरल्याप्रमाणे मध्यरात्रीच्या सुमारास महाराज व दोन-चारशे माणसे रात्रीतून पुण्यामध्ये दाखल झाले. व लालमहालाच्या मागच्या बाजूने कच्ची भिंत फोडून महालात प्रवेश केला. त्यावेळी शाहिस्तेखान व त्याचा जनानखाना गाढ निद्रेत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हल्ल्याचा आवाज ऐकून महालात एकच गोधळ निर्माण झाला. यामध्ये शाहिस्तेखानाचा मुलगा फत्तेखान मारला गेला व खुद्द शाहिस्तेखान हा बोटावर वार लागल्यामुळे जखमी अवस्थेत अंधाराचा फायदा घेऊन जीव मुठीत घेऊन

पळाला. शाहिस्तेखान पळाल्यामुळे महाराज शाहिस्तेखानाचे सैन्य सावध होण्याआधीच महालातून बाहेर पडले व आपल्या विश्वासू सैनिकाच्या एका तुकडीबरोबर ठरल्या प्रमाणे सुरक्षितपणे सिंहगडावर पोहोचले.

## ७. शाहिस्तेखानाचा सिंहगडावर हल्ला व पराभव :

छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानावर रात्रीतून अचानक केलेल्या हल्ल्यामुळे शाहिस्तेखान कसाबसा आपला जीव वाचवून पळाला. मात्र यावेळी त्याचा मुलगा फत्तेखान मारला गेला. या घटनेमुळे संपूर्ण हिंदुस्तानात छत्रपती शिवाजी महाराजांचा दरारा वाढला. तर शाहिस्तेखानाची म्हणजेच औरंगजेबाची नाचक्की झाली. त्यामुळे शाहिस्तेखान अतिशय चिडला. त्याने छत्रपती महाराजांच्या या कृत्याचा सूड घेण्यासाठी त्वरित म्हणजेच ६ एप्रिल १६६३ रोजी पहाटेच म्हणजे हल्ला झाल्यानंतर लगेच जराही वेळ न घालवता छत्रपती शिवाजी महाराजांच्या मार्गावर स्वत: सिंहगडाकडे मोठी फौज घेऊन कूच केली. मात्र शाहिस्तेखानाचे हे सैन्य जवळ येताच मराठ्यांच्या सैन्याने आधीपासूनच तयार असलेल्या तोफांच्याद्वारे खानाच्या सैन्यावर मोठ्या दारूगोळ्याचा मारा सुरू केला. त्यामुळे रात्रीच्या प्रकरणातून अजूनही न सावरलेल्या सैनिकांचे मनोधैर्य अधिकच खचू लागले. त्यामुळे त्यांच्याकडून म्हणावा तसा प्रतिकार होत नव्हता.

त्यातच मराठ्यांच्या सैन्याकडून होत असलेल्या दारूगोळ्याच्या भडीमारातून एक तोफेचा गोळा खुद्द शाहिस्तेखानाच्या हत्तीस लागल्याने तो ठार झाला. त्यामुळे रात्रीच कसाबसा अंधाराचा फायदा घेऊन जीव वाचवलेला खान यावेळी मात्र अगदीच घाबरून गेला. त्यातच सैन्य देखील कच खावू लागल्यामुळे यापुढे मराठ्यांच्या प्रदेशात राहणे धोक्याचे आहे. त्यामुळे सुरक्षित ठिकाण म्हणून त्याने सरळ औरंगाबादला आपली छावणी हलवली. शाहिस्तेखानाच्या अशा दैन्य अवस्थेमुळे फक्त शाहिस्तेखानाचीच नाचक्की झाली नव्हती, तर ती संपूर्ण मुघल साम्राज्याची व त्या अनुषंगाने मुगल साम्राज्याचा सम्राट व शाहिस्तेखानाचा भाचा म्हणून खुद्द औरंगजेबाची नाचक्की होती. त्यामुळे औरंगजेबाच्या दृष्टीने शिवाजीसारख्या एका छोट्या शासकाने शाहिस्तेखानासारख्या प्रचंड सैन्यशक्ति असलेल्या सरदारास पराजित करावे. ही औरंगजेबासारख्या बादशहास मान खाली घालण्यास लावणारी घटना होती. त्यामुळेच शाहिस्तेखान औरंगाबादेत असतानाच औरंगजेबाने त्यास दक्षिणेतून माघारी बोलावून त्याची नेमणूक डिसेंबर १६६३ मध्ये दिल्लीपासून दूर बंगाल प्रांताचा अधिकारी म्हणून केली. ही एक प्रकारची शाहिस्तेखानास शिक्षाच होती.

अशा प्रकारे शाहिस्तेखानास प्रचंड अनुभवी व मोठी सैन्यशक्ति असलेल्या सेनापतीस छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याजवळील अल्पशा सैनिक व युद्ध साहित्याच्या जोरावर माघार घेण्यास भाग पाडले. हे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या अंगी असलेल्या प्रभावी नेतृत्व, कल्पक बुद्धी इ.गुण व निष्ठावान, जीवास जीव देणारे मावळे तसेच महाराष्ट्रातील सामान्य सैनिकापासून तर सरदार व खुद्द छत्रपती शिवाजी महाराज यांची स्वराज्याविषयी असलेल्या अतुट निष्ठेमुळेच शक्य झाले असे म्हणावे लागेल.

### ३.२.१.३ शाहिस्तेखानाच्या पराजयाचे परिणाम :

मराठी स्वराज्याचा नाश करण्यासाठी औरंगजेबाने शाहिस्तेखानास मोठी फौज, रसद देऊन दक्षिणेत पाठवले. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या शौर्याने व कल्पक बुद्धीच्या जोरावर शाहिस्तेखानाच्या संकटाचा यशस्वी मुकाबला केला. त्यामुळे शाहिस्तेखान इ.स.१६६४ च्या मे महिन्यापर्यंत मोहीमेची समाप्ती झाली. मात्र या मोहीमेचे मोगल व मराठे या उभयता सत्तांवर काय परिणाम झाले ते आपण पाहू:

**१. मराठ्यांच्या आत्मविश्वासात वाढ:**

स्वराज्याची उभारणी सुरू असताना आदिलशाही, कुतुबशाही आदिद्वारे या कार्यात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यातच मोगलांकडून शाहिस्तेखानाच्या रुपाने एक मोठे संकट स्वराज्यावर चालून आले. यावेळी हे संकट आत्तापर्यंतच्या आलेल्या संकटापेक्षा मोठे होते. कारण नुकत्याच आलेल्या अफजलखानाच्या रुपाने झालेल्या संकटामुळे स्वराज्याचे मोठे नुकसान झाले होते. त्यातून सावरतो न सावरतो तोपर्यंत शाहिस्तेखानाने स्वारी केली. त्याने आधीपासूनच अडचणीत असलेल्या सा.शेतकरी, जनता यांच्या मालमत्तेची लूट करून मोठे नुकसान केले होते. त्यामुळे आपले स्वराज्य टिकेल की नाही? याची भीती सर्वांच्या मनात निर्माण झाली होती. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाच्या छावणीत शिरून त्यास जखमी केले. त्यामुळे शाहिस्तेखान घाबरून औरंगाबादमध्ये गेला व शेवटी स्वराज्यावरील संकट दूर झाले. या विजयाने मराठ्यांचा गेलेला आत्मविश्वास परत आला. व ते नव्या जोमाने स्वराज्याच्या उभारणीच्या कार्यास लागले.

**२. जसवंतसिंहांच्या रुपाने नवा मित्र मिळाला:**

औरंगजेबाने शिवाजीचा बिमोड करण्यासाठी शाहिस्तेखानाबरोबर बरेच मातब्बर सरदार पाठविले होते. कारण औरंगजेबाचा मुळात स्वभावच संशयी होता. तो स्वत: सोडून दुसऱ्या कोणावरही विश्वास ठेवत नसे. त्यामुळेच प्रत्येक मोहीमेप्रसंगी मुख्य सेनापती बरोबर उपसेनापती ही पाठवित असे. जेणेकरून त्याच्या विरूद्ध बंड न होता दोघांवरही नियंत्रण राहिल.

त्यामुळेच शाहिस्तेखानाच्या स्वराज्यावरील मोहीमेवर देखील त्यांच्याबरोबर जसवंतसिंहाला पाठविले. ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाच्या लालमहालातील छावणीवर हल्ला केला. त्यावेळी मार्गामध्ये जसवंतसिंहच्या नेतृत्वाखाली मोठी फौज होती. मात्र जसवंतसिंहाने छत्रपती शिवाजी महाराजांना अडविल्याचा कुठेही उल्लेख नाही. त्यामुळे एक प्रकारे जसवंतसिंहाने छत्रपती शिवाजी महाराजांना अप्रत्यक्षरित्या मदत केली होती. जसवंतसिंह व शिवाजी महाराज यांच्यात मोहीमेदरम्यान नक्कीच काहीतरी वाटाघाटी झाल्या असल्या पाहिजेत. म्हणूनच फौजेनिशी तयार असलेल्या जसवंतसिंहाने महाराजांना विरोध केला नाही. याची माहिती तत्कालीन काही महत्वपूर्ण कागदपत्रांवरून होते. तसेच शाहिस्तेखानावर हल्ला झाल्यानंतर जेव्हा जसवंतसिंह त्याच्या मदतीला आला

त्यावेळी शाहिस्तेखान म्हणाला कि, मला वाटले कि तुम्ही आमचे रक्षण करता करता शाहिद झालात! असे कुत्सित उद्‌गार काढले. यावरून देखील छत्रपती महाराज व जसवंतसिंग यांच्यात काहीतरी मैत्री करार झाला असावा हे स्पष्टच होते. छत्रपती शिवाजी महाराजांना जसवंतसिंहासारखा नवा राजपूत मित्र मिळाला हा या स्वारीतील महत्वाचा सकारात्मक परिणाम होता.

**३. शत्रुपक्षाच्या सरदारात घबराट निर्माण झाली:**

शाहिस्तेखानाने ज्याप्रमाणे मराठी स्वराज्याच्या प्रदेशात आपल्या सैनिक व सरदारांच्या माध्यमातून धुमाकूळ घातला होता, त्यामुळे संपूर्ण स्वराज्यात एक प्रकारची दैन्यावस्था येऊन जनमानसात घबराट निर्माण झाली होती. शत्रुसैन्य त्याच्या ह्या कारवायासाठी बिनधास्त करीत होते की शाहिस्तेखाना पुढे शिवाजीच्या अल्पसैन्य व साधनांचा काय टिकाव लागणार? आता शिवाजीचे पारिपत्य अटळ आहे. अशी त्यांच्यामध्ये अहंभिका निर्माण झाली होती. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी कडेकोट पहाऱ्यात असणाऱ्या सरदारांच्या मालकावरच म्हणजे शाहिस्तेखानावरच हल्ला चढविला. व त्याला अंधाराचा फायदा घेऊन स्वत:चा जीव वाचवून पळून जाण्यास भाग पाडले.

त्यावेळी मात्र मगरूरीत असणाऱ्या त्याच्या सरदारांना एकदम धडकी भरली. शिवाजी कधीही कुठेही पोहचू शकतो. व शाहिस्तेखानाप्रमाणेच आपलीही गत होवू शकते. या विचाराने शत्रुपक्षाच्या कारवाया शिथिल झाल्या.

**४. शाहिस्तेखानाची बंगाल सुभ्यावर बदली :**

ज्याप्रमाणे शाहिस्तेखानाच्या स्वारीचे मराठ्यांच्या स्वराज्यावर काही परिणाम झाले, त्याचप्रमाणे मुगलांच्या बाजूने देखील या स्वारीच्या पराजयाचा परिणाम झाला. त्यातील महत्वाचा परिणाम म्हणजे मोगलांच्या दिल्ली दरबारात महत्वाची भूमिका बजावणारा व खुद्द औरंगजेबाचा मामा शाहिस्तेखान याची छत्रपती शिवाजी महाराजांनी अतिशय दैन्यावस्था केली. हे पाहून औरंगजेबास नुसते अपमानित झाल्यासारखेच वाटले नाही तर यामुळे संपूर्ण मोगल साम्राज्याची नाचक्की झाली होती. याची शिक्षा म्हणून औरंगजेबाने शाहिस्तेखानाची राजधानी दिल्लीपासून दूर बंगाल प्रांतावर नेमणूक केली.

## ३.२.२ सुरतेची पहिली मोहिम: (१० जानेवारी १६६४)

### ३.२.२.१ सुरतेचीच निवड का केली? :

छत्रपती शिवाजी महाराजांनी आत्तापर्यंत शत्रूच्या मुलखावर जितके हल्ले केले, त्यातील सूरतच्या लुटीच्यावेळी केलेल्या हल्याची मोठी चर्चा झाली. या लुटीबद्दल वेगवेगळ्या इतिहासकारांनी आपली वेगवेगळी मते मांडली आहेत. मात्र या सर्वांतून एक प्रश्न उरतोच. तो म्हणजे महाराजांनी लुटीसाठी सुरत शहराचीच का निवड केली? ते आपण पाहू :

**१. लालमहालात शाहिस्तेखानाचा तळ :**

दक्षिणेत छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी शाहिस्तेखान ज्यावेळी मजल दरमजल करीत आपल्याबरोबर मोठ्या फौजेसह स्वराज्याच्या भूमीत आला. त्यावेळी

मोठा प्रदेश बेचिराख करून टाकला होता. त्याचा राग तर महाराजांच्या मनात होताच. मात्र याही पेक्षा महाराजांना याचा राग होता की ही सर्व लुटालूट करत शाहिस्तेखानाने खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यातील निवासस्थानात म्हणजेच लालमहालातच आपली छावणी दिली. तेथूनच तो स्वराज्याच्या प्रदेशाची व माणसांची हानी करीत असे. यामुळे मराठ्यांना आपली नाचक्की झाल्यासारखे वाटले. याचा सूड घेणे आवश्यक होते.

**२. श्रीमंत शहर :**

शाहिस्तखानाच्या स्वारीच्या वेळी स्वराज्याच्या प्रदेशातील लुटालूटीमुळे स्वराज्याचे बरेच आर्थिक नुकसान झाले होते. तसेच या शत्रुच्या लुटीबरोबरच शाहिस्तेखानाच्या सैन्याशी लढतानादेखील स्वराज्याच्या खजिन्यातील बरीचशी रक्कम खर्च झाली होती. त्यामुळे स्वराज्याच्या विस्तारासाठी धनाची कमतरता भासू लागली. यामुळे त्वरीत मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळेल असा खात्रीशीर मार्ग हवा होता व तो सुरत शहराच्या रूपाने पुढे आला. सुरत हे मोगल साम्राज्यातील सर्वात श्रीमंत शहर होते. तेथे वीरजी वोरा आणि हाजी कासम बेग यांच्यासारखे मोठे श्रीमंत व्यापारी होते. यांच्याकडे अमाप संपत्ती होती. तसेच सूरत शहरात बंदराच्या व्यापारातून मोगल साम्राज्यास दरवर्षी बारा लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेची जकात मिळत होती. म्हणून त्वरित व मोठ्या प्रमाणात संपत्ती मिळवून देणारे ठिकाण सूरतच होते. याची महाराजांना खात्री होती.

**३. इंग्रजांवर धाक निर्माण करणे :**

ज्यावेळी सिद्धी जौहरने पन्हाळा किल्ल्यास वेढा घातला, त्यावेळी पन्हाळा किल्ल्यास अधिकाराखाली आणण्यासाठी सिद्धी जौहरास मोठे कष्ट करावे लागले. त्यामुळे किल्ल्यावर दारूगोळ्याचा मारा करून किल्ला आपल्या ताब्यात घेण्याची योजना सिद्धी जौहराने आखली. मात्र यासाठी त्याच्याकडे पुरेसा दारूगोळा व लांब पल्ल्याच्या तोफा नसल्यामुळे त्याने दारूगोळा व लांब पल्ल्याच्या तोफांची मागणी इंग्रजांकडे केली. इंग्रजांनीही त्यास प्रत्यक्ष मदत न करता अप्रत्यक्षरित्या दारूगोळा व तोफांचा पुरवठा केला. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात इंग्रजांविषयी प्रचंड राग निर्माण झाला होता. अशा या इंग्रजांना वेळीच धाक दाखविण्यासाठी त्यांनी सुरतची निवड केली. सुरत येथे इंग्रजांच्या वखारी तर होत्याच त्याबरोबरच इंग्रजांचा बराचसा व्यापार हा याच बंदरातून होत होता.

**४. सुरतची कमजोर सुरक्षा व्यवस्था :**

स्वराज्यावर शाहिस्तेखानाच्या रुपाने आलेले संकट निवारण्यासाठी बरीच आर्थिक व जीवित हानी झाली होती. यातून बाहेर पडण्यासाठी लागणाऱ्या धनाची प्राप्ती करताना आपल्या सैन्याची कमीतकमी शक्ती लागेल व जीवित हानीही कमी होईल किंवा होणारच नाही अशा पद्धतीचा धनप्राप्तीचा उपाय महाराजांना हवा होता. त्यासाठी महाराजांना बहिर्जी नाईकसारख्या आपल्या अत्यंत हुशार गुप्तहेराने सुरतची सुरक्षा व्यवस्था अत्यंत ढिली असल्यासंबंधीची अत्यंत बारीकसारीक माहिती महाराजांना दिली. त्यामुळे महाराजांनी सुरतची निवड केली. कारण जर अन्य प्रदेशाची निवड केली तर लुटीसाठी शहरात

गेल्यानंतर जिवंत परत येण्याची हमी नव्हती. ती स्थिती सुरतची नव्हती. म्हणून महाराजांनी लुटीसाठी सुरतची निवड केली.

### ५. मराठी मुलखाशी जोडलेले शहर :

छत्रपती शिवाजी महाराजांनी या लुटीच्या मोहीमेत अत्यंत बारीकसारिक गोष्टींचा विचार करून ठेवला होता. त्यांना हे माहीत होते कि आपण मोगलांच्या कोणत्याही प्रदेशाची लुट केली तरी औरंगजेब त्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी मोठी सैन्य मदत पाठवणार. त्यामुळे जरी मोहीम राबवताना काही अप्रिय घडले व शत्रुकडून प्रतिकार झालाच तर आपलीही प्राप्त परिस्थितीशी सामाना करण्याची तयारी असावी. सुरत हे शहर मराठी मुलखाशी ... व समुद्राशी अशा दोन्ही मार्गाने जोडलेले होते. त्यामुळे वेळ पडलीच तर कोणत्याही एका मार्गाने बचाव करता यावा हा विचार महाराजांनी केला होता. म्हणून सुरत शहर लुटीसाठी निवडले.

## ३.२.२.२ सुरत मोहिमेचा घटनाक्रम: (१० जाने १६६४)

शाहिस्तेखानाने स्वराज्यावर केलेल्या स्वारीमुळे स्वराज्याचे आर्थिक नुकसान झाले होते. हे भरून काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवर स्वारी केली याचा घटनाक्रम पुढीलप्रमाणे.

### १. नाशिककडे कूच :

छत्रपती शिवाजी महाराज आपल्या कुठल्याही मोहीमेवर निघताना त्या मोहीमेची पूर्ण तयारी करीत. त्यासाठी आवश्यक असणारी सर्व माहिति मिळवत. तसेच मोहीमेदरम्यान आपल्याकडील असणारी जीवित व मालमत्तेची कमीतकमी हानी होईल व मोहीम पूर्णपणे यशस्वी होईल. याची पूर्ण तयारी करूनच योग्य योजनेच्या आधारेच आपल्या कार्यास सुरूवात करत.

यावेळी देखील स्वराज्यावर अफजलखान, शाहिस्तेखानामुळे जे संकट आले ते निवारून स्वराज्याचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी मोठ्या धनाची आवश्यकता होती. ती सुरतलूटीच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी शत्रूस चकवा देऊन सुरतवर पोहचण्यासाठी गुप्तपणे योजना आखून सुरूवात केली.

ठरलेल्या योजनेनुसार महाराजांनी रायगडावरून थेट सूरत येथे जाण्यापेक्षा प्रथमत: नाशिककडे मोहीमेचा बहाणा करून आपल्या सैन्यासह कूच केली. त्यामुळे आजूबाजूच्या सर्व सत्तांना वाटले की शिवाजी नाशिककडे मोहीमेसाठी निघाला आहे. व त्याच भागात मुलूखगिरी करणार असा विश्वास पटला. मात्र महाराज नाशिककडे जाता-जाता अचानक ६ जानेवारी १६६४ रोजी एकदम सुरतेजवळ जाऊन पोहचले.

महाराज सुरतकडे जाण्याऐवजी नाशिकच्या दिशेने जाण्याचे कारण म्हणजे जर महाराज रायगडावरून थेट सुरतला गेले असते तर अजून महाराष्ट्रात असलेल्या मोगलाच्या फौजा सुरतच्या मदतीस आल्या असत्याच. त्याप्रमाणे सुरतकर सरदार, व्यापारीदेखील आधीच सावध होऊन त्यांनी आपल्या सुरक्षेचा पूर्ण बंदोबस्त करून ठेवला असता. ज्यामुळे

शिवाजी महाराजांना आपली योजना पूर्ण करता आली नसती. म्हणूनच महाराजांनी थेट सुरतकडे न जाता नाशिककडे कूच केली. हीच पद्धत पुढे त्यांनी आग्र्याच्या कैदेतून सूटताना वापरली.

### २. खंडणीची मागणी :

छत्रपती शिवाजी महाराज प्रत्येक मोहीमेत कमीतकमी जीवित व वित्त हानी होईल याची नेहमीच दक्षता घेत होते व त्यासाठी मोहीमेदरम्यान सामोपचाराने शक्य होईल तेवढे प्रश्न सोडविण्याचा ते प्रयत्न करीत. तीच नीति महाराजांनी सूरतलूटी वेळी देखील वापरली.

त्यानुसार महाराजांनी सूरतमध्ये पोहचल्या पोहचल्या तेथील मोगल सुभेदार इनायतखान व हाजी झहिद बेग, वीरजी वोरा आणि हाजी कासम बेग यांना - मभेटीस या व खंडणी भरून सुरक्षित व्हा..फ असा निरोप पाठविला. मात्र महाराजांच्या आव्हानास यांपैकी कोणीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे महाराजांचा नाइलाज झाला. व त्यांनी शहरावर हल्ला करण्याचा निश्चय केला.

### ३. छत्रपती शिवाजी महाराजांवर प्राणघातक हल्ला :

छत्रपती शिवाजी महाराजांनी जाळपोळ, नासधूस व रक्तपात आदि गोष्टी टाळण्यासाठी सामोपचाराने घेण्याचे धोरण अवलंबिले. मात्र महाराजांच्या या धोरणास योग्य प्रतिसाद न देता सुरतचा मुगल सुभेदार इनायतखान याने आपल्या वकिलामार्फत महाराजांना उर्मट उत्तर पाठविले. त्यामुळे महाराजांनी वकिलास कैद करून ठेवले. इनायतखानास हे कळताच तो घाबरून नगराची सुरक्षा न करता किल्ल्यात जाऊन लपला. यावेळी त्याच्याबरोबर सुरतमधील अनेक व्यापाऱ्यांनी त्याला मोठी लाच देऊन किल्ल्यामध्ये आश्रय मिळविला. त्यामुळे ... मराठ्यांच्या सैन्याने सूरतमधील श्रीमंत व्यापाऱ्यांच्या दुकाने व घरावर छापा टाकून संपत्ति लुटण्यास सुरूवात केली.

या लुटीदरम्यान दि.७ रोजी इनायतखानाकडून महाराजांशी बोलणी करण्याच्या निमित्ताने एक वकिल आला. मात्र या वकिलाने बोलणी सुरू असतानाच महाराजांवर तलवारीने वार केला. मात्र महाराज या हल्ल्यातून बचावले. या घटनेमुळे मराठी सैन्यात प्रचंड राग निर्माण होऊन त्यांनी कित्येकांचे हात व डोकी उडवली. मात्र महाराजांनी काही वेळातच सैन्याकडून होत असलेला रक्तपात थांबविण्याची आज्ञा दिली. सूडासाठी कुणाचा जीव घेणे महाराजांना पसंद नव्हते. यावरून त्याच्या अंगी असलेल्या माणुसकीचे दर्शन घडते.

### ४. संपत्तीची प्राप्ती व माघार :

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या संपूर्ण मोहीमेदरम्यान कमीतकमी हानी होऊन जास्तीत जास्त लूट मिळविणे हे ध्येय समोर ठेवले होते. व त्यासाठी एक प्रभावी योजना बनविली. व तितक्याच प्रभावीपणे ती राबविली. या लूटीतून महाराजांना जवळपास दोन कोट रुपये एवढी लूट मिळाली. यात मुख्यत: रोख रक्कम, सोने-चांदी, जडजवाहिर यांचा समावेश होता.

या ठिकाणी एक महत्वाची बाब म्हणजे महाराजांनी या लुटीच्या दरम्यान कोणत्याही गरीब अगर सामान्य माणसास लुटले नाही. उलट मराठी सैनिकांना लूटीमध्ये जी भांडी, कपडे व इतर दैनंदिन वापराच्या वस्तू सापडल्या त्या त्यांनी तेथेच गोरगरिबांना वाटून दिल्या. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांनी सूरतमध्ये लुटताना जाणिवपूर्वक मोठे सरदार, व्यापारी यांची लूट केली. याचे कारण म्हणजे सरदार व व्यापारी मोगल बादशहास कराच्या रूपाने मोठी रक्कम देत व त्यातूनच बादशहा मराठे व इतर सत्तांबरोबर संघर्ष करत असे. म्हणून सूरतेची लूट ही एक राजकीय लूट होती हे यावरून स्पष्ट होते.

लुटीच्या घटनाक्रमात आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे एखाद्या प्रदेशाची लूट करताना त्या प्रदेशातील केवळ संपत्तीचीच लूट केली जात नव्हती. तर त्या प्रदेशातील बायका, जनावरे इ.ची लूटही केली जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मात्र आपल्या पूर्ण आयुष्यात जितक्या मोहीमा केल्या त्यातील एकाही मोहीमेत स्त्रियांना कधीही हात लावला नाही. व आपल्या सैनिकांनाही लावू दिला नाही. तोच पायंडा या मोहीमेत देखील दिसून आला. या ठिकाणी महाराजांनी व्यापारी व सरदार यांच्या हवेल्या व दुकाने लुटली पण बायका-मुलांना हात लावला नाही. यावरून त्याच्याविषयी सन्मानाचा दृष्टिकोन स्पष्ट होतो जो त्या काळात अतिशय दुर्मिळ होता.

### ३.२.२.३ छत्रपती शिवाजी महाराज परकीय व्यापाऱ्यांना घाबरल्याचा बनाव

सुरत लुटीबद्दल इतिहासामध्ये बरेच विचार प्रवाह आले आहेत. त्यामध्ये प्रत्यक्ष घटनेच्या वेळी उपस्थित असणाऱ्या इंग्रज व डचांनी देखील आपल्या कंपनीच्या मालकांना या घटनेबद्दलची माहिती वेगवेगळ्या पत्राद्वारे करून दिली आहे. या पत्रामध्ये शिवाजी हा सुरत मोहिमेच्या वेळी सूरतमध्ये असणाऱ्या डच, इंग्रज आदि व्यापाऱ्यांच्या सैन्यास घाबरला त्यामुळे त्याने त्याच्या वखारीस हात न लावता फक्त मुगल सरदार व व्यापाऱ्यांचीच घरे लुटली. अशी माहिती आपल्या वरिष्ठांना कळविली. मात्र तत्कालीन पत्रांचा अभ्यास केल्यावर ही गोष्ट कशी खोटी आहे हे जाणवते. ते आपण पाहू.

ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांनी ते सुरतमध्ये येईपर्यंत आपल्या आगमनाची गुप्तता पाळून त्वरेने सुरतमध्ये आले. त्याचप्रमाणे कोणालाही न समजता त्वरित सुरतमधून माघारी फिरले. या सर्व घटनांच्या घडामोडींची माहिती परकियांच्या लेखसंग्रहातून मिळते.

छत्रपती शिवाजी महाराज सुरतमध्ये येताना आपण बादशाही सरदार असून बादशाही कामाकरिता अहमदाबादला जात आहोत असे वाटेत सांगून लोकांना आपल्या उद्देशाविषयी माहिती होऊ दिली नाही. त्याचप्रमाणे ज्यावेळी शिवाजीने सुरतवर हल्ला केला त्यावेळी सुरतेचा सुभेदार व किल्लेदार उभयतांनी प्रजेचे संरक्षण केले नाही. त्यामुळेच सुरतमधील कित्येक श्रीमंत नागरिक व व्यापारी यांचे लुटीमध्ये नुकसान झाले. डच व इंग्रजांनी आपल्या वखारीचा बंदोबस्त करून ठेवल्यामुळे शिवाजीच्या माणसांकडून त्यांचे फारसे नुकसान झाले नाही. छत्रपती शिवाजी महाराज लूटीनंतर परत गेल्यावर मुगल बादशहा औरंगजेबाने स्वत:च्या अमलदाराच्या भित्रेपणाशी तुलना करून इंग्रजांच्या शौर्याची प्रशंसा केली. व इंग्रजांना बक्षीस म्हणून एक वर्षाची जकात सर्वांना माफ केली. व पुढे शेकडा अर्धा टक्का सूट

दिली. वरील माहितीप्रमाणेच या पत्रामध्ये सुरतलुटीच्या संबंधाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या उद्देशाबद्दलही त्यात काही विधाने आढळून येतात. यामध्ये खुद्द छत्रपती शिवाजींनीच ॲटनी स्मिथ नावाच्या इंग्रजाजवळ काढलेल्या उद्गारांना ते म्हणाले कि – ''कोणा व्यापाऱ्याचे नुकसान करण्याचा आपला इरादा नसून औरंगजेबाने माझ्या मुलखावर हल्ला करून प्राणहानी केली. त्याचा सूड उगविण्याची माझी इच्छा आहे. इंग्रज व व्यापाऱ्यांनी मला काही द्रव्य द्यावे म्हणजे झाले. वरील माहितीप्रमाणे याच पत्रामध्ये शिवाजीमहाराजांच्या सैन्याची संख्या, त्यांची सुरतबाहेरील प्रवासाची छावणी, त्यांना मिळालेली लूट व त्याकरिता केलेली जाळपोळ, लोकांची कत्तल यांची अतिषयोक्तिपूर्ण वर्णने केलेली आढळतात. याचे कारण म्हणजे छत्रपतींच्या या विलक्षण कामगिरीचे कोणालाच कौतुक वाटू नये यासाठी परकियांनी नेहमीच आपला प्रभाव वाढविण्यासाठी भारतीयांच्या गुणाकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले हा त्याचाच एक भाग होता.

इंग्रज लोक स्वत:च्या अगदी शुल्लक कृतिबद्दल देखील फुशारकीने बोलतात. मात्र याच इंग्रजांनी शिवाजी महाराज सुरतेत आल्यानंतर त्यांच्यापासून सुरक्षिततेकरिता आपला माल गलबतात भरून खाली पाठविला. व गढीमध्ये फक्त हत्यारबंद सैनिकच ठेवले. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांनी हत्यारबंद गढीवजा वखारीकडे जाण्याऐवजी .... अशा धनवानांची घरे रिकामी करणे फायदेशीर वाटले. म्हणून त्यांनी आपला मोर्चा वखारीकडे वळविला नाही. याचे आणखी एक कारण म्हणजे छत्रपतींना रोख रक्कम, सोने-चांदी अशी संपत्ती हवी होती, जी या परकीय लोकांकडे नव्हती. ते ती व्यापारात गुंतवत व त्यांचा माल खरेदी करत. शिवरायांना रोख रकमेची गरज होती न कि मालाच्या गाठी व इतर सामानाची. ज्यावेळी सैनिकांकडील लुटीचा माल एकत्र केला त्यावेळी त्यातील अनावश्यक वस्तू म्हणजे कपडे, भांडी व इतर अवजड वस्तू या तिथल्यातिथे गरिबांना वाटून दिल्या.

इंग्रजांनी शिवाजी महाराज सुरतेजवळ आल्याची बातमी मिळताच सुरतच्या मुख्य रस्त्यावरून आपल्या सशस्त्र सैनिकांच्या बरोबर मोर्चा करून मिरवणूक काढल्याचा उल्लेख आला आहे. मात्र सदरची मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज सुरतमध्ये येण्याअगोदरच वखारीत जाऊन पोहचली. ही माहिती तत्कालीन पत्रात आढळते. यावरून हे स्पष्ट होते की इंग्रजांनी व डचांनी परदेशात बसलेल्या आपल्या पालकांना स्वत:च्या कामगिरीची माहिती फुगवून सांगितली आहे.

वरील विवेचनातून हे स्पष्ट होते की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या सूरत लूटीबद्दल इंग्रजांनी व डचांनी लिहिलेली माहिती खोटी असून सुरतेची लूट करतेवेळी महाराजांनी योजनाबद्धपणे मोहीम फत्ते केली. व या दरम्यान आपल्याकडील माणसांची कमीतकमी हानी होईल याची देखील काळजी घेतली. हे स्पष्ट होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या धोरणाची उकल पूर्णपणे न आल्यामुळे सुरतेच्या स्वारीमधील परकीयांविषयीच्या त्यांच्या भूमिकांबद्दल वेगळा अर्थ काढला गेला जो सत्य नाही.

## ३.२.३ मिर्झा राजे जयसिंगची मोहीम व पुरंदरचा तह :

## (जाने १६६५ ते जून ४६६५)

दक्षिणेत छत्रपती शिवाजी महाराजांनी मुगलाच्या देखत अफजलखान व शाहिस्तेखानाचा पराभव केला. तसेच सुरतची लूट केली. त्यामुळे औरंगजेब अत्यंत अस्वस्थ झाला होता. शिवाजीच्या या हालचालींस वेळीच आवर घालण्यासाठी त्याने एक निर्णायक मोहीम आखली व यावर दिल्ली दरबारातील मुगलसत्तेचा एकनिष्ठ, पराक्रमी राजपूत सरदार मिर्झाराजा जयसिंग याची नेमणूक केली. तसेच त्याच्याबरोबर राजा सृजनसिंग, जयसिंगाचा मुलगा फिरतसिंग, दाऊदखान, कबतलबखान, रायसिंग शिसोदिया इ. पराक्रमी सरदारांना व मनूची सारख्या युरोपिय तोफखाना प्रमुखास का पाठविले या विषयीच्या कार्याचा आढावा आपण थोडक्यात घेऊ.

### ३.२.३.१ स्वारीची कारणे :

**१. सुरत शहरावर हल्ला :**

तत्कालीन काळात भारतभरातील सर्व सत्ता आपल्या साम्राज्य विस्तारासाठी काहीवेळा अंतर्गत वादातून तर काहीवेळेस आर्थिक तसेच अन्य कारणाने आपसातील प्रदेशावर स्वाऱ्या करत. यातूनच मुगलांचा बादशहा औरंगजेब याने दक्षिणेत सत्ताविस्तारासाठी मराठ्यांच्या स्वराज्यावर तसेच विजापूरची आदिलशाही, कुतुबशाही इ. सत्तांवर आक्रमण करून ती नष्ट करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. तसे पाहता मराठे काय किंवा इतर सत्ता काय, यांचा दिल्ली बादशहास वैयक्तिक असा काहीच त्रास नव्हता आणि तसा असणेही शक्य नव्हते. कारण दोघांमध्ये भौगोलिक अंतर खूप होते. तरीही या सर्व सत्ता एकमेकांना संपवून आपली सत्ता बळकट करण्याचा प्रयत्न सातत्याने करीत होत्या. म्हणजे एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमण करणे ही प्रत्येकाची राजकीय, आर्थिक गरज होती. म्हणून तत्कालीन काळातील घटनांकडे आजच्या चष्म्यातून पाहणे व त्याला आजची नितीमूल्ये लावणे हे सुसंगत होणार नाही. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवर जो हल्ला केला तो निव्वळ लुटीसाठी नसून तर ती एक राजकीय अपरिहार्यता होती. मात्र याचाच राग येऊन औरंगजेबाने मराठ्यांच्या उगवत्या सत्तेस नाहीसे करण्यासाठी जयसिंगाची नेमणूक केली.

**२. शाहिस्तेखानाचा अपमान म्हणजे औरंगजेबाचाच अपमान :**

शिवाजी महाजांच्या स्वराज्यावर शाहिस्तेखानाच्या रुपाने जे संकट आले होते त्याने जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्र बेचिराख झाला होता. अनेक लहान मोठे सरदार धनाच्या लालसेने शाहिस्तेखानास मिळाल्यामुळे स्वराज्यात एक प्रकारे अनागोंदीच निर्माण झाली होती. या सर्वांचा परिणाम म्हणून महाराजांनी पुण्यातील लाल महालात खुद्द शाहिस्तेखानाच्याच शयनगृहात घुसून त्याच्यावर हल्ला चढवला व त्याला जीव वाचवून जखमी अवस्थेत पळावे लागले.

यामुळे संपूर्ण मराठी प्रदेशातच नव्हे तर संपूर्ण हिंदूस्थानात महाराजांच्या शौर्याची प्रशंसा होऊन दिल्लीपती मुगलसम्राट औरंगजेबाची नाचक्की झाली. कारण शाहिस्तेखान हा

एकतर औरंगजेबाचा मामा होता. तसेच तो दिल्ली दरबारातील एक मोठा सरदार देखील असल्यामुळे पराजय अथवा विजयाचे संपूर्ण श्रेय बादशहा म्हणून औरंगजेबाचेच होते. म्हणूनच शाहिस्तेखानाचा पराजय हा औरंगजेबाचा पराजय मानला गेला.

**३. अहमदनगर ते औरंगाबादच्या मुगल प्रदेशाची लूट :**

स्वराज्य उभारणीत मराठ्यांनी अनेक प्रदेशात स्वाऱ्या करून त्यावर आपला अधिकार प्रस्थापित केला. त्याच प्रमाणे दक्षिणेमध्ये मुगल सुभेदार म्हणून औरंगजेबाचा मुलगा मुअझम हा अधिकारावर असताना मराठ्यांनी मुगलाच्या अधिकाराखालील अहमदनगरपासून ते औरंगाबादपर्यंतच्या प्रदेशावर हल्ला करून त्यावर अधिकार करण्याचा प्रयत्न सुरू केला होता. मराठ्यांच्या या कारवाईमुळे देखील औरंगजेब अतिशय चिडला होता. दक्षिणेतील मराठ्यांचा हा वाढता त्रास कमी करण्याची त्याला निकड भासत होती.

**४. आरमाराची उभारणी :**

ज्याप्रमाणे मराठ्यांनी मुगलांच्या प्रदेशावर हल्ला करून त्याचा बराचसा भूभाग आपल्या अधिकाराखाली आणण्याचा प्रयत्न चालविला होता. तसाच समुद्रावर आपली शक्ति वाढवून समुद्रमार्गाने होणाऱ्या व्यापारावर आपल्याला नियंत्रण मिळावे, आर्थिक लाभ व्हावा तसेच स्वराज्याच्या सीमा सुरक्षित करण्यासाठी शिवाजी महाराजांनी समुद्रावर आपले स्वतंत्र आरमार उभारण्यास सुरूवात केली. मराठ्यांच्या या कारवाईचा देखील मुगलसत्तेस धोका वाटू लागला. कारण जर मराठ्यांनी आपले स्वतंत्र आरमार उभारले तर त्याद्वारे ते परकीयांच्या व्यापारावर नियंत्रण मिळवतील व त्यामुळे त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नापासून आपणास मुकावे लागेल. त्यामुळे मराठ्यांना वेळीच आवर घालणे जरूरीचे होते.

**५. दक्षिणेत सत्ता विस्तार :**

दक्षिणेमध्ये सर्वदूर मुगल साम्राज्याची सत्ता रहावी अशी इच्छा मुगल गादीवर आलेल्या प्रत्येक बादशहाची होती. व ती स्थापन करण्यासाठी गादीवर आलेल्या सम्राटांनी तसा प्रयत्न देखील सुरू ठेवला होता. यामध्ये शहाजहान व औरंगजेब आघाडीवर होते. मात्र संपूर्ण दक्षिण प्रदेशावर एकहाती सत्ता स्थापण्याचे त्यांचे स्वप्न अजूनपर्यंत पूर्ण झालेले नव्हते.

मात्र औरंगजेब सत्तेवर आल्यानंतर त्याने याकडे जातीने लक्ष घातले. त्यातूनच त्याने दख्खनमधील मराठी साम्राज्याबरोबरच आदिलशाही व कुतुबशाही या सत्तादेखील गिळंकृत करण्यासाठी मिर्झाराजा जयसिंगाच्या नेतृत्वाखाली मोहीमेची सुरूवात केली.

## ३.२.३.२ जयसिंगाची योजना :

मिर्झाराजा जयसिंग हा दिल्ली दरबारातील एक अनुभवी, एकनिष्ठ कुशल सेनानी होता. त्याच्या या गुणांचे दर्शन तो दक्षिणेत मोठ्या शक्तिनिशी उतरला त्याचवेळी झाले. यामध्ये त्याने दक्षिणेत आल्यानंतर शाहिस्तेखानाप्रमाणे शिवाजीस एक सामान्य सरदार म्हणून फाजील विश्वास बाळगला नव्हता. आणि म्हणूनच दक्षिणेत आल्याआल्या त्याने

शिवाजी महाराजांची चारही बाजूने कोंडी करून ही मोहीम लवकरात लवकर यशस्वी करण्यासाठी एक निश्चित योजना आखली.

### १. विजापूराकडून कुमक मिळविण्याचा प्रयत्न :

वास्तविक पाहता औरंगजेबाने मिर्झाराजा जयसिंगाला ही मोहीम यशस्वी करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व अधिकार दिले होते. त्यामागे फक्त मराठी स्वराज्यच नाही तर आदिलशाही, कुतूबशाही सत्तांना देखील नष्ट करून संपूर्ण दख्खन मुगलांच्या अधिकाराखाली आणण्याचा डाव होता.

यामुळेच जयसिंगासारख्या चतुर सेनापतीच्या हातात मोहिमेची सूत्रे दिली होती. जयसिंगाने देखील आपल्या अंतिम उद्दिष्टपूर्तीसाठी एकाचवेळी मराठे, आदिलशाही, कुतूबशाही या सत्तांना दुखावण्यापेक्षा सर्वप्रथम मराठ्यांच्या विरूद्ध आदिलशहाशी हातमिळवणी केली व शिवाजी विरूद्ध मुगलसेनेस कुमक मिळविण्याचा प्रयत्न केला.

### २. शिवाजीच्या शत्रूशी हातमिळवणी :

मिर्झाराजा जयसिंग हा एक मुरलेला सेनापती, बरोबरच मोठा कुटनितीक सुद्धा होता. त्याने स्वराज्याच्या प्रदेशावर आक्रमण करता करताच 'शत्रूचा शत्रु आपला मित्र' या नितीचा देखील वापर करण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्याने महाराजांच्या सर्व लहान मोठ्या शत्रूशी हातमिळवणी करण्यास सुरूवात केली. यामध्ये स्वराज्यातील मोरे घराण्यातील सरदार तसेच अफजलखानाचा मुलगा फाजलखान यांना जहागिरीची लालसा दाखवून शिवाजी विरोधात आपल्या बाजूस वळवून घेतले. त्याचबरोबर इंग्रज, पोर्तुगीज या परकीय व्यापारी व सिद्धीसारख्या समुद्रातील, किनाऱ्यावरील विरोधी शासक यांनादेखील आपल्या बाजूस वळविण्यासाठी त्यांच्याकडे वकिल रवाना केले. त्याच्याकडून जरी प्रत्यक्ष मदत आपणास मिळाली नाही तरी शिवाजीसही मदत न करता तटस्थ राहण्याचे वचन मिळविले. याप्रमाणे मिर्झाराजा जयसिंगाने परकीयांकडून शिवाजीस मिळणारी मदत तोडून एक प्रकारे स्वत:सच मदत मिळविली होती व त्याचाच फायदा पुढे त्याला झाला.

### ३. शिवाजी महाराजांस बादशहास शरण येण्यासाठीची गळ :

जयसिंगाने महाराजांची चारही बाजूने कोंडी करत असतानाच त्याने खुद्द महाराजांवरच गळ टाकला. तो महाराजांना मुगलांच्या सेवेत आणून त्यांच्या हातून शेजारील दोन्ही सत्तांवर अधिकार मिळविण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून त्याने महाराजांशी अतिशय प्रेमाने बोलणी सुरू केली व त्यांना आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न सुरू केला. मात्र छत्रपती, मिर्झाराजा जयसिंगाचा अंतस्थ डाव पूर्णपणे ओळखून होते. त्यामुळे त्यांनी जयसिंगाच्या गोड बोलण्याकडे लक्ष न देता संघर्षाची तयारी सुरूच ठेवली.

### ३.२.३.३ स्वारीचा घटनाक्रम :

जानेवारी १६६५ मध्ये मिर्झाराजा जयसिंग आपल्या सर्वशक्तीनिशी दरमजल करीत आला. तो जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात नर्मदा नदी पार करून बऱ्हाणपूरला आला. तेथील प्रदेशाचा बंदोबस्त करून फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात तो औरंगाबादमध्ये

पोहचला व पुढे वाटेवर येणाऱ्या स्वराज्याच्या मुलखामध्ये हल्ले करून त्यावर अधिकार करीत करीत तो ३ मार्च १६६५ मध्ये पुण्यात येऊन दाखल झाला. त्याने मराठी मुलखातील प्रदेश व किल्ल्यांवर हल्ला करण्याचा सपाटा सुरू केला.

### १. रुद्रमाळ (वज्रगड) ताब्यात :

स्वराज्यातील महत्वाचा किल्ला पुरंदर यावर अधिकार करण्यासाठी दिलेरखानाच्या नेतृत्वाखाली मुगल फौजेने त्यास वेढा घातला. मात्र पुरंदरचा किल्ला सहजा-सहजी हातात येणार नाही याची दिलेरखानास खात्री झाल्यानंतर पुरंदरच्याच मदतीसाठी असणाऱ्या त्याच्याजवळील रुद्रमाळ (वज्रगड) या किल्ल्यावर अधिकार करण्यासाठी याही किल्ल्याकडे त्याने आपले लक्ष केंद्रित केले व किल्ल्यास वेढा देऊन त्यावर आपल्याकडील भल्या मोठ्या तोफांमधून दारूगोळ्याचा प्रचंड मारा सुरू केला.

मराठ्यांनी देखील दिलेरखानाच्या हल्ल्याला तेवढ्याच पराक्रमाने उत्तर देण्यास सुरुवात केली. मात्र भरपूर सैन्य व दारूगोळ्याच्या प्रभावी साधनापुढे त्यांना उभयता किल्ले जास्तकाळ लढवता आला नाही. व शेवटी अधिक नुकसान होण्यापेक्षा किल्ला दिलेरखानाच्या ताब्यात दिला. या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की या हल्ल्यास प्रतिकार करण्यात मराठ्यांचे शौर्य कमी पडले नाही तर त्यांच्याकडे असणाऱ्या साधनसामग्री व सैन्याच्या कमतरतेमुळे दिलेरखानाला विजय मिळाला.

### २. अल्प सैन्यशक्तीमुळे प्रतिकार करणे अशक्य :

आपण सुरूवातीस पाहिले की मिर्झाराजा जयसिंग हा प्रचंड सैन्य व युद्धसाहित्य घेऊन स्वराज्यावर चालून आला होता. त्याच्या तुलनेने मराठ्यांकडे सैन्य व युद्धसाहित्य हे दोन्हीही अत्यल्प होते.

याचाच फायदा मिर्झाराजा जयसिंगाने घेतला. त्याने एकाचवेळी राजगड, सिंहगड, रोहिडा व त्याच परिसरातील स्वराज्याच्या प्रदेशावर हल्ला करून धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर कोकणामध्ये मराठ्यांचा कोकणातील प्रमुख शत्रु...

स्वराज्याच्या अधिकाराखालील प्रदेशावर हल्ला करून तेथे लुटालूट सुरू केली.

वरीलप्रमाणे स्वराज्याच्या जवळजवळ सर्वच प्रदेशावर एकाचवेळी शत्रुच्या हल्ल्यामुळे अल्पप्रमाणात असणाऱ्या सैन्यशक्तीमुळे या हल्ल्याचा प्रतिकार करणे अवघड बनत चालले यामुळेच मिर्झाराजा जयसिंगाच्या अधिकाराखाली यातील बरेच प्रदेश आले.

### ३. मुरारबाजीचा पराक्रम :

मराठ्यांची सैन्य संख्या मिर्झाराजा जयसिंगाच्या तुलनेत जरी अल्प असले तरी पराक्रमात मात्र मुगल सैन्यापेक्षा कित्येक पटीने सरस होते. हे वेळोवेळी सिद्ध झाले होते. आणि म्हणूनच जयसिंगाच्या सैन्याच्या मराठ्यांच्या प्रदेशातील धुमाकूळास मराठे मोठ्या शौर्याने उत्तर देत होते.

यामध्ये मुरारबाजीचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्याने पुरंदरचा वेढा चालू

असताना मुगलसैन्याशी केलेल्या लढाईच्या वेळी विलक्षण शौर्य दाखविले होते व कित्येक मुगल सैनिकास ठार करून मुगल सैनिकांची दाणादाण उडवून दिली. मुरारबाजीचा हा पराक्रम पाहून जयसिंगदेखील आश्चर्यचकित झाला व त्याची खात्री पटली की मुरारबाजीसारखे वीर शिवाजीच्या सैन्यात असल्यामुळेच संख्येने व साधनसामुग्रीने मराठ्यांपेक्षा कित्येक पटीने मुगल सैन्य जास्त असूनही आपणास विजय मिळविण्यात विलंब होत आहे.

आणि म्हणूनच यासारखे वीर आपल्याकडे असावेत यासाठी जयसिंगाने मुरारबाजीस मुगलदरबारात मनसबदार करण्याचे आमिष दाखविले. मात्र स्वराज्यासाठी व शिवाजीसाठी प्राण देण्याची शपथ वाहिलेल्या मुरारबाजीने त्यास नकार दिला व शेवटपर्यंत लढतलढत स्वराज्यासाठी कामी आला व शेवटी पुरंदरचा किल्ला जयसिंगाच्या ताब्यात गेला.

### ४. पुरंदरच्या तहासाठी उभयतांची मान्यता :

मिर्झाराजा जयसिंगाने दिलेरखानाच्या नेतृत्वाखाली पुरंदरच्या किल्ल्यावर जोरदार हल्ला चढविल्यामुळे मोठे नुकसान होऊ लागले होते. त्यातच स्वराज्यातील बराचसा भाग बेचिराख झाल्यामुळे पुरंदरच्या किल्ल्याच्या आश्रयास स्वराज्यातील बरीच माणसे आली होती. त्यामुळे किल्ल्यावरील माणसांचे अधिक नुकसान होऊ नये यासाठी महाराजांनी तहासाठी मान्यता दिली.

ज्याप्रमाणे महाराजांनी तहासाठी इच्छा नसतानाही अपरिहार्य कारणास्तव मान्यता दिली त्याचप्रमाणे मिर्झाराजा जयसिंगाची देखील सुरूवातीस तह करण्याची इच्छा नव्हती. मात्र आत्तापर्यंतच्या लढाईच्या प्रसंगी मराठ्यांनी दाखविलेले शौर्य व शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य याचा परिचय जयसिंगास आला होता. त्यामुळे आपण जर ही लढाई अधिक ताणली तर शिवाजी देखील संघर्षासाठी कोणत्याही किंमतीवर आदिलशाहीची मदत घेण्यास कमी करणार नाही. त्यामुळे असा जर समेट झालाच तर मात्र मुगलसत्तेस दख्खनमध्ये कधीच विजय मिळणार नाही म्हणून जयसिंग हा तहासाठी तयार झाला व उभयतांमध्ये बऱ्याच वाटाघाटी होऊन १४ जून १६६५ रोजी पूरंदरच्या तहाच्या अटी ठरल्या.

### ३.२.३.४ पुरंदरच्या तहाचे स्वरूप :

छत्रपती शिवाजी महाराज व मिर्झाराजा जयसिंग या उभयतांनी तत्कालीन परिस्थितीचे योग्य आकलन करून पुरंदरच्या तहास १४ जून १६६५ रोजी मान्यता दिली. व तहाच्या अटी निश्चित केल्या. यामध्ये मुगलास स्वराज्य अधिकाराखालील किल्ल्यांपैकी २३ किल्ले, यामध्ये पुरंदर, वज्रगड, रोहिडा, कोंडाणा, तुंग, विसापुर, लोहगड, माहूली, खडकाळा, तिकोना, कर्नाळा, काहज, मुरंजन, भांडारगड, सोनगड, पळसगड, खिरदुर्ग, नळदुर्ग, नगगड, वसंतगड, खैरदुर्ग, मार्गगड आणि मानगड इ.किल्ले व त्याच्या आसपासच्या ४ लाख वार्षिक होनाचा प्रदेश देण्याचे महाराजांनी मान्य केले. या ठिकाणी किल्ल्यांच्या संख्येबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. कारण औरंगजेबाने तहाच्या अटी मान्य केल्या त्यावेळी त्यामध्ये वीस किल्ल्यांचा उल्लेख आहे. किल्ल्याच्या संख्येत जरी तफावत असली तरी हे मात्र निश्चित की यामुळे स्वराज्याच्या शक्तिस्थानाला बराच मोठा आघात झाला.

वरील २३ किल्ले व ४ लाख होनांचा प्रदेश बरोबरच मराठ्यांनी दर तीन वर्षांनी ३ लाख होन याप्रमाणे ४० लाख होन मुगल बादशहास देण्याचे कबुल केले. तसेच या व्यतिरिक्त तळकोकण, बाळघाट येथील एकूण ९ लाख होनांचा प्रदेश मोगलांना देण्याचे ठरले.

याचबरोबर येथून पुढे मोगलांचा शत्रू तो मराठ्यांचा शत्रू याप्रमाणे लढाई समयी मोगलांस सैन्य मदत करणे. व संभाजी महाराजांना मुगलाचे पाचहजारी मनसबदार बनवून दक्षिणेत मुगलांच्या सुबेदाराच्या आज्ञेप्रमाणे राहण्याची अट ठरली.

वरीलप्रमाणे या तहाचे स्वरूप पाहता एक प्रकारे मराठ्यांचा अपमानच होता. मात्र महाराजांनी परिस्थिती ओळखून हा तह मान्य करून एक प्रकारे यशस्वी व्यवहारी माघार घेतली होती हे देखील तितकेच सत्य आहे.

## ३.२.३.५ पुरंदरच्या तहास संमती का दिली?

१४ जून १६६५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज व मिर्झाराजा जयसिंग यांच्यामध्ये पुरंदरच्या वेढ्यानंतर तह झाला, हे आपण पाहिले. मात्र पुरंदरचा तह का झाला? यामागे महाराज व जयसिंग यांचा काय उद्देश होता ते आपण पाहू.

### १. मिर्झाराजा जयसिंग मुगल सैन्याविषयी साशंक :

मुगल सत्तेचे केंद्र व विस्तार हा बऱ्याच प्रमाणात उत्तरेकडे असल्याने तेथील सपाट प्रदेशाला अनुकूलच मुगलांनी आपली युद्धपद्धती व साहित्य विकसित केले होते. त्यामुळे त्यांचे सैन्य देखील समोरासमोर लढण्याच्या पद्धतीत पारंगत होते. मात्र दख्खनमध्ये आल्यानंतर महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती ही उत्तरेपेक्षा एकदम भिन्न म्हणजे सह्याद्रीच्या डोंगररांगा, खोल दऱ्या व उष्ण हवामान असे होते.

यामुळेच मिर्झाराजे जयसिंग यास सह्याद्रीच्या डोंगर कपारीत लढणारे आपले सैन्य आणखी किती वेळ टिकाव धरू शकेल, याविषयी साशंकता होती. त्यामुळे सैन्याची अशी स्थिती येण्याआगोदरच तह होत असेल तर तो स्विकारावा या विचारापर्यंत येऊन पोहोचला होता.

### २. अचानक हल्ला करण्याची मराठ्यांची युद्धपद्धती :

मुगल सैन्य हे उत्तरेकडील सपाट मैदानावर समोरासमोर लढण्याच्या युद्धपद्धतीमध्ये पारंगत होते. मात्र याच्या एकदम उलट म्हणजे समोरासमोर न लढता शत्रुसैन्यावर अचानक हल्ला करून पुन्हा माघारी जाणे या युद्धपद्धतीचा वापर करूनच मराठ्यांनी आपल्या स्वराज्याच्या अनेक शत्रुस नामोहरम करून स्वराज्य विस्तार चालविला होता.

यामुळे मिर्झाराजा जयसिंगाने यावेळी आपल्याबरोबर आणलेल्या प्रचंड सैन्य व युद्धसाहित्याच्या जोरावर स्वराज्याच्या बहुतेक प्रदेशावर एकाचवेळी हल्ला करून धामधूम माजवून दिली. यावेळी मराठ्यांनी आपल्या अचानक हल्ला करण्याच्या युद्धतंत्राचा वापर करून संख्येने व साहित्याने कितीतरी अधिक असणाऱ्या मुगलांच्या सैन्यास जेरीस आणले

होते. व त्यामुळे मिर्झाराजा जयसिंगाने अपेक्षित केलेल्या वेळेपेक्षा मोहीम अधिकच वाढत चालली होती. व त्यामुळे खर्चही वाढत होताच. त्याचबरोबर सैन्याचे देखील नुकसान मराठ्यांच्या तुलनेने अधिक होत होते. त्यामुळे हे युद्ध अधिक काळ चालणे परवडणारे नाही हे जयसिंगाच्या ध्यानात आले होते.

### ३. मराठे-विजापूर व गोवळकोंडा यांच्या युतीची भीती :

मिर्झाराजा जयसिंगाबरोबर आदिलशहाने मैत्रीकरार केला असला तरी मिर्झाराजा जयसिंगाचा अंतस्थ हेतू आदिलशहाच्या लक्षात आला होता. तसेच शहाजहानच्या काळात झालेल्या करारानुसार मुगलांना खंडणी देण्यापेक्षा शिवाजीशी हातमिळवणी करून खंडणी टाळण्याचा प्रयत्न या शक्तिकडून होण्याची शक्यता जयसिंगास वाटत होती.

वरीलप्रमाणे जर मराठे-विजापूर-गोवळकोंडा यांच्यात जर युती झाली तर मात्र संयुक्त सैन्यापूढे मुगलसैन्याचा टिकाव लागणं केवळ अशक्य होते. त्यामुळे दक्षिणेत मुगल सत्तेची स्थापना हे केवळ एक स्वप्नच राहणार होते. याची जयसिंगास पूर्ण कल्पना आली होती.

### ४. शिवाजी महाराजांची आवश्यकता :

मिर्झाराजा जयसिंगास हे कळून चुकले होते कि दक्षिणेतील एकूण परिस्थिती पाहता या ठिकाणी मुगलांचे वर्चस्व निर्माण करावयाचे असेल तर ते एकट्याने शक्य नाही. त्यासाठी शिवाजीसारख्या मुत्सद्दी व शौर्यवान राजा आपला मांडलिक असला पाहिजे. म्हणूनच ज्यावेळी पुरंदरचा किल्ला जवळजवळ जिंकला असतानाही मिर्झाराजा जयसिंगाने महाराजांबरोबर औरंगजेबच्या इच्छेविरूद्ध अतिशय आदराचे वर्तन केले व तहास मान्यता दिली. जयसिंगाच्या या वर्तनावर मोहीमेतील दुसरा सरदार दिलेरखान जयसिंगावर नाराज होतो असे तत्कालीन बऱ्याच कागदपत्रांवरून जाणवते.

म्हणजेच शिवाजी महाराजांनी मुगलांचे मित्र बनून दक्षिणेकडील सत्ता विस्तारात मुगलांना मदत करावी. असे जयसिंगास मनोमन वाटत होते.

### ५. छत्रपती शिवाजी महाराज :

ज्याप्रमाणे मिर्झाराजा जयसिंगाने संपूर्ण विजय होत असतानादेखील महाराजांच्या मताला मान देऊन तहास तयार झाला. त्याचप्रमाणे शिवाजी महाराज शेवटपर्यंत न लढता तहास का तयार झाले? ते पाहू.

### ५.१ मराठी राज्य हे रयतेचे राज्य होते :

लढाई म्हटले तर त्याची झळ प्रत्यक्ष लढणाऱ्या सैन्यापासून ते समाजातील सर्व घटकांवर त्याचा बरावाईट परिणाम होत असतो. तसा मिर्झाराजा जयसिंगाच्या मोहीमेदरम्यान देखील झाला. कारण आपण आधी अभ्यासल्याप्रमाणे नुकत्याच झालेल्या अफझलखानाच्या स्वारीनंतर शाहिस्तेखानाची स्वारी व थोड्याच काळात पुन्हा मिर्झाराजा जयसिंग याची स्वारी या सर्व स्वाऱ्यांच्या काळात ज्या लढाया झाल्या त्यामुळे सामान्य जनता, शेतकरी,

कारागीर यांच्या जीवनावर देखील त्याचा मोठा परिणाम घडून आला.

शेतकऱ्यांची उभी पिके शत्रुसैन्याच्या हल्ल्याच्या वेळी नष्ट होत होती. तर सर्वत्र धामधूम असल्यामुळे  नियमित चालणारे बाजार, यात्रा, उत्सव यावर देखील प्रभाव पडून त्या देखील अनियमित होत असल्याने कारागिरांवर त्याचा परिणाम होऊ लागला. व हे सर्व मिर्झाराजा जयसिंगाच्या मोहीमेत तर अधिकच वाढले. व त्यास विरोध करणे देखील मराठ्यांना अशक्य होऊ लागले. यामुळे स्वराज्यात अनागोंदी माजण्याचा संभव निर्माण झाला व हे टाळणे महाराजांना जरूरीचे वाटू लागले. कारण रयत जगली तर स्वराज्याला काही अर्थ आहे.

हा महाराजांचा दृष्टिकोन होता. शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे रयतेचे राज्य होते.

### २. फितूरी रोखणे आवश्यक :

मिर्झाराजा जयसिंगाने दक्षिणेत आल्याआल्याच शिवाजी महाराजांची चारही बाजूने कोंडी करण्यासाठी सैन्य अभियानाबरोबरच महाराष्ट्रातील लहानमोठ्या अधिकाऱ्यास जहागिरी, पैसा, मानपान याचे आमिष दाखवून आपल्या बाजूने ओढण्याचा प्रयत्न सुरू केला होता व त्यामुळे मोरे, सिद्धी, इंग्रज व अन्य काही लहानमोठे सरदार त्यांच्या गळाला लागले होते.

या ठिकाणी विशेष म्हणजे जे जे मिर्झाराजा जयसिंगाच्या अमिषाला बळी पडले होते ते स्वराज्याला व छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य उभारणीच्या कार्यात अडथळा आणणारेच होते.

वरील फितूरांची संख्या वाढू नये यासाठी जयसिंगास लवकरात लवकर स्वराज्याबाहेर घालविणे जरूरीचे होते.

### ३. स्वराज्य नष्ट होण्याची भीती :

महाराजांना मिर्झाराजाबरोबरच्या आत्तापर्यंतच्या संघर्षात हे पक्के कळून चुकले होते कि मुगलांच्या सैन्याशी आत्ता दिर्घकाळ लढणे शक्य नाही. त्यामुळे जर आपण असेच भावनिक राहून लढत राहिलो तर अतिशय कष्टाने, अनेक साथीदारांच्या रक्ताने निर्माण झालेले स्वराज्य पूर्णपणे नष्ट होण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे दिर्घकाळ लढत राहून मरण्यापेक्षा तूर्तास माघार घेणे व जयसिंगास पुन्हा उत्तरेस परत पाठविणे व तो गेल्यानंतर योग्य संधी मिळताच गेलेला प्रदेश पुन्हा मिळविता येईल. मात्र त्यासाठी थोडे का होईना स्वराज्य व माणसे टिकली पाहिजेत. असा विचार मनाशी ठेवूनच तहाची सुरूवात केली.

## ३.२.३.६ जयसिंग यशस्वी का झाला?

जयसिंगाच्या घटनेवरून प्रामुख्याने दोन गोष्टी निदर्शनास येतात. त्या म्हणजे

### १. तडकाफडकी युद्धाचा शेवट लावून घेतला:

जयसिंगाने मोहीमेच्या सुरूवातीपासूनच आधीच्या सरदारांप्रमाणे वेळ वाया न घालवता तडकाफडकी युद्धाचा शेवट लावून घेतला. त्यामुळे तो यशस्वी झाला. मोगलांचे

सैन्य सर्वसाधारणपणे कितीही प्रबळ होते तरी व तयार होते तरी महाराष्ट्रातील भौतिक परिस्थिती म्हणजे येथील वातावरणातील कामगिरीत जसजसा काळ वाढतो तसतसे क्षीण होऊन त्यांची कामगिरी ढासळत असे. हे जयसिंगाने आधीच्या सरदारांच्या कामगिरीचा अभ्यास करून जाणले होते. त्यामुळेच त्याने त्वरेने युद्धाचा निकाल लावून घेतला.

**२. सर्व अधिकार आपल्या हाती घेतले :**

औरंगजेब हा गैरविश्वासामुळे कुठल्याही सेनापतीबरोबर एक जोडसेनापती पाठवित असे. या जोडसेनापती पाठविण्याच्या पद्धतीमुळेच मोहीमेदरम्यान उभयतांमध्ये मतभेद होऊन दोघे जसे कधीही औरंगजेबाविरूद्ध बंड करू शकत नसत तसेच ते युद्धप्रसंगी एक निर्णय होत नसल्यामुळे ऐन मोहीमेच्या प्रसंगी नेहमी गोंधळ निर्माण होऊन कर्तबगार सेनापतीही यशस्वी होत नव्हता. हे लक्षात ठेवूनच जयसिंगाने प्रथम मोहीमेवर निघतानाच मोहीमेविषयीचे सर्व अधिकार आपल्या हाती देण्याविषयीचा तगादा लावून त्याप्रमाणे व्यवस्था करून घेतली होती. कारण त्यास शिवाजी महाराजांना त्याला तोंड द्यायचे होते. ते छत्रपती मोहीमेदरम्यान निर्णयाचे सर्वस्वी अधिकार स्वत:कडे ठेवून स्वत: निर्णय घेण्यास समर्थ होते. व त्यामुळे मोगलांच्या या आधीच्या सेनापतीपेक्षा ते सेनापतीत्व आणि एकसूत्रीपणा यामध्ये वरचढ ठरले होते.

जयसिंगाच्या या धोरणाचा परिणाम जो पर्यंत त्यांच्या हुकमांची अवज्ञा झाली नाही तोपर्यंत सर्व ठिकाणी जयसिंगास यश येत गेले. मात्र पुढे त्यानेच दिलेरखान व खुद्द शिवाजी यांच्या मदतीने विजापूरावर स्वारी काढली. त्यावेळी मात्र वैयक्तिक चुरस, शिवाजी व नेताजी पालकर यांना सांभाळून घेण्याची गरज इ. पेचप्रसंगांमुळे हुकमतीत एकत्रितपणा राहिला नाही. त्यामुळे विजापूरच्या लढाईत त्यांचा पराभव झाला.

जयसिंगाने पुण्यामध्ये मुक्कामाला असताना छत्रपती शिवाजींची चारही बाजूने नाकेबंदी करण्यासाठी कुतुबुद्दिनखानास मोठे सैन्य देऊन जुन्नरपासून लोहगडपर्यंतच्या प्रदेशाच्या रक्षणाची जबाबदारी दिली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज बहुतेक वेळेस बार्शीच्या बाजूने मोगलांच्या मुलूखावर हल्ला करीत. त्यामुळे हा रस्ता बंद करण्यासाठी त्याच्या मार्गातील नळदुर्ग किल्ल्यावर काही सैन्याची नेमणूक केली. तर सुपे येथे सय्यद मनसबखान व इतर मुसलमान व हिंदू अधिकाऱ्यांची नेमणूक केली. त्याचप्रमाणे पुणे व त्याच्या आसपासच्या प्रदेशाच्या रक्षणासाठी इतिशामखानास चार हजार स्वारीनिशी ठेवले. पुणे व सिंहगड या डोंगराळ टापूवर दोन हजार स्वारांची नेमणूक केली. अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांना चारही बाजूने जखडून ठेवण्यासाठी जयसिंगाने जय्यत तयारी केली.

मिर्झाराजा जयसिंगाने केवळ सैन्य व प्रदेशाचीच नाकाबंदी केली नाही तर त्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी या आधी अफझलखान, शाहिस्तेखान यांना ज्या विलक्षण युक्तीवादाने नामोहरम केले, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल व त्यांच्या अंगी असलेल्या विलक्षण दैवीशक्तीबद्दल अनेक समजूती देशभर पसरल्या होत्या. त्या समजूती जरी सत्य नसल्या तरी त्याचा मुगलांच्या सैन्यावर देखील काही प्रमाणात का होईना प्रभाव पडला होता. त्याचप्रमाणे जयसिंग हा देखील स्वत: धर्मनिष्ठ व ज्योतिषावर विश्वास ठेवणारा होता. त्यामुळे त्याने आपल्याबरोबर मोहीमेत मूहूर्त व ग्रहबल सांगण्याकरिता ज्योतिषी व ब्राह्मणही घेतले

होते. याची पुष्टी आपणास जयसिंगाने मोहीमेवर निघण्यापूर्वी कोटचंडी व अकरा कोटिलिंगे केली, बगळामूखी काळरागी प्रित्यर्थ जप केला, तसेच चारशे ब्राह्मण अनुष्ठानास बसविले, प्रत्यही अनुष्ठान चालविले या अनुष्ठानास २ कोटी रुपये अलाहिदा काढून ठेवले. तीन मास अनुष्ठान चालून सिद्ध केले. अनुष्ठानाची पूर्णाहूती, ब्राह्मणास दान-दक्षिणा देऊन संपन्न केले. मग मजलदरमजल करून चालले, यावरून होते.

ज्याप्रमाणे जयसिंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्ण बंदोबस्त करण्यासाठी फक्त सैन्य शक्तिचीच वाढ केली नाही तर सैन्याचे व स्वत:चे मनोधैर्य वाढविण्यासाठी मोहीमेवर निघण्यापूर्वी धार्मिक अनुष्ठानेदेखील करवून घेतली. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य व कर्तृत्वामुळे किती भीती निर्माण झाली होती हे स्पष्ट होते.

### ३.२.४ आग्रा भेट व सुटका :

#### ३.२.४.१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीची कारणे :

छत्रपती शिवाजी महाराज पुरंदरच्या तहानुसार आग्र्यास बादशहाच्या भेटीस का गेले? या विषयी तत्कालीन इंग्रज लेखकांनी केलेल्या लेखनावरून आपणास काही कल्पना येते ते आपण पाहू.

**१. जीवाच्या संरक्षणाची हमी :**

औरंगजेब बादशहाच्या प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जावयाचे असल्यामुळे तो आपल्या जीवावर नक्कीच उठेल, यासाठी आपल्या जीविताच्या संरक्षणाची हमी घेऊन आग्र्यास जाण्यास तयार झाले. ही माहिती खरी वाटते कारण औरंगजेबाने आपला सर्वात विश्वासू सेनापती जयसिंग यास पूर्ण अधिकार देऊन दक्षिणेत पाठविले होते. त्यामुळे तो त्यांचा शब्द मोडणे अशक्य वाटत होते. त्यामुळेच जयसिंगाने शिवाजीच्या जीवितास हानी होणार नाही असा शब्द दिला व त्यावर विश्वास ठेवून छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यास जाण्यास तयार झाले.

**२. औरंगजेबाचा वारंवार आग्रह :**

औरंगजेब आपणास भेटीचे आमंत्रण वारंवार करीत असल्यामुळे त्याला नकार देणे महाराजांच्या स्वभावात बसत नव्हते. तसेच ते त्यांच्या योग्यतेचेही नव्हते. कारण छत्रपती शिवाजी महाराज एक राजे होते. तसाच मान त्यांना आग्र्यात दिला जाईल असे त्यांना वाटल्यामुळे ते औरंगजेबाच्या भेटीस जाण्यास तयार झाले.

**३. पुन्हा युद्ध नको :**

सर्वात महत्वाचे कारण म्हणजे जर औरंगजेबाच्या भेटीस जाण्याचे महाराजांनी नाकारले तर त्यांच्याबरोबर केलेल्या तहाचा भंग होईल आणि पुन्हा तो युद्धासाठी उठेल. महाराजांना युद्धाची तयारी करावी लागली असती. व ते सध्या तरी शक्य नव्हते. म्हणूनच महाराज आग्र्यास जाण्यास तयार झाले.

**४. औरंगजेबाची प्रबळ इच्छा :**

पोर्तुगीज लेखक कौस्मा गार्डा याने असे लिहिले कि, जयसिंग विजापूरहून परत येत

असताना त्याचा मुक्काम सोलापूरास पडला होता. तेथून त्याने शिवाजीने आपल्या स्वारीत केलेल्या बहादूरीचे यथार्थ वर्णन बादशहास कळविले. ते ऐकून शिवाजीस भेटण्याची प्रबळ इच्छा त्याला झाली. त्यामुळे त्याने जयसिंगास कसेही करून शिवाजीला आपल्या भेटीस पाठविण्याचा आग्रह केला.

**५. स्वराज्यावर तूर्तास संकट नाही :**

छत्रपती शिवाजी महाराजांचा मोगलांशी तह झालाच होता. विजापूरचा आदिलशहादेखील मोगलांबरोबरच्या संघर्षामुळे कमकुवत झाला होता. त्यामुळे जरी आपण औरंगजेबास भेटण्यासाठी दिल्लीला गेलो तरी स्वराज्यावर तूर्तास तरी संकट नव्हते. त्यामुळे देखील महाराजांनी बादशहाच्या भेटीस जाण्याचे कबूल केले.

### ३.२.४.२ आग्राभेटीचा घटनाक्रम :

मिर्झाराजा जयसिंग याने स्वराज्याची चारही बाजूने कोंडी केली. त्यामुळे स्वराज्याचा बराचसा प्रदेश, किल्ले, सरदार आदि मोगलांच्या अधिकारात आले. शेवटी पुरंदरच्या किल्ल्याला जयसिंगाने वेढा दिल्याने तो देखील त्याच्या ताब्यात येऊन किल्ल्यावरील माणसांची हानी होणार हे निश्चित झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी माघार घेतली. स्वराज्याचा काही भाग का होईना वाचविण्यासाठी जयसिंगाबरोबर वाटाघाटी करून १३ जून १६६५ रोजी तह केला.

पुरंदरच्या या तहातील ... छत्रपती शिवाजी महाराजांना दिल्ली येथे औरंगजेबाच्या भेटीसाठी जाण्याचे मान्य करावे लागले. कारण त्याशिवाय कोणताही उपाय त्यांच्याकडे नव्हता. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी बादशहाच्या दिल्ली भेटीचा स्वराज्याच्या उपयोगासाठी फायदा करून घेतला. हे या ठिकाणी विशेष होय.

**१. स्वराज्याची कारभाराची व्यवस्था लावली :**

छत्रपती शिवाजी महाराजांना दिल्लीचा बादशहा औरंगजेब याच्या भेटीसाठी दिल्लीस जावेच लागणार हे निश्चित झाल्यानंतर आपल्या माघारी इतक्या कष्टाने निर्माण केलेली स्वराज्याची घडी विस्कटू नये यासाठी आपल्या माघारी राजमाता जिजाबाई यांच्या आदेशाने राज्यकारभार चालविण्याची आज्ञा मोरोपंत पिंगळे, ... सोनदेव, प्रतापराव गुजर व स्वराज्यातील इतर लहान-मोठ्या अधिकाऱ्यांना दिल्या. यावरून आपणास छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याविषयीच्या भावनांचे दर्शन होते. जर आपण परत आलोच नाही तर स्वराज्याचे काम सतत पुढे जात रहावे व वाढावे. यातून त्यांच्यातील योग्य प्रशासकाचा परिचय येतो. त्याप्रमाणे अफझलखान प्रकरणाच्या प्रसंगी अफझलखानाच्या भेटीस जाण्याआधी स्वराज्याच्या कारभाराची यथायोग्य व्यवस्था लावून दिली होती. तसेच आत्तादेखील लावली होती. ज्यामुळे आपल्यामागे कारभार विस्कळीत न होता यथायोग्य चालावा.

**२. आग्र्याकडे मार्गक्रमण :**

स्वराज्याच्या कारभाराची आपल्या माघारी योग्य व्यवस्था व्हावी यासाठी सर्व अधिकारी, सहकारी यांना त्यांच्या कामाची व जबाबदारीची वाटणी करून दिल्यानंतर

छत्रपती शिवाजी महाराज मार्च १६६६ च्या पहिल्या आठवड्यात दिल्लीच्या दिशेने कूच केले. त्यांच्याबरोबर त्यांचा आठ वर्षांचा मुलगा संभाजी तसेच तानाजी मालुसरे, येसाजी कंक, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवजी आणि रघुनाथपंत कोरडे यांसारखे कसलेले वीर व मुत्सद्दी होते.

यावेळी मार्गात खर्चासाठी लागणाऱ्या पैशाची तजवीज तहामध्ये ठरल्याप्रमाणे औरंगजेबानेच करावयाची होती. त्यानुसार एक लाख रुपये मार्गातील खर्चासाठी महाराजांनी मागून घेतले होते. तसेच मार्गामध्ये महाराजांना कुठलीही अडचण येऊ नये तसेच त्यांच्याबरोबर एखाद्या शहजाद्या प्रमाणे वर्तन करावे असे औरंगजेबाने मार्गातील सर्व अधिकाऱ्यांना पत्र पाठवून आदेश दिले होते. तसेच त्यांच्या जीविताच्या रक्षणासाठी खुद्द जयसिंगाचा मुलगा रामसिंग याने स्वत: जबाबदारी घेऊन तशी व्यवस्था केली होती. अशा प्रकारे एका राजाप्रमाणे मार्गक्रम करत छत्रपती शिवाजी महाराज मोगलांच्या अधिकाराखाली असलेल्या औरंगाबाद शहरात येऊन पोहचले.

**३. औरंगाबादच्या मुगल अधिकाऱ्याचा मगरूरपणा :**

छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर एखाद्या शहजाद्याप्रमाणे वागावे असा औरंगजेबचा आदेश असतानाही औरंगाबाद येथील मुगल अधिकारी महाराज औरंगाबादमध्ये पोहचल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी गेला नाही. कारण तो शिवाजी महाराजांना आपल्यापेक्षा कमी दर्जाचा मानत होता. त्याने स्वत: महाराजांच्या स्वागतासाठी न येता आपल्या अधिकाऱ्यास पाठविले. शिवाजी महाराजांना याचा अपमान वाटला व त्यांनी याची तक्रार जयसिंगाकडे केली. यावेळी जयसिंगाची छावणी देखील औरंगाबादमध्ये होती. त्याने महाराजांचा उचित सत्कार व स्वागत केले.

खुद्द मिर्झाराजा जयसिंगानेच छत्रपती शिवाजी महाराजांचे इतक्या अदबीने स्वागत व सत्कार केला हे पाहून या अधिकाऱ्यास आपली चूक कळली. तो स्वत: महाराजांना भेटण्यासाठी त्यांच्या छावणीत आला. त्याच्याकडून आपल्या प्रतिष्ठेस शोभेल असा नजराणा व बहुमान घेऊन महाराज मजलदरमजल करीत मे १६६६ च्या दुसऱ्या आठवड्यात आग्रा येथे पोहचले.

**४. दरबारात अपमान :**

छत्रपती शिवाजी महाराज आपल्या सहकाऱ्यांबरोबर आग्रा येथे पोहचले. ठरल्याप्रमाणे जयसिंगाचा मुलगा व मुगल सरदार मुखलिसखान यांना शिवाजीच्या व्यवस्थेसाठी नेमले होते. त्याप्रमाणे उभयतांनी आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वागत केले व त्यांच्या निवासाची व्यवस्था केली.

ठरल्याप्रमाणे १२ मे रोजी औरंगजेबाच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त भव्य दरबार भरविण्यात आला होता. व याच दरबारात छत्रपती शिवाजी महाराजांची औरंगजेबाशी भेट घडवून आणण्याचे निश्चित झाले. यामागील महत्वाचे कारण म्हणजे औरंगजेबास आपल्या साम्राज्याच्या वैभवाचे प्रदर्शन करून शिवाजीवर याची छाप पाडावयाची होती.तसेच शिवाजीस आपल्या सेवेत घेऊन दक्षिणेकडील आपली सत्ता शिवाजीकरवी मजबूत करण्याचा त्याचा विचार होता.

वास्तविक पाहता ही भेट दिल्ली येथील दरबारात होणार होती. मात्र ही भेट आग्रा येथे झाली. या भेटीच्या दिवशी असदखानाबरोबर शिवाजी महाराज व संभाजी औरंगजेबाच्या दरबारातील दिवाण-ए-खास येथे पोहचले. त्यावेळी महाराजांनी औरंगजेबास १००० मोहरा आणि २००० रुपये नजराणा म्हणून व ५००० रुपये निसार म्हणून पेश केले. महाराजांप्रमाणे संभाजीने देखील नजराणा दिला. यावेळी औरंगजेबाने मात्र जुजबी दोन-चार शब्द बोलून महाराजांकडे दुर्लक्ष केले व दरबारातील एका सामान्य अधिकाऱ्याने महाराजांना पंचहजारी मनसबदारांच्या रांगेत नेऊन उभे केले. ज्या रांगेत शाहिस्तेखानाच्या स्वारी दरम्यान जसवंतसिंहासारखे दक्षिणेतून आलेले दुय्यम दर्जाचे सरदार होते. त्याच्या पाठीमागे महाराजांस उभे केले गेले. हा सर्व प्रकार पाहून महाराजांस आपला अपमान झाल्याची भावना निर्माण झाली व महाराज तडकाफडकी दरबारातून निघून गेले. या ठिकाणी महाराज दरबारातून निघून का गेले? तसेच तेथेच मूर्च्छित होऊन पडले या विषयी बरेच वाद-प्रतिवाद आहेत. हे मात्र नक्की की या सर्व प्रकारामुळे छत्रपती शिवाजी महाराज व औरंगजेबाचे संबंध अधिकच शत्रुत्वाचे बनले. तसे पाहता औरंगजेबाची ही मोठी चूकच झाली. तसेच जयसिंगाच्या ... शिवाजीस मुगलांच्या सेवेत घेऊन त्याच्याकरवी दक्षिणेतील मुगल सत्ता चिरस्थायी बनविण्याची योजना देखील फसली.

### ५. नजरकैद :

औरंगजेबाकडून दरबारात झालेल्या अपमानामुळे महाराजांनी पुन्हा कधीही औरंगजेबाची समोरासमोर भेट न घेण्याचा निश्चय करून आपल्या डेऱ्यामध्ये परत आले. या घटनेनंतर औरंगजेबासही कळून चुकले कि शिवाजीच्या युद्धकौशल्याचा उपयोग करून दक्षिणेकडे आपल्या साम्राज्यविस्ताराचे काम साधण्याची आपली योजना पूर्ण होणार नाही. याची कल्पना आल्यानंतरही त्याने शिवाजी महाराजांस पुन्हा दरबारात येण्याविषयी रामसिंगामार्फत अनेक आमंत्रणे पाठविली. मात्र महाराजांनी स्वत: न जाता शेवटी संभाजीस त्याच्या भेटीसाठी रामसिंगाबरोबर दरबारात पाठविले.

यामुळे औरंगजेब समजून चुकला की शिवाजीचा उपयोग करून घेण्याची आपली योजना फसली आहे. त्यामुळे त्यास जिवंत दक्षिणेत जाऊ देणे धोक्याचे आहे. शिवाजी जर दक्षिणेत सुखरूप पोहचला तर आपणास दक्षिणेत साम्राज्य विस्तार करता येणार नाही. औरंगजेबाची ही भीती पुढील काळात खरी ठरली. ज्या वाडयात शिवाजी महाराजांची व्यवस्था केली होती, त्या वाड्याभोवती पोलादखानाचा कडक पहारा बसविला. औरंगजेबाच्या या कृत्यास रामसिंगही काही करू शकणार नाही याची पूर्ण खात्री शिवाजी महाराजांना आली. त्यामुळे या ठिकाणापासून स्वत:चा बचाव करून जाण्यासाठी स्वत: काही युक्ती करून निसटण्याचा निश्चय केला.

### ६. योजनेची आखणी व कैदेतून सुटका :

औरंगजेबाने शिवाजी महाराजांना कसेही करून दक्षिणेत जाऊ द्यायचे नाही असा निश्चय करून त्यांच्या निवासाभोवती कडक पहारा लावला. तसे पाहता औरंगजेबास शिवाजी महाराजांच्या दरबारातील प्रकाराचे कारण दाखवून ठार देखील करता आले असते.

मात्र मिर्झाराजा जयसिंगाने सांगितल्याप्रमाणे शिवाजीच्या जीवास मोगल दरबारच्या भेटीत असताना जर काही बरेवाईट झाले तर दक्षिणेतील जनता मोठा उठाव करेल व भविष्यात कधीही मुगलसत्तेस दक्षिणेत राज्यविस्तार करता येणार नाही. तसेच बादशहाच्या भेटी दरम्यान शिवाजी महाराजांच्या जिवीताच्या रक्षणाची जबाबदारी खुद्द जयसिंगावरच असल्यामुळे त्याचा शब्द देखील औरंगजेबास सरळ सरळ मोडता येणार नव्हता. म्हणून त्याने शिवाजी महाराजांना कैदेत ठेवून योग्य वेळ येताच कपटने मारण्याचा विचार केला.

काही काळ आधीच्याच ठिकाणी पहारा बसवून लवकरच महाराजांची रवानगी आग्र्यापासून दूर एखाद्या किल्ल्यावर करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती महाराजांस कळाली. ही माहिती बहुदा रामसिंगानेच महाराजांस दिली असावी. त्यानुसार त्वरित निघून जाण्यासाठी रामसिंगाने एक योजना बनविली.

### ७. शरणागतीचा बनाव :

औरंगजेब आता आपणास जिवंत दक्षिणेस जाऊ देणार नाही याची खात्री झाल्यानंतर महाराजांनी आपल्याबरोबर दक्षिणेतून येतानाच मोठा खजिना आणला होता तसेच आग्र्यामध्ये असताना देखील रामसिंगाकडून ६० लाख रुपये कर्ज घेतले होते. असा उल्लेख अनेक राजस्थानी पत्रांतून येतो. महाराजांनी या खजिन्याचा उपयोग आपल्या पहाऱ्यावर असणाऱ्या लहान-मोठ्या अधिकाऱ्यांना देऊन त्यांना आपल्या बाजूने वळवून घेण्यासाठी केल्याचा संभव आहे.

त्याचबरोबर आता आपण पूर्णपणे असहाय्य बनलो आहोत. त्यामुळे दक्षिणेकडील जाण्याचा आपला बिलकूल विचार नाही. दक्षिणेकडील आपला प्रदेश आधीच मोगलांच्या ताब्यात गेल्यामुळे दक्षिणेकडे जाण्यात काहीच हाशिल होणार नाही. काही दिवसाने आपण आपले कुटुंब-कबिले देखील इकडेच बोलावून बादशहाच्या मर्जीप्रमाणे राहणार. असा निरोप औरंगजेब बादशहास पोहचविला. यामुळे औरंगजेब व त्याचे सरदार गाफील झाले.

या निरोपानंतर योजनेचा दुसरा भाग म्हणून आपणास उत्तरेकडील हवामान बिलकूल मानवत नसल्यामुळे आपली तब्बेत अतिशय खालावली आहे व यातून आपण बरे होऊ असे आपणास वाटत नाही. असा बनाव करून अंथरूणावर पडून राहण्यास सुरूवात केली. तसेच आपली शेवटची इच्छा म्हणून आपल्या उरलेल्या वेळेत आपल्या हातून पुण्य कर्म व्हावे यासाठी मंदिरे व दर्ग्यांना फळे व मिठाई वाटण्याची परवानगी मागितली. त्यानुसार तसा उपक्रम सुरू झाला. सुरूवातीस काही दिवस बाहेर जाणारे मिठाईचे व फळांचे पेटारे तपासले जात. मात्र ते नित्याचेच झाल्यामुळे ते तपासणे बंद झाले. याचे कारण म्हणजे आधी सांगितल्याप्रमाणे महाराजांनी येथील अधिकाऱ्यास आपल्याकडील धनाचे काही प्रमाणात वाटप करून त्यांना आपल्या बाजूस करून घेतले होते.

नियमित फळांचे आणि मिठाईचे वाटप चालू असतानाच महाराजांनी या दरम्यान आपल्याबरोबर आलेल्या आपल्या माणसांना सुखरूप दक्षिणेकडे जाऊ देण्याची परवानगी मागितली. ही परवानगी बादशहाने त्वरीत दिली. या मागचे कारण म्हणजे बादशहास बरेच होते की शिवाजीच्या बरोबरील माणसे गेल्यानंतर तो एकटाच सापडणार होता. त्यामुळे

त्याला कधीही ठार करणे अधिक सोपे होणार होते. मात्र हा औरंगजेब बादशहाचा गैरसमज होता. खरे तर महाराजांनी ठरलेल्या योजनेनुसार आपल्या माणसास कैदेतून बाहेर काढून आग्र्याच्या परिसरात गुप्तपणे राहण्याचे निश्चित केले होते. यामुळे आणखी एक फायदा हा झाला कि मिठाईचे व फळांचे पेटारे जे अधिकारी बदलल्यानंतर कधी कधी तपासले जात ते महाराजांबरोबरील माणसे गेल्यानंतर एकदम बंद झाले. अशा प्रकारे सर्व घटना ठरलेल्या योजनेप्रमाणे होत होत्या.

### ८. पेटाऱ्यातून पलायन :

ठरलेल्या योजनेप्रमाणे महाराजांनी आपल्याबरोबरच्या माणसांना कैदेतून मुक्त करून आग्र्याच्या प्रदेशात गुप्तपणे ठेवले. व स्वत:बरोबर सेवेसाठी हिरोजी फर्जंद व मदारी मेहत्तर यांना ठेवले. यामध्ये इथे एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की महाराजांनी आपल्याजवळ अतिशय कठीण समयी जे सेवक ठेवले त्यात एक मुसलमान सेवक होता. यावरून असे स्पष्ट होते की स्वराज्याच्या उभारणीचे जे कार्य महाराजांनी आरंभिले होते, त्यामध्ये जीवास जीव देणारे केवळ स्वधर्मीच नव्हते तर मुसलमान देखील मोठ्या प्रमाणात होते. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांची मुस्लीम धर्माविषयी व मुस्लीम धर्मियांचे महाराजांवरील प्रेम, आदर, आपुलकी स्पष्ट होते.

योजनेत ठरल्याप्रमाणे सर्व माणसे निघून गेल्यावर महाराज आजाराचे ढोंग करून पडून राहू लागले. व त्यांच्याजवळ त्यांची सेवा करण्यासाठी हिरोजी फर्जंद, मदारी मेहत्तर व संभाजी सतत त्यांच्या बाजूस बसू लागले. हा क्रम काही काळ चालल्यानंतर ठरल्याप्रमाणे १९ ऑगस्ट रोजी पहारेकऱ्यास महाराजांना कुठलाही त्रास न देण्यास सांगितले व नियमितपणे मिठाई व फळांचे पेटारे आत आल्यानंतर एका पेटाऱ्यात खुद्द शिवाजी महाराज व दुसऱ्या पेटाऱ्यात संभाजी हे बसून बाहेर पडले.

या दरम्यान हिरोजी फर्जंद हा महाराजांच्या जागी तोंडावर पांघरून घेऊन झोपला व मदारी मेहत्तर त्याच्या पायथ्याशी बसला. काही काळानंतर दोघेही महाराजांना औषध आणण्याच्या निमित्ताने बाहेर पडले. अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी व त्यांच्याबरोबरील त्यांचे सर्व साथीदार औरंगजेबाच्या कैदेतून सुखरूप बाहेर पडले. हे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या बुद्धिमत्ता कौशल्यामुळेच शक्य झाले. शिवाजी महाराजांच्या या कल्पना वाटावी अशा पलायनाच्या घटनेचे विवेचन अनेक साधनांमधून आलेले आहे. यामध्ये सभासद बखर, राजस्थानी कागदपत्रे, परकलदास यांच्या पत्रातून आलेले आहे.

### ९. स्वराज्यात आगमन :

छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी राजे ठरल्याप्रमाणे पेटाऱ्यातून आग्र्यापासून उत्तरेस ६ मैल अंतरावर एका गावी पोहचले. तेथे आधी पासूनच महाराजांचा एक अधिकारी निराजी रावजी हा घोडे घेऊन सज्ज होता. या ठिकाणी निराजीस मुगलांच्या मुलखात जे घोडे मिळाले ते रामसिंगाच्या मदतीने मिळाले. कारण या घटनेनंतर ज्यावेळी रामसिंगच्या घोड्यांची मोजदाद केली, त्यावेळी त्याच्या तबेल्यात दोन घोडे कमी भरले. यावरून निराजीने जे दोन घोडे महाराज व संभाजीसाठी आणले ते रामसिंगनेच दिले हे स्पष्ट होते.

असो! महाराज व संभाजी हे घोड्यावर बसून दक्षिणेस न जाता प्रथम उत्तरेस मथुरेच्या दिशेने गेले. याचे कारण म्हणजे, महाराजांना याचा अंदाज होता की औरंगजेब आपणास शोधण्यासाठी आपले सैन्य हे प्रथम दक्षिणेच्या दिशेनेच पाठवेल व झालेही तसेच. यावरून महाराज शत्रूच्या प्रत्येक हालचालींचा किती बारकाईने अभ्यास करीत होते हे स्पष्ट होते. त्याचबरोबर मथुरेला जाण्यामागील आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे जरी वाटेत शत्रूच्या सैन्याची चुकून गाठ पडलीच तर किमान स्वराज्याचा वारस म्हणून संभाजी तरी सुखरूप रहावा. यासाठी त्यांना सुरक्षित स्थळी ठेवण्यासाठी दक्षिणेकडे न जाता उत्तरेकडे मथुरेस कूच केले. संभाजीला सुरक्षित स्थळी ठेवून स्वत: महाराज आपल्या साथीदारांबरोबर वेश पालटून आडमार्गाने दक्षिणेकडे निघाले.

महाराज आग्र्याकडे प्रथम ज्या मार्गाने आले, त्या मार्गाने न जाता परत आडमार्गाने गेले. याचा अर्थ त्यांनी आपल्याबरोबर जे आपले साथीदार आणले होते, त्यांची आधी सुटका करून त्यांना परतीसाठीचा सुरक्षित मार्ग शोधावयास सांगितला असावा. त्यामुळे महाराज कुठेही न अडता आडमार्गाने सुरक्षितपणे दि.१२/०९/१६६६ रोजी स्वराज्यात सुखरूप पोहचले व काही काळानंतर संभाजी राजेही स्वराज्यात सुखरूप पोहचले.

### ३.२.४.३ आग्रा-भेटीचे परिणाम :

छत्रपती शिवाजी महाराजांची आग्राभेट ही मराठ्यांच्या इतिहासातील केवळ एक घटना नव्हती तर त्याचा दूरगामी परिणाम स्वराज्य व मुगल साम्राज्यावर झाला तो पुढीलप्रमाणे :

#### १. स्वराज्यावरील परिणाम :

#### १.१ शौर्याचा दरारा :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा दरारा संपूर्ण हिंदुस्थानात निर्माण झाला कारण आग्राभेटी दरम्यान दरबारातील त्यांचे बेधडक वर्तन तसेच आग्रा बंदीवासातून अकल्पित योजनेद्वारे स्वत:सह आपल्या सर्व सैन्याची सुटका केली. जवळजवळ संपूर्ण हिंदूस्तानचा बादशहा असलेल्या औरंगजेबाच्या अगदी नजरेखालून शिताफीने स्वत:ची सुटका करून घेऊन एक प्रकारे आपल्या बुद्धिचातुर्याचा तसेच अंगातील अद्‌भूत गुणांचाच परिचय करून दिला. त्यामुळे या घटनेनंतर 'शिवाजीच्या अंगी अद्‌भूत शक्ती आहे, तो सहजगतीने १५ हात उडी मारू शकतो.' अशा अनेक कथा संपूर्ण हिंदुस्थानात पसरल्या. खुद्द औरंगजेबाच्या घरात जाऊन शह दिल्याबद्दल त्यांच्याविषयी आदरही वाढला.

#### १.२ स्वराज्यातील सैनिकांच्या आत्मविश्वासात वाढ :

जयसिंगाने स्वराज्यावर केलेल्या प्रचंड आक्रमणामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना पुरंदरचा तह करून माघार घ्यावी लागली. आत्तापर्यंत अतिशय कष्टाने उभे केलेले स्वराज्य नाहिसे होते का? अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यातच खुद्द शिवाजीराजासच मोगलाचा बादशहा औरंगजेब यास भेटण्यासाठी परमुलूखात जावे लागले. तेथे त्यांच्यावर अतिप्रसंग आल्यामुळे मराठी सैन्यामध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण होऊन त्यांचा आत्मविश्वास कमी

होऊ लागला होता. व तसे होणे स्वाभाविकच होते. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्र्यास जाऊन औरंगजेबाच्या दरबारातच मराठी स्वाभिमानी बाणा दाखविला. तसेच बंदिवासातून देखील अतिशय कल्पक योजनेद्वारे आपली व आपल्या माणसांची सुटका करून सुखरूप स्वराज्यात परत आले. त्यामुळे स्वराज्यात पुन्हा एकदा प्राण येऊन मराठी सैन्याचा गेलेला आत्मविश्वास परत आला व ते पुन्हा नव्या जोमाने स्वराज्य उभारणीच्या कामास लागले.

### १.३ गेलेले प्रदेश पुन्हा परत मिळाले :

पुरंदरच्या तहाने स्वराज्यातील जवळजवळ २०लाख रुपये वार्षिक उत्पन्नाचा प्रदेश व २३ किल्ले मोगलांकडे गेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्राभेटीनंतर मोगलांच्या वास्तविक शक्तिचा अंदाज महाराजांना आला. त्यामुळे सुरुवातीस काही काळ शांत बसून योग्य वेळ येताच स्वराज्याचे गेलेले प्रदेश व किल्ले पुन्हा स्वराज्यात सामिल करून घेण्यासाठी व्यापक संघर्ष सुरू केला. जर महाराजांनी आग्र्यास भेट दिली नसती तर पुढील काळात त्यानुसार योजना करून स्वराज्य बळकट झाले नसते.

### १.४ उत्तरेकडील राजपूत व अन्य सरदारांशी परिचय :

छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्राभेटीचे आमंत्रण स्वीकारून एक प्रकारे संकटच ओढावून घेतले होते. मात्र तत्कालीन परिस्थितीचा विचार करता हे करणेही गरजेचे होते. महाराजांच्या आग्राभेटीच्या निर्णयामुळेच त्यांना आग्रा येथे पोहचेपर्यंत मार्गात तसेच प्रत्यक्ष आग्र्यातील वास्तव्याच्या काळात उत्तरेडील अनेक राजपूत व मुसलमान सरदारांशी प्रत्यक्ष भेटण्याची व त्यांच्याबरोबर आपले संबंध वृद्धिंगत करण्याची संधी मिळाली. ज्यामुळे महाराजांनी आपल्या पुढील वाटचालीत आपणास अनुकूल असणाऱ्या अनेक सरदारांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. तर प्रतिकुल सरदारांचादेखील परिचय झाला. जो स्वराज्याच्या वाटचालीत मोठा उपयोगी पडला.

### १.५ उत्तरेकडील राजकीय परिस्थितीचा अनुभव :

ज्या मुगल साम्राज्याची सत्ता जवळजवळ संपूर्ण हिंदुस्थानभर पसरली होती. अशा या प्रचंड सत्ता असलेल्या मुगलांच्या राजधानीत प्रत्यक्ष कशा पद्धतीने कारभार चालतो तसेच मोगलांची अंतर्गत काय परिस्थिती आहे? तसेच इतर राज्यसत्ताविषयी त्या दरबारातील सरदार, उमराव व प्रत्यक्ष जनता यांचे संबंधीचे काय विचार आहेत? हे देखील महाराजांच्या भेटीत अनुभवास आले. व त्याबद्दलचे अनेक समज गैरसमज दूर झाले. तसेच मुगल दरबारातील अंतर्गत दुही व जे मराठी व अन्य सत्तांचे शासक मुगलांच्या सेवेत गेले आहेत त्याच्या त्या ठिकाणच्या वास्तविक स्थितीबद्दलची माहिती महाराजांना आग्रा भेटीमुळेच झाली.

### १.६ मोगल साम्राज्यावरील परिणाम :

ज्याप्रमाणे आग्राभेटीचे स्वराज्यावर परिणाम झाले त्याप्रमाणे मुगल साम्राज्यावरही झाले. ते पुढील प्रमाणे :

मिर्झाराजा जयसिंगाची निराशा झाली. शाहिस्तेखान प्रकरणानंतर औरंगजेबाने आपला सर्वांत पराक्रमी, अनुभवी सरदार मिर्झाराजा जयसिंग यास मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्यासाठी

मोठ्या शक्तिनिशी दक्षिणेकडे पाठविले त्यामुळे मिर्झाराजा जयसिंग देखील अनुभवाच्या व शक्तिच्या जोरावर छत्रपती शिवाजी महाराजांचा बिमोड करण्यासाठी आला. त्याने शाहिस्तेखानाने केलेल्या चूका न करता छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्ण पाडाव करण्यापेक्षा त्यास मोगलांच्या सेवेत घेऊन दक्षिणेकडील मोगलांच्या सत्तेला स्थायित्व देण्याची योजना आखली. त्या योजनेनुसारच आपली वाटचाल केली. ती काही प्रमाणात सफलही झाली. मात्र औरंगजेबाने जयसिंगाच्या योजनेचा हा शिवाजी महाराजांबरोबर आग्रा येथे केलेल्या अपमानास्पद वर्तणुकीमुळे शिवाजीस मोगलांच्या सेवेत घेण्याची योजना सफल होऊ शकली नाही. त्यामुळे त्याची घोर निराशा झाली. त्याचा परिणाम दक्षिणेत मुगल सत्तेचे स्थायित्व हे कायमचे स्वप्नच राहिले.

## ३.२.५ इ.स.१६६६ ते इ.स.१६७३ या काळातील मुगल व आदिलशाही सत्तांशी संघर्ष :

आग्र्यावरून सुखरूप स्वराज्यात परत आल्यानंतर महाराजांच्या मनात स्वराज्याच्या पुनर्बांधणीची योजना तयार होती. त्यानुसार प्रथम त्यांनी आत्तापर्यंतच्या स्वराज्यातील विजापूरी व मुगल आक्रमणामुळे निर्माण झालेल्या राज्यकारभारातील अव्यवस्था दूर करणे व मोगलांकडे गेलेले प्रदेश व किल्ले परत मिळविणे या दोन गोष्टी करणे मनाशी पक्के केले. व त्यानुसार हालचालींना प्रारंभ केला.

महाराजांना काही काळ शांततेचा हवा होता. तसा तो औरंगजेबासही हवा होता. मात्र ही शांतता दीर्घकाळाची नसून अल्पकाळासाठी आवश्यक होती. म्हणूनच पुन्हा संधी मिळताच मराठे-मुगल यांच्यामध्ये संघर्षास सुरूवात झाली. या संघर्षामागे कोणती कारणे होती ते आपण पाहू.

### ३.२.५.१ कारणे :

### १. मुगलांचा स्वराज्य विस्तारास विरोध :

आग्र्यावरून परत स्वराज्यात आल्यानंतर महाराजांनी आपल्या निश्चित केलेल्या योजनेनुसार स्वराज्याच्या कोकण किनारपट्टीवरील पश्चिम किनारा सुरक्षित करण्यासाठी जंजिरा व सभोवतालच्या प्रदेशावर हल्ला केला. यामुळे जंजिऱ्याच्या सिद्धीने कल्याणच्या मुगल सुभेदाराकडे मदतीची मागणी केली. यामुळे मुगल बादशहाने शिवाजी महाराजांना जंजिऱ्यावर हल्ला न करण्यास सांगितल्यामुळे महाराजांनी हल्ला मागे घेतला. मुगलांचे हल्ला न करण्याचे मत महाराजांनी यासाठी मान्य केले की महाराजांना मुगलांबरोबर तूर्तास कोणताही संघर्ष नको होता.

मात्र या घटनेमुळे मुगलांचे खरे रूप समोर आले व आपल्या स्वराज्य विस्तारास मुगलांचा विरोध आहे हे स्पष्ट झाले.

### २. महाराजांस अनुकूल परिस्थिती :

आग्राभेटीच्या वेळी छत्रपतींचा परिचय औरंगजेबचा मुलगा मुआझम याच्याबरोबर झाला होता. त्यामुळे मिर्झाराजा जयसिंगानंतर दक्षिणेत मुआझमची सुभेदार म्हणून नेमणूक झाली. तसेच त्यांच्याबरोबर शाहिस्तेखानाच्या स्वारीच्या वेळी मदत करणारा जसवंतसिंह

हा देखील दक्षिणेतच होता. त्यामुळे शिवाजी महाराजांचे संबंध चांगले प्रस्थापित झाले. व महाराजांना आपला स्वराज्य विस्ताराचा हेतू साध्य करण्यासाठी अनुकूल परिस्थिती तयार झाली.

मात्र शिवाजी महाराज व मुअझम, जसवंतसिंग यांच्यातील जवळीक नंतर औरंगाबादला आलेला मुगल सरदार दिलेरखान याला आवडली नाही. त्यामुळे त्याने औरंगजेबास मुअझम व जसवंतसिंग हे शिवाजीच्या मदतीने मुगलसाम्राज्यास अपाय करतील असा समज करून दिला. यामुळे दक्षिणेत मुगल सरदारांमध्ये एकदम गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. व याचाच फायदा महाराजांनी करून घेतला.

### ३. मराठी सैन्याची मुगल प्रदेशात लूट :

आधीच संशयी असलेल्या औरंगजेबाचे दिलेरखानाने दक्षिणेतील मुअझम-जसवंतसिंह-शिवाजी यांच्यातील जवळिकी विषयी गैरसमज करून दिल्याने औरंगाजेबाने संभाजीला दिलेली वऱ्हाड व अन्य प्रदेशातील जहागिरी परत घेतली. यामुळे या जहागिरीवर असलेल्या सैन्याने मुगल प्रदेशांवर लूटालूट केली.

### ४. मुगल सैनिक शिवाजीकडे नोकरीस :

दक्षिणेत बऱ्याच काळापासून शिवाजी महाराजांविरोधात औरंगजेबाने मोहीम उघडली होती. यामध्ये बरेचसे सैनिक दक्षिणेतूनच भरती केले होते. मात्र मुगलांच्या सर्व मोहीमा अयशस्वी झाल्यामुळे त्यांच्याकडे भरती असलेल्या सैनिकांस आपला पगार वेळेवर न मिळाल्यामुळे ते सैनिक महाराजांच्या सेवेत सामिल झाले. यामुळे देखील औरंगजेबास राग आला व उभयतांमध्ये संघर्ष सुरू झाला.

### ५. मुगलांच्या राजधानीतील राजकीय अस्थिरता :

शिवाजी महाराजांनी आग्राभेटीच्या वेळी मुगलांच्या दरबारातील संपूर्ण परिस्थितीचा बारीक अभ्यास केला होता. त्यातच दक्षिणेतील सर्व मोहीमेवर आलेले अपयश तसेच आपापसातील बंड, हेवेदावे यामुळे दरबारातील परिस्थिती हाताबाहेर जातेय काय? असे औरंगजेबास वाटू लागले. व त्याचा राज्यकारभारावर परिणाम होऊन राजधानीत एकदम गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष दिल्यामुळे औरंगजेबाचे दक्षिणेकडे म्हणावे तसे लक्ष राहिले नाही व याचा फायदा घेऊन महाराजांनी आपल्या कारवाया वाढविल्या व त्यातूनच संघर्षास सुरुवात झाली.

सारांश : महाराजांना मुगलांच्या बरोबर याआधि झालेल्या संघर्षाने स्वराज्याचे झालेले नुकसान भरून काढून स्वराज्याचा कारभार करावयाचा होता. त्यामुळे महाराजांनी एकदम मुगलांशी शत्रुत्व घेण्यापेक्षा मित्रत्वाचा बहाणा केला. तसेच याकाळात मुगल साम्राज्यात निर्माण झालेल्या अंतर्गत कलहाचा फायदा घेऊन आपणाला हेतूपूर्ण करण्यासाठीचे कार्य जोमाने सुरू केले. व यातूनच दोघांमध्ये पुन्हा संघर्ष निर्माण झाला.

### ३.२.५.२ मुघलांबरोबर संघर्षाचा घटनाक्रम :

आग्र्याहून सूटका झाल्यानंतर व स्वराज्यात परत आल्यानंतर स्वराज्याची घडी व्यवस्थित बसविण्यासाठी इ.स.१६६७ च्या मध्यापर्यंत शांततेचे धोरण अवलंबिले होते. यानंतर आपले दुसरे उद्दिष्ट स्वराज्याचा विस्तार करून गेलेला प्रदेश पुन्हा मिळविण्यासाठी आपले आक्रमक धोरण राबविण्यास सुरूवात केली. यातूनच मुगल-मराठे संघर्षास प्रत्यक्ष सुरूवात झाली. तो पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१. सिंहगड काबीज : (४ फेब्रुवारी १६७०)**

जयसिंगाबरोबर झालेल्या पुरंदरच्या तहावेळी मराठ्यांचे जे तेवीस किल्ले मुगलांना देण्यात आले होते, त्यापैकी कोंढाणा किल्ला म्हणजे सिंहगड हा एक होता. या किल्ल्याचे महत्व म्हणजे या किल्ल्यावरूनच पुण्याच्या घाटांवरच्या मुलूखावर नियंत्रण ठेवले जात होते. त्यामुळे ज्याच्या अधिकाराखाली कोंढाणा किल्ला असे, त्याचाच अधिकार पुण्याच्या घाटावरील मुलूखावर असे. त्यामुळे कोंढाणासारखा महत्वाचा किल्ला आपल्या हाती यावा असे जिजाबाई व शिवाजी महाराज यांना मनोमन वाटत होते. मात्र तो जिंकणे तितके सोपे नव्हते. यासाठीच महाराजांचा एकनिष्ठ सहकारी तानाजी मालुसरे व बंधु सूर्याजी याच्यावर किल्ला घेण्याची जबाबदारी सोपविली. त्यानुसार या उभयतांनी ४ फेब्रुवारी १६७० रोजी किल्ल्यावर रात्रीतून आपल्या तीनशे मावळ्यासह हल्ला चढविला. या ठिकाणी तानाजी मालूसरेने घोरपडीच्या सहाय्याने दोर वर नेऊन बांधला. असा उल्लेख बऱ्याच ग्रंथामध्ये येतो. याचा अर्थ तानाजीच्या सैन्यात घोरपडीप्रमाणे किल्ल्याच्या दगडाला कपारीच्या सहाय्याने एखादा मावळा आधी दोर घेउन वर गेला असेल व त्याने वर गडावर दोर मजबूत ठिकाणी बांधून खाली सोडला असेल व त्याच्या आधारे बाकीचे मावळे वर गडावर आले असावेत ही शक्यता बरोबर वाटते. असो! ज्यावेळी तानाजी मालुसरे व त्याचे सैन्य गडावर पोहचले त्यावेळी गडावरील किल्लेदार उदयभानू राठोड यांच्यात तुंबळ लढाई झाली व यामध्ये तानाजी मालुसरे व उदयभानू राठोड दोघेही ठार झाले. किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. हा विजय म्हणजे .... पहिला विजय होता. यामुळे मराठ्यांच्या इतिहासात याचे वेगळे महत्व आहे.

**२. कोंढाणा किल्ल्याचे सिंहगड नामकरण व सैन्याचा गौरव :**

तानाजी मालूसरेने कोंढाणा किल्ल्यावर रात्रीतून केलेल्या अचानक हल्ल्यामुळे किल्ल्यावरील सैन्यास एकदम कापून काढले. व किल्ला हस्तगत केला. मात्र यामध्ये तानाजी सारखा मित्र, वीर, सहकारी सिंहासारखा लढता लढता ठार झाला. याबद्दल महाराजांना व जिजाईंना मोठे दुःख झाले. तानजी मालूसरेचा पराक्रम सतत तेवत रहावा यासाठी महाराजांनी कोंढाणा किल्ल्याचे नाव बदलून सिंहगड असे ठेवले. यावरून महाराजांच्या मनात आपल्या मावळ्यांबद्दल किती पराकोटीचा आदर होता हे स्पष्ट होते. त्याचबरोबर महाराजांनी तानाजीबरोबर शौर्याने लढणाऱ्या मावळ्यांचा देखील कर्णभूषणे, कडे, माळा व कंठे देऊन गौरव केला.

### ३. पुरंदर किल्ला हस्तगत (८ मार्च १६७०) :

सिंहगडासारखा महत्वाचा किल्ला हाती आल्यानंतर महाराजांनी आपला मोर्चा पुरंदराकडे वळविला व किल्ल्यावर प्रचंड हल्ला करून किल्ल्यावरील किल्लेदार व सैनिकांस कैदेत टाकून ८ मार्च रोजी किल्ल्यावर अधिकार केला.

पुरंदरच्या विजयानंतर उत्तर कोकणातील कल्याण, भिवंडी, माहूली इ. वर विजय मिळवून त्यावर मराठ्यांचा अधिकार स्थापन केला. याच क्रमाने कर्नाळा, रोहिडा देखील हस्तगत केले. ही सर्व कारवाई महाराजांनी वर्ष-सहा महिन्यांतच पूर्ण केली. यावरून त्यांच्या कारवाईची तीव्रता लक्षात येते. महाराजांनी घेतलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावून वऱ्हाड, अहमदनगर, जुन्नर, परिंडा इ. मुगलांच्या प्रदेशावर हल्ला करून मोठी संपत्ती मिळविली.

### ४. पुन्हा सुरतवर हल्ला (दुसरा) : (ऑक्टोबर १६७०)

शाहिस्तेखानाच्या स्वराज्यावरील हल्ल्यानंतर महाराजांनी सूरत शहरावर हल्ला करून औरंगजेबाची नाचक्की करून मोठी संपत्ती मिळविली होती. त्याचप्रमाणे याही वेळी हल्यासाठी मुगलांच्या अधिकाराखालील स्वराज्याच्या जवळील, सर्वात सोईचा व संपन्न प्रदेश सुरतच आहे. हे महाराजांना अनुभवावरून कळून चुकले होते.

त्यामुळे त्यांनी पुन्हा ऑक्टोबर १६७० मध्ये मोठ्या तयारीनिशी सुरतला कूच केले. मागच्या वेळी महाराजांनी सुरतसारख्या संपन्न शहरावर केलेल्या हल्ल्यामुळे औरंगजेब यातून काही बोध घेऊन शहराची सुरक्षा व्यवस्था वाढवेल असे वाटले होते. मात्र तशी कुठलीही सुरक्षा व्यवस्थेची काळजी दिसून येत नव्हती. त्यामुळेच महाराजांनी सुरतचीच पुन्हा निवड केली होती.

अपुरी सुरक्षाव्यवस्था व नुकताच सुरतच्या सुभेदाराचा मृत्यू तसे कमी झालेले सैन्य त्यामुळे या संधीचा लाभ घेऊन महाराजांनी या शहरावर हल्ला चढविला. ३ ऑक्टोबर १६७० ते ६ ऑक्टोबर १६७० पर्यंत शहरातील श्रीमंत व्यापाऱ्यांच्या पेढ्या व दुकानांतून मोठे धन जमा केले. तसेच महाराजांच्या भीतीमुळे आधीच आपल्या संपत्तीसह शहराबाहेर पळून गेलेल्या व्यापाऱ्यांना गाठून त्यांच्याकडूनही मोठी संपत्ती प्राप्त केली. तसेच माघारी जाताना शहरप्रमुखाकडून दरसाल बारा लाख रुपये खंडणी देण्याचे कबूल केले. तसेच यावेळी इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज या वखारवाल्यांनी स्वत:हून महाराजांना खानदेशातील साल्हेरची नजराणे, भेटवस्तु, तलवारी व रोख खंडणी देऊन स्वत:चे संरक्षण करून घेतले.

### ५. हल्ल्याचा परिणाम :

### १. मुंबई व्यापारी केंद्र बनण्यास सुरूवात :

महाराजांच्या सुरतवरील दुसऱ्या हल्ल्याचाही मोठा परिणाम झाला. यावेळी सुरतवरील पहिल्या हल्ल्याच्या वेळचा प्रमुख व्यापारी हाजी सय्यद बेगच्या मुलाने आपला व्यापार सुरतऐवजी मुंबई बंदरावरून करण्याचे जाहीर केले.

### २. व्यापार सीमित झाला :

सुरतवरच्या मराठ्यांच्या दुसऱ्या हल्ल्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये घबराहट निर्माण झाली. त्याचे कारण म्हणजे महाराजांनी तेथील व्यापारी व सुभेदारांस वार्षिक बारा हजार खंडणी न दिल्यास पुन्हा हल्ला करण्याची धमकी दिली. तेथील व्यापारी धास्तावले व त्यांनी आपला व्यापार सुरतऐवजी इतर बंदरांवरून करण्यास सुरुवात केली.

### ३. औरंगजेबच्या मनात युरोपिय व्यापाऱ्यांबद्दल संशय निर्माण :

महाराजांच्या सुरतवरील प्रथम हल्ल्याच्या वेळी तेथील युरोपिय व्यापारी डच, इंग्रज इत्यादींनी आपल्या वखारीची सुरक्षा करण्यासाठी सैन्य सज्जता केली होती. व काही प्रमाणात काहींनी विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र यावेळी पूर्वी पेक्षाही जास्त शक्ती असताना देखील शिवाजीस विरोध न करता उलट त्यांना स्वत: भेटून भेटवस्तू व खंडणी दिली. त्यामुळे औरंगजेबाच्या मनात शिवाजी व परकीय व्यापारी एक असल्याचा संशय निर्माण झाला.

### ४. वणी-दिंडोरीचा संघर्ष : (१७ ऑक्टोबर १६७०)

छत्रपती शिवाजी महाराज सुरतच्या हल्ल्यावरून स्वराज्यात परत येत असताना मार्गात आजच्या नाशिक जिल्ह्यातील वणी-दिंडोरी या ठिकाणी महाराजांच्या मागावर मुगल सेनापती दाऊदखान कुरेशी हा येत असल्याची बातमी शिवाजी महाराजांना मिळाली. त्यामुळे महाराजांनी आपल्याबरोबरील सैन्याचे सहा गट करून त्यातील दोन गटाकडे सूरतवरून बरोबर आणलेली संपत्ती सुरक्षितपणे नेण्याची जबाबदारी देऊन स्वत: उरलेल्या सैन्यासह नाशिकजवळील चांदवडच्या पश्चिमेस असलेल्या कांचनमंचनच्या डोंगर परिसरातील वणी-दिंडोरी या ठिकाणी मोगल सैन्याशी समोरासमोर टक्कर देण्यासाठी सज्ज झाले. यावेळी महाराजांबरोबर सेनापती प्रतापराव गुजर, आकाजी आनंदराव, व्यंकोजी दत्तो व मोरोपंत पिंगळे इ.सरदार होते. तर मुगल सेनापती दाऊद कुरेशी बरोबर पठाण इखलास खान, अब्दुल मेहबुब, संग्रामखान तसेच शाहिस्तेखान स्वारीच्या वेळी सामिल झालेली 'रायबाघान' ही देखील होती. रायबाघान हिला औरंगजेबाने तिच्या शौर्याबद्दल ही पदवी दिली होती . यामागील कारण म्हणजे महाराजांच्या विरोधात येथील बऱ्याच वतनदार देशमुखांना शाहिस्तेखान व मिर्झाराजा जयसिंग यांनी वेगवेगळ्या मानाच्या पदव्या देऊन आपल्या बाजूस वळविले होते. त्यामुळे माहूरच्या देशमुखाच्या या विधवा पत्नीस औरंगजेबाने 'रायबाघान' ही पदवी दिली असल्याचा संभव आहे. असो!

वणी-दिंडोरीच्या ठिकाणी महाराजांचे सैन्य व दाऊदखान कुरेशी यांच्यात झालेल्या भीषण लढाईत दोन्ही बाजूची मोठी जीवित हानी झाली असली तरी मुगलाची मात्र मोठी हानी होऊन इखलासखान, संग्रामखान मीर मेहबूब हे जखमी झाले. तर अब्दूल मेहबूब याचा मुलगा ठार झाला. व शेवटी महाराजांना या लढाईत विजय मिळाला.

या लढाईचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे महाराजांनी नेतृत्व केलेली मराठ्यांची ही समोरासमोरील प्रथम लढाई होती. यात देखील विजय मिळाला हे विशेष. कारण मराठ्यांचे

आत्तापर्यंतचे लढाईचे तंत्र म्हणजे अचानक हल्ला करणे व आपला उद्देश सफल होताच त्वरित माघारी जाणे यातच ते तरबेज होते. लढाईच्या या प्रकारालाच अनेक ग्रंथात 'गनिमी कावा' असा शब्दप्रयोग केलेला आहे.

### ५. परिणाम :

मराठ्यांच्या विजयाचा मोठा परिणाम घडून आला. आणि तो म्हणजे या विजयाने मराठ्यांचा समोरासमोरील लढाईचा आत्मविश्वास वाढला तर मोगलांच्या सेवेत असलेल्या सिद्धीहलाल हा मराठ्यांच्या सेवेत आला.

### ६. खानदेशातील साल्हेरच्या किल्ल्यावर हल्ला व लूट हस्तगत :

मराठ्यांच्या सैन्याने स्वराज्य विस्ताराच्या उद्देशाने स्वराज्याबाहेरील मुगलांच्या बऱ्याच प्रदेशावर हल्ले करून मोठी संपत्ती व प्रदेश मिळवित चालले होते. त्याचक्रमाने खानदेशच्या गुजरात सरहद्दीवरील साल्हेर नावाचा बळकट किल्ला मोगलांच्या ताब्यात होता. तो हस्तगत करण्यासाठी मराठ्यांनी किल्ल्यावर हल्ला चढविला. यावेळी किल्ल्यावर असलेल्या मोगल सैन्याशी मोठी लढाई झाली. हा संघर्ष जवळजवळ वर्षभर चालला होता. मात्र शेवटी मराठ्यांना यात विजय मिळून फेब्रुवारी १६७२ मध्ये किल्ला ताब्यात आला.

या विजयानंतर मराठ्यांना मोठी संपत्ती हाती लागली तर मुगलाकडील इखलासखान, मुहकमसिंग इ. अधिकाऱ्यांना कैद केले गेले.

### ७. रामजी पांघेराचा पराक्रम : (फेब्रुवारी१६७२)

छत्रपती शिवाजी महाराज मुगलांच्या अधिकाराखाली गेलेले विविध प्रदेश व किल्ले एकामागून एक जिंकून ते स्वराज्यात मिळवित होते. याच क्रमात चांदवड जवळ कान्हेर नावाचा भक्कम किल्ला आहे. हा मोक्याच्या ठिकाणावर असल्यामुळे तो जिंकून घेण्यासाठी औरंगजेबाचा सरदार दिलेरखान याने किल्ल्यावर हल्ला चढविला.

मात्र यावेळी या किल्ल्यावर रामजी पांघेरा नावाचा किल्लेदार तैनात होता. किल्ल्याच्या रक्षणासाठी त्याच्याजवळ अवघे सहाशे सैनिक होते. मात्र किल्ल्यावर हल्ला करणाऱ्या दिलेरखानाकडे हल्ल्यावेळी रामजीच्या कित्येक पटीने सैन्य अधिक होते. असे असले तरी रामजीने दिलेरखानाच्या सैन्याचा आपल्या अवघ्या सहाशे सैनिकांसोबत पराक्रमाची पराकाष्ठा करून पराभव केला.

### ८. मराठ्यांच्या हाती न आलेले किल्ले :

स्वत: शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुगलांकडील स्वराज्याचा गेलेला प्रदेश व किल्ले जवळजवळ सर्व परत मिळविले होते. मात्र याही परिस्थितीत इ.स.१६७२-७४ दरम्यान झालेल्या संघर्षात शिवनेरी व चिंचवड येथील किल्ले संघर्ष करूनही मराठ्यांच्या ताब्यात येऊ शकले नाही. ही आग्र्याहून परत आल्यानंतर स्वराज्य पुनर्बांधणीच्या मोहीमेतील मर्यादा होती. हे देखील तितकेच सत्य होय.

### ३.२.५.३ आदिलशाहीबरोबर संघर्ष :

आग्राहून परत आल्यानंतर स्वराज्याच्या पुनर्बांधणीचे कार्य अतिशय जोमाने सुरू होते. मुगलांकडील गेलेले जवळजवळ सर्वच किल्ले व प्रदेश महाराजांनी स्वराज्यात परत आणले होते. त्यामुळे दख्खनमध्ये मुगलांची सत्ता व प्रतिष्ठा केवळ नावालाच शिल्लक राहिलेली होती.

त्यामुळे महाराजांनी आपले लक्ष दक्षिणेतील स्वराज्याचा शत्रु विजापूरचा आदिलशहा याच्याकडे केंद्रित करून कारवाया सुरू केल्या त्यामुळे मराठे व विजापूर यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला. या विषयी आपण अभ्यास करणार आहोत.

**१. पन्हाळा हस्तगत :(मार्च १७७३)**

स्वराज्यातील रक्षणासाठी महत्वाच्या किल्ल्यांमध्ये पन्हाळा किल्ल्याचा देखील समावेश होता. मात्र इ.स.१६६० मधील सिद्धी जोहरच्या विरूद्ध केलेल्या कारवाईदरम्यान हा किल्ला विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात गेला. तो तब्बल दहा वर्ष मराठ्यांच्या अधिकारात आला नाही. त्यामुळे महाराजांनी मुगलांविरूद्ध मिळत असलेल्या विजयामुळे सैन्याचा आत्मविश्वास वाढत होता. मुगलांच्या पराभवामुळे विजापूर दरबारातील अंतर्गत वादामुळे पन्हाळा घेण्याची नामी संधी मराठ्यांना मिळाली.

या संधीचा फायदा घेऊन महाराजांनी कोंडाजी फर्जंद आणि अण्णाजी दत्तो या दोघांवर किल्ला घेण्याची कामगिरी सोपविली. व त्यानुसार या उभयतांनी रात्रीतून किल्ल्यावर हल्ला करून पन्हाळ्याचा किल्लेदार बांबूखानास ठार केले व किल्ला ताब्यात घेतला. पन्हाळा किल्ला ताब्यात घेतल्यानंतर एप्रिल १६७३ मध्ये सातारा व परळी हे प्रदेश देखील आपल्या ताब्यात घेतले.

**२. बहलोलखानास प्रतापराव गुजरांचे जीवदान :**

कोल्हापूर जवळील महत्वाचा किल्ला पन्हाळा, सातारा व परळी या ठिकाणच्या मराठ्यांच्या विजयामुळे विजापूरचा आदिलशहा चिडून गेला. मराठ्यांच्या या कृत्याचा सूड घेण्यासाठी आदिलशहाने आपल्या दरबारातील पराक्रमी सरदार बहलोलखान यास मोठ्या फौजेनिशी मराठ्यांवर पाठविले.

बहलोलखान आपल्यावर चालून येत असल्याची बातमी शिवाजी महाराजांस लागल्यामुळे तो तेथपर्यंत पोहचण्याच्या आतच त्याचा वाटेतच पराभव करण्यासाठी महाराजांनी सेनापती प्रतापराव गुजर यांच्याबरोबर सैन्य देऊन त्यास बहलोलखानाचा बंदोबस्त करण्यासाठी रवाना केले. त्यानुसार विजापूरपासून जवळजवळ ३५ ते ४० मैलाच्या अंतरावर असलेल्या उबराणी या ठिकाणी बहलोलखानास गाठले. व त्यावर हल्ला चढविला. यावेळी झालेल्या लढाईत प्रतापरावांनी मोठा पराक्रम गाजवून बहलोलखानच्या सैन्याची मोठी कत्तल केली. त्यामुळे बहलोलखान एकदम घाबरून गेला व त्याने प्रतापरावांकडे आपल्याला जिवंत सोडण्याची विनंती केली.

प्रतापरावाने देखील बहलोलखानाची अति दयनीय परिस्थिती पाहून त्याला माफ

केले व आपल्या उर्वरित सैन्यासह सुखरूप जाऊ दिले. मात्र बहलोलखानासारखा शत्रु ताब्यात आल्यानंतर त्याला संपविण्याऐवजी त्याच्या सैन्यासह जाऊ दिले याचा महाराजांना फार राग आला. त्याबद्दल महाराजांनी प्रतापराव गुजर यांची कानउघडणी देखील केली.

महाराजांचा हा राग योग्यच होता हे थोड्याच काळात सिद्ध झाले. कारण बहलोलखानाने जीवदान मिळताच पुन्हा स्वराज्याच्या प्रदेशाला उपद्रव देण्यास सुरूवात केली.

**३. प्रतापरावांचा आततायीपणा व दु:खद अंत :**

बहलोलखानास प्रतापरावाने दयाबुद्धीने जीवदान दिले होते. मात्र बहलोलखानाने त्याचा गैरफायदा घेऊन पुन्हा स्वराज्यातील प्रदेशावर आक्रमण करण्यास सुरूवात केली. तसेच महाराजांनी प्रतापरावांची कानउघडणी केल्यामुळे प्रतापरावास त्याचे अतिशय दु:ख झाले. काहीही करून बहलोलखानास लवकरात लवकर ठार करून महाराजांचा आपल्यावरील राग दूर करण्याचा निश्चय त्यांनी मनाशी पक्का केला.

त्यानुसार प्रतापराव बहलोलखानाच्या मागावार निघाले. वाटेत त्याने हुगळी या शहरावर आक्रमण करून ते लूटले. इ.स. १६७४च्या फेब्रुवारीमध्ये बहलोलखान आपल्या सैन्यासह गडहिंग्लज जवळील नेसरी खिंडीत असल्याचे त्यास कळाल्यावर प्रतापराव आततायीपणाने आपल्याबरोबरच्या केवळ सहा साथीदारांसह तो बहलोलखानाच्या दिशेने चाल करून गेला. त्यामुळे व्हायचे तेच झाले. बहलोलखानाच्या हजारो सैनिकांनी प्रतापराव गुजर व त्यांच्या सहा साथीदारांस गराडा घालून ठार केले. अशा प्रकारे पराक्रमी प्रतापराव गुजरांचा आपल्या आततायीपणामुळे दु:खद अंत झाला. ही बातमी ऐकून महाराजांना देखील खूप दु:ख झाले.

**४. आनंदराव मकानीचा पराक्रम :**

महाराजांच्या सैन्यातील फक्त सेनापतीच पराक्रमी नव्हते तर त्यांच्या हाताखाली तयार झालेले व इतर दुय्यम दर्जाचे सरदार, सेनापतीही तितकेच पराक्रमी व शूर होते. याची प्रचिती आपणास प्रतापराव गुजरांच्या सैन्यातील सेनाधिकारी आनंदराव मकानी यांच्या पराक्रमावरून येते.

ज्या बहलोलखानाने प्रतापरावास आधी फसविले नंतर ठार केले. त्या बहलोलखानाचा सूड घेण्यासाठी आनंदराव मकानी यांनी बहलोलखानाचा पाठलाग सुरू केला. मात्र त्याचवेळी बहलोलखानास मुघल अमलदार दिलेरखान याची सैन्य मदत मिळाल्याने त्याची सैन्यशक्ति वाढली. त्यामुळे तूर्तास त्याच्यावर हल्ला करून पराजित होण्यापेक्षा आनंदराव मकानीने आपला मार्ग बदलून मार्च १६७४ मध्ये बहलोलखानाच्या जहागिरीत असलेले खामगाव या गावावर हल्ला करून दीड-दोन लाखांचा खजिना मिळविला व बंकापूरजवळ बहलोलखानास गाठून त्याला त्याच्या सैन्यासह पळवून लावले.

**५. प्रतापराव गुजरांच्या पराक्रमाबद्दल महाराजांची कृतज्ञता :**

प्रतापराव गुजरास आपण उगाच दूषण लावले व त्यामुळे त्याने आततायीपणा

करून स्वत:चा अंत ओढवून घेतला. याबद्दल महाराजांना अतिशय वाईट वाटले. तसेच मरणाची पर्वा न करता बहलोलखानाशी दोन हात करून त्यास जिवीताची भीक मागायला लावणाऱ्या त्याच्या शौर्याचा गौरवही वाटत होता.

त्यामुळे महाराजांनी प्रतापरावांच्या स्वामीनिष्ठेचा व पराक्रमाचा गौरव व्हावा. यासाठी प्रतापरावाच्या मुलीचा आपला मुलगा राजाराम याच्याशी विवाह लावून दिला. अशा प्रकारे महाराजांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली यानंतर मात्र महाराजांच्या राज्याभिषेकाची तयारी सुरू झाल्यामुळे लढाईच्या सर्व आघाड्यावर काही शिथिलता आली.

## ३.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न / सरावासाठी स्वाध्याय:

**१. शाहिस्तेखानाच्या स्वारीत सामील असलेली माहिला सेनापती कोण होती?**

१) रज़िया सुलतान २) रायबागन ३) चाँद बीवी ४) मुमताज महल

**२. योग्य पर्याय निवडा.**

१) I, II २) फक्त II ३) फक्त IV ४) II, III

**३. शिवाजी महाराजांनी सुरत शहरावर प्रथम हल्ला केला....**

१) जानेवारी १६६४ २) जून १६६७ ३) जुलै १६६४ ४) फेब्रुवारी १६६०

**४. पुरंदरचा तह कधी झाला?**

१) इ.स. १६१६ २) इ.स. १६२६ ३) इ.स. १६६७ ४) इ.स.१६६५

**५. खालील वाक्यांपैकी कोणते वाक्य बरोबर आहे ते ओळखा.**

I) सह्याद्रीच्या पर्वतरांगा व पश्चिम घाट हे दोन वेगवेगळे भौगोलिक भाग आहेत.

II) डोंगरमाथ्यावरील जमीन शेतीसाठी उपयुक्त होती.

III) दक्खनच्या पठारावरील माती काळी व उपजाऊ आहे.

IV) दक्खन मधील माणसांना काटक व मजबूत बनविण्यात या ठिकाणच्या भौगोलिक स्थितीचा मोठा वाटा आहे.

१. फक्त I २. I, II ३. III, IV ४. I, II, III,IV

## सरावासाठी स्वाध्याय:

१) शाहिस्तेखानाच्या पराजयाचे परिणाम स्पष्ट करा.

................................................................................................

................................................................................................

................................................................................................

२) शिवाजी महाराजांनी सुरतचीच निवड का केली? हे स्पष्ट करा.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

३) 'प्रथम सुरत हल्ल्या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज परकीय व्यापाऱ्यांना घाबरले' हा एक बनाव होता असे आपणांस वाटते का?

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

४) मिर्झा राजे जयसिंहाच्या दक्षिण योजनेचे परिक्षण करा.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

५) पुरंदरचा तह करण्यास छत्रपती शिवाजी महाराजांनी पुढाकार का घेतला? -स्पष्ट करा.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

६) मिर्झाराजे जयसिंह दक्षिण स्वारीत यशस्वी का झाला?

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

७) छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्राभेटीचे निमंत्रण का स्विकारले याची माहिती द्या.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

८) छत्रपती शिवाजी महाराजांनी आग्र्याच्या कैदेतून सूटकेची योजना कशी कायान्वित केली याची माहिती द्या.

.............................................................................................................

.............................................................................................................

.............................................................................................................

९) शिवाजी-मुगल संघर्षाची कारणे स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

१०) वणी-दिंडोरी संघर्षाचे वर्णन करून थोडक्यात परिणाम सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

११) रामजी पांघेराच्या पराक्रमाची माहिती सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

१२) खान्देशातील साल्हेर किल्ल्याच्या हल्ल्याची माहिती द्या.

## ३.४ सारांश

छत्रपती शिवाजी महाराज व मुघल यांच्यामध्ये इ.स. १६५७ पासून संघर्षास सुरूवात झाली होती. तो संघर्ष औरंगजेबाच्या काळात अधिक तीव्र झाला. दक्षिणेत सुभेदार असताना औरंगजेब उत्तरेतील वारसा हक्काच्या लढाईमुळे अचानक उत्तरेकडे गेला व पुढे तेथूनच दक्षिणेत मराठ्यांच्या विरूद्ध युद्ध सुरू केले. व यासाठी आपल्या दरबारातील शाहिस्तेखान, मिर्झाराजा जयसिंह आदि पराक्रमी सरदारांना मोठी सैन्य शक्ति देऊन पाठविले.

मात्र शिवाजी महाराजांनी या सर्व संकटांना यशस्वीपणे तोंड तर दिलेच, मात्र खुद्द औरंगजेबाच्या आग्र्याच्या कैदेतून सुखरूप परत स्वराज्यात येऊन स्वराज्याची पुनर्बांधणी केली. त्याचबरोबर मुगलांना वेळोवेळी मदत करणाऱ्या विजापूरच्या आदिलशहास देखील वेगवेगळ्या आघाड्यांवर पराभूत करून दक्षिणेत मराठ्यांचे शक्तिशाली राज्य स्थापन केले. याचे पूर्णत्व ६जून १६७४ च्या रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाने झाले. एक असामान्य सेनापती व विजेता या नात्याने त्यांनी आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले.

## ३.५ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ

देश - पूर्वपासून पश्चिम घाटापर्यंत पसरलेला दख्खनी पठारी प्रदेश

घाटमाथा - उंचावर असलेली पश्चिमी घाटावरील जमीन

बखर - मचरित्राफ साठी वापरलेला मराठी शब्द

कोंकण - पश्चिम किनाऱ्याचा प्रदेश, पश्चिम घाटाखालील प्रदेश.

किल्लेदार – किल्ल्यावरील प्रमुख अधिकारी

जागीर – मेहनताना म्हणून रोख रकमेऐवजी दिली जाणारी भूमि. ज्या मधून येणाऱ्या कराच्या उत्पन्नाचा उपभोग जागीर प्राप्त करणारा करतो.

होन – छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरू केलेले सोन्याचे नाणे.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके:

**इंग्रजी :**

१. जदुनाथ सरकार : शिवाजी एण्ड हिज टाइम्स

२. जी.एस.सरदेसाई : न्यू हिस्ट्री ऑफ मराठाज् , खंड – ख

**मराठी :**

१. पवार जयसिंगराव : मराठी सत्तेचा उदय

२. आठवले सदाशिव : शिवाजी आणि शिवयुग

३. खाबडे दिनकर : हिंदवी स्वराज्याची शौर्यगाथा

४. बिरादार टी.के : मराठ्यांचा इतिहास (शिवाजी आणि शिवकाळ)

# घटक ४

# शिवाजींचा राज्याभिषेक

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ शिवाजींचा पहिला राज्याभिषेक – कारणे व महत्त्व

४.२.२ शिवाजींचा दुसरा राज्याभिषेक

४.३ स्वयं अध्ययन प्रश्न

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द

४.६ संदर्भ सूची

## ४.० उद्दिष्टे

मराठ्यांच्या किंबहुना भारताच्या इतिहासातील एक अनोखे पर्व म्हणून शिवराज्याभिषेकाचा उल्लेख केला जातो. दक्षिणेच्या इस्लामी राजवटीतील एका सेनापती व जहागीरदाराच्या पुत्राने स्वपराक्रमाने सह्याद्रीच्या कुशीत स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली व विकट आणि विपरीत परिस्थितीत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. केवळ स्थापनाच केली नाही तर राज्याभिषेकाच्या रूपाने त्यास गौरवमयी मुकुट चढवून तत्कालीन राजपदाचे अधिकार चाप्त करून घेतले. अशा या भारतीय इतिहासावर परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या घटनेचा परामर्श आपण प्रस्तुत प्रकरणात घेणार आहोत. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर अध्ययनार्थींना यातून खालील माहिती मिळण्यास मदत होईल.

१. शिवराज्याभिषेकाची पार्श्वभूमी जाणून घेता येईल.

२. शिवराज्याभिषेकाची आवश्यकता व त्याचे महत्त्व यांचे अध्ययन करता येईल.

३. शिवराज्याभिषेक समारंभाची विस्तृतपणे माहिती प्राप्त करून घेता येईल.

४. शिवाजीच्या दुसऱ्या राज्याभिषेकामागील कारणमीमांसा जाणून घेता येईल.

५. शिवराज्याभिषेकामुळे शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वावर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करता येईल.

## ४.१ प्रस्तावना –

मध्ययुगीन इतिहासाच्या कालखंडातील एक महत्त्वाचे पर्व म्हणून शिवराज्याभिषेकाकडे पाहिले जाते. केवळ मराठा इतिहासातच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासात या घटनेला

अनन्य साधारण महत्त्व आहे. इ.स. १२०६ पासून इस्लामी सत्तेची हिंदुस्थानात झालेली पायाभरणी व या सत्तेने त्यांच्या सामर्थ्यांच्या बळावर तत्कालीन राजवटींचा केलेला नाश ही या काळातील राजकीय स्थित्यंतराची वाटचाल होती. असे असले तरी तत्कालीन ज्या ज्या हिंदू सत्ता अस्तित्वात होत्या. त्यांना नेस्तनाबूत करणे हे सुध्दा इस्लामी साम्राज्य विस्ताराचे धोरण होते. त्यामुळेच अल्लाउद्दिन खिलजीच्या रूपाने दक्षिणेतील स्वारीत यादवांचे खच्चीकरण झाले, तर बहामनी राजवटीत विजयनगरसारख्या बलाढय हिंदू साम्राज्याचा विनाश घडवून आणला गेला. यामुळे उत्तरेतील झळ दक्षिणेतही येऊन पोहोचली असल्याचे लक्षात येते. दक्षिणेतील एतद्देशियांना नेस्तनाबूत करून त्यांच्यावर आपली सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही या सारख्या इस्लामी राजवटी आणि साम्राज्य विस्ताराच्या लालसेने दक्षिणेच्या दिशेने पाऊले टाकणारे मुघल अशा परिस्थितीत सह्याद्रीच्या कुशीत मर्द मावळ्यांच्या सहकार्याच्या बळावर हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या व त्याला राज्याभिषेकाच्या रूपाने स्वतंत्र व सार्वभौमत्व राज्याच्या निर्मितीची ललकारी देणाऱ्या शिवाजी महाराजांची कामगिरी ही इतिहासातील एक अविस्मरणीय कामगिरी म्हणून ओळखली जाते.

## ४.२ विषय विवेचन

'राज्याभिषेक' हे महाराजांच्या जीवनातील एक गौरवशाली व वैभवशाली घटना आहे. वर कृष्णाजी अनंत सभासदाने आपल्या दोनच वाक्यात या महान ऐतिहासिक घटनेचे वर्णन केले आहे. या युगात सर्वत्र मुसलमान राजे होते. आम्हा हिंदूना राजे होता आले नाही आणि पुढे होता येणार नाही. अशा न्यूनगंडाने पछाडलेल्या हिंदू समाजात महाराजांनी राज्याभिषेक करून नवचैतन्य निर्माण केले. आणि म्हणूनच सभासदाने मऱ्हाटा पातशही येवडा छत्रपती झाला. ही गोष्ट काही सामान्य नाही. असे म्हटले आहे. महाराजांचा राज्याभिषेक नूतन राजधानी रायगड या किल्ल्यावर झाला. तो सोहळा कसा झाला याचे वर्णन करण्यापूर्वी महाराजांना राज्याभिषेकाची आवश्यकता का भासली याची कारणे पुढीलप्रमाणे.

### ४.२.१ राज्याभिषेकाची कारणे

**१) सार्वभौमत्वासाठी :**

सर्व शासकांनी शिवाजी महाराजांचे हे राज्य सार्वभौम आहे असे मानावे ही इच्छा होती. मराठी राज्याचे सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठी राज्याभिषेक करून घेणे ही त्यावेळेच्या काळाची गरज होती.

**२) वैधानिकता :**

हे स्वराज्य निर्माण झाल्यावर तत्कालीन स्थितीनुसार त्याला कायदेशीरपणा, वैधानिकता येणे आवश्यक होते. याच दृष्टिने शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाचे आयोजन केले.

**३) राजा म्हणून मान्यतेसाठी :**

स्वराज्याचा बहुतांश भाग आदिलशाहीच्या वर्चस्वाखालील प्रदेश असल्याने शिवाजीला

बंडखोर ह्या दृष्टिकोनातून पाहिले जात होते. इतरही राजे शिवाजीला स्वतंत्र राजा मानीत नसत. आग्र्याला मिळालेली अपमानास्पद वागणूक म्हणजे शिवाजी राजा नव्हे तर इतर सरदारांसारखाच आहे असे सुचविले होते. या सर्वांवर उपाय म्हणून राज्याभिषक करवून शिवाजी कायदेशीरपणे राजा बनू इच्छित होते.

### ४) वतनदारांना स्वराज्याच्या कार्यासाठी वळविणे :

स्वराज्यात अनेक वतनदार होते. शिवाजीच्याही आधीपासून त्यांची वतने असल्याने ते शिवाजीला ते आपल्या बरोबरीचा मानीत. राजा अजिबात मानत नसत. ते वतनदार मोगल, विजापूर, गोवळकोंडा शासनाकडे नोकरीला असल्याने ही स्थिती धोक्याची होती. या सर्व वतनदारांना एकाच सार्वभौम सत्तेखाली आणण्यासाठी राज्याभिषक करणे महत्वाचे होते.

### ५) लष्करी अधिकार कायदेशीर असणे :

शिवाजीने स्वराज्य स्थापनेकरिता स्वत:चे सैन्य उभारले होते. तरी 'राजा' म्हणून या सैन्यावर कायदेशीरपणे शिवाजीचा ताबा असणे आवश्यक होते. कायदेशीरपणे राजा बनून सैन्यावर नियंत्रण ठेवता यावे. कायदेशीर अडचणींवर मात करता यावी म्हणून राज्याभिषेक करण्याचे ठरविले.

### ६) शिवाजीचा राज्याभिषेक व्हावा ही मातोश्री जिजाबाईंची इच्छा :

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक म्हणजे काळाची गरज होती. अनेक प्रयत्नांनी, कष्टाने उभारलेले हे राज्य शिवबाने निर्मिले परंतू इतर राजांप्रमाणे आपल्या कर्तृत्ववान मुलाचा राज्याभिषेक घडवून आणावा असे मातोश्री जिजाबाई व सर्वसामान्य जनतेने उराशी स्वप्न बाळगले होते. त्या इच्छापूर्तीसाठी शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक समारंभ रायगडावर घडवून आणला.

### ७) आपली सत्ता स्वतंत्र गणली जावी या उद्देश्यपूर्तीसाठी :

प्रा. दि. ना. कुंभारे म्हणतात 'पोकळ राजेपणा शिवाजी महाराजांना पुरेसा वाटत नव्हता. खरेखुरे स्वतंत्रतेचे व स्वाधिनतेचे अधिराज्य मिळाल्याशिवाय आपली व आपल्या स्वकीयांची हीनदीन स्थिती कायमची घालविता येणार नाही. अशी त्यांची खात्री झाली होती. अधिसत्ता स्थापन केल्यावाचून मांडलीकी, दुबळेपणा नष्ट होऊ शकत नाही. आपला अधिकार सर्वसामान्य व्हावा. आपली सत्ता स्वतंत्र गणली जावी म्हणून राज्याभिषेकाची जरूरी होती.

### ८) प्रशासकीय अडचणी दूर करणेसाठी :

राजपद हे वंशपरंपरेने चालणारे असेल तर राजाचे वचन कायदेशीर मानले जाते. राज्याभिषेकाशिवाय शिवाजी महाराजांच्या शब्दांना किंवा वचनांना महत्व प्राप्त होऊ शकत नसे. कायदेशीररित्या त्याला तहावर सही करता येत नसे. रयतेकडून कर वसूल करणे कायद्याने त्यांचे नियमन करणे, परकीय लोकांशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार करणे, कायदेशीर ठरू शकत नव्हते. म्हणून प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी राज्याभिषक

करणे गरजेचे होते.

### ९) जनतेत राष्ट्रीय भावना व राज्यात एकसुत्रीपणा आणण्यासाठी :

डॉ. बाळकृष्णांच्या मते, राज्याभिषेकामुळे जनतेत दृढ राष्ट्रीय भावना व राज्यात एकसूत्रीपणा येणार होता. हिंदूचे दक्षिणेतील विजयनगरचे राज्य नष्ट झाले होते. शिवाजी राजांचे राज्य विजयनगरच्या राज्याची कामगिरी पार पाडणार होते. हिंदूचा धर्म आणि संस्कृती यांचे संरक्षण करणार होते. यासाठीच शिवाजी राजांनी राज्याभिषेक करवून घेतला.

### १०) राजसिंहासनाला मान्यतेसाठी राज्याभिषेकाची आवश्यकता

काशीचा पंडित गागाभट्ट शिवाजी महाराजांना भेटले. त्यांनी हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे राजसिंहासनाला मान्यतेसाठी राज्याभिषेक समारंभ करून घ्यावा असा आग्रह केला. शिवाजी महाराजांच्या मनातही कधीपासून राज्याभिषेक करवून घेण्याची इच्छा होती. म्हणून शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेतला.

राज्याभिषेक करण्याचा निर्णय झाल्यानंतर अनेक अडचणी आल्या. राजा बनण्याचा अधिकार फक्त क्षत्रियालाच. त्यामुळे क्षत्रिय आहे काय? हा प्रश्न निर्माण झाला. त्याचे उत्तर स्वत: शिवाजीने देऊन चालणार नव्हते. म्हणून यास दूतांकरवी काशीचे धर्मपंडित गागाभट्ट यांना निमंत्रण दिले. गागाभट्टाने धर्मशास्त्राचा व कागदपत्रांचा हवाला देऊन शिवाजी क्षत्रिय असल्याचे घोषीत केले. एवढेच नव्हे तर शिवाजी महाराजांचा संबंध राजस्थानातील उदयपूर येथील शिसोदे घराण्याशी संबंध ठेवून तेथून रामाच्या सुर्यवंशाशी त्यांचा वंशच जोडला. त्यामुळे शिवाजी महाराज उच्चवर्णिय क्षत्रीय ठरले. आता राज्याभिषेकाच्या मार्गात कोणतीही अडचण नव्हती. त्यामुळे मोठ्या उत्साहात गागभट्टांच्या मार्गदर्शनाखाली रायगडावर राज्याभिषकाची तयारी धुमधडाक्यात सुरू झाली. ६ जून, १६७४ (ज्येष्ठ शुध्द १३ शके १५९६)

### ४.२.२ पहिला राज्याभिषेक सोहळा :

राज्याभिषेकापूर्वी शिवाजी महाराजांनी राज्यातील अनेक देवदेवतांचे दर्शन घेतले. रायगडावर अनेक इमाती बांधल्या. त्या सुशोभित करण्यात आल्या. शिवाजीराजांनी आई जिजामाता यांना नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर प्रतापगडावर जावून भवानी देवीचे दर्शन घेतले. आणि देवीला सव्वा मण सोन्याची छत्री अर्पण केली. यानंतर त्यांनी क्षत्रीय पद्धतीनुसार उपनयन संस्कार केला. त्याचदिवशी शिवाजी महाराजांची सुवर्णतुला केली. ३० मे १६७४ रोजी महाराजांचे त्यांच्या राण्यांशी वैदिक पद्धतीने विवाह करण्यात आले. राज्याभिषेकाच्या दिवसांपर्यंत दररोज अनेक प्रकारचे विधी, ब्राम्हणांना दान, भोजने इत्यादी कार्यक्रम अखंड चालू होता.

ज्येष्ठ शुध्द १३ शनिवार, ६ जून १६७४ रोजी रायगडावर महाराजांचा राज्याभिषेक झाला. या राज्याभिषेकास शुक्रवार सायंकाळपासून सुरूवात होऊन तो शनिवार सकाळी संपला. महाराज व राणी सोयराबाई यांचा राज्याभिषेक मंडपात कार्यक्रम सुरू झाला. सर्वप्रथम गणेश पुजन, स्वस्तीक पूजन, मंडप पूजन, विविध कुंभ, तूप, दुध, जल भरून

मंडपाच्या सर्व दिशांना ठेवले. देशातील अनेक पवित्र नद्यांचे जल भरून आणले होते. महावेदीवर अग्निदेवता व ग्रह यांची प्रतिष्ठा केली. वेदमंत्राच्या घोषात होमहवन झाले. नंतर महाराजांनी समंत्र स्नान केले. व पंचामृत केले. विधीपूर्वक महाराज आसनारूढ झाले. अग्नीपूजा केली. नंतर महाराज अभिषेकशाळेत गेले आणि अभिषेकाला सुरूवात झाली.

अभिषेक शालेत ३२ मण सोन्याचे आसन तयार केले होते. त्या आसणावर महाराज बसले. सोयराबाई व संभाजी दुसऱ्या आसणावर बसले. अष्टप्रधान मंडळाचे सभासद आठही दिशांना उभे होते. पुर्वेला मोरापंत पिंगळे तुपाने भरलेला सोन्याचा कलश घेऊन उभे होते. आग्नेय दिशेला अण्णाजी पंत छत्र घेऊन उभे होते. दक्षिणेला हंबीरराव मोहिते दुधाने भरलेला रौप्य कलश घेऊन उभे होते. पश्चिमेला रामचंद्रपंत अमात्य दह्याने भरलेला तांब्याचा कलश घेऊन उभे होते. वायव्येला दत्ताजीपंत मोर्चेल घेऊन उभे होते. या सर्वांच्या साक्षीने मंत्र घोषात पट्टराणी व युवराज यांच्यावर अभिषेक केला. वादयांच्या मोठ्या गजरात सोळा ब्राम्हण सुवासिनींनी महाराजांना सोन्याच्या पंचारत्या केल्या.

महाराजांनी पुन्हा स्नान करून काशाच्या परातीत तुपात आपले मुख पाहिले. दागिने, अलंकार, वस्त्र परिधान करून डोक्यावर मंदिल बांधला. नंतर शस्त्रांस्त्रांची व रथांची पूजा केली. वडीलधारी मंडळीना वंदन केले. व महाराज राजसभेत सिंहासनावर रूढ व्हावयास निघाले. महाराजांचे सिंहासन आकर्षक होते. सिंहासनाच्या आठ दिशांना रत्नजडित स्तंभ होते. महाराजांच्या मस्तकावरील छत्र जडजवाहिरांचे व मोतींच्या झालरीचे होते. हे सिंहासन ३२ मण सोन्याचे होते. सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर अनेक अधिकारदर्शक राजसत्तेची चिन्हे होती. उजव्या हाताला दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शिरे होती. डाव्या हाताला सोन्याच्या तराजूची पारडी न्यायचिन्ह म्हणून चमकत होती. असे राज्यरोहणप्रसंगी इंग्रज वकील हेन्री ऑक्सीडेन हजर होता.

ब्राम्हण पंडित अष्टप्रधान मंडळ व चिटणीस यांच्यासह महाराजांनी सभागृहात शुभवेळी प्रवेश केला. सिंहासनाजवळ येतास त्यास वंदन करून त्याला पद स्पर्श होऊ न देता वेदमंत्राच्या घोषात महाराज सिंहासनारूढ झाले. युवराज संभाजी राजे, गागाभट्ट, मोरोपंत पिंगळे हे सिंहासनाच्या खालच्या पायरीवर आसनस्थ झाले. आणि इतर सर्व आपल्या ठरलेल्या जागेवर उभे होते. मातोश्री जिजाबाईच्या समोर हा सोहळा चालू होता. महाराज सिंहासनावर बसताच वाद्यांचा गजर झाला. दुंदुभी झडल्या. रायगडावर तोफा गडगडल्या. त्याचवेळी इतरही गडावर तोफा कडाडू लागल्या. नंतर महाराजांना १६ कुमारिकांनी सोन्यच्या ताटातून पंचारती केली. गागाभट्टांनी मोत्याचा तुरा लावलेला भरजरी राजमुकूट महाराजांच्या मस्तकावर ठेवला व उच्च सुरात शिवाजी महाराज हे छत्र सिंहासनाधीश्वर व संस्कारयुक्त राजे झाल्याचे घोषीत केले.

या नंतर गागाभट्ट व इतर ब्राम्हणांनी महाराजांना शुभआशीर्वाद दिला. मोरोपंत पिंगळे यांनी महाराजांना मुजरा करून ८००० होन सोन्याची नाणी महाराजांच्या मस्तकावर टाकली. त्यांनतर इंग्रज, डच, पोर्तृगीज यांनी महाराजांना प्रणाम करून नजराणा दिले. यानंतर महाराज अश्वारूढ होऊन गडावरील देवतांचे दर्शन घ्यावयास निघाले. नंतर सुवर्णालंकारांनी सजलेल्या गजराजांवर महाराज आरूढ झाले. त्यांचे माहूत खुद्द सेनापती

हंबीरराव मोहिते होते. वाटेत त्यांच्यावर फुलांची वृष्टी केली. पंचारत्या झाल्या. महाराजांनी गडावरील देवतांचे दर्शन घेतले. नंतर राजसभेत येऊन कुलदैवत, मातोश्री जिजामाता यांना वंदन केले. या नंतर राज्याभिषेक सोहळा संपला.

महाराजांनी या सोहळ्यात अपार दानधर्म केला. विद्वान, पंडित, ब्राम्हण, संत, महंत, साधू इत्यादिंना मुक्तहस्ते दान केले. गागाभट्टास सात हजार होन दक्षिणा दिली. हा दानधर्म १० ते १२ दिवस सतत चालू होता. सभासदांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व खर्च एक कोटी बेचाळीस होन इतका झाला. तर डच रेकॉर्डप्रमाणे दिड लाख होन इतका झाला होता. सर जदुनाथ सरकारांच्या मते १० लाख होन खर्च झाला असावा.

राज्याभिषेकानंतर दहा बारा दिवसांनी मातोश्री जिजामाता स्वर्गवासी झाल्या. (१८ जून १६७४) आपला मुलगा सिंहासनाधिष्टीत झालाचे, शककर्ता झाल्याचे पाहण्याचे भाग्य त्यांना लाभले. यानंतर २४ सप्टेंबर १६७४ रोजी महाराजांना पुन्हा दुसरा राज्याभिषेक करून घ्यावा लागला.

### ४.२.३ शिवाजी महाराजांचा दुसरा राज्याभिषेक :

शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर अवघ्या तीन महिन्यांनी त्यांनी आणखी एक छोटासा राज्याभिषेकाचा समारंभ घडवून आणावा लागला. हा समारंभ रायगडावरच झाला आणि त्यांच्या सोहळ्याचे पुढारीपण निश्चलपुरी नावाच्या तांत्रिक पंथीय गोसाव्याने केले. हा राज्याभिषेक २४ सप्टेंबर १६७४ रोजी फक्त एका दिवसाचा होता. या राज्याभिषेकाची कारणे पुढील प्रमाणे–

#### १) निश्चलपुरीचा वैदिक पद्धतीस विरोध :

निश्चलपुरी हा तंत्रविद्येत पारंगत असल्याने त्यांचा वैदिक पद्धतीच्या कार्यावर विश्वास नव्हता. गागाभट्टाने वैदिक पद्धतीने केलेल्या राज्याभिषेकाच्या वेळी ग्रामदेवता, गृहदेवता, मंडप देवता, स्थानदेवता, स्तंभदेवता अशा अनेक देवतांचे पूजन केले नव्हते. त्यामुळे महाराजांच्या 'ठायी राजशक्ती' व सिंहासनाच्या ठिकाणी 'दैवीशक्ती' प्रतिष्ठीत करण्यालाही तांत्रिक राज्याभिषेकाची गरज होती असे निश्चलपुरीला वाटत होते.

#### २) गागाभट्टाने केलेल्या चुका : निश्चलपुरीचा आरोप :

'शिवराज्याभिषेक कल्पतरू' मध्ये गागाभट्टाच्या अनेक चुका दाखविल्या गेल्या आहेत. गागाभट्टाने 'शिवाजीकडून पर्वतराजास बलिदान देवविले नाही. शिर्काईची पूजा केली नाही. देशस्वामी भार्गवाचे अर्चन करवून घेतले नाही. वेताळ, भूते, हनूमान यांची पूजा केली नाही. द्वारपाल, भूतप्रेतपिशाच्यांना बलीही दिला नाही. असे अनेक आरोप निश्चलपुरीने गागाभट्टावर केले. त्यामुळे भुतप्रेतपिशाच्चांना संतुष्ट करण्यासाठी तांत्रि राज्याभिषेकाची आवश्यकता आहे, असे त्याचे म्हणणे होते.

#### ३) अनिष्ट घटना :

गागाभट्टाने केलेल्या चुकांमुळे मातोश्री जिजाबाईंचा मृत्यू झाला, असे निश्चलपुरीचे म्हणणे होते. महाराजांच्या पत्नी काशीबाई यांचाही मृत्यू झाला. स्वराज्याचा सेनापती प्रतापराव गुजर यांचा मृत्यू झाला. शिवाय अनेक अपशकून झाले. राजगृहाच्या एका

लाकडाचा तुकडा गागाभट्टाच्या नाकावर पडला. संभाजीराजांच्या कंठ्यातून मोती गहाळ झाले. महाराज तलवारीची पुजा करीत असतांना ती मान्यातून खाली पडली. राज्याभिषेकानंतर काही दिवसातच प्रतापगडावरील देवीच्या मंदिरास आग लागली. इ. घटनांचा निश्चलपुरीने याचा संबंध गागाभट्टाने केलेल्या राज्याभिषेक हा योग्य मुहूर्तावर नसल्याचा दावा केला त्यासाठी नविन तांत्रिक राज्याभिषेकाची आवश्यकता आहे, असे त्याचे म्हणणे होते.

### ४) साऱ्यांचे समाधान :

निश्चलपुरीच्या तांत्रिक राज्याभिषेक करण्यामागला हेतू महाराज जाणून होते. महाराज अंधश्रद्धाळू नव्हते. ते मुत्सद्दी होते. कुठल्याही अपशकूनांनी घाबरणारे व्यक्तीमत्व त्यांचे नव्हते. पण गागाभट्टाने केलेल्या वैदिक पद्धतीच्या राज्यभिषेकानंतर जर एखादा लहानसा गट नाराज राहत असेल व त्या नाराजीचे पडसाद सर्वसामान्य जनतेत उमटून जनता जर भयकंपीत होत असेल तर ती नाराजी दूर करण्यास आणखी थोडा खर्च करण्याची महाराजांची तयारी होती. राज्याभिषेक सोहळ्यास कुठलेही गालबोट लागू नये व निश्चलपूरीला भरघोस दक्षिणा देवून त्यालाही संतुष्ट करावे यासाठी हा दुसरा राज्याभिषेक करण्यात आला.

## ४.२.४ राज्याभिषेकाचे महत्व (परिणाम)

शिवराज्याभिषेक ही मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक अपूर्व घटना आहे. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकामुळे नवे युग निर्माण झाले.

### १) हिंदू स्वराज्याची स्थापना :

भारतात मोगलांची सत्ता स्थापन झाली. त्यात कमी अधिक प्रमाणात हिंदूना जागा मिळत असल्या तरी त्या मुस्लिम राज्यकर्त्यांच्या मर्जीवर अवलंबून होत्या. हिंदूना कायम दुय्यम दर्जाची वागणूक मिळत असे. औरंगजेबाच्या काळात जाणीवपूर्वक त्रास दिला जात असे. विजयनगरच्या पतनानंतर संपूर्ण भारतात एकही स्वतंत्र हिंदू राज्य नव्हते की जेथे हिंदू स्वाभिमानाने राहतील. शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करून स्वतंत्र राज्याची स्थापना करून ती कमतरता पूर्ण केली.

### २) कायद्याची मान्यता :

शिवाजी महाराजांनी मोगल, आदिलशहा, कुतुबशहा, इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांना आपल्या पराक्रमाने त्रास देऊन सोडले. पण त्यांचा राज्याभिषेक झालेला नसल्याने त्यांच्या या पराक्रमास हे लोक गुंडगिरी, लुटारू, दरोडेखोर अशी विशेषणे लावीत. सर्वसाधारण प्रजाही वेळप्रसंगी महाराजांचा अधिकार डावलीत असत. राज्याभिषेकामुळे महाराजांच्या राजपदाला कायद्याची मान्यता प्राप्त झाली.

### ३) प्रजेची निष्ठा :

शहाजी राजे आदिलशाहीचे जहागिरदार. शिवाजी महाराजांना शहाजी राजांकडून जहागिरी मिळाली. म्हणजेच शिवाजी महाराजही आदिलशाहीचेच जहागिरदार. आदिलशहा विरूद्धचे महाराजांची प्रत्येक चाल म्हणजे बंडखोरी. जेथे महाराज बंडखोर तेथे त्यांनी स्वत:च्या प्रजेकडून निष्ठेची अपेक्षा करणे चूक होते. प्रजेची निष्ठा मिळण्यासाठी प्रथम स्वत:चे अस्तित्व राजांनी सिद्ध केले. त्यामुळे प्रजेची निष्ठा त्यांना लाभली.

**४) इस्लामी वर्चस्व झुगारले :**

भारतात सर्वत्र इस्लामी वर्चस्व होते. इस्लामी राजवटीमुळे यादवांचे राज्य व विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाले. पण महाराजांच्या काळात मराठ्यांनी इस्लामी लोकांचे हे आव्हान स्विकारले व त्यांच्यावर विजय मिळवण्यात ते यशस्वी झाले. महाराजांचा राज्याभिषेक सोहळा हे इस्लामी वर्चस्व झुगारल्याचेच एक उदाहरण होय.

**५) सार्वभौम राजा म्हणून राजांना मान्यता :**

महाराजांनी इ.स. १६४५ पासून सतत पराक्रमाने बराच प्रदेश व किल्ले ताब्यात घेऊन स्वराज्य विस्ताराचे कार्य केले. पण महाराजांना राजा म्हणण्यास त्यावेळी कोणीही तयार नव्हते. राज्याभिषेकामुळे त्यांना सर्व जनता व हिंदूस्थानातील सत्ताधिशांनी राजा म्हणून मान्यता दिली.

**६) सुराज्य व संस्कृतीचे संवर्धन :**

स्वराज्यात सुराज्याशिवाय अर्थ नसतो. स्वराज्य स्थापनेची शपथ घेऊन महाराजांनी ती पुर्ण केली. राज्याभिषेकासमयी महाराजांनी आपल्या स्वराज्यासाठी हिंदू धर्म व संस्कृतीचे जतन व संवर्धनाचे आश्वासन दिले. त्यामुळे भारतीय संस्कृतीचे पुनरूज्जीवन घडून आले.

**७) हिंदवी स्वराज्याची अस्मिता व स्वाभिमान जागृत झाला :**

पृथ्वी नि:क्षत्रिय झाल्याने कोणीही हिंदू राजा होऊ शकला नाही पण राज्याभिषेक सोहळ्याने या न्यूनगंडातून हिंदू जनतेला बाहेर काढले. यवनांच्या आक्रमणाने नष्ट झालेली हिंदू संस्कृतीचा जीर्णोद्धार महाराजांनी केला. त्यामुळे महाराष्ट्रातून मराठ्यांची अस्मिता जागृत झाली. हिंदूही राजे होऊन ते यशस्वीपणे लढू शकतात असा स्वाभिमान मराठ्यांमध्ये निर्माण झाला व त्याचाच परिणाम म्हणजे महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाशी सतत २५ वर्षे संघर्ष करून मराठी स्वराज्य जिवंत ठेवण्याचा प्रयत्न केला.

**८) राज्यकारभारात नव्या मनूस प्रारंभ :**

राज्याभिषेकापूर्वीचे राज्यकारभारातील दोष काढून टाकून नवीन कायदे करण्यात आले. दरबारी कामकाजातील फारसी भाषेचा प्रभाव दूर केला. नवीन शक सुरू करून रामराज्याची ग्वाही देण्यात आली.

स्वतंत्र राज्याचे चलनही स्वतंत्र असले पाहिजे. म्हणून महाराजांनी आपल्या राज्याची नवी नाणी पाडण्यास सुरूवात केली. शिवाराई व होन ही महाराजांची नवी नाणी प्रचारात आली.

## ४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१) शिवाजी महाराजांनी स्वत: राज्याभिषेक का करवून घेतला?

..............................................................................................................

..............................................................................................................

..............................................................................................................

२) राज्याभिषेक समारंभाचे थोडक्यात वर्णन करा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

३) शिवाजी महाराजाच्या राज्याभिषेकाची कारणे सांगा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

४) शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे महत्व विशद करा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

५) शिवाजी महाराजांना दुसरा राज्याभिषेक का करावा लागला?

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

## ४.४ सारांश

मध्ययुगीन कालखंडातील एक अभूतपूर्व व ऐतिहासिक घटना म्हणून छत्रपती शिवाजींच्या राज्याभिषेकाकडे पाहावे लागेल. इस्लामी सत्तेला आव्हान देऊन एतद्देशियांच्या सत्तेची मुहूर्तमेढ रोवून त्याला राज्याभिषेकाच्या रूपाने डौलदार फडकणाऱ्या ध्वजामध्ये रूपांतर करण्याची किमया शिवाजींनी साधली होती. तत्कालीन काळात हे कार्य किती जिकिरीचे होते हे सखोल अभ्यासाने लक्षात येते. परकीयांवर धाक निर्माण करून आपल्या स्वराज्याला एक नवीन लौकिक प्राप्त करून देण्याचा तो प्रयत्न होता. या शिवाय स्थानिक जनतेवरही कायदेशीर हक्क प्रस्थापित करण्याचा तो एक महत्त्वाचा टप्पा होता या दृष्टीकोनातून आम्हांला त्याकडे पहावे लागते.

देशी ब्राम्हणांच्या वादाला दूर सारून गागाभट्टांसारख्या पुरोगामी पुरोहितांकडून राज्याभिषेक करवून घेणे. तद्नंतरही निश्चलपूरीसारख्या व्यक्तींनी त्यात त्रुटी काढून कुरबूर निर्माण केल्यामुळे त्याला व्यापक स्वरूप मिळू न देता त्याच्या हातूनही तांत्रिक पध्दतीने राज्याभिषेकाचा पुरक सोहळा संपन्न करून शिवाजींनी भविष्यातील वादावर कायमचे पांघरूण घालण्याचा प्रयत्न केलेला होता. असे असले तरी मराठ्यांच्या इतिहासातील एक महत्त्वाचे पर्व म्हणून राज्याभिषेकाला अनन्य साधारण महत्त्व आहे. सह्याद्रीच्या कुशीत स्वराज्याची स्थापना करून त्याला सुराज्याचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी राज्याभिषेकाची

गरज या निमित्ताने त्यांनी पूर्ण केलेली होती आणि भारताच्या इतिहासात मराठयांच्या पर्वाला एक अलौकिक महत्त्व प्राप्त करून दिले होते. असेच आपल्याला म्हणावे लागेल.

## ४.५ पारिभाषिक शब्द

१.जिन्नस - दैनंदिन गरजेच्या वस्तू,

२.तांत्रिक पध्दत- जादूटोणा, बळी देणे, भूतखेतांची शांती करणे अशा प्रकारची विधी. ज्याला वैज्ञानिक आधार नाही.

## ४.६ संदर्भ सूची


१. सहस्त्रबुध्दे पु.ग. - १९९४, महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. सतीशचंद्र - २०१०, मध्यकालीन भारत, ओरियंट ब्लैकस्वॉन, नवी दिल्ली.

३. आचार्य कृ.अ. व आपटे भा.कृ. - १९७८, मध्ययुगीन भारत, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

४. संपादक हरिश्चंद्र वर्मा - २००७, मध्यकालीन भारत, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

५. देशमुख मा.म. - १९९८, मध्ययुगीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर.

६. प्रमुख संपादक, डॉ. जयसिंगराव पवार - २०११, छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

७. संपादक कुळकर्णी अ.रा., खरे ग.ह. - २०१०, मराठ्यांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

८. कुळकर्णी अ.रा. व देशपांडे प्र.न. - १९९९, मराठ्यांचा इतिहास, स्नेहवर्धन पब्लिशिंग, पुणे.

९. प्राचार्य गायकवाड आर.डी. व इतर - १९८७, मराठेकालीन संस्था व विचार, फडके बुकसेलर्स, कोल्हापूर.

१०. प्रा.शेणोलीकर ह.श्री व देशपांडे प्र.न. - २००६, महाराष्ट्राचा सामाजिक- सांस्कृतिक इतिहास, के सागर प्रकाशन, पुणे.

११. आवळसकर शांताराम विष्णू - २००८, रायगडची जीवनकथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

१३. कुळकर्णी गो.रा. - २००२, युगद्रष्टे छत्रपती शिवाजी, श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण.

१३. सुभाष पाटील व इतर - २०११, शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार.

१४. कदम रा.आ. - २००६, छत्रपती श्री.शिवाजी महाराज, राजमयूर प्रकाशन, पुणे.

# घटक ५

## कर्नाटक मोहीम

**अनुक्रमणिका**


५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ विषय विवेचन

५.२.१ कर्नाटक मोहिमेचा उद्देश (कारणे)

५.२.२ कर्नाटक मोहिमेचा प्रारंभ

५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

५.४ सारांश

५.५ पारिभाषिक शब्द

५.६ संदर्भ सूची


## ५.० उद्दिष्टे :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील कर्नाटक मोहीम ही अत्यंत महत्वाची घटना आहे. अत्यंत अल्प कालावधीत शिवाजी महाराजांनी या मोहीमेमध्ये प्रचंड यश व किर्ती संपादन केली. शिवाजी महाराजांनी केलेल्या कामगिरीचा आढावा आपण घेणार आहोत. या कर्नाटक मोहिमेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:

१. कर्नाटक मोहिमेअंतर्गत शिवाजी महाराजांनी कर्नाटकमध्ये मिळविलेल्या विजयांची व त्यांनी

जिंकलेल्या प्रदेशांची माहिती मिळविणे.

२. या घटकाच्या सहाय्याने छत्रपती शहाजी राजांनी दक्षिणेत निर्माण केलेल्या जहागिरीची स्थिती कशी होती याचा आढावा घेणे.

३. व्यंकोजीच्या जहागिरीमध्ये शांतता निर्माण करून घेणे व मराठी राज्याला थैर्य प्राप्त करून देणे.

४. स्वराज्य उभारणीसाठी दक्षिण प्रांतातील समृद्धीचा फायदा घेऊन स्वराज्यासाठी अर्थ प्राप्ती करणे.

५. दोन मुलांसाठी दोन स्वतंत्र राज्य निर्माण करणे व संकटसमयी स्वराज्यासाठी पूर्व किनारपट्टीवर सुरक्षित आश्रयस्थान निर्माण करणे.

६. कर्नाटक मोहीमेमध्ये छत्रपती शिवाजींनी दाखविलेली मुत्सद्देगिरी व त्यांनी केलेला स्वराज्य विस्तार इ.चा अभ्यास करणे.

कर्नाटक मोहिमेची सर्वसाधारणपणे वरीलप्रमाणे उद्दिष्टे होती. या मोहीमेची माहिती शिवाजी महाराजांनी व्यंकोजी व मालोजी घोरपडे यांना लिहिलेली पत्रे, मॉर्टिनची रोजनिशी, पूर्वेकडील इंग्रज, फ्रेंच, डच वसाहतींचा पत्रव्यवहार, सभासद बखर, ९१ कलमी बखर, जेधे शकावली इ. मूळ ऐतिहासिक साधनांमध्ये माहिती उपलब्ध होते.

## ५.१ प्रस्तावना :

६ डिसेंबर १६७६ रोजी शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम काढली. शिवाजी महाराजांच्या कार्यकाळातील शेवटच्या कालखंडात महाराजांनी काढलेली व प्रदीर्घ वेळ चाललेली मोहीम म्हणून इतिहासात या मोहीमेला महत्व प्राप्त झालेले आहे. कृष्णा-तुंगभद्रा नद्यांपासून खाली दक्षिणेत कावेरी नदीपर्यंतचा प्रदेश कन्नड भाषिक प्रदेश म्हणजे कर्नाटक असे स्थूलमानाने म्हणता येईल. इ.स.१७ व्या शतकात या कर्नाटक प्रांतात अनेक संस्थानिक होते. त्यामध्ये बेळगाव, धारवाड, विजापूर, बेल्लारी, बिदर, गुलबर्गा, रायचूर, बंगळूर, चित्रदुर्ग, चिकमंगळूर, कोलार, हसन, मंड्य इ. कन्नड भाषिक संस्थानिक होते. तर तंजावर, जिंजी, मदुराई, येथे तमिळी भाषिक संस्थानिक होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिणेतील कर्नाटक मोहीमेत या संस्थानिकांवर वर्चस्व निर्माण करून दक्षिणेत तंजावरचे एक छोटेसे राज्य निर्माण केले. अत्यंत अल्प काळात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राएवढे साम्राज्य कर्नाटकात मिळविले होते. स्वत: शिवाजी महाराजांनी या मोहीमेत भाग घेतला होता. या मोहिमेची उद्दिष्टे पुढिलप्रमाणे...

## ५.२ विषय विवेचन

### ५.२.१ कर्नाटक मोहिमेचे उद्देश : (कारणे)

#### ५.२.१ .१ कर्नाटकातून संपत्ती प्राप्त करणे:

दि. ६ जून १६७४ ला छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला होता. या राज्याभिषेकामुळे स्वराज्य तिजोरीवर मोठा ताण पडला होता. स्वराज्यासाठी पैसा उभा करणे हा या मोहीमेचा एक उद्देश होता. या अगोदर उत्तरेकडे सुरतेची दोन वेळा मोहीम शिवाजी महाराजांनी केली होती. त्यामुळे संपत्ती प्राप्तीसाठी कर्नाटक मोहीम काढणे गरजेचे होते. स्वराज्यातील जनतेवर जास्त कर लादून राज्याभिषेकासाठी खर्च झालेला पैसा उभा करणे हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्वात बसणारे नव्हते. त्यामुळे स्वराज्याचा कारभार चालविण्यासाठी कर्नाटक प्रांतातून पैसा उभा करण्यासाठी महाराजांनी ही मोहीम काढली.

#### ५.२.१.२ कर्नाटकातील जहागिरीत वारसा हक्क मिळविणे :

शहाजीराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये पुणे व बेंगलोर अशा दोन ठिकाणी जहागिरी निर्माण केली होती. पुण्याच्या जहागिरीमध्ये पुणे, सुपे, चाकण या प्रदेशाचा समावेश होता. याच जहागिरीचे रूपांतर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्या मध्ये केले. कर्नाटकातील जहागिरीमध्ये बेंगलोर, कोलार, चिक्कबाळापूर, कनकगिरी, होस्कोट इ.प्रदेशाचा समावेश होता. या जहागिरीवर शिवाजी महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजी हा कारभार पाहत होता.

कर्नाटकाची जहागिरी ही आपल्या वडिलांची म्हणजेच शहाजी राजांची असल्याने या जहागिरीमध्ये आपल्याला निम्मा हिस्सा मिळाला पाहिजे असे शिवाजी महाराजांना वाटत होते. सदर हिस्सा प्राप्तीसाठी त्यांनी कर्नाटकामध्ये मोहीम काढली.

### ५.२.१.३ व्यंकोजीच्या प्रदेशातील अस्थिरता :

शहाजी राजांच्या निधनानंतर व्यंकोजी हा कर्नाटक प्रांताचा कारभार पाहत होता. इ.स.१६७५ साली व्यंकोजीने आपली राजधानी बेंगलोरहून तंजावर येथे हलविली. त्याचा हा निर्णय चुकीचा ठरला. कारण त्यामुळे म्हैसूरच्या नायकावरील वर्चस्व कमी झाल्याने त्याने उत्तर कर्नाटकात आपली सत्ता वाढविण्यास सुरूवात केली. त्यामुळे व्यंकोजीच्या जहागिरीच्या प्रदेशात जे अस्थैर्य निर्माण झाले होते, ते दूर करून कर्नाटकातील मराठी सत्तेला बळकटी प्राप्त करून देणे हा या मोहिमेचा उद्देश होता.

### ५.२.१.४ विजापूर दरबारातील पठाणी मुस्लिमांचे वर्चस्व कमी करणे :

विजापूर आदिलशाही दरबारात दक्षिणी मुसलमान विरूद्ध पठाणी मुस्लिम असा एक मोठा संघर्ष होता. हे दोन गट सतत एकमेकांना शह-काटशह देत असत. या अंतर्गत संघर्षात खवासखानाच्या मृत्यूनंतर आदिलशाही दरबारात पठाणी मुस्लिमांचा गट प्रभावी बनला. दक्षिणेतील आदिलशाही दक्षिण मुस्लिमांच्या हातात असावी असे शिवाजी महाराजांना वाटत होते. या संदर्भात शिवाजीराजांनी मालोजी घोरपडे यांस लिहिलेले पत्र उपलब्ध आहे. त्यानुसार पठाणांना नेस्तनाबूत करून दक्षिणेची पातशाही आम्हा दक्षिणीयांच्या हाती रहावी अशी इच्छा शिवाजी महाराजांची होती. त्यामुळे दक्षिण्यांचा दक्षिण हा कर्नाटक मोहिमेचा उद्देश होता.

### ५.२.१.५ दक्षिणेत स्वराज्याची निर्मिती :

स्वराज्याचा सर्वात मोठा शत्रू उत्तरेची मोगल सत्ता होती. मोगली सत्तेपुढे मराठी सत्तेचा टिकाव लागणे अशक्य होते. त्यामुळे दक्षिणेतील सर्व संस्थानिक, आदिलशाही, कुतुबशाही या सर्वांना एकत्र करून मोगली सत्तेविरूद्ध प्रबळ आघाडी उभारणे तसेच सर्वांनी एकत्र येऊन भारतातील मोगली सत्तेचे उच्चाटन करणे यासाठी शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम हाती घेतली होती.

डॉ.एस.एन.सेन यांच्या मते, ''शिवाजी महाराजांनी मोगली सत्तेला यशस्वीपणे तोंड देता यावे म्हणून कर्नाटक मध्ये आपली ठाणी निर्माण केली. कर्नाटकातील ठाणी स्वराज्यात समाविष्ट होणार की नाही याचाही विचार छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला नाही.''

### ५.२.१.६ दोन पुत्रांसाठी दोन राज्य :

छत्रपती शिवाजी महाराजांना संभाजी व राजाराम अशी दोन मुले होती. सईबाईंचा पूत्र संभाजी यांचा जन्म १६५७ मध्ये झाला आणि सोयराबाई यांचा पूत्र राजाराम यांचा जन्म १६६० मध्ये झाला. संभाजी महाराजांनी कर्नाटकात राज्य करावे व राजाराम महाराजांनी महाराष्ट्रात राज्य करावे. अशी शिवाजी महाराजांची इच्छा होती. त्यामुळे कर्नाटक जिंकण्यासाठी शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम काढली.

### ५.२.१.७ स्वराज्यासाठी सुरक्षित ठिकाण निर्माण करणे :

मराठा स्वराज्याची सीमा उत्तरेच्या बाजूने मोगली साम्राज्याला भिडली होती. मोगलांचे स्वराज्यच्या प्रदेशावर वारंवार हल्ले चालू होते. तसेच स्वराज्याच्या दक्षिण दिशेला आदिलशाही सत्ता होती. भविष्यकाळात आदिलशाही व मोगल सत्ता एकत्र आल्यास या दोन्ही सत्तांपासून स्वराज्याचा बचाव करण्यासाठी भारताच्या पूर्व किनारपट्टीवर आश्रयासाठी एखादे सुरक्षित स्थळ निर्माण करण्याचा हेतू शिवाजी महाराजांचा होता. छत्रपती संभाजींच्या मृत्यूनंतर जिंजीचा आश्रय घेऊन मराठ्यांनी मोगलांशी जो संघर्ष केला यावरून शिवाजी महाराजांची दूरदृष्टी दिसते.

### ५.२.१.८ विजयनगर साम्राज्याची स्मृती :

कर्नाटकमध्ये १४ व्या शतकात विजयनगरचे हिंदू साम्राज्य प्रभावशाली होते. इतिहास प्रसिद्ध इ.स.१५६५ च्या तालिकोटच्या लढाईने विजयनगरचे हिंदू साम्राज्य नष्ट झाले होते. शिवाजी महाराजांनी व्यंकोजीला लिहीलेल्या पत्रानुसार वेल्लोर जिंकावे व श्रीरंगपट्टनचे सिंहासनही मिळवावे. वेल्लोरचे राज्य हे विजयनगरच्या राज्याचा शेवटचा दुवा होय. वेल्लोरचे मांडलिकत्व स्विकारलेल्या इतरही सत्ता कर्नाटकात होत्या. परंतु व्यंकोजीने वेल्लोर जिंकले नाही व तसा प्रयत्नही केला नाही. त्यामुळे आपण स्वत: कर्नाटकात मोहीम काढून या विजयनगरच्या साम्राज्याचे पुनरूज्जीवन करण्याचा शिवाजी महाराजांचा हेतू होता.

### ५.२.१.९ कर्नाटक प्रांताची समृद्धी:

स्वराज्याच्या तुलनेने कर्नाटक प्रांत श्रीमंत व समृद्ध होता. सकस काळी जमीन, निसर्गाची अनुकूलता, खनिजसंपत्तीची मुबलकता यामुळे कर्नाटकातील लोक श्रीमंत बनले होते. त्यामुळे कर्नाटक प्रांतावर मोहीम काढल्यास भरपूर संपत्ती मिळेल या हेतूने शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम काढली.

### ५.२.१.९ रघुनाथ नारायण हणमंतेंचा सल्ला :

रघुनाथ हणमंते हा व्यंकोजीचा मुख्य कारभारी होता. परंतु त्याचे व व्यंकोजीचे संबंध बिघडले. त्यामुळे तो स्वराज्यात आला. त्याने शिवाजी राजांची भेट घेतली. व त्यांना कर्नाटक मोहिमेचे निमंत्रण दिले. या व्यक्तीच्या माहितीमुळेच शिवाजी राजांनी कर्नाटक मोहीम काढली असा एक मतप्रवाह आहे. शिवाय या मोहिमेत हैद्राबादच्या कुतूबशहाचेही सहकार्य मिळेल असेही हणमंते याने शिवाजी महाराजांना सांगितले. त्यामुळे महाराजांनी कर्नाटक मोहीम काढली.

### ५.२.२ कर्नाटक मोहीमेचा प्रारंभ :

छत्रपती शिवाजी महाराजांनी मोहिमेवर निघण्यापूर्वी स्वराज्याची उत्तम व्यवस्था लावली होती. आपल्या गैरहजेरीत मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांच्या हाती स्वराज्याचा कारभार सोपविला. स्वराज्यातील अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या सोपवून महाराजांनी आपल्यासोबत २५,०००फौज घेतली. कोप्पल जिंकून हंबीरराव मोहितेही शिवाजी महाराजांना

येऊन मिळाले. एकूण ५०,००० फौज जमली होती. ६ डिसेंबर १६७६ रोजी मोहिमेस प्रत्यक्ष सुरुवात झाली. या मोहिमेच्या वेळी सुर्याजी मालुसरे, येसाजी कंक, नेताजी पालकर, मानाजी मोरे, सर्जेराव जेधे, नागोजी जेधे, हंबीरराव मोहिते, बाळाजी आवजी, रघुनाथपंत व जनार्दनपंत हणमंते इ. नामवंत सरदार शिवाजी महाराजांबरोबर होते. वायव्य सरहद्दीवर बंडखोर पठाणांच्या टोळ्यांचा बंदोबस्त करण्यात औरंगजेब गुंतला होता. आदिलशाही अंतर्गत संघर्षाने पोखरून गेलेली होती. बहादूरशहा या मोगल सरदारासही तूर्त शिवाजी महाराजांशी संघर्ष नको होता. बहलोलखान (पठाणी मुस्लीम गट नेता) व खवासखान (दक्षिणी मुस्लीम गट नेता) या दोघांमध्ये वर्चस्वासाठी आदिलशाहीत संघर्ष चालू होता. यामध्ये खवासखान ठार झाला होता. खवासखानाच्या मृत्यूमुळे मोगल सुभेदार बहादूरखान चिडला व त्याने विजापूरवर स्वारी करण्याचे ठरविले.

### ५.२.२.१ कोप्पलच्या हुसेनखान मियानाचा पराभव :

कर्नाटक मोहिमेवर जाण्यासाठी प्रथम हैदराबाद (भागानगर) येथे जाण्याचे निश्चित केले. वाटेत कुतुबशाहीतील रयतेला कसलाही त्रास न देता शिवाजी महाराज हैदराबाद कडे निघाले. या वाटेवर कोप्पल प्रांत होता. हा प्रांत आदिलशहाच्या ताब्यात होता. तेथील रयतेने आपल्यावर होणारा अन्याय व जुलूम शिवाजी महाराजांना सांगितला. त्यामुळे महाराजांनी हंबीरराव मोहितेंच्या नेतृत्वाखाली फौज पाठविली. या प्रांतावरील आदिलशहाचे सरदार हुसेनखान मियाना व अब्दुल रहिमखान मियाना या दोन्ही सरदारांचा हंबीरराव मोहित्यांनी पराभव केला. स्वत: हुसेनखान मियाना मराठ्यांचा कैदी बनला. या लढाईत नागोजी जेधे हा मृत्यू पावला. या युद्धात मराठ्यांना फार मोठी लूट मिळाली.

### ५.२.२.२ कुतूबशहाची भेट :

कोप्पल प्रांत जिंकल्यानंतर हंबीरराव मोहिते शिवाजी महाराजांना येऊन मिळाले. सुमारे ५०,००० फौज बरोबर घेऊन कुतूबशहाला भेटण्यासाठी शिवाजी महाराज निघाले. नांदेड-बोधन-सिकंदराबाद-हैदराबाद असा प्रवास करत गोवळकोंड्याला येऊन पोहोचले. प्रल्हाद निराजी या वकीलाच्या मध्यस्तीने शिवाजी महाराज व कुतूबशहा यांची भेट झाली. कुतूबशहाच्या मनात महाराजांबद्दल भिती होती. परंतु प्रल्हाद निराजी यांनी सुरक्षेची हमी दिल्यावर ही भेट घडून आली. यानंतर महिनाभर शिवाजी महाराज गोवळकोंड्यात मुक्कामास होते. या भेटीवेळी दोघांमध्ये सुरक्षेविषयी पुढील करार झाला.

१. कर्नाटक मोहीमेसाठी मदत करण्याचे कुतूबशहाने मान्य केले.
२. स्वत:चे ५००० सैन्य व तोफखाना मदतीसाठी देण्याचे मान्य केले.
३. कुतूबशहाने दरवर्षी १ लक्ष होन खंडणी देण्याचे मान्य केले.
४. कर्नाटकात महाराजांनी जिंकलेल्या प्रदेशाचा ताबा कुतूबशहाकडे देण्याचे ठरले.
५. मोगलांविरूद्धच्या संघर्षात कुतूबशहाला मदत करण्याचे शिवाजी महाराजांनी मान्य केले.

हा करार कर्नाटक मोहीम पार पाडण्यास उपयुक्त ठरला.

### ५.२.२.३ कर्नुल आणि जिंजीवर हल्ला :

कुतूबशाहीशी करार झाल्यानंतर मराठा सैन्याने कर्नुलवर हल्ला केला. महाराजांनी कर्नुलमधून ५ लाख होनांची खंडणी वसूल केली. तेथून त्यांनी जिंजीवर लक्ष केंद्रित केले. जिंजीचा किल्ला नासिर महम्मद या सुभेदाराकडे होता. आदिलशाहीतील दख्खनी-पठाणी संघर्षात पठाणी मुस्लिमांचे वर्चस्व वाढले होते. अशा परिस्थितीत नासिर महम्मद कुतूबशाही राजकारणात दुर्बल बनला होता. त्यामुळे त्याला महाराजांनी आपल्याकडे वळवून जिंजी सोडण्यास भाग पाडले. त्याला ५०,००० होनांची जहागिर व रोख रक्कम देण्यात आली. त्यामुळे जिंजीसारखा किल्ला मराठ्यांना सहज हस्तगत करता आला. १३ मे १६७७ रोजी जिंजीचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात मिळाला.

### ५.२.२.४ वेल्लोरचा किल्ला जिंकला :

कर्नाटक मोहिमेतील दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे वेल्लोरचा भुईकोट किल्ला होय. हा किल्ला दुर्गम आणि अभेद्य होता. आदिलशाही सैन्याचा तळ या किल्ल्यात होता. या किल्ल्याचे वर्णन कृष्णाजी अनंत सभासद यांनी आपल्या 'सभासद बखर' या पुस्तकात केले आहे. या किल्ल्याभोवती एक प्रचंड खंदक होता. या खंदकात हजारो सुसरी पाण्यात होत्या. तसेच या किल्ल्याला चार परकोट होते. किल्ल्याची तटबंदी विशाल होती. या किल्ल्यावर अब्दुलखान हा आदिलशाही किल्लेदार होता. १३ मे १६७७ रोजी मराठ्यांनी किल्ल्याला वेढा दिला. नरहरीरूद्र यांच्या अधिपत्याखाली वेढा चालू राहिला. दरम्यान शिवाजी महाराजांनी वालीगंडापूरवर हल्ला केला. वेल्लोरचा वेढा १४ महिने चालू होता. शेवटी अब्दुल्लाखान शरण आला. वेल्लोर मराठ्यांनी जिंकले. अब्दुल्लाखानास शिवाजी महाराजांनी अभय देऊन त्यास छोटीशी जहागिर दिली. वेल्लोरचा किल्ला जिंकल्यामुळे कर्नाटक मोहीमेतील महाराजांचे वर्चस्व वाढले.

### ५.२.२.५ तिरूवाडीची लढाई :

कर्नाटक मोहिमेतील तिसरा महत्वाचा टप्पा म्हणजे तिरूवाडीची लढाई होय. आदिलशाही दरबारात पठाणी गटाचे वर्चस्व निर्माण झाले होते. शेरखान हा पठाणी गटाच्या सामर्थ्यावर प्रबळ बनला होता. त्याने त्या परिसरातील छोट्या-मोठ्या नायकांना जेरीस आणले होते. मराठ्यांबरोबर संघर्ष करण्याचीही शेरखानाची इच्छा होती. त्यामुळे शेरखानाच्या बंदोबस्तासाठी शिवाजी राजे शेरखानावर चालून गेले. दोन्ही सैन्याची गाठ २६ जून १६७७ रोजी तिरूवाडीजवळ पडली. यावेळी घनघोर लढाई झाली. या लढाईत शेरखानाचा पूर्ण पराभव होऊन शेरखान पळून गेला. खानाचे घोडे व दारूगोळा मराठ्यांच्या हाती सापडला. ५ जुलै १६७७ रोजी शेरखान मराठ्यांना शरण आला. यावेळी शेरखानाकडून २० हजार होन दंड वसूल करण्यात आला. या लढाईमुळे आदिलशहाचा बराच मोठा प्रदेश मराठ्यांनी हस्तगत केला. दरम्यानच्या काळात कुतूबशहाने कर्नाटकच्या मोहीमेस चालू असलेली मदत थांबविली. परंतु यावेळी कर्नाटक प्रांतातून बरीच संपत्ती मिळाल्यामुळे व मद्रास किनारपट्टीवरील श्रीमंतांकडून खंडणी मिळाल्याने कुतूबशहाच्या मदतीची गरज उरली नाही.

### ५.२.२.६ मदुराईच्या नायकावर वर्चस्व :

१२ ते १३ जुलै १६७७ या काळात शिवाजी महाराजांचा मुक्काम तिरूमळपाडी या ठिकाणी होता. दरम्यान महाराजांना इथेच फ्रेंच वकील येऊन भेटला. यावेळी कावेरी नदीला आलेल्या पुरामुळे मदुराईवरील हल्ल्याचा बेत पुढे ढकलला. महाराजांनी मदुराईच्या नायकाला १ कोटी होन खंडणी देण्याविषयी निरोप पाठविला. नायकाने महाराजांचे पराक्रम पाहून २५ लाख होन खंडणी देऊन शिवाजी महाराजांचे वर्चस्व मान्य केले. त्यामुळे मदुराईवर प्रत्यक्ष हल्ला झाला नाही.

### ५.२.२.७ जिंजी कुतुबशहास देण्यास नकार :

शिवाजी महाराज व कुतूबशहा यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार जिंजीचा प्रांत कुतूबशहाच्या स्वाधीन करणे आवश्यक होते. परंतु जिंजीचा किल्ला राजकीय व लष्करी दृष्टीने भक्कम होता. त्यामुळे हा किल्ला कुतूबशहास देण्यास मराठ्यांनी नकार दिला. त्या बदल्यात कुतूबशहाने कर्नाटक स्वारीसाठी सुरू असलेली ३००० होनांची मदत बंद केली. त्यामुळे कुतूबशहा व मराठे यांच्यातील करार मोडीत निघाला. पुढे जिंजीचा स्वराज्य रक्षणासाठी फार मोठा फायदा झाला.

### ५.२.२.८ कर्नाटक मोहीम व व्यंकोजी भोसल्यांची भूमिका :

व्यंकोजी हे शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू होते. ते शिवाजी महाराजांपेक्षा लहान होते. त्यांचे वास्तव्य आदिलशाहीत शहाजीराजांबरोबरच होते. २३ जानेवारी १६६४ रोजी शहाजी राजांचा मृत्यू झाला. आणि आदिलशाहीतील जहागिर व्यंकोजीस मिळाली. इ.स.१६५५ मध्येच शहाजीचे ज्येष्ठ पुत्र संभाजी ठार झाले होते. त्यामुळे कर्नाटकातील जहागिरीस व्यंकोजी हेच वारस ठरले. व्यंकोजीने तंजावर या ठिकाणी स्वत:ला तंजावरचे राजे म्हणून राज्याभिषेक करवून घेतला व आदिलशहाचे मांडलिकत्व स्विकारले. शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीमेच्या वेळी व्यंकोजीबरोबर बराच पत्रव्यवहार केला. व व्यंकोजीस भेटीस बोलावले. तिरूमळपाडी येथे शिवाजी-व्यंकोजी भेट झाली. शिवाजी महाराजांनी यावेळी व्यंकोजीचा आदर सत्कार केला. शेवटी जहागिरीच्या वाटणीचा विषय निघाला. यावेळी व्यंकोजीने कर्नाटकातील जहागिरीत हिस्सा देण्याऐवजी स्वराज्यामध्येच अर्धा हिस्सा मागितला. शेवटी वाटपावर एकमत झाले नाही. २३ जुलै १६७७ रोजी व्यंकोजी शिवाजी महाराजांच्या छावणीतून पळून गेला. शिवाजी महाराजांनी बोलविणे पाठवूनही तो परत आला नाही.

तंजावरला परत आल्यावर मदुरा व म्हैसूर येथील नायकांची मदत घेऊन शिवाजी महाराजांविरूद्ध बंडाळी करण्याचा प्रयत्न व्यंकोजीने केला. त्यामध्ये त्याला यश आले नाही. कर्नाटक मोहीम आटोपून शिवाजीराजे महाराष्ट्राकडे निघाले. नोव्हेंबर १६७७ मध्ये मराठ्यांनी कोलोरून नदी ओलांडून व्यंकोजीच्या प्रदेशामध्ये प्रवेश केला. मराठ्यांचा सेनापती संताजी भोसलेने पराक्रमाची शर्थ केली. नोव्हेंबर १६७७ च्या या लढाईत सुरुवातीस संताजीचा पराभव झाला. परंतु शेवटी मात्र मराठ्यांना विजय मिळाला. यावेळी व्यंकोजीची १ हजार घोडी मराठ्यांनी पकडली. या लढाईत शेवटी व्यंकोजी व संताजी भोसले यांच्यात

तह होऊन व्यंकोजीने ६ लाख होन खंडणी देण्याचे मान्य केले. व व्यंकोजीचा जिंकलेला प्रदेश त्यास परत देण्याचे ठरले.

परतीच्या प्रवासात त्यांनी एका तामिळी हस्तलिखीतानुसार त्यांनी तिरूवन्नमलाई येथील शिवमंदिराची पुनर्प्रतिष्ठापना केली. उत्तर व दक्षिण अर्काट हा भाग जिंकून घेतला. स्वराज्याकडे परतत असताना म्हैसूर प्रांतातील बंगलोर, कोलार, होस्कोट, बाळापूर, शिरा इ. तसेच धारवाड परगण्यातील बंकापूर, लक्ष्मणेश्वर इ. प्रदेशांवर वर्चस्व निर्माण केले. जून १६७८ मध्ये कर्नाटक मोहीम संपवून शिवाजी महाराज रायगडावर पोहचले.

### ५.२.३ कर्नाटक मोहीमेचे महत्व (परिणाम) :

कर्नाटक मोहीम ६ डिसेंबर १६७६ ला सुरू झाली. आणि एप्रिल १६७८ ला पूर्ण झाली. अशा प्रकारे ही मोहीम १५-१६ महिने चालू होती. या मोहिमेचे महत्व किंवा परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येईल:

#### ५.२.३.१ नवीन राज्याची निर्मीती :

कर्नाटक मोहिमेमुळे शिवाजी महाराजांनी १५-१६ महिन्यांच्या कालावधीत कर्नाटक प्रांतातील अनेक प्रदेश जिंकले. २० लाख होन वार्षिक उत्त्पन्न असलेला प्रदेश महाराजांनी या मोहिमेत जिंकला. तसेच १०० लहान मोठे किल्ले जिंकून घेतले. या प्रदेश प्राप्तीमुळे शिवाजी महाराजांनी कर्नाटक प्रांतात एक नवीन राज्यच निर्माण केले असे म्हणता येईल. महाराष्ट्रातील स्वराज्य निर्मितीसाठी महाराजांना अनेक वर्षे परिश्रम घ्यावे लागले होते. त्या तुलनेत महाराजांनी कर्नाटकात जिंकलेल्या प्रदेशाला महत्व प्राप्त झाले होते.

#### ५.२.३.२ विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचे पुनरूज्जीवन :

शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम काढून कर्नाटकात अनेक प्रांत जिंकून घेतले. व मराठी सत्ता निर्माण केली. यामुळे पूर्वीसारखे विजयनगरचे साम्राज्य निर्माण होऊ शकले नाही. मात्र विजयनगरच्या साम्राज्याच्या स्मृती जागृत झाल्या.

#### ५.२.३.३ कर्नाटक मोहीमेतील यश :

शिवाजी महाराजांना कर्नाटक मोहीमेत प्रचंड यश मिळाले होते. महाराष्ट्रातील स्वराज्य कोकण व सह्याद्रीच्या कुशीत विस्तारलेले होते. स्वराज्य निर्माण करण्यासाठी महाराजांची जीवनातील जवळपास ३०वर्षे खर्च झाली होती. परंतु कर्नाटकात अल्प कालावधीत महाराजांना प्रचंड यश प्राप्त झाले होते. २०लाख होनांचा प्रदेश व १०० किल्ले महाराजांना या मोहीमेत प्राप्त झाले. याशिवाय कर्नाटक मोहीमेमुळे प्रचंड संपत्तीही मिळाली.हा पैसा महाराजांनी स्वराज्यातील लष्करी, मुलकी व्यवस्था, किल्ल्यांची बांधणी, दुरुस्ती, नाविक दल यासाठी वापरला. मोहीमेमुळे शिवाजी महाराजांना प्रचंड यश प्राप्त होऊन त्यांची प्रतिष्ठा वाढली.

#### ५.२.३.४ नवीन लोकांच्या कर्तबगारीला वाव :

शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीमेचे नियोजन व्यवस्थित केले होते. राजकारणातील

व्यवहारनिती, मुत्सद्देगिरी, सैनिक नेतृत्व, हेरपद्धती इ. महाराजांचे गुण स्पष्ट झाले. त्याचबरोबर महाराजांबरोबर असणारे संताजी भोसले, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, हंबीरराव मोहिते, नेताजी पालकर, बाळाजी आवजी, रघुनाथपंत हणमंते इ. अनेक सरदारांच्या कर्तबगारीला वाव मिळाला. संताजी भोसलेने व्यंकोजी विरूद्धच्या संघर्षात महत्वाची भूमिका बजावली होती.

### ५.२.३.५ कर्नाटकात मराठी संस्कृतीचे बीजारोपण :

शिवाजी महाराजांनी या मोहीमेत कोलेरून नदीच्या उत्तरेचा व म्हैसूरच्या पठारावरील शहाजीराजांच्या जहागिरीचा प्रदेश महाराजांनी आपल्या लष्करी शक्तीच्या जोरावर जिंकला. यावेळी व्यंकोजीचे तंजावरचे राज्यही महाराज जिंकून घेऊ शकत होते. एवढेच नव्हे तर व्यंकोजीचा जिंकलेला प्रदेश परत केला. या संदर्भात इतिहासकार किंकडे व पारसनीस यांनी शिवाजी महाराजांच्या दक्षिण दिग्वीजयाची तुलना फ्रेंच सम्राट नेपोलियन बोनापार्ट याने केलेल्या कामगिरी बरोबर केली आहे.

### ५.२.३.६ कर्नाटकात दुसरी आघाडी :

डॉ.जयसिंगराव पवार यांनी आपल्या 'शिवाजी व शिवकाळ'या ग्रंथामध्ये महाराजांनी कर्नाटक मोहीम यशस्वी करून कर्नाटकात दक्षिणेच्या बाजूने विजापूरकरांविरूद्ध नवी आघाडी निर्माण केली असे म्हटले आहे. इतिहासकार श्री.बेंद्रे वा.सी यांनीही या मतास दुजोरा दिला आहे. संभाजी महाराजांच्या वधानंतर मोगली सत्तेचे प्रचंड संकट महाराष्ट्रातील स्वराज्यावर ओढवले होते. यावेळी राजाराम महाराजांना कर्नाटकातील जिंजीचा किल्ला हे उत्तम व सुरक्षित आश्रयस्थान प्राप्त झाले. आणि त्यामुळेच मराठी स्वराज्यास जीवदान मिळून छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या काळात मराठे समर्थपणे मोगली आक्रमणाला तोंड देऊ शकले. ही घटना मराठ्यांच्या इतिहासात 'मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध' म्हणून ओळखली जाते.

अशा प्रकारे कर्नाटक मोहीमेमुळे शिवाजी महाराजांच्या कार्याला महत्व प्राप्त झाले. कर्नाटक मोहीमेतून शिवाजी महाराजांनी अनेक गोष्टी साध्य केल्या. आदिलशाही संघर्षाचा फायदा घेऊन मोगलांशी यशस्वी राजकारण केले. मोगल सरदार बहादुरखानाला तटस्थ ठेवण्यातही ते यशस्वी ठरले. कुतूबशाही सुलतानाबरोबर बरोबरीच्या नात्याने तह केला. स्वतंत्र सार्वभौम राजा या नात्याने त्यांनी हा तह केला. या मोहिमेत महाराजांना संपन्न प्रदेश प्राप्त झाला. व दक्षिणेतील सुपीक व खनीज संपत्तीने समृद्ध प्रदेश स्वराज्यासाठी प्राप्त झाला. त्यामुळे अनेक अर्थाने ही मोहीम महत्वपूर्ण होती.

---

## ५.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न :

१. कर्नाटक मोहिमेचे उद्देश सांगून शिवाजी महाराजांनी ही मोहीम का आखली याची चर्चा करा.

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

२. कर्नाटक मोहिमेची कारणे सांगून या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

३. शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेचे हेतू सांगून या मोहिमेचे महत्व विषद करा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

४. टिपा लिहा:

१) कुतूबशहा व छत्रपती शिवाजी महाराज यांच्यातील सुरक्षा करार

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

२) शिवाजी - व्यंकोजी संबंध

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

३) तिरूवाडीची लढाई.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

## ५.४ सारांश

कर्नाटक मोहीम ही शिवाजी महाराजांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाची व सर्वात मोठी फलदायी मोहीम होय. या मोहिमेत शिवाजी महाराजांच्या पराक्रमाबरोबरच त्यांचे राजकारण, मुत्सद्देगिरी, युद्ध कौशल्य, अध्यात्मवादी दृष्टिकोन इ. अनेक गुण दिसून आले. ६ डिसेंबर १६७६ रोजी शिवाजी महाराजांनी ही मोहीम काढली. या मोहीमेत अनेक उद्देश साध्य करण्यात आले. या मोहीमेमुळे दक्षिणेत कर्नाटक प्रांतात मराठ्यांचे राज्य निर्माण झाले. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजी याने आदिलशहाचे मांडलिकत्व स्विकारले होते. महाराजांनी या मोहीमेत हा प्रदेश जिंकून घेतला. व परत व्यंकोजीस देऊन टाकला. त्यामुळे मराठ्यांचा दक्षिणेत पुन्हा प्रभाव निर्माण झाला. राज्याभिषेकामुळे स्वराज्याची

तिजोरी रिकामी झाली होती. या कर्नाटक मोहिमेत मिळालेल्या संपत्तीमुळे स्वराज्याची अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत झाली.

शिवाजी महाराजांनी दक्षिणेत मिळविलेल्या विजयांमुळे या मोहीमेस दक्षिण दिग्वीजय असे म्हटले जावू लागले. कर्नाटक मोहिमेच्या माध्यमातून विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यातील कर्नाटक प्रांतातील बराच मोठा प्रदेश शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला. विजापूरच्या दरबारात पठाणी मुस्लिमांचे वर्चस्व कमी केले. तसेच मद्रासच्या किनारपट्टीवर एक सुरक्षीत आश्रयस्थान महाराजांनी जिंजीचा किल्ला जिंकून निर्माण केले.

विजयनगरच्या साम्राज्याच्या पतनानंतर साम्राज्याचे अनेक तुकडे पडून प्रांतिक सुभेदार स्वतंत्र झाले होते. (दक्षिणेत अनेक हिंदू नायक आपले अस्तित्व टिकवून होते) त्यांना शिवाजी महाराजांच्या आगमनामुळे बळ प्राप्त झाले. रघुनाथ पंडित हणमंते यांच्या सल्ल्याने शिवाजी महाराजांनी ही मोहीम काढली असे काही इतिहासकारांचे मत आहे. शिवाजी महाराजांनी मोहिमेत कोप्पल, कर्नुल, जिंजी, वेल्लोर हे महत्वाचे प्रदेश जिंकून मुदरेच्या नायकांवर वर्चस्व निर्माण केले. या मोहिमेतून दक्षिणेत एक नविन राज्य निर्माण करण्यात शिवाजी महाराजांना यश मिळाले. तसेच या मोहिमेत शिवाजी महाराजांना दक्षिण प्रांतातील समृद्धीचा फायदा होवून संताजी भोसले, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, हंबीरराव मोहिते, नेताजी पालकर, बाळाजी आवजी, बाबाजी ढमढेरे, दत्ताजी त्रिंबक इ. सरदारांच्या कर्तृत्वाला संधी मिळाली.

थोडक्यात १५-१६ महिन्यांच्या अवधीत कर्नाटक मोहिमेने महाराजांना प्रचंड यश व किर्ती प्राप्त झाली.

## ५.५ पारिभाषिक शब्द

१. सभासद बखर : कृष्णाजी अनंत सभासद याने लिहीलेली बखर

२. जेधे शकावली : दरबारातील मुख्य घटना व तिथी लिहिलेले कागदपत्र जेधे घराण्यातील ही शकावली आहे.

३. बखर : शिवकालीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन लेखकांनी लिहून ठेवलेले ग्रंथ. खबर या अरबी शब्दाचा अपभ्रंश होऊन बखर हा शब्द तयार झाला आहे.

४. वारसा हक्क : वडिलोपार्जित जमीनीवरील किंवा संपत्तीवरील हक्क.

५. होस्कोट : कर्नाटक प्रांतातील प्रदेशाचे नाव

६. पठाण : दक्षिणेतील मुस्लिम सत्ताधिशांच्या दरबारात नोकरीसाठी आलेले अफगाणिस्तानातील मुस्लीम लोक

७. परकोट : किल्ल्याच्या मुख्य भिंतीच्या आतमध्ये सरंक्षणासाठी बांधलेली भिंत

## संदर्भ ग्रंथ सूची


१. भावे वा.कृ.(१९५७) शिवराज्य व शिवकाळ, न.वा.काळे प्रकाशन, पुणे.

२. पुराणिक श.श्री.(१९८२) मराठ्यांचा स्वातंत्र्य समर, काळ प्रकाशन, पुणे.

३. कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपा)(२००६) मराठ्यांचा इतिहास. खंड-ख कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

४. पुरंदरे ब. मो. (१९८३), राजा शिवछत्रपती, पुरंदरे प्रकाशन, पुणे.

५. राजवाडे वि.का. मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड -१५ वि.का.राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे

६. शेजवलकर त्र्यं.शं.(१९६४) श्री.शिवछत्रपती , मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई

७. काळे दि.वी. (१९६१) छत्रपती शिवाजी महाराज, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे.

८. सरदेसाई गो.स. (२०१०) मराठा रियासत खंड - I पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

९. जोशी शं.ना.(संपा)(२००९) शिवकालीन पत्र-सार-संग्रह, खंड- I , पुनर्मुद्रण, भा.इ.सं.म., पुणे

१०. कुलकर्णी अ.गो. (२०११) शिवछत्रपतींची पत्रे, परममित्र प्रकाशन, पुणे.

११. केळकर य.न.(२००८) ऐतिहासिक पोवाडे, मराठ्यांचा काव्यमय इतिहास, डायमंड प्रकाशन, पुणे.

१२. पवार ज.भा.(२००१) शिवाजी व शिवकाळ, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

१३. देशपांडे प्र.न.(२००१) मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

14. Sardesai G.S.(1957) New History Of Marathas, K.B.Dhavale, Mumbai.

15. Sen S.N.(ed)(1976) Foreign Biographics of Shivaji, Book co.Ltd. calcutta.

# घटक ६

# परकीय सत्तांशी संबंध

**अनुक्रमणिका**

६.0 उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ विषय विवेचन

६.२.१ शिवाजी महाराज – सिद्दी संबंध

६.२.२ शिवाजी महाराज – पोर्तुगीज संबंध

६.२.३ शिवाजी महाराज – इंग्रज संबंध

६.२.४ संभाजी राजे – सिद्दी संबंध

६.२.५ संभाजी राजे – पोर्तुगीज संबंध

६.२.६ संभाजी राजे – इंग्रज संबंध

६.३ स्वयं अध्ययन प्रश्न

६.४ सारांश

६.५ पारिभाषिक शब्द – शब्दार्थ

६.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ६.0 उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास शिवाजी महाराज, संभाजी राजे यांच्या सिद्दी पोर्तुगीज, इंग्रज आदी परकीयसत्तांशी असलेल्या संबंधाचे आकलन होईल.

## ६.१ प्रस्तावना

छ. शिवाजी महाराजांनी आरमाराची स्थापना करून मराठी राज्यात एका नव्या पर्वाची सुरुवात केली होती. प्राचीन काळापासून आरमाराची समृद्ध परंपरा असलेल्या महाराष्ट्रात काही काळ ही परंपरा खंडित झाली होती. याचे पुनरूजिवन छ. शिवाजी महाराजांनी केले, हे करीत असतांना स्वराज्याच्या पश्चिमकिनाऱ्यावरील सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्या आरमारी सामर्थ्यावर वचक निर्माण केला. हा वचक पुढे त्यांच्यानंतर संभाजीराजांनी अबाधित ठेवला हे करीत असतांना या परकीय सत्तांशी मराठ्यांचे कधी सामंजस्याचे तर कधि संघर्षाचे प्रसंग आले आपण पाहू.

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१ शिवाजी महाराज – सिद्दी संबंध

#### ६.२.१.१ शिवाजी महाराज व सिद्दी संघर्षाची कारणे :-

छ. शिवाजी महाराजांनी दक्षिणेत मराठ्यांचे स्वराज्य स्थापन केले. मात्र यात कोकणातील स्वराज्याचा भाग असलेल्या प्रदेशाच्या सीमा परकीय शक्तीच्या स्वराज्याच्या सीमांना लागून होत्या. त्यामुळे छ. शिवाजी महाराज व कोकणातील सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज आदी परकीय शक्तिबरोबर मराठ्यांचा संघर्ष होणे अपरिहार्य होते. यातूनच स्वराज्याच्या सीमेला लागून असलेल्या जंजिरा येथील सिद्दीबरोबर महाराजांचा अनेक वेळा संघर्ष झाला. हा संघर्ष होण्यामागे आणखी कोणकोणती महत्त्वाची कारणे होती ती आपण पाहू

**१) सीमा विस्तार :-**

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर स्वराज्य वाढविण्यास सुरूवात केली. यासाठी त्यांनी स्वराज्याच्या सीमेलगत असलेल्या शत्रुच्या प्रदेशावर हल्ला करण्यास सुरूवात केली. कोकणातील स्वराज्याच्या सीमेलगत असलेल्या सिद्दीबरोबर संघर्ष आरंभ केला.

**२) परकीय शक्तींकडून स्वराज्याच्या सीमांचे रक्षण :-**

महाराजांनी आपल्या स्वराज्य विस्ताराच्या धोरणानुसार कोकणातील बरेचसे प्रदेश आपल्या अधिकाराखाली आणले होते. मात्र या प्रदेशाला लागूनच इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज , डच सिद्दी या परकीय शक्तींच्या सिमा भीडत होत्या. यातून आपल्या सीमांचे रक्षण व्हावे म्हणून जंजीऱ्याच्या सिद्दीवर देखिल नियंत्रण मिळविणे आवश्यक होते.

**३) व्यापारावर नियंत्रण :-**

छ. शिवाजी महाराजांना स्वराज्यविस्तारासाठी मोठया धनाची आवश्यकता होती. त्यामुळे तत्कालीन प्रचलित शेतसारा, सीमाशुल्क इ. मार्गांनी संपत्ती मिळविण्याचा प्रयत्न सुरूच होता. मात्र या सर्वांपेक्षा निश्चित व आधिक संपत्ती मिळविण्याचा मार्ग म्हणजे स्वराज्याच्या नैसर्गिक सीमांवरून होणारा म्हणजे समुद्रा मार्गे परकियाद्वारे होणारा व्यापारातून मिळणारा कर आकारणी, व्यापारी भागाची खरेदी विक्री यातून मोठा कर मिळत होता. यामुळे समुद्राद्वारे होणाऱ्या व्यापारावर आपले नियंत्रण असावे असे वाटणे स्वाभाविक होते. मात्र यामध्ये सीमावर्ती भागातील इंग्रज, पोर्तुगीजप्रमाणे सिद्दींचा देखील मोठा अडसर होता व तो अडसर दूर करणे अगत्याचे होते.

**४) सिद्दीस मराठ्यांच्या वाढत्या प्रभावाचा धोका :-**

ज्याप्रमाणे छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या सीमा वाढवून व त्याच्या संरक्षणाचा बंदोबस्त करण्यासाठी सिद्दीस देखील आपल्या सीमावर्ती प्रदेशात मराठ्याच्या वाढत्या

शक्तीमुळे चिंता वाटू लागली. व याला वेळीच पायबंद घातला नाही तर पुढे आपले राज्यदेखील मराठे गिळंकृत करतील. अशी भीती त्याला वाटू लागली व त्यामुळेच त्याने मराठ्यांशी संघर्षाची सिद्धता केली.

वरील करणावरून हे स्पष्ट होते की  मराठे व सिद्‌दी उभयता दोघेही आपआपले राज्य वाढवून ते अधिक सुरक्षित करणे, व्यापारावर नियंत्रण मिळवणे असा समान हेतू असल्यामुळे दोन्ही सत्तामध्ये संघर्ष होणे अपरिहार्य होते व तसा तो झालाही.

**५) सिद्‌दी आदिलशहाचा नोकर होता :-**

छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात मुघल, कुतुबशहा यांच्या प्रमाणेच मोठा शत्रू म्हणजे विजापूरचा आदिलशहा होता. त्यामुळेच महाराजांनी वेळोवेळी आदिलशहाबरोबर संघर्ष केला होता. जंजिऱ्याचा सिद्‌दी हा स्वतःस आदिलशहाचा नोकर समजत, त्यामुळे हा देखिल स्वराज्याचा शत्रूच होता. त्यामुळे देखिल महाराजांचा सिद्‌दीबरोबर संघर्ष घडून आला.

**६) दंड - राजापूरीवर नियंत्रण आवश्यक :-**

जंजिऱ्याच्या परिसरातील दंड राजापूरी ही ठिकाणे सिद्धीस आपल्या ताब्यात ठेवणे अत्यंत गरजेचे होते. कारण याच प्रदेशातून सिद्‌दीस जगण्यासाठी आवश्यक अन्नधान्य, पाणी, सरपण व पैसा याची प्राप्ती होत होती. जर हा प्रदेश शिवाजीच्या ताब्यात गेला तर आपले जगणे मुश्किल होईल. हे सिद्‌दीस माहित होते आणि म्हणूनच त्याने मराठयांबरोबर संघर्षास सुरूवात केली.

**६.२.१.२ शिवाजी महाराज - सिद्‌दी संघर्ष (१६७४ - १६८०)**

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या पश्चिमेकडील कोकणच्या प्रदेशावर अधिकार मिळविण्यासाठी सुरूवातीपासूनच प्रयत्न सुरू केले होते. महाराजांच्या या प्रयत्नातील जंजिरा या सागरी किल्याच्या आश्रयाने समुद्रावर त्यालगतच्या किनारपट्टीवरील सिद्धी हा मोठा अडथळा होता. हा अडथळा दूर करण्यासाठी महाराजांनी जंजिरा किल्ला घेण्याचा भरपूर प्रयत्न केला, व यातूनच मराठे - सिद्‌दी असा संघर्ष घडून आला. हा संघर्ष इ.स. १६५९ रोजी शाहिस्तेखानाच्या प्रकरणावरून सुरू झाला तो शेवटपर्यंत चालला व शेवटी अनिर्णीत राहिला. हा संघर्ष शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकानंतर ( इ.स. १६७४) कसा घडला. या विषयीचा घटनाक्रम पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) दौलतखान - सिद्‌दी संबूळ संघर्ष :-**

छ. शिवाजी महाराजाचा राज्यभिषेक इ.स. १६७४ रोजी रायगडावर तयारी सुरू असतानाच कोकणातील जंजिऱ्याच्या सिद्‌दी याच्या आरमाराचा प्रमुख सरदार सिद्‌दी संबूळ याने मराठ्यांच्या प्रदेशांवर हल्ले करणे सुरू ठेवले होते. सिद्‌दी संबुळाच्या या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी छ. शिवाजी महाराजांनी आपल्या आरमाराचा प्रमुख दौलतखान यास सिद्‌दी संबुळ चा पाडाव करण्यासाठी पाठविले त्यानुसार दौलतखान आपल्याबरोबरील आरमारासह रत्नागिरीच्या किनारपट्टीवरील सिद्‌दी संबुळच्या रोखे जात

असताना त्याचा व सिद्दी संबुळ गाठ पडली. समोरासमोर आलेल्या दौलतखान व संबुळ यांच्या सैन्यात मोठी लढाई आली.

या लढाई दरम्यान दोन्हीकडील सैन्याने एकमेकांवर निकराचा हल्ला केला. उभयता दोन्ही सैन्यांनी पराक्रमाची पराकाष्टा केली. मात्र छ. शिवाजी महाराजांचा आरमार प्रमुख दौलतखान यांच्या सैन्यापुढे सिद्दी संबूळ व त्याच्या सैन्याचा निभाव लागणार नाही असे चित्र निर्माण झाले तेव्हा सिद्दी संबूळने आपला पूर्ण पाडाव होण्याआगोदर माघार घेतली. मराठ्यांना विजय मिळाला या लढाईत जशी वित्तहानी झाली तशीच दोन्ही सैन्यांची जिवितहानीही मोठ्या प्रमाणात झाली. यात सिद्दीच्या सैन्यातील १०० तर मराठ्यांच्या सैन्यातील ४४ सैनिक ठार झाले. मराठ्यांच्या तुलनेत सिद्दीच्या सैन्याची जिवितहानी दुप्पट झाली. शेवटी त्याचा पराभव झाला.

### २) जंजिरा किल्ल्यास वेढा :- इ.स. १६७५

छ. शिवाजी महाराजांनी काहीही करून जंजिरा किल्ला स्वराज्यात आणायचाच असा पक्का निश्चय केला व त्यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणजे १६७४ मध्ये राज्याभिषेक झाल्यानंतर वर्षभरात लगेच दक्षिणेकडील अन्य शत्रूंपासून थोडी उसंत मिळाल्यामुळे महाराजांनी आपले लक्ष पुन्हा सिद्दीकडे वळविले. मोठी तयारी करून जंजिरा किल्यास वेढा दिला. जंजिरा हा समुद्रात असल्यामुळे किनाऱ्यावरून त्यावर मारा करणे शक्य नव्हते व किल्ल्याच्या कोटाला भगदाड पाडण्यासाठी तोफांच्या गोळयाचा प्रभावी मारा करणे गरजेचे होते. यासाठी महाराजांनी किल्ल्याच्या दिशेने पाण्यातच तराफे उभे करून त्यावरील तोफांमधून किल्यावर दारू गोळयाचा प्रचंड मारा करण्यास सुरूवात केली. याला प्रतिकार म्हणून किल्यावरूनही तोफांचा मारा सुरू झाला. पण छ. शिवाजी महाराजांच्या तोफाचा मारा इतका जबर होता कि किल्यावरून होणाऱ्या प्रतिकाराचा त्यावर काहीही परिणाम होत नव्हता. त्यामुळे सिद्दीस हे कळून चुकले की बाहेरून मदत मिळविल्याशिवाय आपला निभाव लागणार नाही. यासाठी त्याने सिद्दी संबूळास मदत मिळविण्यासाठी पाठविले सिद्दीच्या प्रयत्नांना यश येऊन त्याला बाहेरून मदत मिळाली. त्यामुळे सिद्दीची ताकद एकदम वाढली. ते मराठयांच्या हल्लाचा जोरदार प्रतिकार करू लागले. सप्टेंबर ते डिसेंबर इतक्या दीर्घ काळापर्यंत जंजिरा किल्यावर तोफाचा मारा चालू होता. त्यामुळे मराठ्यांचा दारूगोळा कमी झाला होता. त्यामुळे जंजिऱ्यावरील हल्लादेखील शिथिल झाला. मराठ्यांचा नाइलाज होऊन शेवटी जंजिरा किल्ला हस्तगत न करताच वेढा उठवावा लागला.

जंजिराचा वेढा अर्धवट सोडावा लागला तरीही महाराज निराश न होता पून्हा जोमाने वेढयाच्या तयारीस लागले. तयारी पूर्ण होताच १६७६ मध्ये एकाच वर्षाने पुन्हा जंजिरा किल्ल्यास वेढा घातला. यावेळी मात्र मागच्याप्रमाणे सैन्याची व दारूगोळयाची कमतरता होऊ नये. यासाठी वेढा घातलेल्या सैन्या व्यतिरिक्त मोरोपंत पेशव्यांबरोबर दहा हजार फौज जंजिऱ्यास पाठविली. यावरून महाराजांची जंजिरा किल्ला घेण्याची तळमळ प्रतित होती. दौलतखान व मोरोपंत यांच्या फौजेने पुन्हा एकदा जंजिरा किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला.

यावेळी देखील तितक्याच निकराचा प्रतिकार शत्रूकडून होऊ लागला. पण मराठ्यांच्या माऱ्यात फरक न पडल्यामुळे जंजिराच्या सिद्दीने आपला सरदार सिद्दी कासिम याच्या वतीने पून्हा बाहेरून मदत मिळविली. व प्रतिकार सुरू केला त्यामुळे मराठ्यांच्या सैन्याचे नुकसान होऊ लागले त्यात कोकण हा अतिपावसाचा प्रदेश असल्यामुळे एका बाजूला पावसाचा वाढता जोर व दूसरीकडे वाढलेली शत्रूची शक्ती यामुळे पुन्हा एकदा जंजिरा न घेताच वेढा उठवावा लागला. मराठ्यांनी वेढा उठविला तो केवळ शत्रूसैन्याची शक्ती वाढली म्हणून नव्हे तर पावसाचा जोर वाढल्यामुळे समुद्राची पातळी वाढत होती. तसेच वादळामुळे समुद्रातील तराफ्यावरून तोफांच्या माऱ्यामध्ये अडथळा येत होता यासाठी वेढा उठविणे हाच योग्य निर्णय होता व तो महाराजांनी घेतला हा महाराजांचा युद्ध कौशल्याचाच एक भाग होता.

वेढा उठविण्याचे आणखी एक कारण म्हणजे याच वेळी छ. शिवाजी महाराज हे कर्नाटकच्या स्वारीत गुंतले होते. तिकडे लक्ष देता येत नव्हते म्हणून जंजिराभोवतीचा वेढा उठविला.

### ३) सिद्दी संबूळ मराठ्यांच्या सेवेत दाखल :– ( इ.स. १६७७)

मराठ्यांच्या व सिद्दीच्या संघर्षात इ.स. १६७७ मध्ये एक महत्त्वाची घटना घडली आणि ती म्हणजे सिद्दीच्या प्रमुख सेनापतीमधील सिद्दी संबुळ हा जंजिराच्या सिद्दीस सोडून मराठ्यांच्या सेवेत दाखल झाला.

मराठा – सिद्दी संघर्षात सिद्दी सुंबळने मोठी कामगिरी बजावली होती. त्याच्या अंगच्या पराक्रमामुळे सिद्दीच्या सैन्यात त्याचे महत्त्व वाढत चालले होते. जे त्याच्याबरोबरील सिद्दी कासिम व इतर सहकाऱ्यांना रूचत नव्हते. त्यातच जंजिऱ्याच्या केंद्रित सत्तेमध्ये देखील बदल झाले. याचा फायदा सिद्दी कासिमने घेऊन मुगलांच्या मदतीने सिद्दी संबुळला पदच्युत करण्याचा प्रयत्न सुरू केला व सिद्दीने सिद्दी संबुळास त्याच्या आरमाराच्या पदावरून दूर केले व त्याजागी सिद्दी कासिम याची नियुक्ती करून त्यास दंडराजापूरीचा प्रमुख प्रशासक बनविले. यामुळे सिद्दी संबुळास मोठा अपमान वाटला व त्याने आपला आरमाराचा ताबा सिद्दी कासिमला देण्यास नकार दिला आणि त्यामुळे सिद्दी कासिम व सिद्दी संबुळ यांच्यात संघर्ष होऊन संबुळास माघार घ्यावी लागली. दुखावलेल्या सिद्दी संबुळाचा उपयोग जंजिराच्या सिद्दीच्या विरूद्ध करण्यासाठी महाराजांनी त्यांना आपल्या सेवेत घेतले. तसेच संबुळ हा सिद्दीचा आरमार प्रमुख असल्यामुळे आरमाराचा शक्तीस्थळे व मर्यादा माहित होत्या त्याच्याकडील या माहिताचा उपयोग करून जंजिराच्या सिद्दीस नाहीसा करावा. अशी उपाययोजना महाराजांनी आखली व त्याला आपल्या सेवेत घेतले. यावरून महाराजांचे युद्ध कौशल्य दिसून येते.

### ६.२.१.३ शिवाजी महाराजांची मुंबई बेटावर हल्ला करण्याची योजना (इ.स. १६७८)

सिद्दी संबुळ मराठ्यांच्या सेवेत आल्यामुळे जंजिराच्या सिद्दीची शक्ति कमकुवत झाली. तसेच मराठ्यांच्या सेवेत आल्यामुळे जंजिराच्या सिद्दीची शक्ती कमकुवत झाली. तसेच मराठ्यांनी सिद्दी संबूळ याला आपल्या सेवेत घेतल्याने सिद्दी कासिम याला मराठ्यांचा राग आला होता म्हणून त्याने आपल्या आरमाराबरोबर मराठ्यांच्या प्रदेशावर

हल्ले सुरू केले. मोठ्या प्रमाणात जिवित व वित्त हानी केली.

सिद्दी कासिमच्या उपद्रवास आळा घालण्यासाठी व त्याचा बंदोबस्त करण्यासाठी महाराजांनी आपल्या आरामाराचे प्रमुख दयासारंग व दौलतखान यास सैन्य घेऊन पाठविले यावेळी मराठ्यांच्या हल्ल्यांच्या भीतीने सिद्दी कासिम हा आधिच इंग्रजाच्या अधिकाराखालील मुंबई या बंदरावर आश्रय घेऊन बसला होता. व तेथूनच तो मराठ्यांच्या प्रदेशात उपद्रव करत होता. त्यामुळे महाराजांनी थेट मुंबई बंदरावरच हल्ला करण्याची योजना आखली. व दर्यासारंग आणि दौलतखान यांना मुंबईकडे सैन्य घेऊन रवाना केले. हे उभयता सरदार आपल्या सैन्यासह सिद्दीकडे जात असतानाच खराब हवामान व पावसामुळे या मार्गाने मुंबई पर्यंत पोहचणे अवघड बनले यासाठी त्यांनी पोर्तूगीजांना त्याच्या प्रदेशातून जाण्यास वाट मागितली. पण पोर्तुगीजांनी त्याला नकार दिला. कारण इंग्रज काय किंवा पोर्तुगीज काय? दोन्हीं सत्तांना मराठ्यांचे समुद्रावरील वर्चस्व नकोसे होते अणि प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सिद्दीस मदत करीत होते.

पोर्तूगीजाच्या नकारामुळे दौलतखानाने आपला मोर्चा थेट जंजिऱ्यावर वळविला व जंजिऱ्यास वेढा घालून दारू गोळयाचा प्रचंड मारा किल्यावर सुरू केला. मात्र भौगोलिक दृष्ट्या मजबूत असलेला जंजिरा किल्ला मात्र मराठयांच्या ताब्यात येऊ शकला नाही.

### ६.२.१.४ उंदेरीवर हल्ला ( इ.स. १६८०) :-

मराठे - सिद्दी यांचे एकमेकांच्या प्रदेशावर हल्ले करून आपल्या अधिकार क्षेत्रात वाढ करण्याचा प्रयत्न सतत चालू होता यात कधी मराठ्यांना यश येत तर कधी सिद्दीस. याच क्रमाने इ.स. १६८० मध्ये सिद्दीने उंदेरी बेटावर ताबा मिळवून त्यावरून खांदेशी बेटावर हल्ला करण्यास सुरूवात केली. याचा प्रतिकार करण्यासाठी मराठ्यांचा आरमारप्रमुख दौलतखान याने २६ जानेवारी १६८० रोजी मोठ्या फौजेनिशी उंदेरी बेटावर हल्ला चढवला व प्रतिकार सुरू केला यात दौलतखानास म्हणावे तसे यश आले नसले तरी सिद्दीवर वचक निर्माण झाला.

## ६.२.२ शिवाजी महाराज - पोर्तुगीज संबंध :-

पंधराव्या सोळाव्या शतकात अनेक परकीय व्यापार करण्याच्या उद्देशाने भारतात आले. यामध्ये पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच या शक्ती प्रमुख होत्या. इ.स. १४९८ मध्ये पोर्तुगीज व्यापारी वास्को-द-गामा याच्या रुपाने पोर्तुगीजाचे भारतात आगमन झाले. हे तत्कालीन भारतात येणारे प्रथम व्यापारी होते. पोर्तुगीजांनी व्यापार करण्याच्या हेतूने प्रथम भारतात पाऊल ठेवले होते. मात्र येथील अस्थिर राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन प्रथमतः गोव्यांमध्ये आपल्या सत्तेचा पाया घातला व हळूहळू आपल्या सत्तेचा विस्तार करण्यास सुरूवात केली. याचवेळी छ. शिवाजी महाराजाचे स्वराज्य स्थापनेचे व दृढ करण्याचे कार्य जोमाने सुरू होते. एकीकडे पोर्तुगीज गोव्याच्या आसपासचा प्रदेश म्हणजे साण्टी, दीव-दमण, बारदेश आदि प्रदेशांवर अधिकार करण्याचा प्रयत्न करत होते. हे प्रदेश स्वराज्याच्या सीमेवरील असल्यामुळे शिवाजी पोर्तुगीज संघर्ष होणे अटळ होते व तो संघर्ष झाला. याची कारणे पुढीलप्रमाणे.

### ६.२.२.१ पोर्तुगीज संघर्षाची कारणे :-

**१) आरमाराची स्थापना -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या संरक्षणासाठी व वाढीसाठी आरमाराचे महत्त्व ओळखले होते. तसेच स्वराज्याची पश्चिम सीमा कोकण किनारपट्टी असल्यामुळे या ठिकाणावरून होणारा विदेशांशी व्यापार व त्याद्वारे स्वराज्याला मिळणारा कायमस्वरूपाचा आर्थिक लाभ यासाठी सक्षम आरमाराची आवश्यकता होती. ही गरज ओळखूनच महाराजांनी आरमाराच्या सक्षमिकरणास सुरूवात केली. मात्र पश्चिम किनारपट्टीच्या भागात आपली सत्ता स्थापलेल्या पोर्तुगीजांना शिवाजी महाराजांची ही कृती धोक्याची वाटली. व यातूनच शिवाजी- पोर्तुगीज संघर्षास सुरूवात झाली.

**२) पोर्तुगीजांचे समुद्रावर वाढते वर्चस्व -**

तत्कालीन काळात समुद्राद्वारे व्यापार करणारे पोर्तुगीज हे प्रमुख व्यापारी होते. त्यामुळे त्याच्याकडे माल वाहून नेणारी व मालाची संरक्षण करणारी मोठ मोठी लढाऊ जहाजे होती. तत्कालीन काळात भारतातील कुठल्याच स्थानिक सत्तेकडे पोर्तुगीजाच्या तोडीची सामग्रीक शक्ती नव्हती. ही उभारण्यास छ. शिवाजी महाराजांनी सुरूवात केली होती. तसेच पोर्तुगीज जहाजे समुद्रामध्ये इतरांची जहाजे आल्यास त्यांच्याकडून शुल्क वसूल करीत, तसेच परवाने न घेतल्यास जहाजांची लूट करत, हा उपद्रव मराठ्यांच्या जहाजांना देखील होत असे. त्यामुळे देखिल शिवाजी पोर्तुगीज संघर्षास सुरूवात झाली.

**३) पोर्तुगीजांचा स्वराज्याच्या विरोधकास आश्रय -**

शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेपासूनच परकीयांप्रमाणेच स्वकीयांबरोबर देखिल संघर्ष करावा लागला. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या पश्चिम सीमेवरील बारदेश प्रांतावर हल्ला करून तो प्रदेश स्वराज्याच्या अधिकाराखाली आणला. त्यामुळे त्या ठिकाणचा सत्ताधिश देसाई हा पोर्तुगीजाच्या आश्रयाला गेला. व स्वराज्याविरूद्ध च्या कारवाईत मदत मागितली. पोर्तुगीजांनी देखिल तत्काळ दिली. यामुळे देसाईने आणखी धीर धरून स्वराज्यावर हल्ले करण्यास सुरूवात केली. यामुळे आपल्या शत्रूस मदत करणाऱ्या पोर्तुगीजास वेळीच धडा शिकवण्यासाठी शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांबरोबर संघर्ष सुरू केला.

**४) कायम स्वरूपी आर्थिक मदत मिळविणे-**

छ. शिवाजी महाराजांना स्वराज्याच्या पश्चिमकिनाऱ्यावरील कोकणच्या समुद्रकिनारावरून विदेशी व्यापाऱ्यांकडून मोठया प्रमाणात कायमस्वरुपी आर्थिक मदत मिळवायची होती. यासाठी तो प्रदेश स्वराज्याच्या अधिकाराखाली आणणे गरजेचे होते व ते प्रेमाने सांगून ऐकणारे नव्हते. त्यामुळे त्याच्याशी संघर्ष हा एकच पर्याय होता.

**५) पोर्तुगीजांची सिद्दीस मदत -**

स्वराज्यांच्या सीमा असलेल्या पश्चिमकिनाऱ्यावरील जंजिराच्या सिद्दी हा मराठ्यांचा मोठा शत्रू होता. तो समुद्रातील जंजिरा या किल्यावर राहून आसपासच्या प्रदेशावर सत्ता गाजवित असे. तसेच स्वराज्य प्रदेशात लूटपाट करी. त्याच्याकडे समुद्रात लढणारी चांगल्या

प्रतीची जहाजे होती. त्याच्याच जोरावर तो मराठ्यांच्या प्रदेशात धुमाकुळ घालत होता. त्याच्या कारवायांना आळा घालण्यासाठी मराठ्यांनी त्याच्याशी संघर्ष सुरू केला. तेव्हा पोर्तुगीज हे कधी उघड तर कधी अप्रत्यक्षरित्या सिद्दीस मदत करीत. त्यामुळे त्याच्या कारवायावर नियंत्रण ठेवता येत नव्हते आणि म्हणून या पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठी छ. शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांशी संघर्ष केला.

### ६.२.२.२ पोर्तुगीजाबरोबर संघर्ष :-

### १) बारदेश प्रांतावर हल्ला – (इ.स. १६६७)

स्वराज्याच्या सीमेलगतचा महत्त्वाचा प्रांत म्हणजे बारदेश, गोव्यातील पोर्तुगीज व्हॉईसरॉयने धर्मगुरू येथील स्थानिक जनतेला त्रास देण्यास सुरूवात केली व त्याच्या या कार्यात त्याला तेथील स्थानिक अधिकारी ही मदत करीत होते. त्यात बारदेशच्या देसाईचा समावेश होता. त्यामुळे या सर्वाचा बंदोबस्त करण्यासाठी शिवाजी महाराजांनी बारदेशवर हल्ला करून तेथे सतत तीन दिवस संघर्ष केला. त्यावेळी महाराजांना खूप संपत्ती प्राप्त झाली. तसेच विरोध करणाऱ्या देसाईच्या काही सैनिकास कैद केले. मात्र मुख्य अधिकारी देसाई हा आपला जीव वाचवून पोर्तुगीजाच्या आश्रयास गेला व पोर्तुगीजांनी त्याला मदत केली. याचा राग शिवाजी महाराज्यांच्या मनात होता आणि म्हणूनच पोर्तुगीजांना कायमची अद्दल घडविण्यासाठी शिवाजी महाराजांनी हा हल्ला करून त्यांना माघार घेण्यास भाग पाडले.

महाराजांच्या या हल्ल्यामुळे पोर्तुगीजांना आपली चूक कळून आली व त्यांनी छ. शिवाजी महाराजांशी मैत्रीचा करार करण्यास पुढाकार घेतला. व हा करार पुढील प्रमाणे.

मराठे पोर्तुगीज करार (५ डिसेंबर १६६७)

**छ. शिवाजी महाराज –** पोर्तुगीज यांच्यात बारदेशात झालेल्या संघर्षातून पोर्तुगीजानी माघार घेऊन घडवून आणलेल्या करारातील अटी पुढीलप्रमाणे -:

१) मराठ्यांच्या प्रदेशात लूटपाट करणाऱ्यांना पोर्तुगीजांनी आश्रय देऊ नये.

२) बारदेशातील युद्धावेळी कैद केलेल्या सैनिकांची मराठ्यांनी मुक्तता करावी.

३) उभयता दोन्ही पक्ष एकमेकास वेळोवेळी सहकार्य करतील व करारातील सर्व अटीचे पालन करतील.

४) पोर्तुगीजांच्या प्रदेशात येणारा माल, जनावरे इ. मराठ्यांनी सुरक्षित जाऊ दयावीत.

### ६.२.२.३ मराठे पोर्तुगीज दुसरा करार ( इ.स. १६७०)

छ. शिवाजी महाराजांनी गोव्याजवळच्या बारदेशावर हल्ला करून एक प्रकारे पोर्तुगीजांना अद्दल घडविली होती व त्यातूनच त्यांनी करार घडवून आणला. मात्र म्हटल्याप्रमाणे वरील करार हा दोन्ही पक्षांकडून वेळमारून नेल्यासाठी केलेला करार होता. शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांचे मुख्य ठिकाण असलेल्या गोव्यावर हल्ला करून तो प्रदेश स्वराज्याचा भाग बनवून पोर्तुगीजांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी हल्ला करण्याची योजना आखली होती. कदाचित या योजनेची माहिति पोर्तुगीजास लागली असावी व त्यामुळेच त्यांना इ.स. १६७० मध्ये मराठ्यांबरोबर दूसरा करार केला.

**करारातील अटी :-**

मराठा व पोर्तुगीज यांच्या मध्ये झालेल्या दुसऱ्या कराराच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१) मराठी जहाजांना समुद्रामध्ये विना परवानगी संचार करण्याची मुभा.

२) पोर्तुगीज व मराठे यांनी एकमेकांची पकडलेली जहाजे परत करावीत.

३) मराठे-सिद्दी संघर्षात गोव्याच्या व्हॉईसरॉयने शांतता प्रस्थापनेसाठी मध्यस्थिस मान्यता.

४) गोवा ते देशातील घाटमाथा या दरम्यानच्या प्रदेशातील पोर्तुगीज व्यापाऱ्यास मराठयांनी संरक्षण दयावे.

**३) रामनगरचा विजय :-**

छ. शिवाजी महाराज कोकण किनारपट्टीवरील सर्व प्रदेश आपल्या अधिकाराखाली आणून स्वराज्याचे कायमस्वरूपीचे उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचाच एक भाग म्हणून या किनारपट्टीवरील दमणच्या प्रदेशातील रामनगरच्या प्रदेशावर शिवाजी महाराजांनी हल्ले करून त्या प्रदेशातील कोळी राजास आपल्या अधिकाराखाली आणले. त्यामुळे तेथील जनतेने छ. शिवाजी महाराजांचे अधिकारत्त्व मान्य करून स्वराज्यास चौथाई देण्याचे मान्य केले. मात्र याच वेळी पोर्तुगीज या कोळी राजास गुप्तपणे मदत करून त्याला उठाव करण्यासाठी चिथावणी देत होते.

## ६.२.३ शिवाजी महाराज- इंग्रज संबंध.

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या पश्चिम सीमेवर म्हणजेच कोकणात राज्य विस्तारास सुरूवात केली. त्यावेळेपासून इंग्रजांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या संबंध येत होता. या संबंधात शिवाजी महाराज व इंग्रज हे दोघेही एकमेकांच्या शक्तिस्थानाला ओळखून होते आणि म्हणून उभयतामध्ये आत्तापर्यंत अतिटोकांचे संघर्ष निर्माण झाले नव्हते. इ.स. १६७४ मध्ये छ. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकावेळी इंग्रजांनी जो करार केला होता. त्यातून ही उभयतांचे संबंधामध्ये काही प्रमाणात संघर्षाची पार्श्वभूमी तयार झाली. यावेळी महाराजांनी इंग्रजांकडे दारूगोळा व तोफांची मागणी केली. मात्र इंग्रजांनी ही मागणी पूर्ण केली नाही. इंग्रजांच्या या वर्तनाने महाराजांनी त्याच्याबरोबर जशास तसे वागण्याच्या नीतीचा अवलंब सुरू केला. यातूनच महाराजांनी इंग्रजांची धरणगाव, राजापूर व दुबळी येथील वखारीवर हळू करून इंग्रजांवर वचक बसविला..

### ६.२.३.१ धरणगाव हल्ला (इ.स. १६७५):-

छ. शिवाजीराजांनी १ जानेवारी १६७४ मध्ये खान्देशातील धरणगाव येथे हल्ला केला. या हल्ल्याच्या वेळी तेथील इंग्रजांच्या वखारीतील माल महाराजांच्या सैनिकांनी लुटून आणला. त्यामुळे इंग्रज चिडले मात्र त्यांना महाराजांविरूद्ध थेट कारवाई करण्याची हिंमत झाली नाही. म्हणून त्यांनी महाराजांकडे धरणागावच्या लुटीच्या नुकसान भरपाईची मागणी करण्यासाठी इंग्रज वखारीचा प्रमुख सैम्युयल ऑस्टिन यास आपला वकील म्हणून

पाठविले मात्र या वकिलास महाराजांनी दाद दिली नाही.

**राजापूर वखारीच्या लुटीची इंग्रजाकडून मागणी :-**

छ. शिवाजी महाराजांनी सुरूवातीपासून इंग्रजांशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र इंग्रजांनी त्याचा गैरफायदा घेऊन कधी स्वतः, तर कधी सिद्दीसारख्या शत्रुस मदत करून मराठ्यांच्या प्रदेशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता.

इ.स. १६६१ मध्ये शिवाजी महाराज पन्हाळच्या वेढयात असताना इंग्रजांनी आदिलशाहास मराठ्यांविरूद्ध दारूगोळा पूरविला होता. तर आदिलशाहाच्या फौजेबरोबर मिळून पन्हाळयावर दारूगोळयांचा मारा केला होता. याचा राग महाराजांच्या मनात होता. आणि म्हणूनच महाराजांनी मार्च १६६१ मध्ये चार हजार सैन्यानीशी इंग्रजाची राजापूरची वखार लुटली होती. या प्रसंगाने मराठ्यांची ताकद इंग्रजांना कळाली होती. त्यामुळे इंग्रजानी महाराजांशी जूळवून घेण्यासाठी थेट लढाई ऐवजी राजापूरच्या लुटीच्या भरपाईची मागणी केली व ती मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्या प्रयत्नाचा भाग म्हणूनच महाराजांच्या राज्याभिषेकानंतर छ. शिवाजी महाराज व इंग्रज यांच्यात इ.स. १६७४ मध्ये एक तह घडून आला.

**तहाची कलमे:-**

या तहाच्या कलमावर इंग्रजाच्या वत्तीने त्याचा वकिल ऑक्सिडेन याने सह्या केल्या. ही कलमे पुढील प्रमाणे होती.

१) उभयतांनी एकमेकांच्या प्रदेशात लुटालूट करू नये.

२) उभयपक्षांनी आपल्या भागात व्यापार, संचार यावर एकमेकांच्या जनतेला खुला करावा.

३) एकमेकांनी आपल्या क्षेत्रात आलेली आपसातील जहाजे विना जकात सोडावी.

४) दोन्ही पक्षातील प्रदेशात व्यापाऱ्याकडून तेथील आधिकाऱ्यांनी जकाती व्यतिरीक्त बक्षिसाची मागणी करू नये.

५) मराठ्यांच्या प्रदेशातील इंग्रजांच्या वखारीस संरक्षण द्यावे.

६) इंग्रजांनी राजापूरात जकात देऊन व्यापार व संचार करावा.

७) इंग्रजांनी मराठ्यांना आयात-निर्यात मालावर शेकडा २।। % जकात दयावी.

८) उभयतांनी एकमेकांच्या शत्रुस आश्रय अगर मदत करू नये.

छ. शिवाजी महाराज व ऑक्सिडेन यांच्यात झालेल्या करारा नंतर ऑक्स्डिनने महाराजांना नजराणा भेट दिली. तो पुढीलप्रमाणे :

लहान पितळी तोफ गोंड्यासह शिवाजी करिता -३००.००

१२ यार्ड कापड मोरोपंताकरिता - १५०.००

७ यार्ड कापड आण्णाजी पंडीताकरिता –८७.१६

१ आरसा व १ तोळा कस्तूरी – २५.००

३ यार्ड कापड सेनापती – २७.१६

इतर किरकोळ वस्तू – १४०.००

असा सुमारे ७४० रूपयांचा नजराणा दिला. यावरून इंग्रज शिवाजी महाराजाबरोबर वरवर का होईना सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावे याचा प्रयत्न करीत होते. मात्र शिवाजी महाराज इंग्रजाचा अंतस्थ हेतू ओळखून होते. म्हणूनच इंग्रजाच्या कुठल्याही प्रयत्नास त्याना हवे असलेले यश येऊ दिले नाही. इंग्रजांचे शिवाजी महाराजांविषयी काय मत होते. याची प्रचिती २८ सप्टेंबर १६७५ मधील मुंबईचा गव्हर्नर ऑजियर याच्या पत्रातील मजकूरावरून स्पष्ट होते. तो म्हणतो पोर्तुगीज मोगल सुभेदार फ्रेंच व डच हे सर्व आपल्या परीने येथे आम्हास सतावण्यास झटत असतांना शिवाजी मात्र त्याच्या स्वतःच्या हिताकरीता का होईना आमचा उत्तम मित्र अणि उदार शत्रु ठरला आहे. (डरींक्षशश हशींह ीींशिव ेंी षरळीशींीं षीळशपव रपव पेलशश्रींीं शपशाू) ‘शिवाजीच्या मुलखातील व्यापारातून कंपनीला बराच फायदा होईल तरी शिवाजीशी असलेल्या स्नेहाला अधिक उत्तेजन द्यावे.’

### ६.२.३.२ इंग्रजाची राजापूरच्या वखारीचा खर्च देण्याची मागणी :–

इंग्रज राजापूरच्या वखारीच्या लुटीची मागणी सातत्याने करीत होते. मात्र महाराज त्याला दाद देत नव्हते. म्हणून त्यांनी त्यावेळी राजापूर येथून आपली वखार मोडली होती. महाराजांच्या राज्यभिषेकानंतर इंग्रज–शिवाजीमहाराज यांच्यातील कलमानुसार इंग्रजांनी राजापूर येथे महाराजांच्या परवानगीने नव्याने वखारीच्या स्थापनेचा प्रयत्न केला. या वखारीस परवानगी देण्याचे कारण म्हणजे यामुळे स्वराज्यातील व्यापारात वाढ होऊन खजिन्यात जकातीच्या उत्पन्नातून भर पडणार होती.

तर इंग्रजांना देखील राजापुरात पुन्हा आपले स्थान भक्कम करावयाचे होते. म्हणून त्यांनी तेथे वखार उभारण्याची तयारी सुरू केली. यावेळी राजापुर येथे मराठ्यांचा सुभेदार आण्णाजी दत्तोने इंग्रजांना जागा देण्यास नकार दिला. अन्य ठिकाणी वखार स्थापण्यासाठी जागा देऊ केली. त्यामुळे इंग्रजांनी या वखारीच्या स्थापण्यासाठीच्या खर्चाची महाराजांकडे मागणी केली. मात्र महाराजांनी आधि दिलेल्या आज्ञेनुसार राजापूरच्या लुटीची भरपाई म्हणून इंग्रजांना जकातीच्या करातून सुट म्हणून देण्यात येणाऱ्या दहा हजार होनातुनच ही रक्कम धरण्याचे सांगून रोख खर्च देण्यास नकार दिला. महाराजांची ही कृती इंग्रजास जशास तसे उत्तर होते. कारण महाराजांनी इंग्रजांकडे तोफा मागितल्या असता त्यांनी देखील अशीच काहिशी उडवाउडविची उत्तरे दिली होती.

### ६.२.३.३ खांदेरी बेटावरील संघर्ष (इ.स. १६७९–८०)

छ. शिवाजी महाराजांनी इंग्रजांविरूद्ध स्वतः आक्रमण न करण्याचे धोरण स्विकारले असले तरी इंग्रजांकडून तसे वर्तन होताना दिसत नव्हते. हे वेळोवेळी सिद्ध झाले होते. आपल्या सागरी सत्तेचे प्रतिस्पर्धी इंग्रज, सिद्दी, पोर्तुगीज यांना शह देण्यासाठी शिवाजी

महाराजांनी इ.स. १६७९-८० मध्ये जवळ खांदेरी व कुलाबा येथे जलदुर्ग बांधले. त्याच्यातील खांदेरी हे बेट मुंबईच्या दक्षिणेस ११ मैल व जंजिऱ्याच्या उत्तरेस ३० मैल अंतरावर आहे. या बेटावरून मुंबई बंदरात प्रवेश करणाऱ्या व बंदरातून बाहेर पडणाऱ्या जहाजांवर नियंत्रण ठेवून येथील व्यापारावर अधिकार करणे अगदी सोईचे होते. इतक्या महत्त्वाच्या बेटावर महाराजांनी इ.स. १६७२ मध्ये या बेटावर तटबंदी उभारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्यावेळी इंग्रज व सिद्दी यांनी एकत्र येवून महाराजांस विरोध केल्याने तो प्रयत्न यशस्वी झाला नव्हता.

मात्र यावेळी म्हणजेच इ.स. १६७९ मध्ये बेटावर अधिकार करण्यासाठी ऑगस्टमध्ये बंदराजवळील नागांव या ठिकाणी बेटावरील तटबंदी साठी माणसे व सामानाची जमवाजमव केली.

**इंग्रजांचा बेटावर दावाः-**

छ. शिवाजी महाराजांच्या हालचालीची माहिती इंग्रजांना लागण्यापूर्वीच महाराजांचे आरमार सरदार मायननाईक भंडारी याने चार तोफांसह १५० माणसे खांदेरी बेटावर पोहचविली होती. इंग्रजांना मराठ्यांच्या या हालचालींची माहिती मिळताच ते अस्वस्थ झाले. व मायननाईकास कळविले की “ खांदेरी बेटावर आपला हक्क आहे, म्हणून हे बेट सोडून तुम्ही परत फिरावे” मात्र मायननाईकाने यास नकार दिला.

**इंग्रजांचा खांदेरीबेटावर हल्ला (४ सप्टेंबर १६७९) :-**

मायननाईक भंडारीने दिलेल्या नकारामुळे इंग्रजांना अपमान झाल्यासारखे वाटले. तसेच त्यांना हेही कळून चूकले की मराठे खांदेरी बेट सहजासहजी सोडणार नाही आणि जर आपण काहीही न करता तसेच बसून राहिलो तर मराठ्यांची आरमारी शक्ती वाढून देणे परवडणारे नव्हते आणि म्हणून इंग्रजांनी इंग्रज अधिकाऱ्यांतील तीन शिबाडे देऊन खांदेरी बरोबर पाठविले. यावेळी बेटावर मराठ्यांनी चारशे लोकांच्या मदतीने तीन फुट उंचीची तटबंदी बांधुन घेतली होती. तसेच या तटबंदीच्या रक्षणासाठी अधिक तोफा सज्ज केल्या होत्या. मराठ्यांच्या या तयारीमुळे इंग्रजांनी हयुजेस याच्या मदतीस कॅप्टन मिंचीन याबरोबर रिव्हेंट व हंटर या दोन लढाऊ जहाजासह पाठविले. या मिचीनने जहाजावरून खांदेरी बेटावर तोफांचा मारा केला. तर १९ फेब्रुवारी १६७९ लेफ्टनंट थॉर्प याने खांदेरीवर आपले सैन्य चढविण्याचा प्रयत्न केला. मात्र मराठ्यांनी त्याच्या हा प्रयत्न यशस्वी होऊ दिला नाही. या वेळी झालेल्या लढाईत इंग्रज सेनापती थॉर्प हा मारला गेला. तर इंग्रजांचे एक शिबाड मराठ्यांच्या हाती लागले. या लढाईच्या वेळी मराठ्यांच्या आरमाराचा प्रमुख दौलतखान याने महत्त्वाची भुमिका बजावली.

**इंग्रजाचा पुन्हा हल्लाः- (१८ ऑक्टोंबर १६७९)**

इंग्रज सेनापती थॉर्प यांच्या मृत्युमुळे इंग्रजांनी पुन्हा अधिक युद्ध साहित्यासह मराठ्यांवर हल्ला चढविला. याला प्रत्युत्तर म्हणून मराठी सैन्याने देखिल इंग्रजांच्या लढाऊ जहाजावर आपल्या ४० गुराबाच्या मदतीने हल्ला चढविला. मराठ्यांच्या या प्रखर हल्ल्यामुळे

इंग्रजांच्या गलबताची पागांपाग झाली. मात्र इंग्रजांचे 'रिव्हेज' नावाच्या युद्ध नौकेवर मोठ्या तोफा व भरपूर दारूगोळा असल्याने त्याने मराठ्यांवर या जहाजातून एक सारख्या दारूगोळयांचा वर्षाव सुरू केला. यामुळे मराठ्यांना अधिक जीवित व वित्त हानी टाळण्यासाठी माघार घेऊन काहीकाळासाठी नागावच्या खाडीत आश्रयाला जावे लागले. या लढाईत मराठयांचे तीन गुरबा, बुडयाला तर ३०० लोक ठार झाले व १०० जखमी झाले.

**इंग्रजांचा मराठ्यांची रसद तोडण्याचा प्रयत्न :-**

मराठ्यांना इंग्रजांच्या हल्ल्यावेळी माघार घ्यावी लागली. त्याचे महत्त्वाचे कारण त्याच्याकडील रसद संपत्त चालली होती. यासाठी इंग्रज प्रयत्नशील होते. मात्र इंग्रजाची नजर चुकवून मराठी सैनिकांनी, मराठी लष्कराकडे  रात्रीच्या वेळी रसद पोहचविली मराठ्यांना रसद पोहचविण्याची बातमी इंग्रजांना लागल्या नंतर त्यांनी २७ ऑक्टोंबरला आपली जहाजे खांदेरी बेटाजवळ नेऊन ठेवली. मात्र याला न जुमानता मराठ्यांनी चपळ हालचाली करून खांदेरीवर रसद पोहचविण्याचे काम सुरूच ठेवले. या विषयीची इंग्रजांची अगतिकता २७ ऑक्टोंबर १६७९ च्या कॅप्टन किग्विन याच्या पत्रातील मजकूरावरून होते. तो लिहीतो ''कितीही दक्षतेने पहारा केला तरी मराठ्यांच्या नौका खांदेरीला रसद पुरवितातच व आपण ते थांबवू शकत नाही.''

**इंग्रजांची माघार व तह :-**

मराठ्यांच्या जलद हालचालीमुळे तसेच आत्तापर्यंतच्या संघर्षामुळे त्यांना मराठ्यांच्या सामर्थ्यांचा परिचय आला होता. त्यांना हे कळून चुकले की शिवाजीच्या सामर्थ्यापुढे आपला टिकाव लागणार नाही त्यातच पावसाळा जवळ आल्यामुळे देखिल वेढा उठविणे भाग होते.. त्याचबरोबर वेढा असाच अजून ताणला तर शिवाजीने रागावून जर मुंबई बंदरावरच हल्ला केला तर मुंबईचे संरक्षण करणे कठीण होणार होते. आणि म्हणून २४ ऑक्टोंबर १६७९ रोजी सुरतच्या इंग्रजांनी वेळीच माघार घेऊन शिवाजी महाराजांबरोबर तह करण्याचा ठराव केला. व त्यानुसार तहाच्या बोलणीस सुरवात केली.

तहाची कलमे :-

१) खांदेरीवरून सिद्दी व इंग्रजानी आपले आरमार काढून घ्यावे.

२) सिद्दीस खऱ्या अर्थाने तुम्ही घालवता की नाही हे पाहण्यासाठी मराठ्यांचा १ बातमीदार व ५० माणसे मुंबईत राहतील.

३) मराठ्यांच्या प्रदेशातील कोणत्याही कर्जदाराला इंग्रजानी आश्रय देऊ नये.

४) आधि ठरल्याप्रमाणे नागोठाणे किंवा पेण खाडीत मराठ्यांच्या शत्रूस आश्रय देऊ नये तसेच सिद्दीकडील मराठ्यांचे कैद्याची इंग्रजांनी सुटका करावी.

५) शिवाजीच्या मुलखातील व्यापारी, रहिवासी यांना इंग्रजांनी चांगली वागणूक दयावी.

६) सिद्दीचा सरदार दाऊदखान यास बेटावरून इंग्रजानी काढून दयावे.

## ६.२.४ संभाजीराजे– सिद्दी संबंध

छ. शिवाजी महाराजानंतर संभाजीराजे सत्तेवर आल्यानंतर महाराजाप्रमाणेच त्यांचाही संबंध सिद्दी, पोर्तुगिज, इंग्रज यांच्याशी आला. यामधील सिद्दी हा कोकणसमुद्रातील जंजिराकिल्याच्या आश्रयाने मराठी प्रदेशात नेहमी धुमाकुळ घालत होता. याचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजीराजांचा त्याचा बरोबर संघर्ष सुरू झाला. यामुळे सिद्दी व संभाजीराजे यांचे संबंध कधिही मैत्रीचे होऊ शकले नाही.

### ६.२.४.१ दंडा–राजापूरी प्रकरण (जानेवारी १६८२):–

सिद्दी हा सतत इंग्रज, पोर्तूगिजाच्या मदतीने मराठ्यांच्या आश्रयाने मराठ्यांच्या प्रदेशात धूमाकूळ घालीत होता. यामध्ये त्याला इंग्रजाची होत असलेली मदत बंद करण्यासाठी संभाजीराजांनी इंग्रजास वेळोवेळी सांगूनही इंग्रज त्याकडे दुर्लक्ष करू लागले. त्यामुळे संभाजीराजांच्या आरमाराच्या अधिकाऱ्यांनी इंग्रजांची गलबते अडवून ती आपल्या ताब्यात घेतल्यानंतर मात्र इंग्रजांनी सिद्दीच्या कारवायास अटकाव करण्यासाठी त्याला मदत न करण्याचे धोरण सुरू केले. त्यामुळे संभाजीराज्यांच्या आरमाराच्या अधिकाऱ्यांनी इंग्रजांची गलबते सोडून दिली. तसेच त्यावरील सिद्दी मिस्त्री या अधिकाऱ्याची देखिल मुक्तता (१२ ऑक्टोबर १६८९) केली.

गलबते व सिद्दी मिस्त्री यांना सोडून दिल्यानंतर जंजिऱ्याच्या सिद्दीचा सरदार सिद्दी कासम याने ७ डिसेंबर १६८९ रोजी मराठ्यांच्या अधिकाराखालील आपटे गावात लुटपाट केली. याप्रमाणे सिद्दीच्या सैन्याने नागोठाण व चौल येथे जाळपोळ व लुटालुट केली.

### ६.२.४.२ दंडा – राजापूरीस वेढा :–

सिद्दीच्या या वाढत्या कारवायांना वेळीच आळा घालण्यासाठी संभाजी राजांनी सिद्दीच्या आधिकारातील दंडा–राजापूरीस वेढा दिला. व तोफाचा प्रचंड मारा करून किल्ल्याच्या भिंती पाडून टाकल्या. यामुळे सिद्दीची स्थिती अत्यंत बिकट बनली. किल्ल्यातील अधिकारी व सैनिक जीव वाचवून वाट मिळेल तिकडे पळून गेले. यामध्ये किल्ल्यातील सिद्दीचा अधिकारी सिद्दी खैरात हा जीव वाचवून दंडा–राजापूरावरून पळून गेला. याच दरम्यान सिद्दीचे काही आरमार मुंबई येथे इंग्रजांच्या आश्रयाला गेले होते. सिद्दीचा पराजय निश्चित असतानाच त्याचवेळी मोगल अधिकारी हसनअलीखान याने कल्याणच्या ठाण्यावर हल्ला केला. त्यामुळे दंडा–राजापूरची जबाबदारी दादाजी रधुनाथ प्रभू यावर सोपवून संभाजीराजे कल्याणकडे रवाना झाले. पावसाळा लागल्यामुळे दादाजीस वेढा उठवावा लागला. यावेळी गोविंदजी जाधव व गोविंद कान्हो हे आरमाराचे सरदार होते. ते वेढा उठल्यानंतर नागोठणे व आपटे याकडे जात असताना उरणच्या खाडीजवळ सिद्दीच्या आरमाराबरोबर त्यांचा सामना होऊन उभयतामध्ये संघर्ष झाला. यावेळी मराठ्यांना माघार घ्यावी लागली.

### ६.२.४.३ उंदेरी बेटांवर संभाजीराजांचा हल्ला :–

सिद्दीच्या कारवायांना आळा घालण्यासाठी संभाजीराजांनी उंदेरीबेटांवर हल्ला करण्यासाठी कूच केली. उंदेरी हे बेट दंड राजापुरी प्रमाणे सिद्दीचे महत्वाचे ठाणे होते सिद्दी

नेहमीच इंग्रजांच्या मदतीने याच बेटावर आश्रय घेत त्यामुळे संभाजीराजांनी या महत्त्वाच्या बेटावर हल्ला केला. यावेळी संभाजीराजाकडे तीन हजार सैनिक व बाबीस गलबते होती, तर प्रत्येक शिपायास सहा महिन्याचा पगार आगाऊ देण्यात आला होता. तर हल्ल्यात विशेष कामगिरी करणाऱ्यास दोनशेर सोन्याचे बक्षीसही जाहिर केले होते. अशी माहिती मुंबई सुरत मधील इंग्रजांच्या पत्रव्यवहारातून मिळते यावरून उंदेरी बेट घेण्यासाठी संभाजीराजांनी किती तयारी केली होती याची कल्पना येते.

संभाजी राजांनी वरिल प्रमाणे मोठया तयारीनिशी १८ जुलै १६७१ रोजी सकाळी उंदेरीवर हल्ला चढविला मात्र बराच संघर्ष करूनही हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. याचे कारण उंदेरी बेटाची नैसर्गिक स्थिती व पावसाळ्याचा काळ हा होता.

## ६.२.४.५ जंजिऱ्यावर हल्ला (इ.स. १६८१) :–

जंजिरा हा सिद्दीच्या शक्तीचा केंद्र बिंदू होता. समुद्रातील हा किल्ला ज्याच्या हाती त्याचा त्या मार्गातील समुद्र व्यापारावर व आसपासच्या भुप्रदेशावर अधिकार. त्यामुळे जंजिरा आपल्या अधिकाराखाली आणण्यासाठी छ. शिवाजी महाराजांपासून प्रयत्न सुरू होते ते संभाजीराजांनीही सुरू केले. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी डिसेंबर १६८१ मध्ये २० हजारांची फौज व साधन सामुग्रीसह औरंगजेबाचा मुलगा शहजादा अकबर यास मदतीस घेऊन जंजिरा किल्ल्यावर हल्ला सुरू केला. मात्र त्याचा म्हणावा तसा उपयोग होत नव्हता.

## ६.२.४.५ किल्ल्यात जाण्यासाठी खाडीत भराव टाकण्याची योजना :–

जंजिरा किल्ला किनाऱ्यापासून बराच दूर आत समुद्रात असल्याने तसेच किनाऱ्याचा भाग वाळूचा असल्याने तोफाचे धमधमे निट बसत नव्हते व त्यामुळे किल्ल्यावर तोफांचा मारा देखिल अचूक होत नव्हता. त्यामुळे संभाजी राजांनी किल्ल्याचा जवळ जाऊन तोफांच्या माऱ्याची योजना बनविली. त्यासाठी किल्ल्यापर्यंत जाणाऱ्या खाडीमध्ये लाकडे, कापडाच्या गठया, दगड आदीचा भराव टाकूण किल्यापर्यंत रस्ता बनविण्याचे काम सुरू केले. मात्र या भागात समुद्राची खोली अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने तसेच ऐनवेळी समुद्रात लाटा उत्पन्न झाल्यामुळे भरावाचे काम पूर्ण होऊ शकले नाही.

त्याचवेळी मोगलाचे आक्रमण अधिक तीव्र झाल्याने संभाजीराजाना ही योजना अपूर्ण सोडून माघारी जावे लागले व जंजिरा किल्ला पुन्हा एकदा हाती येता राहिला.

## ६.२.५ संभाजी राजे – पोर्तुगीज संबंध

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या पश्चिम सीमेवरील किनारपट्टीवर अधिकार ठेवण्यासाठी पोर्तुगीजांबरोबर कधी सामोपचाराचे तर कधी संघर्षाचे संबंध ठेवले होते. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर (इ.स. १६८९) याच प्रकारचे संबंध संभाजीमहाराजांनी पोर्तुगीजांशी ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र हे बहुतेक संघर्ष राहिले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### ६.२.५.१ पोर्तुगिजाचा संभाजीराजांबरोबर सलोखा ठेवण्याचा प्रयत्न :-

छ. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजीमहाराजांना राज्य मिळविण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला. त्यामुळे त्यात त्याची बरीच शक्ती व वेळ गेला. या परिस्थिती फायदा घेण्यासाठी स्वराज्याअंतर्गत व बाहय शक्तीनी आपला उपद्रव वाढविला आणि म्हणून तुर्तास तरी आणखी नवीन शत्रु तयार होऊ नये याची काळजी संभाजीराजे घेत होते आणि त्यामुळेच मे १६८० मध्ये पोर्तुगीजांबरोबर सलोखा होण्यासाठी रामजी नाईक या वकिलास संभाजी राजांनी पोर्तुगीजाकडे पाठविले. गोव्यातील पोर्तुगीजांना देखिल संभाजीराजांबरोबर संघर्ष नको होता. कारण छ. शिवाजी महाराजांच्या कालखंडातील संघर्षावरून त्यांना मराठ्यांच्या शौर्याची व शक्तीची जाणीव झाली होती. व यावरून त्यांना हे लक्षात आले होते की, हिंदुस्थानात आपणास निर्धोक व्यापार करावयाचा असेल तर मराठ्यांना दुखवून चालणार नाही. आणि म्हणून संभाजीराजांचे व्हाइसराय व्हिसेरेई आतोनियुपाईश द सांद याने मोठे स्वागत केले. व पोर्तुगीज मराठे मैत्री करार व्हावा यासाठी संमती दर्शविली. या संबंधित माहिती ८ मे १६८० च्या व्हिसेरेईच्या पत्रांतून मिळते.

व्हिसेरेईने आपण संभाजी महाराजांशी मैत्री करण्यासाठी तयार आहोत हे दाखविण्यासाठी त्याने २९ मे १६८० रोजी संभाजीमहाराजांना छ. शिवाजी महाराजांच्या निधनाबद्दल दुखवटयाचा संदेश पाठविला तसेच साण्टी प्रांताच्या कॅप्टनला युद्धाबंदीची आज्ञा दिली. यावरून मैत्रिसाठी संभाजी राजापेक्षा पोर्तुगीज अधिर होते हे स्पष्ट होते.

### ६.२.५.२ अरबांना जवळ करण्याचा संभाजीराजांचा प्रयत्न -(इ.स. १६८२) :-

छ. संभाजी राजांनी सूरुवातीच्या काळात पोर्तुगिजांबरोबर मैत्रिचे संबंध स्थापण्याचा प्रयत्न केला. व पोर्तुगिजांनी देखिल त्याला प्रतिसाद दिला. मात्र हे मैत्रिचे संबंध जास्त वेळ टिकू शकले नाहीत. पोर्तुगीजांनी प्रत्यक्षरित्या मराठयांच्या विरूद्ध तक्रारी करण्याचे सुरू ठेवले आणि त्यामुळे संभाजीराजांनी पोर्तुगीजांचे व्यापारातील प्रतिस्पर्धी अरब व्यापारी याच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न सुरू केला. ''शत्रुचा शत्रु तो आपला मित्र'' या नितीने संभाजीराजांनी गोवा कारवार या दरम्यानच्या समुद्रातील अंजदीव नावाच्या बेटावर तटबंदी करून आरमारी तळ करून अरबांना व्यापारासाठी एक तळ करून दयावा अशी योजना (जाने. १६८२) आखली.

या योजनेची माहिती पोर्तुगीजांना कळाल्यानंतर ते अस्वस्थ झाले. कारण त्यांना हे माहित होते की जर अंजदीव बेटावर तंटबंदी होऊन हे ठिकाण मराठ्यांकडे गेले तर ते आपणास शह देण्यासाठी अरबांना व्यापारी सवलती व संरक्षण देतील ज्यामुळे आपल्या जीवनावश्यक वस्तुंच्या व्यापारावरील एक अधिकार नाहीसा होईल आणि म्हणून संभाजीमहाराजांच्या या योजनेची अमंलबजावणी सुरू होण्याआधिच पोर्तुगीजांनी अंजदीव बेट आपले असल्याचा दावा केला. व त्यावर सात हजार सैनिक पाठवून तेथे तटबंदी केली.

### ६.२.५.३ संभाजी राजाविरूद्ध पोर्तुगीजांची मुघलांना मदत :-

पोर्तुगीज संभाजी राजांना अडचणीत आणण्याची कोणतीच संधी सोडत नव्हते.

त्यानुसार इ.स. १६८३ मध्ये मुघलबादशाहा औरंगजेब मराठी राज्याचा नाश करण्यासाठी मोठा शक्तीनिशी स्वराज्यावर चालून आला. त्यावेळी संभाजीचा बिमोड करण्याची ही नामी संधी चालुन आली असा पोर्तुगीजाचा समज झाला. त्यातच औरंगजेबाने देखिल संभाजीराजांविरूद्ध पोर्तुगीजाकडे मदत मागितली. त्यामुळे पोर्तुगीजानी औरंगजेबास प्रत्यक्ष सैन्य मदत देण्याऐवजी मोगली आरमारास आपल्या अधिकाराखालील चौल , वसई, दमण इत्यादी समुद्री मार्गातून कुठलेही आडकाठी न करता जाऊ दिले. तसेच आपल्या प्रदेशातून मोगलाना आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तुच्या खरेदीसाठी अनुमती दिली. अशा प्रकारे अप्रत्येक्षरित्या संभाजीविरूद्ध मुगलास मदत केली.

### ६.२.५.४ संभाजीराजांचा चौल ठाण्यास वेढा :-( इ.स. १६८३)

पोर्तुगीजांनी स्वराज्यांवर चाल करून आलेल्या औरंगजेबास सहाय्य करून संभाजी राजांचा रोष ओढवून घेतला. पोर्तुगिजाच्या या कृत्याबद्दल त्यांना अद्दल घडविण्यासाठी संभाजी महाराजांनी पोर्तुगीज प्रदेशावर हल्ले सुरू केले. फेब्रुवारी १६८३ मध्ये उत्तर कोकणातील दोन किल्ले जिंकून घेतले. याच कामात जुलै १६८३ मध्ये अशी बातमी पसरली की संभाजीराजे थेट गोव्यावरच हल्ला करणार आहेत. त्यामुळे पोर्तूगीजांमध्ये अतिशय घबराटीचे वातावरण निर्माण झाले. कारण जर एकदा गोवा हातचा गेला तर हिंदुस्थानातील पोर्तूगीज सत्तेचा व व्यापाराचा कायमचा बिमोड होईल हे त्यांना माहित होते. मात्र संभाजीमहाराजांनी आपली गोव्यावरील मोहिम रद्द करून आपले सैन्य चौल कडे रवाना केले. या वेळी या सैन्यामध्ये दोन हजार घोडदळ आणि सहा हजार पायदळ होते. या सैन्याने पोर्तूगीजांच्या प्रदेशात धुमाकूळ घालीत चौलच्या ठाण्यास वेढा घातला व हल्ल्यास सुरूवात केली. हा हल्ला १० ऑगस्ट ते १८ ऑगस्ट पर्यंत सतत चालू होता. यामुळे चौल मध्ये असलेल्या शिबंदीने मराठ्यांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी तटावरून तोफांचा मारा सूरू केला. मात्र याचाही म्हणावा तसा उपयोग झाला नाही कारण गडावरील तोफाखाना पाद्रयाच्या हातात होता. व ते त्याची योग्य काळजी घेत नव्हते. असा उल्लेख काही इतिकासकार करतात.

मराठ्यांनी चौलला वेढा देऊन सहा महिन्यापेक्षा जास्त काळ उलटला तरी वेढा पूर्ण झाला नव्हता. वेढा चालू असतांनाच दुसरीकडे इंग्रज-संभाजी राजांचा मैत्रीचा करार घडून आला. व संभाजीराजांचे लक्ष तिकडे गेल्यामुळे चौलकडील वेढयात शिथिलता येऊन मराठयांना वेढा उठवावा लागला असे वाटते.

### ६.२.५.५ फोंडयाच्या स्वारीत पोर्तूगीजाचा पराभव (नोव्हेंबर १६८३) :-

मराठ्यांनी चौलचे ठाणे जवळजवळ काबिज करीत आणलेच होते. त्यामुळे पोर्तूगीजांनी एक योजना आखली. त्यांनी मराठ्यांचे लक्ष विचलीत करण्यासाठी गोव्याच्या व्हाईसरॉयने १ नोव्हेंबर रोजी किल्ल्यास वेढा घातला. यावेळी या किल्यावर मराठ्यांचा सरनौबत येसाजी कंक व कृष्णाजी कंक हे पितापुत्र किल्याचे अधिकारी म्हणून काम पाहत होते

पोर्तूगीजांनी आपल्या जवळील मोठया आकाराच्या तोफांमधून किल्याच्या तटावर प्रचंड दारूगोळयाचा मारा सुरू केला. याचा प्रतिकार वरील मराठी अधिकारी व सैन्यानी

करण्यास सुरूवात केली. मात्र पोर्तूगीजांच्या दारूगोळयाच्या माऱ्यापूढे किल्यावरील केवळ ६०० सैनिकांचा निभाव लागणे शक्य नव्हते. अशाही परिस्थितीत मराठी सैन्याने निकराचा पराक्रम केला. व गडाच्या तटाला खिंडार पाडून आत आलेल्या पोर्तूगीज सैन्यास माघारी लावले.

**संभाजी महाराज फोंडयाच्या मदतीस दाखल :-**

येसाजी कंक व त्यांचा मुलगा कृष्णाजी यांच्या नेतृत्त्वाखाली केवळ ६०० सैनिक पोर्तूगीजांच्या संख्येने व साधन सामग्रीने कित्येक पट मोठया सैन्याशी टक्कर देत होते. फोंडयाच्या वेढयाची माहिती मिळताच संभाजीराजे आपल्याबरोबर जवळजवळ दहा हजार फौज घेऊन फोंडयाच्या मदतीस आले. संभाजी महाराजांच्या फौजेच्या आगमनाने पोर्तुगीजांची एकदम तारांबळ उडाली व ते जीव वाचवण्यासाठी वाट मिळेल तिकडे पळू लागले.

## ६.२.५.६ पोर्तूगीजांची माघार :-

संभाजी महाराजांच्या कुमकेमूळे येसाजी कंक व त्यांच्या सैन्यात नवचैतन्य संचारले. त्यांनी पोर्तुगीजावर पुन्हा निकराचा हल्ला करण्यास सुरूवात केली. यावेळी जीव वाचवून पळणाऱ्या पोर्तूगीज सैन्याचे बरेच सामान मराठ्यांच्या हाती लागले. यावेळी खुद गोव्याचा व्हॉईसरॉय हा कसाबसा स्वतःचा जीव वाचवून जखमी अवस्थेत गोव्यामध्ये पोहचला (१२ नोव्हेबर १६८३). या विषयीची माहिती या व्हाईसरॉयच्या १६ डिसेंबर १६८३ रोजी पोर्तूगीज राजाला लिहीलेल्या पत्रातील मजकूरावरून मिळते.

**फोंडयाच्या किल्यावरील हल्याची विरजइने दिलेली कारणे.**

१) मराठ्यांचा चौलचा वेढा उठविणे.

२) पोर्तूगीजांच्या गोवा, साष्टी व बारदेश याचे संरक्षण करणे सुलभ व्हावे म्हणून दक्षिण कोकणचा प्रदेश स्वतः च्या अंमलाखाली आणणे.

३) कोकणचे उत्पन्न मोठे कोकण घेण्यापूर्वी ते हस्तगत करणे.

**संभाजीराजांची गोव्यावर चढाई :-**

मराठ्यांचे लक्ष विचलीत करण्यासाठी गोव्याच्या व्हाईसरॉयने फोंडयावर हल्ला केला. मात्र त्यात त्याला मार खावी लागली. फोंडयाचा वेढा उठविल्यानंतर संभाजीराजे पन्हाळयावर परत जातील अशी विरजईची कल्पना होती. मात्र पोर्तूगीजांना मराठा विरोधी कारवाया बद्दल अद्दल घडविण्यासाठी संभाजीराजांच्या सरदारांनी गोव्याच्या मार्गातील जुवे बेटावरील किल्यावर हल्ला करून (२४ नोव्हेंबर २६८३) तो किल्ला आपल्या ताब्यात घेतला.

किल्ला मराठयांनी ताब्यात घेतल्याची माहिती पोर्तूगीज व्हाईसरॉय विरजई यास मिळताच त्याने धावजीच्या बाजूने २४ नोव्हेंबर १६८३ रोजी सकाळी ४०० सैनिकांसह जूवे बेटावरील मराठी सैन्यावर हल्ला चढविला. मात्र मराठयांनी विरजईच्या या हल्यास प्रतिकार करून विरजई च्या सैन्याची मोठी कत्तल घडवून आणली यावेळी जीवाच्या भितीने कित्येक

सैनिक गोवा व दिवाडीच्या मधून वाहणाऱ्या मांडवी नदीच्या दिशेने पळाले. त्यातच बरेच ठार झाले.

पोर्तूगीजांचा पूर्ण पाडाव करण्याची ही नामी संधी मराठ्यांना आली होती. कारण एकदा जर गोवा मराठ्यांच्या ताब्यात आला असता तर पोर्तूगीजांचे वर्चस्व कायमचे नाहिसे झाले असते . मात्र गोव्यावर हल्ला करणार तेव्हा मात्र मांडवी नदीस भरती आल्यामुळे मराठ्यांवर हल्ला करता आला नाही. त्यामुळे नाईलाजाने माघारी फिरावे लागले.

या माघारीचे मुख्य कारण म्हणजे शहाआलम कोकणातून मोठया सैन्यानिशी पोर्तूगीजांच्या मदतीस येत असल्याची बातमी संभाजी राजांना लागली तसेच मांडवी नदीच्या मुखावरील आग्वाद, रेझसमागूस, काबू प मुरगाव या किल्याच्या संरक्षणासाठी पोर्तूगीज आरमार आधिपासूनच सज्ज होते आणि म्हणून संभाजी राजांनी गोव्यावर चढाई न करता माघारी फिरण्याचा निर्णय घेतला. मात्र गोवेकर विरजईने याचा वेगळाच अर्थ घेतला की सेट फ्रान्सिस झेवियर यांच्या कृपेने संभाजीने माघार घेतली.

संभाजी राजाच्या माघारीमुळे पोर्तूगिजांनी आपल्यावरील मोठे संकट टळल्याने मोठा संतोष वाटला, व तुर्तास तरी संभाजीराजांचे गोव्यावर पुन्हा आक्रमण नको यासाठी जानेवारी १६८४ मध्ये फोंडयाच्या किल्ल्यावर शांततेसाठी वाटाघाटी  यशस्वी होऊ शकला नाही व त्यामुळे पून्हा संघर्षास सुरूवात झाली.

### ६.२.५.७ कोकणातील देसाई, खेम सावंत यांच्या मार्फत संभाजी राजांशी संघर्ष :–

स्वराज्य स्थापने पासूनच ज्या प्रमाणे परकीयांचा विरोध झाला. तसा स्वकियांचा देखिल सूरू होता. कोकणातील देसाई कुडाळचे, खेम सावंत हे मराठ्यांची सत्ता मानित नव्हते. ते या प्रदेशात  स्वतः राजे म्हणून वावरत व वेळोवेळी मराठी सत्तेविरूद्ध बंड करीत. त्यांना पोर्तूगिज व कोकणातील अन्य परकीय शक्ती मदत करीत.

पोर्तूगीजांबरोबरच्या संघर्षाच्या वेळी याच देसाई व खेम सावंताबरोबर पोर्तूगिजांनी एक गुप्त करार करून मराठ्यांच्या अधिकाराखालील कारवारचा किल्ला  घेण्यासाठी देसायांना मदत केली. या विषयीची माहिती २४ जानेवारी १६८६ च्या गोव्याच्या व्हाईसरॉयने आपल्या राजास लिहीलेल्या पत्रातील '' फेब्रुवारी १६८५ रोजी आपण या देसायाशी गुप्त करार केला. त्यानूसार १२ फेब्रुवारी १६८५ ह्या दिवशी त्यांनी उठाव केला'' या उल्लेखावरून मिळते.

या खेम देसायाचा बंदोबस्त करण्याचे निश्चित होत असताच स्वराज्यावर मोगलांचे संकट चालून आल्याने संभाजीराजांना पोर्तूगीज, देसाई, खेम सावंत यांच्या कारवायांकडे लक्ष देता आले नाही. व याचाच फायदा घेऊन उभयतांनी कोकणातील मराठ्यांच्या अधिकारातील बराच प्रदेश जिंकून घेतला. या विषयीची माहिती जानेवारी १६८३ रोजी गोव्याच्या व्हाईसरॉयने  आपल्या राजाला लिहिलेल्या पत्रातील ''गोवा प्रांतात आत्ता फोंडयाशिवाय दुसऱ्या ठिकाणी संभाजीचा अमल राहिलेल्या नाही'' या मजकूरावरून मिळते.

अशा प्रकारे छ.संभाजीराजांनी आपल्या अल्प करकीर्दीत (इ.स. १६८० ते १६८९) पोर्तूगीजावर अंकुश ठेवला हे महत्तवाचे होते.

## ६.२.६ संभाजी राजे– इंग्रज संबंध

ज्या प्रमाणे छ. शिवाजी महाराजांनी इंग्रजाबरोबर शक्यतो. शत्रुत्त्व नाकारण्याचा प्रयत्न केला होता. मात्र वेळप्रसंगी त्यांच्याशी दोन हात करून त्याच्यावर कायमचा वचक बसविला होता. याच प्रकारची नीती संभाजीराजांनी सूरू ठेवल्याचे दीसते. यामुळे इंग्रजांनी देखिल संभाजीराजांच्या हयातीत कधिही मराठ्यांबरोबर सरळ–सरळ शत्रुत्त्व घेतले नाही.

### ६.२.६.१ संभाजीराजांची मृत्सदेगिरी :–

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजी राजे स्वराज्याच्या अधिकारावर आले. यावेळी इंग्रजांचा राजापूरच्या वखारीच्या लुटीच्या परताव्याचा प्रश्न अजूनपर्यंत सुटलेला नव्हता. तो पुन्हा उपस्थित करून परताव्याची मागणी संभाजीकडे सूरू केली. याच दरम्यान चौलच्या मराठ्यांच्या सूभेदारांकडे राजापूरच्या इंग्रजांनी मालमत्तेसह सूखरूप जाण्याची परवानगी मागितली (मे.१६८०) मात्र या सुभेदाराने या परवानगीसाठी इंग्रज वकीलास संभाजीराजांकडे पाठविले. हा इंग्रज वकील रायगडावर संभाजीराजांकडे गेला असता. संभाजी राजांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. याचे कारण इंग्रजाना वेळोवेळी सांगूनही ते सिद्दीस प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरीत्या मदत करीत होते. या मदतीच्या जोरावर सिद्दी मराठ्यांच्या प्रदेशात धुमाकूळ घालीत होता.

#### १) इंग्रजावर लक्ष ठेवण्यासाठी आवजी पंडीताची मुंबई कडे रवानगी :–

संभाजीराजांनी इंग्रजाच्या सिद्दीस मदत करण्याच्या कृत्याचा सुड घेण्यासाठी, राजापूर येथे मराठी सैन्याची जमवाजमव केली. तसेच वाटाघाटी करण्याच्या बहाण्याने आपला वकील आवजी पंडीत यास मुंबईला रवाना केले. या मागचा मुख्य उद्देश वाटाघाटी करणे नसून इंग्रजाच्या हालचालीची माहिती काढणे हा होता असे वाटते. कारण जर योग्य संधी आली तर सरळ मुंबईवरच हल्ला करून इंग्रजांना कायमची अद्दल घडवावी. ज्यामुळे इंग्रजांबरोबर सिद्दीचा प्रश्न देखिल कायमचा निकाली निघेल आणि याचसाठी राजापूरजवळ मराठी सैन्याची जमवाजमव केली होती.

#### २) सिद्दीस मुंबई बाहेर घालवले :–

योजनेप्रमाणे आवजी पंडीत या संभाजीराजांच्या वकिलाने इंग्रजास इशारा दिला की, 'जर तुम्ही सिद्दीस मुंबईतून घालवून दिले नाही तर, संभाजीराजे मुंबईवर हल्ला करतील.'' यांचा योग्य परिणाम होऊन इंग्रजांनी संभाजीमहाराजांपासून मुंबईचा बचाव करण्यासाठी सिद्दीस त्याच्या आरमारासह मुंबई बेटावरून घालवून दिले.

मात्र थोडयाच दिवसात सिद्दीने पुन्हा १६ मार्च १६८१ रोजी मराठ्यांची मुंबई बेटाकडे जाणारी दोन गलबते व चार माणसे कैद केली. सिद्दीच्या हया कृत्याने इंग्रजांच्या मुंबईवरील बेटाचे संकट पुन्हा निर्माण झाले. त्यामुळे एकवार पुन्हा इंग्रजांनी संभाजी राजांच्या अयाने मराठयांची गलबते सोडवून ती मराठयांना परत केली. यावरून इंग्रजांच्या

मनात संभाजीराजांबद्दल किती प्रीती निर्माण झाली होती हे सिद्ध होते. या विषयीची माहिती १९ जानेवारी १६८२ मधील मुंबईतील इंग्रजांनी सूरत येथील इंग्रजास पाठविलेल्या पत्रावरून होते. या पत्रात मुंबईकर इंग्रज लिहीतात '' जर सिद्दीने मराठयांस त्रास देण्याचे थांबविले नाही. तर इंग्रजाशी संभाजीमहाराज कोणत्याही क्षणी लढाई देतील व इंग्रजास त्यांचा हल्ला परतविणे जड जाईल.''

### ३) इंग्रजांची अन्नधान्याची रसद बंद केली :-

वेळोवेळी सांगूनही इंग्रज सिद्दीला मदत करण्याचा व त्याच्यावर कारवायी करण्याबाबत काहीच ठोस भूमिका घेत नव्हते. त्यामुळे संभाजीराजांनी इंग्रजाच्या अन्नधान्याची रसद बंद करण्यास सुरूवात केली. तसेच पोर्तूगीजांनाही इंग्रजांना अन्नधान्यांचा पुरवठा न करण्याचा इशारा दिला. अशा प्रकारे इंग्रजाची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे इंग्रजांनी यातून मुक्त होण्यासाठी मुंबईकर इंग्रजांनी सूरतच्या इंग्रजाकडे सैन्य व आरमाराची मदत मागीतली मात्र सूरतमधील इंग्रजांनी त्यास म्हणावा तसा प्रतिसाद दिला नाही. आणि म्हणून शेवटी इंग्रजांनी संभाजीराजांकडे तहाची बोलणी सुरू केली. संभाजीराजांनी यास प्रतिसाद देऊन आपल्याकडील वकील निराजी यास इंग्रजांकडे पाठविले. इंग्रजांनी या वकीलास सन्मानाने आणण्यासाठी 'बलून' नावाचे जहाज पाठविले (२० नोव्हेंबर १६८२) मात्र सिद्दीचा बंदोबस्त करण्यासंदर्भात इंग्रजांनी कोणतेही ठोस आश्वासन न दिल्यामुळे हा तह होऊ शकला नाही. व शेवटी संभाजीराजे व इंग्रज यांच्यात महागिरी येथे लढाई झाली.

### ४) मुंबईला वेढा :-

इंग्रजांच्या बरोबरचा महागिरीची लढाई अनिर्णीत राहील्यामुळे काही काळ संभाजीराजांनी आपले लक्ष पोर्तूगीजांकडे वळविले व त्याच्याकडून कारंजा व इतर प्रदेश जिंकूण घेतले. व पुन्हा १६८३ साली मुंबईस वेढा दिला. यावेळी मुंबईकर इंग्रजाची स्थिती इतकी दयनीय बनली होती की त्याचे खाण्यापिण्याचे हाल होऊ लागले. व मुंबई मराठ्यांच्या ताब्यात जाईल अशी स्थिती निर्माण झाली. यामुळे मुंबईच्या जनतेने मुंबईचा इंग्रज अधिकारी चाइल्ड व वॉर्ड यांच्या गव्हर्नर म्हणून रिचर्ड केजविनची नेमणूक केली. याने परिस्थितीचा रेटा ओळखून संभाजीराजांशी सलोखा ठेवण्याचे धोरण आरंभिले.

### ५) संभाजीराजे-इंग्रज तह (इ.स.१६८४) :-

रिचर्ड केजविणे संभाजीराजांबरोबरच्या सलोख्याच्या धोरणाची अंमतबजावणी करण्यासाठी बिखाडी येथे संभाजी राजाकडे आपले वकिल कै. थॉमस विस्क्लिन्स, व राम शेणवी (दुभाषा) यांना पाठविले. यावेळी संभाजी महाराजांनी इंग्रजास या वकीलामार्फत ''सिद्दीस मदत न करण्याच्या अटीवर तहास मान्यता दिली. या तहाच्या मसुदयात कर्नाटकासाठी अकरा कलमे व मुंबईसाठी तीस कलमानां संभाजीराजांनी संमती दिली.

**कर्नाटकासाठी तहाची कलमे :-**

१. इंग्रजांनी त्यांना योग्य वाटेल तेथे वखारी स्थापाव्यात.

२. इंग्रजाच्या वखारीस मराठयांच्या हवालदार व सुभेदार आदी अधिकाऱ्यांनी मदत

करावी.

३. इंग्रजानी मालाची ने आण करणे, रखवाली करणे यासाठी आवश्यक तेवढयाच माणसाची भरती करावी जास्त करू नये.

४. परस्पराच्या राज्यात व्यापाऱ्याचे चोरापासून संरक्षण करणे.

५. इंग्रजानी आयात मालावर २११% जकात दयावी, निर्यात जकात मुक्त असेल.

६. व्यापाऱ्याच्या कर्जफेडीस आवश्यक ती मदत करणे.

७. मराठयांच्या प्रदेशात कोणत्याही माणसास गुलाम म्हणून विकत घेता येणार नाही.

८. इंग्रजांनी मराठयांची भरकटलेली जहाजे जप्त न करता चौकशी करून ती सोडून दयावी.

९. मराठी कारकून किंवा अधिकाऱ्याच्या सहिचे पत्र असल्यास इंग्रजांनी मराठयांना आवश्यक असणारा माल दयावा लागेल.

१०. इतर ख्रिश्चनाप्रमाणे इंग्रजाकडूनही 'डोईपट्टी' घेतली जाऊ नये.

११. इतर व्यापाऱ्याप्रमाणे इंग्रज व्यापाऱ्यांनाही आवश्यक तेवढया सोई सवलती मिळाव्या.

वरील करारातील कलमाप्रमाणे कलम सात हे अतिशय महत्त्वाचे मानावे लागेल. कारण या कलमाने संभाजीराजांनी भारतातील गुलामांचा व्यापार बंद करण्याचा मोठा क्रांतीकारी निर्णय घेतला, यातून त्यांच्यातिल सुधारकाचा गुण व सामान्य जनतेप्रति असलेला कळवळा दिसून येतो.

**७) मुंबईसाठीच्या तहाची कलमे :–**

कर्नाटकाप्रमाणेच मुंबईकर इंग्रजासंबंधी तीस कलमे ठरविण्यात आली ती पुढील प्रमाणे–

१) या आधिची सर्व भांडणे तंटे विसरूण इथून पुढे उभयतांनी मैत्रि राखावी.

२) जकात देऊन व्यापार करावा

३) चोरापासून व्यापाऱ्यांना उभयपक्षानी संरक्षण दयावे.

४) शिवाजी महाराजांच्या काळात ठरल्याप्रमाणे जकाती देऊन मालाची ने आण करावी.

५) दोघांतील मतभेद विचार विनिमय करूण सोडवावे

६) मुघलाबरोबरील संघर्षात आपसातील माल व माणसे कैद झाल्यास ती परत करावी

७) परकीयाच्या जहाजावरील उभयपक्षाचा माल निशान पाहून सोडून दयावा.

८) इंग्रजांनी आयातीवर २११% जकात दयावी. निर्याति जकात मुक्त असेल

९) राजापूरहून बालाघाटकडे जाणाऱ्या मालावरआदिलशहाप्रमाणे जकात घ्यावी

१०) मराठी राजांतून जकात भरूण माल खरेदी - विक्री करता येईल

११) पोर्तूगिज, डच, इंग्रजाच्या लढाई प्रसंगी मराठे आलिप्त राहतील

१२) हा करार दोन्ही राज्यातील प्रदेशासाठी राहील.

१३) उभयंतानी आपसातील गुन्हेगारांना शरण देऊ नये

१४) आपसातील प्रजेमध्ये काही कलम झाल्यास सुभेदार चौकशी करूण त्याला शासन करेल

१५) मराठी प्रदेशातून मुंबईबेटावर जळावू लाकडे विना जकात पाठविली जातील

१६) राजापूरच्या व्यापाऱ्याकडील इंग्रजाचे येणे ते चौकशी करूण वसूल करूण देण

१७) इंग्रजांनी नागोठाणे व पेण येथे वखारी काढाव्यात व ठरल्याप्रमाणे जकात दयावी

१८) फोर्ट सेंट जॉर्जच्या सातव्या कलमाप्रमाणे.

१९) शिवाजीराजांच्या काळातील राजापूरची बाकी नारळ व सूपारी यांच्या रूपाने इंग्रजांना दिली जाईल

२०) कै. रिचर्ड यांच्या परवानगिनेच इंग्रज व्यापाऱ्यास वखार स्थपू दयावी

२१) फोर्ट सेंट जॉर्जच्या कलम २ प्रमाणे

२२) इंग्रजानी सोने, चांदी, व्याज देऊन फक्त टाकसाळीतील नाणे पाडण्यासाठीच आणावी इतरत्र नाही

२३) फोर्ट सेंट जॉर्जच्या तिसऱ्या कलमाप्रमाणे

२४) फोर्ट सेंट जॉर्जच्या नवव्या कलमाप्रमाणे

२५) इंग्रजाकडे मोठा व महत्त्वाचा प्रश्न असेल तर वकिल पाठविला जाईल

२६) फोर्ट सेंट जॉर्जच्या अकराव्या कलमाप्रमाणे

२७) इंग्रज- सिद्दी संघर्षात संभाजीराजे इंग्रजांना मदत करतील

२८) शिवाजीराजापासून सूरू असलेली इंग्रजाच्या मालावर विक्रिच्या ठिकाणवरूणच जकात घ्यावी इतरत्र नाही हा नियम पाळावा

२९) फोर्ट सेंट जॉर्जच्या दहाव्या कलमाप्रमाणे

३०) इंग्रजांचे शिल असलेली पत्रेच तपासून जाऊ दीली जातील

या करारातील कलमाप्रमाणे उभयतांनी वर्तन करावे यास संभाजी महाराज व इंग्रज यांनी मान्यता दिली.

वरील तहाने इंग्रजांनी सिद्दीस मदत करण्याचे धोरण बाजूला सारले त्यामुळे सिद्दी नमूण गेले. व येथून पूढे त्याने संभाजीराजे असेपर्यंत कधिही मराठी मुलूखावर हल्ला करण्याचे

धाडस दाखविले नाही यावरून हे सिद्द होते की संभाजी महाराजांनी आपल्या शौर्याने व मुत्सदीपणाने इंग्रज व सिद्दी हया दोघांवर अंकूश ठेवला.

## ६.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

१) सिमा विस्तार

२) परकिय शक्तिकडून स्वराज्याच्या स्त्रियांचे रक्षण

३) व्यापारावर नियंत्रण

४) सिद्दीस मराठयांच्या वाढत्या प्रभावाचा धोका

५) दंड राजापूरीवर नियंत्रण आवश्यक आदि मुदयाच्या आधाराने लिहीने

### * स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२

१.१) आरमाराची स्थापना

२) पोर्तुगीजांचे समुद्रावरील वर्चस्व

३) कायमस्वरूपी आर्थिक मदत मिळविणे

४) पोर्तुगीजांची सिद्दीस मदत - आदि मुदयाच्या आधारे लिहीणे.

२.१) शिवाजी पोर्तुगीज संघर्ष या मुद्याच्या आधारे उत्तर लिहीणे.

३.१) शिवाजी- पोर्तुगीजसंबंध या मुद्दयातील उपयुमुदया.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -३

१) शिवाजी महाराज - इंग्रज संबंध (२.२.३) या मुदयाच्या उपमुदयावरून उत्तर लिहीणे.

२) २.२.३ मधील उपयुक्त वरून उत्तर लिहीणे

३) २.२.३ शिवाजी- इंग्रज संबंध यातील खांदेरी बेटावरील संघर्ष.

### * स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -४

१) २.२.४ संभाजी राजे -सिद्दी संबंध या मुदयांच्या आधारे उत्तर लिहीवे.

### * स्वयं- अध्ययनासाठी प्रश्न -५

१) २.२.५ संभाजीराजे - पोर्तुगीज संबंध या मुदयाच्या आधारे उत्तर लिहावे.

### * स्वयं.-अध्ययनासाठी प्रश्न -६

१) २.२.६ संभाजी राजे -इंग्रज संबंध या मुदयाच्या आधारे उत्तरे लिहावे.

## ६.४ सारांश :-

छ. शिवाजी महाराजांची स्वराज्याची सुरक्षितता, आर्थिक संपन्नता, यासाठी स्वराज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील सिद्दीची सत्ता नष्ट करण्याचा भरघोस प्रयत्न केला. यात काही प्रमाणात यशही आले मात्र संपूर्ण उद्दिष्ट पूर्ती झाली नाही. याचे कारण म्हणजे सिद्दीस वेळोवेळी इंग्रज पोर्तूगीज यांनी कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष मदत केली. तरी देखील महाराजांनी मराठी सत्तेचे वर्चस्व समुद्रावर व समुद्रकिनाऱ्यावर बसवून सिद्दीस आपल्या काबूत ठेवण्यात यश मिळविले.

वरील मुद्द्यांच्या विवेचनावरून असे म्हणता येईल की व्यापारी म्हणून आलेल्या पोर्तुगीजांना आपल्या अंकित ठेवून स्वराज्याची पश्चिमकिनारपट्टीवरील सीमा सुरक्षित करून स्वराज्यासाठी कायमस्वरूपी उत्पन्नाचा आर्थिक स्त्रोत निर्माण करावयाचा होता. यासाठी पोर्तुगीजांशी संघर्ष केला व त्यात बऱ्याच अंशी यशही संपादन केले.

वरील करार हा दोन्ही पक्षाकडून वेळ मारून नेण्यासाठी केलेला समझोता होता. असे पुढील काळातल घटनांवरून स्पष्ट झाले.

वरील विवेचनावरून सारांश रूपाने आपणास असे म्हणता येईल की, छ. शिवाजी महाराजांनी पश्चिम किनारपट्टीवरील सागरी युद्धात जगाविख्यात असलेल्या इंग्रजाबरोबर आपले संबंध ठेवताना सुरूवातीस सामंजस्याचा व नंतर जशासतसे उत्तर म्हणून संघर्षाचा मार्ग अवलंबला व शेवटी त्याचा सागरी युद्धात पराभव केला. वास्तविक पाहता छ. शिवाजी महाराजांच्या मागे कोणतेही आरमारी परंपरा नसतांना इंग्रजाचा गर्व नाहिसा करून त्यांना आपल्या दबावाखाली ठेवले. हे छ. शिवाजी महाराजांच्या स्वकर्तुत्वामुळेच शक्य झाले.

संभाजी राजे - सिद्दी यांच्या संबंधाच्या दृष्टीत केलेल्या विवेचना वरून असे म्हणता येईल की छ. शिवाजी महाराजांच्या काळात ज्याप्रमाणे सिद्दीने इंग्रज -पोर्तुगीजाच्या आश्रयाने मराठी प्रदेशावर हल्ले करून तो लुटण्याचा क्रम सुरू ठेवला होता. मात्र छ. शिवाजीराजांप्रमाणे संभाजीराजांनी देखिल सिद्दीच्या कारवायांना आळा बसविण्याचा देखिल प्रयत्न केला. मात्र इंग्रजांची मदत त्याला मिळत असल्याने तो पूर्ण पणे पराजित होऊ शकला नाही.

छ. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजीराजांच्या कालखंडाच्या सूरवातील मराठयांचे - पोर्तूगीजांबरोबरचे संबंध मैत्रीचे रहावे यासाठी उभयपक्षांनी प्रयत्न केले. मात्र हे प्रयत्न वेळ काढू पणाचे होते. त्यामुळे योग्य वेळ येताच उभयतामध्ये पून्हा अंजदीव बेट, चौल, फोंडा, गोवा, आदि ठिकाणी संघर्ष झाले. या संघर्षात निर्णयिक विजय कोणत्याच पक्षाला मिळाला नसला तरी संभाजी राजांना एकाच वेळी मुघलाशी संघर्ष करावा लागला. नसला तर पोर्तुगीजांची शक्ती त्यांनी कायमची संपविली असली हे नक्की मात्र त्याचा अकाली मृत्युमूळे (इ.स.१६८९) हे शक्य होऊ शकले नाही.

छ. संभाजी राजांनी सिद्दीस मदत करणाऱ्या इंग्रजांना आपल्या शक्ति सामर्थ्याच्या व मुत्सदीपणाच्या जोरावर माघार घेण्यास भाग पाडले. शेवटी इंग्रजांना संभाजी राजांच्या

शौर्याची जाण झाली.व जर सुरक्षित व्यापार करायचा असेल तर संभाजी राजाबरोबर सलोख्याचे संबंध ठेवणे जरूरीचे होते. हे ध्यानात आल्यानंतर त्यांनी तह करूण सिद्दीस मदत न करण्याचे आश्वासन पाळले व व्यापाराकडे लक्ष केंद्रीत केले. ज्यामुळे संभाजीराजे असेपर्यंत सिद्दी-इंग्रज याचा उपद्रव शोर्य, मुत्सदीपणामुळेच शक्य झाले.

## ६.५ पारिभाषिक शब्द- शब्दार्थ

गलबते- मराठा कालखंडातील आरमारातील विमान (नौका)

खाडी- समुद्राच्या पाण्याने भरलेला किनाऱ्यावरील नाव

कुमक- साधन सामुग्री

रसद- लढाई प्रसंगी लागणारी साधन सामुग्री

वखार- व्यापाऱ्याची मालसाठविण्याचे ठिकाण (गोदाम)

सराफ- लढाऊ नौका

## ६.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) रविंद्र वामन रामदास- सागरी सत्तेचे संस्थापक छ. शिवाजी महाराज.

२) पवार जयसिंगराव - मराठी सत्तेचा उदय

३) पिसुर्लिक पा.स - पोर्तुगीज - मराठे संबंध

४) देसाई स.र.श - पोतुर्गगीज - मराठा सेबंध

५) पवार जयसिंगराव (संपा) - छत्रपती संभाजीराजे गौरव ग्रंथ.

# घटक ७

# छत्रपती शिवाजींची प्रशासकीय व्यवस्था

**अनुक्रमणिका**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ विषय विवेचन

७.२.१ मुलकी प्रशासन

७.२.२ लष्करी प्रशासन

७.२.३ धार्मिक धोरण

७.२.४ मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील छत्रपती शिवाजींची भूमिका

७.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

७.४ सारांश

७.५ पारिभाषिक शब्द

७.६. संदर्भ ग्रंथ सूची


## ७.० उद्दिष्टे

भारताच्या आणि विशेषत: दख्खन देशाच्या इतिहासात सतरावे शतक हे फार महत्त्वाचे आहे. चैतन्यहीन बनलेल्या आणि संपूर्णपणे परकीयांच्या हुकमतीखाली नांदणाऱ्या या खंडप्राय देशाला स्वत्त्वाची जाणीव करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य छत्रपती शिवाजींनी केले. या स्वराज्याच्या निर्मितीमध्ये ज्यापध्दतीने छत्रपती शिवाजींनी परकियांना पराभूत केले तसेच स्वकीयांना सुध्दा आपलेसे केले. या संपूर्ण संघर्षात त्यांची लष्करी शक्ती अग्रभागी होती तशीच त्यांची मुलकी व्यवस्था आणि त्यांच्या सहिष्णु धार्मिक धोरणाचा सुध्दा या कामी मोठा वाटा होता. त्यामुळेच येथील जनतेला हे राज्य आपलेसे वाटत होते. या सर्व बाबींची पार्श्वभूमी आणि वस्तुस्थिती आपण प्रस्तुत प्रकरणात अभ्यासणार आहोत. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर अध्ययनार्थींना यातून खालील माहिती मिळण्यास मदत होईल.

१. छत्रपती शिवाजींची मुलकी व्यवस्था कशा प्रकारची होती याबाबत जाणून घेता येईल.

२. छत्रपती शिवाजींच्या लष्करी प्रशासन व पध्दतीचे अध्ययन करता येईल.

३. छत्रपती शिवाजींच्या धार्मिक धोरणाचा अभ्यास करता येईल.

४. मध्ययुगीन कालखंडात छत्रपती शिवाजींच्या भूमिकेचा मागोवा घेता येणे शक्य होईल.

५. शिवकाळातील मुलकी, लष्करी व धार्मिक धोरणाची माहिती करून घेता येईल.

## ७.१ प्रस्तावना

शून्यातून स्वराज्य निर्माण करण्याचे असामान्य कार्य छत्रपती शिवाजीनी केले. आपले 'स्वराज्य' हे केवळ 'स्व-तंत्र' राज्य असता कामा नये, तर आपल्या राज्यात सर्वसामान्य जनता सुखी असली पाहिजे अशी छत्रपतींची मनोधारणा होती. त्यामुळेच एकतंत्री राज्यात लोककल्याणाची तळमळ रात्रंदिन मनात बाळगणारा सतराव्या शतकातील महान राजा म्हणून छत्रपती शिवाजींचा उल्लेख करावा लागतो. शिवाजींनी केवळ परकिय सत्तेविरूध्द लढा देऊन स्वराज्याची स्थापना करण्यात धन्यता मानली नाही , तर त्यांनी या स्वकष्टाने निर्माण केलेल्या स्वराज्याला 'सुराज्याचा' दर्जा प्राप्त करून दिला. याकरिता त्यांनी अनेक नवनवीन योजना व कल्पकता त्यासाठी राबविल्या. इस्लामी राजवटींपेक्षा हे राज्य माझे आहे ही भावना त्यांनी लोकांच्या व सैनिकांच्या मनात रूजविली. त्यामुळेच त्यांच्या मुलकी, लष्करी व धार्मिक क्षेत्रातील योजना, कल्पकता व कार्यशैलीला एक वेगळे अधिष्ठान प्राप्त झाले.

## ७.२ विषय विवेचन

### ७.२.१. मुलकी प्रशासन –

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या स्थापने सोबत ज्याप्रमाणे प्रशासकीय व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडवून आणले. त्याप्रमाणे त्यांनी येथील कष्टकरी व शेतकऱ्यांच्या जीवनाचा अभिन्न अंग असलेल्या शेती व्यवसायाच्या विकासातही बदल घडवून आणले होते. शेतकऱ्यांचे दारिद्र्य जाऊन त्यांना सुख समृध्दीचे व सुरक्षित जीवन लाभले पाहिजे, अशी शिवाजींची सुरूवातीपासून धारणा होती. त्यानुसार त्यांनी शेतकऱ्यांना अनेकविध सवलती देण्याचा प्रयत्न केलेला होता. शिवाजींनी त्यांच्या काळात स्वराज्यातील गरीब शेतकऱ्यांना गुरेढोरे व बैल पुरविण्यासोबतच बी – बियाणे आणि वर्षाचे धान्य देण्याची अभिनव योजना सुरू केली होती. इतकेच नव्हेतर शिवाजींनी दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना शेतसारा माफ करून नैसर्गिक आपत्ती सोबत टोळधाड, साथीचे रोग, युध्दातील हानी अशा प्रसंगामुळे जर शेतकरी हवालदिल झाला असल्यास त्यास सर्व प्रकारचे साहाय्य उपलब्ध करून देण्याचा व त्यांचे जीवन सुरक्षित आणि निर्भय बनविण्याचा शिवाजींनी प्रयत्न केलेला होता. आपल्या लष्कराच्या हालचालीमुळे शेतकऱ्यांना काडीचीही तोशीस लागू नये, याबाबतसुध्दा शिवाजींनी आवश्यक काळजी घेतली होती व त्याबाबत आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना अगदी बारीकसारीक सूचना केलेल्या होत्या.

शिवाजींच्या कारकिर्दीत 'जमीन महसूल' हाच उत्पन्नाचा मुख्य आधारस्तंभ होता. शिवाजींच्या काळात महसूल वसुलीच्या दृष्टीने 'स्वराज्य' व 'मोगलाई' असे दोन विभाग होते. स्वराज्य याचा अर्थ शिवाजीच्या ताब्यात असलेला प्रदेश तर मोगलाई म्हणजे परकियांच्या ताब्यात राहून शिवाजींना खंडणी देणारा प्रदेश होय. शिवाजींच्या कारकिर्दीत स्वराज्यातील महसुलाची तीन वेळा मोजणी करण्यात आली होती. शिवाजींच्या बालपणी दादाजी कोंडदेव व नंतर मोरोपंत पिंगळे तद्नंतर अण्णाजी दत्तो यांनी जमिनीची मोजमापणी

करून जमीन महसुलात एकसुत्रीपणा आणण्याचा प्रयत्न केला होता. पूर्वीच्या सोयी, गैरसोयी लक्षात घेऊन त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या होत्या.

### * जमीन मोजण्याची पध्दत –

शिवाजींनी स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून त्यावर सारा ठरविण्याचे कार्य अण्णाजी दत्तो यांच्याकडे सोपविलेले होते. अण्णाजी दत्तोंनी कोंकण भागातील जमिनीची मोजणी करून सारा आकारणी निर्धारीत करत सरकारी दस्त ठरविला होता. त्याच पध्दतीप्रमाणे देशावरील जमिनीची मोजणी व सारा आकारणी ठरविण्याचे कार्यही शिवाजींनी इतर अधिकाऱ्यांच्या मार्फत पूर्ण करून घेतले होते.

शिवाजींनी जमीन मोजणीसाठी ज्या काठीचा वापर केला तिला ‘ शिवशाही काठी ’असे म्हणतात. ही काठी ५ हात व ५ मुठी लांबींची असे. हात हा सात मुठीच्या बरोबर व एक मूठ दोन तनसूंच्या बरोबर असे. वीस चौरस काठ्यांचा एक पांड व २० पांडांचा एक बिघा होत असे. अशा १२० चौरस बिघ्यांचा एक चावर होत असे. मापन पध्दतीमध्ये तसू, हात, काठी, बिघा व चावर अशी पाच चढती परिणामे रूढ होती. या कामी अमीन (मोजणी अधिकारी), काटकर (मोजणीदार) आणि कारकून यांना मासिक वेतन मिळत असे. जमिनीची मोजणी झाल्यानंतर तिची प्रतवारी ठरविली जात असे. त्यानंतर पिकांची पाहाणी करून सारा आकारणी करण्यात येई . ही पध्दती मराठेशाहीत ‘अण्णाजीपंतो धारा ’ या नावानेही ओळखली जाते. शिवाजींच्या काळात महसुलाची वसुली धान्य रुपाने करण्याचा प्रघात होता. वसुलीचे अधिकार पाटील, कुळकर्णी , इत्यादी मुलकी अधिकाऱ्यांना होते. ‘रयतेचा वाटा रयतेस पावे अणि राजभाग आपणास येई ते करणे’ अशा आशयाच्या आज्ञा छत्रपती शिवाजींनी सुभेदारांना दिलेल्या आढळून येतात.

### * जमिनीची वर्गवारी –

छत्रपती शिवाजींनी जमिनीची पाहाणी करून त्या जमिनीची वर्गवारी निश्चित केली होती त्या वर्गवारीनुसार त्यांनी सारा ठरवून दिला होता. शिवाजींनी निर्धारीत केलेल्या जमिनीच्या वर्गवारीचे स्वरुप पुढीलप्रमाणे होते.

१.लागवडीखाली असणारी व लागवडीखाली नसणारी पडीक अशा मुख्य दोन प्रकारात जमिनीची विभागणी करण्यात आली होती. या दोन्हीही प्रकारांचे पुन्हा प्रत्येकी तीन प्रकार करण्यात आले. यापैकी लागवडीखाली असलेल्या जमिनीचे सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन भाग पाडले. पडीक जमीनीचे जंगल व वरकस असे तीन भाग पाडले.

२.लागवडीखाली असणाऱ्या जमिनीचे जिराईत व बागाईत असे दोन भाग पाडण्यात आले होते. यात जिराईत जमिनीमध्ये सर्वसाधारण पिके व बागाईत जमिनीमध्ये फळफळावळ इ.पिके ‘यावीत अशी पध्दत सुरू केली.

३.जमिनीची वर्गवारी करत असतांना त्या जमिनीस मिळणारे पाणी यावरसुध्दा त्याची वर्गवारी निश्चित करण्यात आली होती. यात ज्या जमिनींना कालवा किंवा तळे यांच्याद्वारे पाणी मिळत असे, अशा जमिनींना ‘पाटस्थल ’ जमिनी तर ज्या जमिनींना मोटेच्या साह्याने

पाणी मिळत असे अशा जमिनींना 'मोटस्थळ' अशी संज्ञा देण्यात आली होती. पाटस्थल व मोटस्थल जमिनींसाठी वेगवेगळे आकार असत.

४.जमिनींप्रमाणेच त्यामध्ये होणाऱ्या पिकांच्या मगदुराप्रमाणे सारा आकारण्याची पध्दत सुरू केली होती. घेण्यात येणाऱ्या प्रत्येक पिकाच्या महत्त्वानुसार व पिकाऊपणानुसार कर आकाराणी केली गेली.

शिवाजींच्या काळात जिरायती जमिनीचे मुख्यत: अव्वल (उत्कृष्ठ ) ,दूम (मध्यम) ,सीम (कनिष्ठ). असे तीन प्रकार मानले जात होते तर कोकणात षेरणू , मुरमाड, धुळपट, दरवट इत्यादी नावापरत्वे जमिनीचे काही प्रकार होते.

इ.स. १६७३ मध्ये शिवाजींनी त्यांच्या स्वराज्याचे एकंदर तीन भाग पाडले व या प्रत्येक भागावर एकेक सरकारकून किंवा सरसुभेदार याची नेमणूक केली. या स्वराज्याचे उत्तरेकडील विभाग म्हणजेच साल्हेरपासून पुण्यापर्यंतचा देशावरचा प्रदेश व उत्तर कोकण होय. स्वराज्याचा दक्षिण विभाग म्हणजे दक्षिण कोकण, सावंतवाडी व कारवारचा उत्तर किनारा होय. स्वराज्याचा तिसरा विभाग म्हणजे पूर्व किनाऱ्यावरील पाँडेचेरी, तंजावरचा प्रदेश, वेल्लोर, जिंजी, अरणी इ. होय. या प्रदेशांवर कारभाराच्या सोयीसाठी मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, दत्ताजी वाकनीस या कर्तबगार सेनापती व मुत्सद्दांची नेमणूक केली. वरील तीन विभागांची पुन्हा सुभा, परगणा, तर्फ, कर्यात यात विभागणी केलेली होती. सुभ्यामध्ये साधारणत: एक लाख रुपये महसूल जमा होईल इतक्या प्रदेशाचा समावेश होत असे. या सुभ्याच्या खालोखाल दुसरा महत्त्वाचा महसूल विभाग म्हणजे परगणा होय. परगण्यामध्ये ४० ते ६० खेड्यांचा समावेश होत असे. परगण्यामध्येच तर्फ किंवा कर्यात या सर्वांचा समावेश होत असे. परगण्याप्रमाणेच महाल हा सुध्दा एक महसूल विभाग असे. सर्वात लहान महसूल विभाग म्हणजे तर्फ असे.

शिवाजींनी आपल्या स्वराज्याची मावळ, वाई, सातारा, कराड, पन्हाळा, दक्षिण कोकण, ठाणा, त्रिबंक, बागलाण, वनगड, बिदनूर, कोलार , श्रीरंगपट्टणम, कर्नाटक, वेलोर आणि तंजावर अशा १६ महसूल विभागांमध्ये विभागणी केली होती.

शिवाजींनी महसूल विभागात बऱ्याच सुधारणा केल्या होत्या. त्यापैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे खेडेगावातील पाटील व कुळकर्णी आणि सुभ्याच्या ठिकाणचे देशमुख व देशपांडे यांचे पूर्वापार चालत आलेले वंशपरंपरेचे हक्क कमी केले. या पूर्वापार अधिकाऱ्यांच्या ऐवजी नवे अधिकारी नियुक्त केले. या सर्वांना रोख पगार देण्याची पध्दत सुरू केली व हे सर्व अधिकारी खुद्द छत्रपतींना जबाबदार असतील अशी व्यवस्था केली. मुसलमानी अमदानीत मौजे, परगणा, सरकार व सुभा असे काही विभाग होते. ही नावे बदलून शिवाजींनी मौजे, तर्फ व प्रांत ही नावे कायम केली. तरीसुध्दा पूर्व परंपरेप्रमाणे काही नावे अधूनमधून रुढ होती. या विभागांवरील अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जात असे. उदा: तर्फवरील अधिकाऱ्याला 'हवालदार' म्हणत तर त्याच्या कारकुनाला 'पारिपत्यगार' असे म्हणत. प्रांताच्या अधिकाऱ्याला सुभेदार तर त्याच्या कारकुनांना ' मुख्य देशाधिकारी 'असे संबोधले जात. अनेक प्रांताच्यावर किंवा सुभ्यांच्यावर असणाऱ्या अधिकाऱ्याला सरसुभेदार म्हटले

जाई. सुभेदाराच्या मदतीला दिवाण, मुजूमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जामदार, पोतनिस असे आठ अधिकारी कार्यरत होते.

* **चौथाई –** शिवपूर्व काळापासून प्रबळ राज्यकर्ते दुर्बल राज्यकर्त्यांकडे चौथाईची मागणी करीत. आपल्या राज्याच्या रक्षणासाठी आणि युध्द टाळण्यासाठी दुर्बळ सत्ताधिश चौथाईचे हक्क प्रबळ राजांना देत. ज्या भागातील चौथाईचे (एकंदर महसुलाच्या उत्पन्नाचा १/४ किंवा १/८ भाग) हक्क प्राप्त झाले असतील, तर त्या भागाचे शत्रुच्या हल्ल्यापासून रक्षण करण्याची जबाबदारी राज्यकर्ते स्वीकारत, असे मत न्या.रानडे यांनी व्यक्त केलेले आढळते. परंतु चौथाईच्या हक्काच्या मोबदल्यात संरक्षणाची जबाबदारी प्रबळ राज्यकर्त्यांनी घेण्याची प्रथा नव्हती. शिवाजींनी चौथाईच्या पध्दतीचा पुरस्कार करून सीमेवरील सत्ताधिशांकडून वारंवार चौथाईची मागणी केलेली असल्याचे आढळून येते. स्वराज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी चौथाईचा उपयोग होत असे.

* **सरदेशमुखी –** सुभ्यातील एकुण उत्पन्नाच्या १/१० भागाला सरदेशमुखी असे म्हणत. सरदेशमुखीचे हक्क शिवकालापासूनच अस्तित्वात होते. हे हक्क बजावणारे अनेक सरदेशमुख शिवाजीच्या काळात कोकणात होते. रत्नागिरी जिल्ह्यात प्रभावळी या भागात मावळंगकर हे सरदेशमुख होते. प्रभावळी भाग शिवाजींनी जिंकल्यानंतर मावळंगकरांनी आपले हक्क सुरक्षित राहावेत म्हणून शिवाजींना विनंती केली होती. स्वराज्याच्या स्थापनेनंतर शिवाजींनी सरदेशमुखीचे अधिकार आपल्याकडे घेतले आणि ज्या भागात हा हक्क रूढ होता त्या भागातील १/१० हिस्सा स्वत:कडे घेण्यास सुरूवात केली. सरदेशमुखीचे अधिकार स्वराज्यातील भागापुरते मर्यादित होते.

* **वतनदारी –** यादव कालखंडापासून महाराष्ट्रात वतनदारीची पध्दत रुढ होती. इस्लामी राज्यकर्त्यांनी वतनदारी पध्दतीची जोपासना केली असली, तरी शिवाजींना मात्र वतनदारी पध्दतीपेक्षा वतनदारांच्या वर्तनाचा अतिशय तिटकारा होता. रयतेवरील अत्याचार दूर करण्यासाठी वतनदारीची पध्दत बंद केली पाहिजे, असे शिवाजींला प्रकर्षाने वाटत असे. परंतु ही पध्दती बंद करण्यामध्ये अनेक अडचणी होत्या. पाटील-कुळकर्ण्यांपासून ते देशमुख-देशपांड्यांपर्यंत सारेच लहानमोठे वतनदार होते. याचा अर्थ वतनदारांचा प्रभाव लहान गावापासून ते परगण्यासारख्या मोठया घटकापर्यंत वाढलेला होता. या साऱ्या वतनदारांच्या हक्कांवर शिवाजींनी गदा आणली असती , तर त्यांनी बंड पुकारून शिवाजींच्या स्वराज्य कार्यात मोठा अडथळा निर्माण केला असता. शिवाय शिवाजींने वतने रद्द केली असती तरी आदिलशाही किंवा मुघली भागातील वतनदारांच्या हक्कांना धक्का पोचला नसता. त्यामुळे स्वराज्यातील वतनदार त्यांच्या स्वार्थासाठी परकीय सत्ताधिशांशी संगनमत करतील ही भिती होतीच. त्यामुळे नाईलाजास्तव शिवाजींना त्यांच्या महत्त्वाकांक्षेला मुरड घालणे भाग पडले. वतनदारी पध्दत पुर्णत: बंद करणे त्यांना शक्य झाले नसले तरी शिवाजींनी आज्ञेचे पालन न करणाऱ्या अनेक वतनदारांची वतने रद्द केली होती याचे दाखले मिळतात.

शिवाजींनी त्यांच्या कार्यकाळात वतनदाराच्या बंडखोर आणि जुलूमी प्रवृत्तींना खंबीरपणे आळा घातला होता. वतनदारांनी वाडे वा तटबंदीयुक्त महालांच्या निर्मिती ऐवजी

सामान्य लोकांप्रमाणे राहावे, अशी सक्त ताकीद दिली होती. सभासद लिहितो, 'मुलखात जमीनदार, देशमुख व देसाई यांच्या जप्तीखाली कैदेत रयत नाहीत. यांनी साहेबी करून नागवीन म्हटलियाने त्यांचे हाती नाही.' आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्य लिहितात, 'वतनदार स्नेह आणि दंड या दोहोंमध्ये निक्षून ठेवावे लागतात. आहे वतन ते चालवून प्रजेवर यांची सत्ता असू न द्यावी.' थोडक्यात, छत्रपती शिवाजींनी वतनदारांची मिजासखोरी बंद केली आणि त्यांच्या बंडखोरीला आळा घातला होता.

*** रयतवारी पध्दत** –शिवाजींनी पूर्वीची जमीनदारी पध्दत बदलून नवी रयतवारी पध्दती सुरू केली होती. पूर्वी सरकारला रयतेकडून त्याच्या एकुण उत्पन्नापैकी २/५ उत्त्पन्न मिळत असे. हे उत्त्पन्न त्या संबंधित गावच्या कारकुनाने ठरवून सरकारात जमा करावे. ही रक्कम सुगीच्या दिवसात गोळा करावी अशी पध्दत होती. या पध्दतीत काही दोष होते. ते दोष दूर करण्यासाठी शिवाजींनी रयतवारी पध्दती सुरू केली होती. रयतवारी पध्दतीमध्ये पीक पाहणी एखाद्या व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून न राहाता प्रत्यक्ष पिकांच्या स्थितीवर अवलंबून राहिल्यामुळे रयतेवर जुलूम होत नसे. रयतेला सुध्दा २/५ पेक्षा कमी सारा भरण्याची सवलत देण्यात आली. त्यामुळे स्वराज्यात शांतता व समृध्दी निर्माण होण्यास मदत झाली.

## ७.२.२ शिवाजीचे लष्करी प्रशासन

इतिहासाच्या अध्ययनाने असे लक्षात येते की, कोणत्याही राज्याची लष्करी शक्ती हे त्या राज्याच्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वावर परिणाम करीत असते. त्यामुळेच प्राचीन काळापासून आपली लष्करी शक्ती प्रबळ व सुसज्ज असण्यावर सातत्याने भर दिला जात होता. छत्रपती शिवाजींनीसुध्दा लष्कराचे महत्त्व ओळखले होते. त्यामुळे त्यांनी मोगल वा इतर इस्लामी राजसत्तेच्या लष्कराच्या उणिवांचा अभ्यास करून आपले लष्कर अधिक स्वयंपूर्ण व सुसज्ज करण्याचा प्रयत्न केला होता. या संदर्भात शिवाजींच्या लष्कराविषयी सखोल माहिती घेतली असता त्यात खालील विभागांचा समावेश असल्याचे आढळून येते.

### १. राज्य संरक्षक दल –

स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नास जसजशी गती प्राप्त होत गेली, तसतशी शिवाजींने राजा या नात्याने स्वत:च्या संरक्षणासाठी खास सैन्य ठेवण्याची आवश्यकता वाटू लागली. प्रामाणिक व कार्यक्षम असे सैन्य सदैव जवळ असले पाहिजे असे शिवाजींना वाटू लागले. शिवाजी मोहिमेवर असतांना खास पराक्रम केलेल्या विश्वासु लोकांतून या सैन्याची निवड करीत. हे सैन्य खास पारखून, राजाच्या खास कसोटीस उतरलेले असे. राजांच्या शरीररक्षणाबरोबर राजाची सभा, त्यांचे निवासस्थान व तेथील सर्व प्रकारची व्यवस्था यांचे रक्षण करण्याची जबाबदारी या सैन्यावर असे. याशिवाय प्रत्येक ठिकाणी काही कट, द्रोह घडत नाही ना ? याची जागृत राहून पाहाणी करणे व त्याचे निवारण करणे हे या सैन्याचे मुख्यत: काम असे. शिवाजींच्या संरक्षक दलाकडे बंदुकधारी, भालेकरी, हलकी हत्यारे, तोफखाना इ. प्रकारचे हत्यारबंद लोक होते. या लष्कराबाबत अतिशय करडे नियम असत व त्यांच्या अंमलबजावणीबाबत कसलीही कुचराई किंवा दयामाया दाखविली जात नसे.

खास शरीररक्षकास शिवाजींने अधिक पगार दिलेला होता. राजाच्या खास मर्जीतील त्यामुळे या लष्करास जास्त महत्त्व होते व ते शिवाजींच्या खास कसोटीत उतरलेले असत. राज्य संरक्षक दलातील सैन्याची उपयुक्तता वेळोवेळी लक्षात आली होती. शिवाजींच्या पहिल्या सुरत लुटीच्यावेळी शिवाजींशी वाटाघाटी करण्याच्या निमित्ताने सुरतेचा गव्हर्नर 'इनायतखान'याने शिवाजींकडे एक मारेकरी पाठविला होता व वाटाघाटीच्या ओघात अचानकपणे तलवार उपसून शिवाजींवर वार केला. परंतु शिवाजींच्या दक्ष रक्षकाने मारेकऱ्याचा हात वरच्यावर छाटला. यामुळे छत्रपती शिवाजी सुखरूप बचावले. शिवाजी स्वत:ही अनेक संकटात स्वत:स झोकून देत असत. अशावेळी या रक्षकांचा उपयोग होत असे. इ.स. १६७६ मध्ये गोवळकोंडा येथे शिवाजी महाराज व कुतुबशहा यांच्या भेटीच्या वेळी हजर असलेला डच प्रवासी लिहितो की, 'शिवाजी व सुलतान चर्चा करीत असतांना ती सर्व जागा शिवाजी महाराजांच्या सहा हजार घोडेस्वारांनी वेढून टाकली. ते घोडेस्वार इतक्या हळूहळू आले होते की, एखाद्या माशीचा उडण्याचा आवाज सुध्दा ऐकायला आला असता.' यावरून या रक्षकांची दक्षता तसेच दगाफटका होण्यापासून शिवाजींनी बाळगलेली सावधानता दिसून येते.

**२. घोडदळ**

छत्रपती शिवाजीराजाच्या घोडदळाचे मुख्यत: दोन भाग होते. १) पागा- बारगीर व २ ) शिलेदार, पागा बारगीर म्हणजे सरकारी नोकर असलेला घोडेस्वार. या सैन्याचे घोडे , हत्यारे सरकारच्या मालकीचे असत. याउलट शिलेदाराचा घोडा व हत्यारे त्याच्या स्वत:च्या मालकीची असत. शिलेदाराने काही काळाकरिता सरकारी नोकरी पत्करलेली असे व तेवढ्या वेळापुरता ठरलेला पगार त्याला मिळत असे.

सरकारी घोडे बाळगणाऱ्या बारगीर शिपायांच्या खालीलप्रमाणेच्या श्रेणी होत्या.

| | | |
|---|---|---|
| २५ बारगीर | = | १ हवालदार |
| ५ हवालदार | = | १ जुमला बारगीर |
| १० जुमले | = | १ हजारी बारगीर |
| ५ पंचहजारी | = | १ सरनौबत बारगीर |

पंचहजारीच्या मदतीस एक मुजूमदार, मराठी कारभारी व जमेनीस प्रभू जातीचा अधिकारी यांची नियुक्ती असे तर सरनौबत यालाचा सैन्याचा ' सेनापती ' असे संबोधले जात असे. १२५० शिपायांच्या गटास कारकून , दरबारी व हेरखाते मदतीस असे. या मदतनिसांच्या नेमणुका प्रत्यक्ष सरसेनापतीकडून होत असत. बारगीराप्रमाणेच शिलेदार या शिवाजींच्या दुसऱ्या स्वरूपाच्या घोडदळाचे स्वरूप व रचना होती. प्रत्यक्ष बारगीर व शिलेदार या शिपायांच्या पगाराबाबतची निश्चित माहिती मिळत नाही. मात्र पायदळातील शिपायापेक्षा बारगिरीचा व बारगिरीपेक्षा शिलेदारांचा पगार जास्त असे.

मराठ्यांच्या मोहिमा साधारणपणे पावसाळा संपताच विजयादशमीच्या सुमारास सुरु होत व पावसाळा सुरू होण्यापूर्वी संपत. अगदी क्वचित प्रसंगी पावसाळ्यात युध्दे चालत. साहाजिकच पावसाळ्यात घोडदळासाठी मोठमोठ्या छावण्या असत. या छावण्यांसाठी निवाऱ्याची जागा, पुरेसे धान्य, औषधपाणी, घोडदळासाठी गवत इ. ची तरतूद करून ठेवलेली असे.अशा प्रकारे शिवाजींकडे राजाच्या मालकीचे घोडदळ होते. त्यांच्या सुखसोयी व कार्यक्षमता याबाबत ते विशेष दक्ष होते. पायदळ व पायदळाचे अधिकारी यांचे पगार,

घोडदळ व त्यांचे अधिकारी यापेक्षा कमी होते. तो घोडदळाच्या सरनौबताच्या नियंत्रणाखाली असे. घटनात्मकदृष्ट्या घोडदळाचा सरनौबत प्रमुख व सरस मानला जात होता व त्याचे स्थान शिवाजींच्या अष्टप्रधान मंडळात असे.

**३.पायदळ –**

पायदळ या सैन्याची भरती छत्रपती शिवाजींनी प्रामुख्याने मावळे लोकांमधून केली होती. शिवाजींचा स्वराज्य निर्मितीचे प्रयत्न मुख्यत: सह्याद्रीच्या डोंगरी प्रदेशात सुरू होते व त्या काळी किल्ला अथवा दुर्ग हे त्यांचे संरक्षणाचे महत्त्वाचे साधन होते. डोंगरी प्रदेशात व विशेषत: किल्ल्यांच्या संरक्षणासाठी घोडदळापेक्षा पायदळच जास्त उपयुक्त ठरत होते. त्यामुळे शिवाजींनी काटक, चपळ, शूर व प्रामाणिक मावळे लोकांवर अधिक विश्वास दाखविलेला होता व त्यांना पायदळात मोठ्या प्रमाणात सामावून घेतले होते.

छत्रपती शिवाजींच्या पायदळात अधिकाऱ्यांची पदे पुढीलप्रमाणे होती –

| | | |
|---|---|---|
| ९ सैनिक असलेला | – | नाईक |
| ५० सैनिक असलेला | – | हवालदार |
| १०० किंवा १५० सैनिक | – | जुमलेदार |
| १००० किंवा १५०० सैनिक | – | हजारी |
| ७००० किंवा १०५०० सैनिक | – | सरनौबत |

साधारणपणे एका सरनौबताच्या हाताखाली सातपासून साडेदहा हजारापर्यंत पायदळ सैन्य असे. त्यामुळे त्याला लष्करी व्यवस्थेत मानाचे पद समजले जात असे. शिवाजींनी सरनौबतपदी 'येसाजी कंक' यांची नियुक्ती केली होती. या काळात मोगल व दक्षिणेतील इस्लामी राजवटीचा घोडदळावर अधिक भर होता. मात्र शिवाजींचे कार्य सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांच्या क्षेत्रात व विशेषत: अतिउंच किल्ल्यांच्या संरक्षणासाठी घोडदळाचा वापर शक्य नव्हता. इतकेच नव्हे तर शिवाजींच्या प्रारंभीच्या काळात घोडदळाचा खर्चही परवडणारा नव्हता. त्यामुळे शिवाजींनी पुढे घोडदळ उभारले असले तरी त्यांनी पायदळाच्या उभारणीस प्राधान्य दिले असल्याची माहिती प्राप्त होते.

**४. हत्तीदळ व उंटदळ –**

मोगल सैन्यात हत्तीदल व उंटदलाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असे. यांचा उपयोग मुख्यत: साहित्य वाहून नेण्यासाठी , मोठमोठ्या तोफा वाहून नेण्यासाठी केला जात असे. इतकेच नव्हेतर हत्तीवरील अंबारीत बसून सेनापती युध्दात लढत असे. त्यामुळे हे दळ खर्चाचे असले तरी प्रतिष्ठेचे मानले जात होते. मात्र शिवाजींला या साऱ्या गोष्टी परवडणाऱ्या व मानवणाऱ्या नव्हत्या. गनिमी युध्द हे त्यांच्या युध्दाचे तंत्र होते. त्यामुळे शिवाजींनी हत्तीदळ व उंटदळ यांची वाढ फारशी केलेली नव्हती. पर्यायाने शिवाजींकडे हत्तीदळ फारसे नव्हते. तरी त्यांच्याकडे या दळाच्या दोन तुकड्या होत्या. चिटणीसाने शिवाजींकडे एक हजार उंट व १५०० हत्ती असल्याचे नमूद केले आहे. शिवाजींच्या कालखंडात हत्ती व उंटासोबत बैलांचा सुध्दा वापर केला जात असे.

## ५. हेरखाते –

छत्रपती शिवाजींराजाच्या लष्करी विभागाचा हा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. त्यांच्या हेरखात्यात निरनिराळ्या राज्यांत नेमलेल्या राजदूतांचाही समावेश होता. शत्रु राष्ट्रांची इत्यंभूत माहिती मिळविणे व ती राजाला कळविणे यासाठी विश्वासू, कार्यक्षम लोकांची नियुक्ती केली जात होती. शिवाजींने हेरखात्यातील लोकांच्या नेमणूका कशा केल्या ? त्या दळातील लोकांची संख्या किती होती ? याबाबत फारशी माहिती उपलब्ध होत नाही. मात्र शिवाजीने त्यांच्या कार्यकाळात त्यांच्यापेक्षा संख्याबळाने अनेकपट अधिक असलेल्या शत्रुंवर अनेक नेत्रदिपक विजय मिळविले होते. शत्रुराज्यातील अनेक सधन शहरे लुटली. गुप्तपणे ठेवलेली प्रचंड संपत्ती शोधून काढली. हे सारे त्यांना त्यांच्या कार्यक्षम व प्रामाणिक हेरांच्या कामगिरीमुळे शक्य झाले. शिवाजी स्वत: हेरगिरीत अत्यंत निपुण होते. शिवाजी स्वत: वेश पालटून शत्रुंची माहिती मिळवत असत. याबाबतच्या अनेक आख्यायिका तत्कालीन कागदपत्रांत दिसून येतात.

शिवाजींच्या पदरी 'बहिर्जी नाईक'हा हेरांचा प्रमुख होता. शिवाजींनी इ.स.१६६४ मध्ये पहिल्यांदा सुरत लुटले. त्यावेळी सुरत लुटीपूर्वी बहिर्जी नाईकने सुरत शहराची सर्व माहिती, शहरातील सधन लोक, त्यांच्या संपत्तीचा अंदाज इ.बाबतची माहिती कळविलेली होती. सुरतेस जाण्याचा जवळचा मार्ग शिवाजींनी फकीराचा वेश धारण करून शोधून काढला होता अशी आख्यायिका त्या काळात प्रचालित होती. शिवाजींच्या हेरखात्याच्या कामगिरीबाबत जोसेफ टी ऑलिन्स लिहितो, ''शिवाजी सुरत शहर लुटण्याकरिता येणार आहे, या संदर्भातील वार्ता कोणासही नव्हती. शहर लुटण्याचे कित्येक दिवस अगोदर त्यांनी आपल्या २०० शिपायांना खलाशी व व्यापाऱ्यांचा पोशाख देऊन सुरत शहरात पाठवून दिले होते. या शिपायांनी शिवाजी येण्यापूर्वी तेथील संपत्तीची सर्व माहिती मिळवून ठेवली होती.'' वल्लभ गंगादास नावाचा व्यापारी सुरतेला शिवाजींसाठी हेरगिरी करीत होता, असा उल्लेख इंग्रजी पत्रांतून आढळतो. शिवाजींनी आपल्या सैन्यासह शहरात प्रवेश केल्याबरोबर या शिपायांनी दिलेल्या माहितीच्या आधारे शहराची लूट करण्याचे काम त्यांनी अतिशय थोड्या अवधीत संपविले व अपार संपत्तीची लुट घेऊन ते सुरक्षित स्थळी निघून गेले.

अफझलखानाच्या स्वारीप्रसंगीसुध्दा शिवाजींनी त्यांच्या पायदळाचा पंचहजारी अधिकारी विश्वासराव नानाजी प्रभू मुसेर खोरेकर यास हेरगिरीसाठी नियुक्त केले होते. तो प्रतिदिन फकिराचा वेष घालून अफझलखानाच्या सैन्य तळाची व त्यांच्या युध्दविषयक तयारीची माहिती मिळवित होता. शिवाजींच्या हेराची संख्या वा पगाराबाबत विस्तृत माहिती मिळत नाही. मात्र छत्रपती शिवाजी हेरांना भरपूर पगार देत असे. असा उल्लेख पाश्चात्यांच्या पत्रात आढळतो.

## ६. हत्यारे–

छत्रपती शिवाजींच्या लष्कराकडे तत्कालीन काळातील अत्यंत प्रभावी व कार्यक्षम अशी हत्यारे होती. त्यात तलवार, कट्यार, जमदाडा, पट्टे, भाले, धनुष्यबाण, बिचवे, बंदुका, दगड फेकणारी यंत्रे(गलोल), छोट्या मोठ्या तोफा यांचा समावेश होता. ही हत्यारे

परंपरागत पध्दतीची असल्यामुळे शिवाजींनी पाश्चात्यांकडून प्रगत हत्यारे मिळविण्याचा प्रयत्न केला होता. मात्र इंग्रजांनी शिवाजींना प्रगत हत्यारे देण्याचे टाळले होते. पर्यायाने शिवाजींना पोर्तुगीज व फ्रेंचाकडून चोरटी शस्त्रास्त्रे विकत घ्यावी लागली होती. या बळावरच त्यांनी पुढे तोफा ओतण्याचा व दारुगोळा तयार करण्याचा कारखाना सुरू करण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केला होता. शिवाजींचा 'पुरंदर' येथे तोफा ओतण्याचा कारखाना होता व तेथे पोर्तुगीज, इंग्रज व फ्रेंच अधिकारी कार्यरत असल्याची माहिती प्राप्त होते.

### ७. लष्करी छावण्या

मोगलांचे लष्करी तळ म्हणजे मोठमोठाली शहरे होती. त्यात सर्व प्रकारच्या सुविधा असत. नाच-गाणे, मद्य यामुळे त्यात विलासीपणा येत असे. त्यामुळे एका ठिकाणाहून तळ हलविणे व पुढे जाणे अत्यंत कठीण जात होते. याउलट शिवाजींच्या लष्करी तळाची व्यवस्था होती. शिवाजींच्या लष्करीतळात स्त्रिया, नर्तकी व मद्य यांना प्रवेश नव्हता. त्यांच्या छावणीत फक्त दोन छोटे तंबू असत. त्यातील एक ते स्वत:साठी वापरत व दुसरा त्यांच्या मंत्र्यांसाठी असे. दोन शिपायांमागे तीन घोडे असत. त्यामुळे त्यांना जलद हालचाली शक्य होत असत. शिवाजी आपल्या लष्कराला नियमीत वेतन देत असत. लढाईवर असतांना सैन्याला दाणागोटा व लुटीतील ठराविक भाग त्यांना स्वत:कडे ठेवण्यास परवानगी होती. शिवाजींच्या सैन्यातील बहुतांश सैनिक पावसाळ्यात घरी जाऊन आपली शेती करीत. शिवाजींच्या सैन्याने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कूच करतांना गोरगरीब लोकांना लुबाडणे, खाण्यापिण्याची सोय झाली नाही तर घरे, गावेच्या गावे जाळणे असे प्रकार करण्यास बंदी होती. पर्यायाने त्यांच्या या धोरणामुळे शिवाजींला साहजिकच रयतेची सहानुभूती व स्नेह मिळत असे.

### ८. युध्दतंत्र

शिवाजींच्या उत्तम लष्करी व्यवस्थेबरोबरच त्यांच्या गनिमी तंत्राचा वापर त्यांच्या यशास कारणीभूत होता. याशिवाय त्यांनी शत्रु सैन्यात फूट पाडणे, त्यांची रसद तोडणे, शत्रु वरचढ दिसताच माघार घेऊन अचानकपणे हल्ला चढवून शत्रुचा फडशा पाडणे, या तंत्राचा शिवाजीने वापर केलेला होता. वेळप्रसंगी माघार घेऊन वा स्वराज्याच्या हिताच्या दृष्टीने कधी काळी दोन पाऊल माघारी येण्याची भूमिका त्यांनी स्वीकारलेली होती.

### ९. लष्करी तळ –

शिवाजींच्या सैन्याचे लष्करी तळ उघड्या मैदानावर असत. झाडांच्या सावलीत सैन्य थांबत असे. तंबू, शामियाने यांसारखे अवजड सामान शक्यतो टाळले जात असे. इ.स. १६६४ मध्ये शिवाजींनी सुरतेवर स्वारी केली, त्यावेळी त्यांचा तळ कसा होता याविषयी डच रेकॉर्डमध्ये पुढीलप्रमाणे माहिती मिळते. 'शिवाजी सुरतेबाहेर दोन कोसावर उतरले होते. फक्त त्यांचाच एक शामियाना होता. इतर सर्व अधिकारी उघड्यावर रहात होते.' व्हॉल्कार्ड इव्हर्सन या डचाने शिवाजीच्या लष्करी तळाविषयी लिहिले आहे की, ' शिवाजी तंबूत बसले नसून एका झाडाला एक कापड टांगून सूर्यकिरणांपासून त्यांच्याकरिता आडोसा तयार करण्यात आला होता.' शिवाजींच्या तळाविषयी आणखी एका ठिकाणी माहिती मिळते.

त्यानुसार त्यांच्या सैन्याचे छावणीत कोणत्याही प्रकारचा दिमाख नव्हता, बायका किंवा अवजड सामान हेही त्यांच्या छावणीत नसे. जाड्या - भरड्या कापडाचे फक्त दोन तंबू त्याच्या छावणीत असत. त्यातील  एक त्यांच्या स्वत:साठी व दुसरा त्यांच्या मुख्य प्रधानासाठी वापरण्यात येत असे.

**१०. शस्त्रास्त्रे**

शिवकालातील शस्त्रास्त्रांविषयी बखरी आणि आज्ञापत्रांवरून  काही प्रमाणात माहिती मिळते. त्यात कठारा, जमदाडा, पट्टे, भाले, बाक, बिचवा, सैत्या, टाकण्या, तिरकमाना, तलवारी इत्यादी. यांचा उल्लेख सापडतो. शिवाजींकडे अनेक प्रकारच्या बंदुका होत्या. मात्र या बंदुका आणि आधुनिक प्रकारची शस्त्रास्त्रे संग्रहित व्हावीत, असा शिवाजींचा सातत्याने प्रयत्न होता. याकरिता त्यांनी  इंग्रजांकडे वारंवार मागणी केलेली होती. पुरंदरावर शिवाजींनी तोफा ओतण्याचा कारखाना सुरू केलेला होता असे मिर्झा राजे जयसिंहांनी औरंगजेबास लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते. शिवाजींच्या तोफखान्याविषयी इंग्रजानींही उल्लेख केलेला आहे. शिवाजींनी पोर्तुगीजांच्या धर्तीवर दारूखाना काढलेला होता, असा उल्लेख डॉ.सेन यांच्या लिखाणात सापडतो. या काळात किल्ल्यांच्या तटावर आणि बुरूजावर 'जंबुरे' नावाच्या लहान आकाराच्या तोफा ठेवण्याची प्रथा होती.

**११. आरमार**

इ.स.१६५९ मध्ये छत्रपती शिवाजींनी आरमाराचा पाया घातला. आरमार बांधणीसाठी त्यांनी प्रथम पोर्तुगीजांची मदत घेतली असावी. 'आरमार' हा शब्द मुळात पोर्तुगीजांचा आहे ही गोष्ट लक्षात  घेण्यासारखी आहे. 'गलबत' हा शब्दही पोर्तुगीज शब्दावरून आलेला आहे. शिवाजींने भिवंडी, कल्याण व पनवेल या ठिकाणी लढाऊ जहाजे बांधली होती. इ.स. १६६५ मध्ये शिवाजींजवळ  ८५ लहान व ३ मोठी गलबते असल्याचा उल्लेख सापडतो. तर इ.स.१६६६ मध्ये शिवाजीचे आरमारी सामर्थ्य इतके वाढले होते की, इंग्रजांना त्यांच्या सामर्थ्याची भीती वाटू लागली होती. इ.स. १६७० मध्ये शिवाजींच्या आरमारी ताफ्यात गुराव, गलबत, तिरांडी, तारू, पगार, पाल, मचवा अशी जवळपास १६० जहाजे असल्याचा उल्लेख सापडतो.

सभासदांच्या मते, शिवाजींच्या आरमारात एकंदर ४०० जहाजे होती. दर्या सारंग आणि मायानाक या दोन अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली प्रत्येकी २०० जहाजांचे आरमार होते. सिद्दींचा पाडाव करण्यासाठी शिवाजींनी आरमारी सामर्थ्य वाढविले असे सभासद सांगतो. आरमाराचे सुभे केलेले असून प्रत्येक सुभ्यात पाच गुराबा व पंधरा गलबते असत. मालवणचा सिंधुदुर्ग हे शिवाजींच्या आरमाराचे मुख्य केंद्र होते.

व्यापारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य आरमाराने कसे करावे याबाबत आज्ञापत्रात तपशीलवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. आरमाराच्या बांधणीसाठी लाकडाची अत्यंत आवश्यकता असल्याने अमात्यांनी स्वराज्यातील झाडांचे लेकराप्रमाणे संवर्धन व संरक्षण करावे असे लिहिले आहे. मात्र शिवाजींइतके आरमाराचे महत्त्व मध्ययुगातील इतर भारतीय राज्यकर्त्यांना उमगले नव्हते हे दुर्दैवच मानावे लागेल. शिवाजींनी पाश्चात्य जलचरांचे उपद्व्याप ओळखले होते. हे शिवाजींच्या दूरदृष्टीचे द्योतकच  होते.

आरमाराचे महत्त्व विशद करताना अमात्य लिहितात, 'आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. असे ज्यास अश्वबल तसी त्याची वृध्दीप्रभा आहे. तद्वतच ज्या जवळ आरमार त्याचा समुद्र.' आरमाराविषयी आज्ञापत्रात स्वतंत्र प्रकरण असून जहाजे कशी असावीत, जहाजे बांधण्यासाठी कोणते लाकुड वापरावे, नाविक युध्दाच्या वेळी कोणती दक्षता घ्यावी, आरमारी छावणी कशा प्रकारची असावी याविषयी माहिती तपशीलाने दिलेली आहे.

* **लष्करी शिक्षण –** छत्रपती शिवाजी हे मध्ययुगातील असे एकमेव राजे होते की, ज्यांनी आपल्या लष्कराला नियमीत लष्करी शिक्षण दिले होते. यापूर्वी व नंतरच्या काळातही असे फारसे प्रयत्न झालेले दिसत नाही. त्यांच्या लष्कराची कार्यक्षमता, निपुणता यावरून शिवाजींनी शिपायांना लष्करी शिक्षण देण्यासाठी विशेष परीश्रम घेतले असावे मात्र या संदर्भात फारशी माहिती उपलब्ध नाही.

लष्कराचे महत्त्व विशद करताना अमात्य लिहितात, 'स्वशौर्य-पराक्रमाचे प्रकटीकरणाचे साधन व सैन्यादी देशदुर्गाचे संरक्षणाचे आदिकारण ते हुजरात (लष्कर) आहे.' जलद आणि परिणामकारक हालचाली करता येणे शक्य व्हावे या हेतूने शिवाजींनी आटोपशीर असे सेनादल उभारले होते. अष्टप्रधानांपैकी पंडितराव आणि न्यायाधिश हे प्रधान सोडल्यास इतर सर्व प्रधानांनी युध्द शास्त्र पारंगत असले पाहिजे, असाही शिवाजींचा दंडक होता.

* **लष्करनीती –** छत्रपती शिवाजी हे जन्मजात लष्करी नेते होते. त्यांनी युध्दकाळात एकमुखी नेतृत्वाची निकड ओळखलेली होती. त्यामुळेच त्यांच्या लष्कराची वाढ होताच त्यांनी लष्कराची योग्य नियमीत निश्चिती केलेली होती. यासंदर्भात सभासद बखरीत शिवाजींच्या लष्करनियमीत संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मिळते– 'लष्करात बायको व बटीक व कलावंतीण नसावी, जो बाळगील त्याची गर्दन मारावी, परमुलूखात पोरे-बायका न धरावी... कोणी बदअमल न करावा.' आपल्या सैन्याकडून रयतेला काडीचीही इजा होता कामा नये अशी शिवाजींची तळमळ होती.

हलवर्णे ता. चिपळूण येथे मुक्कामी असलेल्या लष्कराला शिवाजींनी पत्र लिहिले होते. त्यावरून शिवाजींना कोणती लष्करनीती अपेक्षीत होती याची कल्पना येते. या पत्रातील काही वाक्ये पाहा – ' कोण्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाही...लोक जातील, कोण्ही कुणब्याचे येथील दाणे आणील, कोण्ही भाकर , कोण्ही गवत... ऐसे करू लागलेत म्हणजे जो कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील. कितेक उपाशी मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसे होईल की, मुघल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही... ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास मराठीयांची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैसा ?' अशी उज्ज्वल आणि निकोप लष्करनीती शिवाजींनी घालून दिलेली होती. या लष्करनीतीला त्यांनी 'मराठियांची इज्जत' हे अतिशय समर्पक नाव दिले होते.

अमात्यांच्या आज्ञापत्रात लष्करविषयक धोरणासंबंधी एक स्वतंत्र परिच्छेद आहे. लष्करामध्ये कोणत्या प्रकारचे लोक नसावेत याचे उत्तम मार्गदर्शन अमात्यांनी केले आहे.

शिवाजींचे धोरण तेच होते यात शंका नाही. अमात्य लिहितात, 'तऱ्हेवाईक, शेरखोर, अमर्याद, बालभाष्य, व्यसनी, कुचोद्य, कुचाळ्या करणारा व एका धन्यापासून हरामखोरी करून आला असेल, असे लोक हुजरातीत एकंदर ठेवून नयेत.'

लष्करी कामात एखाद्या अधिकाऱ्याने कुचराई जर केली तर त्याची गय केली जात नसे. तो अधिकारी ब्राह्मण असला तरी त्याचा मुलाहिजा बाळगला जात नसे. लष्करातील नोकरांना नियमित आणि भरपूर वेतन देण्याची प्रथा शिवाजींनी सुरू केली होती. अश्वदळातील शिपायांना अधिक पगार होता. प्रत्येक स्वारास २ होन पगार मिळत असे. शिवाजी सैन्यावर विलक्षण प्रेम करीत असे. युध्दात कामी आलेल्या शिपायांच्या कुटुंबांसाठी नेमणूक करून दिली जात असे. लष्करातील शिपायांनी शिवाजीं वर जीवापेक्षा अधिक प्रेम केले याची साक्ष अनेक ऐतिहासिक प्रसंगांवरून कळते.

शिवाजींच्या घोडदळात व पायदळात विविध अधिकाऱ्यांची जी श्रेणी निर्माण केली गेली होती. त्यामुळे लष्कारात एकसुत्रीपणा निर्माण झाला होता. कार्यक्षमता दाखविल्यास बढतीची शाश्वती होती. दक्षिणेतील मुस्लिम व उत्तरेकडील मोगल बादशाहीमध्ये मुलकी व लष्करी अधिकारी वंशपरंपरेने नेमले जात. त्यांचे पगार पर्यायाने त्यांचे वतन त्यांच्या लष्करी श्रेणीवर अवलंबून असे. मुलकी सेवा, लष्करी सेवा यांची फारकत नव्हती. शिवाजींनी या दोन सेवा स्वतंत्रपणे निर्माण केल्या. मुस्लिम सत्तांत त्यांच्या सेवकांचे पगार निश्चित व अनियंत्रित मिळण्याची तरतूद नव्हती. शिवाजी लष्कराच्या नियमीत व निश्चित रोख पगाराबाबत अत्यंत दक्ष होते ही बाब सुध्दा लक्षात घेण्याजोगी आहे.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ :**

अष्टप्रधान मंडळ हे शिवाजीच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे अंग होय किंवा वैशिष्ट होय. स्वराज्याचा कारभार व्यवस्थित चालावा म्हणून शिवाजीने या अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली.

**अष्टप्रधान मंडळाची निर्मिती :**

शिवाजीची ही अष्टप्रधान मंडळाची निर्मिती कशी झाली म्हणजेच ही अष्टप्रधान मंडळाची पद्धती शिवाजीने कोठून घेतली. कोणापासून घेतली । बाबतीत आपणास इतिहासकारात मतभेद दिसतात. शिवाजीने अष्टप्रधान मंडळाची कल्पना रामायण, महाभारत, मनुस्मृती आणि शुक्रनीति यांच्यापासून घेतली असावी असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. शिवकाळात शुक्रनिती जास्त परिचीत होती. या शुक्रनीतित १० मंत्री सांगितले आहे आणि त्यात पूरोहिताला महत्वाचे स्थान आहे. इतिहासकार वा. कृ. भावे यांनी ''शिवराय आणि शिवकाल'' या आपल्या ग्रंथात शिवाजीने अष्टप्रधान मंडळ शुक्रनीतिच्या आधारे केले असे मत मांडले आहे.

सर यदूनाथ सरकार या मराठ्यांच्या खंदया इतिहासकाराने असे नमूद केले आहे की, अष्टप्रधान मंडळाच्या पद्धतीची सुरूवात राज्याभिषेकांनंतर झाली असे नव्हे तर, शिवाजी १२ वर्षाचा असतांनाच शहाजीने त्याची पुण्याच्या जहागीरीवर रवानगी केली तेव्हा दादोजी कोंडदेवाच्या मदतीला पेशवे, मुजूमदार, डबीर, आणि सबनीस असे चार अधिकारी दिले

होते. त्या वेळेपासून अष्टप्रधान मंडळ पद्धत सुरू झाली. दादोजीच्या देहांतांनतर शिवाजी स्वतंत्रपणे कारभार पाहू लागला. तेव्हा त्याने १६४७ सरनौबत, आणखी एका अधिकाऱ्याची भर घातली. १६५६ जावळी विजयानंतर सुरनिस व वाकनिश हे दोन अधिकारी नेमले. आग्र्याहून परत आल्यावर १६६७ मध्ये मुख्य न्यायाधिशाचे नविनपद तयार केले. अशाप्रकारे अष्टप्रधान मंडळ निर्मितीची क्रिया राज्याभिषेकाच्या वेळीपर्यंत पूर्ण झाली आणि शिवाजीच्या मृत्यूपर्यंत हे मंडळ अस्तित्वात होते.

एकंदरीत या दोन्ही मतांचे अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीच्या दृष्टिकोनातून आपण सातत्याने विचार केला तर, आपणांस हे स्पष्ट दिसते की, शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाची निर्मिती आणि वाढ स्वराज्याच्या अस्थापने बरोबर व विस्ताराबरोबर होत होती. कारण शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळी हे अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते ते एकदम तयार झालेले होते. त्यांची संख्या देखील जसजसी स्वराज्याची वाढ होती गेली तस तशी वाढत गेली. यात अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीचा इतिहास सन १६४४ इतका पाठीमागे जातो. त्यावर्षी बंगलोरहून शिवाजी यांची शहाजीने पुण्याच्या जहागीरीवर नेमणूक केली. तेव्हा पेशवा म्हणून शामराव निळकंठ, मुजूमदार म्हणून बाळकृष्णपंत हनमंते, डबीर म्हणून सोनोपंत आणि सबनिस म्हणून रघुनाथ बल्लाळ या चार अधिकाऱ्यांची नेमणूक करून शिवाजी बरोबर शहाजीने पाठविले होते. दादोजी कोंडदेव हा कारभारी होता आणि हे चारही अधिकारी दादोजी व शिवाजी यांना राज्यकारभारात मदत करीत होते. पुढे दादोजीच्या देहांतानंतर १६४७ मध्ये शिवाजीने काही काळ तुकोजी योर याला आपला सरनौबत (सेनापती) म्हणून नियुक्त केले. पण अल्पकाळात त्या जागेवर मानकोजी दहातोंडे यांची नेमणूक केली. अशाप्रकारे सरनौबत हे पद अष्टप्रधान मंडळात आले होते. जावळी विजयांनतर छत्रपती शिवाजीने आपल्या अष्टप्रधान मंडळात बदल केले. निळोसोनदेवला सुरनिस (सेक्रेटरी-सचीव). गंगाजी मंगाजीला-वाकनिस, येसाजी कंकला-पायदळाचा मुख्य सेनापती व नेताजी पालकरला- सेनापती म्हणून नियुक्त केले होते. इंग्लंडमध्ये जशी लोकशाही हळूहळू विकसीत होत गेली. रूढ्या, परंपरा आणि रितीरिवाज यांच्या विचारात जसजसा काळ बदलत गेला तस तसे इंग्लंडमध्ये जशी लोकशाहीचा विकास होत गेला. म्हणून इंग्लंडची राज्यघटना अलिखत आहे तसेच शिवाजीचे अष्टप्रधान मंडळ हे अलिखीतरित्या निर्माण झाले आहे आणि जसजसे स्वराज्य वृद्धिंगत होत गेले परिस्थितीनुसार जशी जरूर पडली तस तशा शिवाजीने अष्टप्रधान मंडळाच्या जागा निर्माण केल्या.

जावळी विजयानंतर अष्टप्रधान मंडळात भर टाकली व बदल केले. पण त्यानंतर शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाचा इतिहास तुटक तुटक स्वरूपात आहे. मिर्झा राजा जयसिंग शिवाजीवर १६६५ मध्ये स्वारी करून आला त्यावेळी रघुनाथपंत कोरडे यांस पंडीतराव म्हणून शिवाजीने आपले वकील या नात्याने नेमणूक केली व आपला वकील म्हणून जयसिंगाकडे पाठविले. म्हणजेच दुसऱ्या शब्दात पंडीतराव हे पद त्यावेळी निर्माण झाले होते.

**अष्टप्रधान मंडळाची कामे :-**

शिवाजीच्या राज्यारोहन प्रसंगी त्याच्या अष्टप्रधान मंडळात पुढील प्रधान होते.

| पद | प्रधानाचे नाव |
|---|---|
| १) पेशवा | मोरो त्रिंबक (मोरोपंत) |
| २) मुजूमदार (अमात्य) | नारो निळकंठ आणि रामचंद्र निळकंठ |
| ३) सरनौबत (सेनापती) | हंबीरराव मोहिते |
| ४) सुरनिस (सचिव) | अण्णाजी दत्तो |
| ५) वाकनिस ( मंत्री) | दत्ताजी त्रिंबक |
| ६) पंडीतराव (दानाध्यक्षक) | रघुनाथ पंत |
| ७) सुमंत (डबीर) | रामचंद्र त्रिंबक |
| ८) न्यायाधिश | निराजी रावजी |

यांची कामे आणि कर्तव्ये आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. पेशवा : पेशवा म्हणजे मुख्य प्रधान होय. छत्रपतीच्या खालोखाल पेशव्याचे अधिकार होते आणि त्याची मुलकी व लष्करी खात्यावर देखरेख रहात असे. छत्रपतीच्या गैरहजेरीत राज्याच्या प्रमुख या नात्याने पेशवा कारभार पाहात असे. राज्यातील सर्व अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवून त्यांच्याकडून एक दिलाने कार्य करून घेत असे. सरकारी खलीत्यांवर आणि फर्मानावर छत्रपतींच्या शिक्का मोर्तबाबखाली याचा मोर्तब रहात असे. मल्हार चिटणीस याने लिहिलेल्या ''शिव छत्रपतीचे सप्त-प्रकारात्मक चरित्र'' या पुस्तकात पेशव्याचे स्थान राज्यकारभारात किती उच्च हे सांगितले आहे. सर्व सरदार आणि सेना यांच्यावर पेशवा देखरेख ठेवत असे आणि त्याला सालीना (दरवर्षी) १५००० हजार होन वेतन मिळत असे.

२. मुजूमदार (अमात्य) : राज्याच्या उत्पन्नाचा व खर्चाचा मोठ्या बारकाईने तो जमाखर्च पाहत असे. मोठ्या बारकाईने सर्व लष्करी आणि मुलकी खात्याचे आणि किल्ल्याचे हिशोब त्याला पहावे लागत. प्रांतातील सर्व जमाखर्चाच्या नोंदी त्याच्याकडे तपासण्यास येत. राज्यकारभारातील कोणत्याही खात्यास पैसा हवा असल्यास त्याला अमात्याची मंजूरी हवी होती म्हणूनच त्याचे काम जोखमीचे होते. रामराव चिटणीसाने आपल्या सहा प्रकरात्म चरित्रात अमात्याचे स्थान किती जोखमीचे होते आणि आर्थिकदृष्ट्या किती जबाबदारीचे होते हे स्पष्ट सांगितले आहे. अमात्याला दरसाल १२ हजार वेतन मिळत असे.

३. सरनौबत (सेनापती) : हा मराठा राज्याचा लष्करी प्रमुख असून त्याला लष्कराची सर्व व्यवस्था पहावी लागत असे. सरनौबत दोन प्रकारचे असत १) घोडदळाचा २) पायदळाचा पण पायदळाच्या सरनौबतापैक्षा घोडदळाचा सरनौबत याला जास्त अधिकार असलेले दिसतात. कारण पायदळाच्या सरनौबताला अष्टप्रधान मंडळात जागा राहत नसे. सरनौबताला युद्धप्रसंगी सर्व सैन्य जय्यत तयार ठेवावे लागत असे अणि रणागंणावर ज्यांनी मर्दानी झुंज दिली, सामाजिकपणे सेवा केली किंवा विशेष कामगीरी बजावली त्यांना वेतन अथवा बक्षीस छत्रपतीकडे निवेदन देऊन मिळवून देण्याचे काम देखील सरनौबताला करावे

लागे. याबद्दल 'सहा प्रकरणात्मक चरित्रात' मल्हार चिटणीसाने माहिती नमूद केली आहे.

४. सुरनिस (सचिव) : तो सरकारी दप्तरावर देखरेख ठेवी. स्वराज्यातील निरनिराळ्या प्रांताचे अधिकारी लष्करी अंमलदार व किल्लेदार यांच्याकडून येणारी पत्रे आणि सरकारकडून त्यांना द्यावयाची, इनामपत्रे व सनदा यांच्या नोंदी ठेवायच्या इत्यादी सरकारी दप्तरांची निट पाहणी करण्याची जबाबदारी सचीवावर रहात असे. त्याच्या शिक्क्यावाचून कोणत्याच सरकारी कागद किंवा खलीता/मुलकी अथवा लष्करी अंमलदाराकडे जात नसे. इतिहासकार कृ.अ.केळूसकर यांनी आपल्या ''छत्रपती शिवाजी महाराज'' या ग्रंथात सचिवाची कामगीरी चांगली सांगीतली आहे.

५. वाकनिस (मंत्री) : याच्याकडे खाजगीकडील व्यवस्था रहात असे. राज्याची दैनंदिन कृत्ये, राजाचे भोजन, राज्याचे आमंत्रण इत्यादी व राज्याला आवश्यक असणाऱ्या पदार्थांच्या व वस्तूंच्या पुरवठ्याचा विचार करणे, राजपत्रावर देखील त्याला चिन्ह करावे लागत असे आणि ते (संमत) असे रहात असे. स्वराज्यातील १८ कारखाने, १२ महल, हुजुरपागा व जिलेबची पायदळ यांचा बंदोबस्त मंत्र्याला करावा लागे. त्याचप्रमाणे खाजगीचे दप्तर आणि पत्रव्यवहार यावर तो देखरेख ठेवत असे.

तोच राजाचा गुप्त पत्रव्यवहार, राजाला भेटण्यास येणारी मंडळी व परदरबारातील वकील यांच्या वर कडक नजर ठेवत असे. आपल्या सहा प्रकरणात्मक चरित्रात वाकनिसाची कामगिरी सांगितली आहे.

६. पंडितराव (दानाध्यक्ष) : स्वराज्यातील सर्व धार्मिक बाबींवर याचा अधिकार चालत असे. म्हणजे त्याच्याकडे सर्व धर्माधिकार होते. छत्रपतीला वेळप्रसंगी शास्त्रर्थक विवेचन करीत असे. जाती-जमातीचे निवाडे करीत असे. विद्वान व साधु पुरुषांचा आदर सत्कार करीत असे. याशिवाय फौजदारी खटल्यात धर्मशास्त्राप्रमाणे न्यायनिवाडा केला जातो किंवा नाही हे पाहण्याचे काम तो करत असे आणि एखाद्याने धर्मबाह्य आचरण केल्यास त्याला काय शिक्षा करावी ते तो ठरवत असे. चिटणीसाने आपल्या 'सहा प्रकरणात्मक चरित्रात' पंडित रावाची कामगिरी सांगीतली आहे.

७. सुमंत (डबीर) : सुमंत म्हणजे स्वराज्याचा परराष्ट मंत्री याला डबीर म्हणत. परराज्याशी होणाऱ्या पत्रव्यवहारांवर देखरेख ठेवणे, परराज्याशी युद्ध किंवा तह याबाबतीत छत्रपतीला सल्ला करणे, परराज्यातील माहिती उपलब्ध करणे व परराज्याच्या वकीलाशी वाटाघाटी करणे तसेच परराज्याकडून येणारे खलीते, जासूद व परराज्याकडे सरकारातून जाणारे खलीते आणि जासूद यांच्यावर देखरेख ठेवण्याचे काम त्याला करावे लागे.

८. न्यायाधिश : न्यायाधिश स्वराज्यातील प्रजेला दिवाणी व फौजदारी दोन्ही खटल्यात जनतेला कायद्यानुसार व निपक्षपातीपणे न्याय मिळतो किंवा नाही याच्यावर देखरेख ठेवत असे. ओज सभा किंवा सरकारी अधिकारी यांनी दिलेला न्याय अन्यायकारक वाटल्यास लोकांना केंद्र सरकारकडे अपिल करता येत असे. अशावेळी त्या अर्जाचा योग्य विचार करून निर्णय देण्याची जबाबदारी न्यायाधिशावर राहत असे. जमीनीचे हक्क व ग्रामाध्यक्षकांचे हक्क इत्यादी संबंधिचे निकाल त्याच्या सहीने जाहिर केले जात.

पेशवा आणि मुजूमदार यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व प्रधानांना १०हजार होन वार्षिक वेतन दिले जात असे. शिवाजीने आपल्या अष्ट प्रधानांना जहागिऱ्या दिल्या नाहीत तर, प्रत्येकाला रोख वेतन दिले. शिवाजी माणसांची योगरित्या पारख करीत असे त्यामुळे अष्टप्रधान मंडळातील त्याचे सर्वच प्रधान खरोखरच योग्य, कार्यक्षम, निष्ठावान व निष्णात होते. त्यांच्या प्रधानांवर त्याचा जसा पूर्ण विश्वास होता तसाच प्रधानांचाही त्याच्यावर होता. जर एखादा प्रधान अकार्यक्षम वाटला उधम वाटल तर त्याची हकालपट्टी शिवाजी करीत असे. पेशवा महादेव आणि सरलष्कर नेताजी पालकर यांच्याकडे याबाबतीत आपणांस अंगूली निर्देश करता येईल. परंतू, असे अपवाद सोडले तर आपल्या अष्टप्रधान मंडळात शिवाजीने फारसे बदल केले नाही. त्याच्या या अष्टप्रधान मंडळातील जागा वंश परंपरागत नव्हत्या ही वंश परंपरागत जागा देण्याची पद्धती नंतरच्या काळात राजाराम व पेशव्यांच्या अस्तित्वात आलेली दिसते. शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे फक्त पंडीतराव आणि न्यायाधिश हे जर सोडले तर सर्व प्रधानांना लष्करी मोहिमेचे नेतृत्व करावे लागे आणि प्रसंग पडल्यास शत्रूशी युद्ध करावे लागे. यामुळे शिवकालात मोरोपंत पेशवा व अण्णाजी दत्तो यासारख्या प्रधानांनी अनेक वेळा लष्करी मोहिमा काढल्याचे दिसते. शिवाजीचे हे अष्टप्रधान मंडळ शिवाजीला राज्यकारभाराच्या बाबतीत सल्ला देत. परंतु, प्रधानांनी दिलेला सल्ला शिवाजीला बंधनकारक नव्हता. या शिवाय प्रधानाच्या हाताखाली जे अधिकारी असत तयांची निवड छत्रपती करीत असे. या प्रधानाकडे जर एखाद्या मुलूखाचा कारभार सोपविला गेला तर तो त्यांना पहावा लागत असे. मोरोपंत पेशवा, अण्णाजी दत्तो आणि दमाजी पंत यांची सर सुभेदार म्हणून शिवाजीने नेमणूक केलेली आपणांस दिसते. अष्टप्रधान मंडळाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या सर्व प्रधानांवर स्वराज्याच्या कारभाराची संयुक्त जबाबदरी होती.

काही इतिहासकारांनी शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाची आधुनिक लोकशाहीच्या मंत्री मंडळाशी तुलना केली आहे. पण ते चुकीचे आहे कारण, शिवाजीचा राज्यकारभार हा अनियंत्रीत राजशाहीचा होता. त्याचे प्रधान नियुक्त होते शिवाय जर त्याच्या प्रधानांच्या बाबतीत जनतेला अविश्वास वाटल्यास ते पदावरून काढले जात नव्हते आणि त्याचे छत्रपतीचे प्रधान त्याला जबाबदार राहत पण आधुनिक लोकशाहीचे मंत्री मंडळातील मंत्री हे जनतेकडून निवडलेले असतात. या मंत्री मंडलावर लोक प्रतिनिधीने अविश्वास व्यक्त केल्यास त्यांना मंत्री मंडळातून राजीनामा द्यावा लागतो आणि मंत्रीमंडळ लोकप्रतिनिधीला जबाबदार असते.

असे असले तरी, शिवाजीच्या या अष्टप्रधात मंडळाचा विचार केला तर, या अष्टप्रधान मंडळाद्वारा शिवाजीने जागतिक आणि लोककल्याणकारी कारभार केलेला आपणांस दिसून येतो.

## ७.२.३. धार्मिक धोरण –

छत्रपती शिवाजींनी त्यांच्या लष्करी नीतीएवढेच धार्मिक धोरणाला सुध्दा महत्त्व दिले होते. धर्म हा प्रत्येकाचा श्रध्देचा, आत्मियतेचा आणि जीवनावर विश्वास दर्शविणारा भाग असल्यामुळे शिवाजींनी त्यांच्या कार्यकाळात या गोष्टीचा योग्य आदरभाव बाळगलेला

होता. भारतीयांच्या सांस्कृतिक मूल्यांची जोपासना झाली पाहिजे, बहुसंख्यांकांचा धर्म म्हणजे हिंदूधर्म सुरक्षित आणि निर्भय राहिला पाहिजे, हिंदूंच्या श्रध्दास्थानांना धक्का लागता कामा नये, धर्मप्रसारक, साधू आणि संत यांना निर्भयपणे भूमीवर संचार करता यावा, अशी शिवाजींच्या धार्मिक धोरणाची बैठक होती. त्याचबरोबर परधर्माचा योग्य तो आदर राखला पाहिजे, अल्पसंख्याकांच्या धर्माला, धर्मस्थानांना आणि धर्मपुरोहितांना सुरक्षितता लाभली पाहिजे याबाबतही छत्रपती शिवाजींचा कटाक्ष होता.

छत्रपती शिवाजींनी मंदिरे बांधण्यास उत्तेजन दिलेले आढळून येते. त्यांनी रायगडावर जगदिश्वराचे भव्य मंदिर बांधून यात्रेकरूंच्या सोयीसाठी एक ओवरीवजा धर्मशाळा बांधली होती. याशिवाय इ.स. १६६८ मध्ये त्यांनी गोवे भागातील भतग्रामातील नारवे येथे सप्तकोटीश्वर मंदिराचा जीणोध्दार केला होता. या मंदिराच्या महाद्वारावरील शिलालेखच या गोष्टीची साक्ष देतो. याबाबत शिवाजींनी त्यांच्या आजोबा मालोजींचे ध्येय धोरण पुढे चालविले असे म्हणावे लागेल. शिवाजींनी प्रतापगडाची निर्मिती केल्यानंतर तेथे तुळजाभवानीची प्रतिष्ठापना केली होती ही बाब सर्वश्रृत आहे. इतकेच नव्हेतर शिवाजींनी दक्षिणेच्या स्वारीत जिंजीच्या शिवमंदिराची पुनर्स्थापना करून कार्तिक महिन्यात दीपोत्सव सुरू केला अशी माहिती नारायणम नावाच्या दक्षिणी व्यक्तीने तामीळ भाषेत लिहून ठेवलेली आढळून येते.

शिवाजींनी अनेक साधू संतांना इनामे अणि वर्षासने दिलेली होती. पाटगावच्या मौनीबाबांच्या दर्शनासाठी शिवाजी इ.स. १६७९ मध्ये गेले त्यावेळी त्यांनी तेथील पुराणिक व इतर दोन सेवेकऱ्यांना १८ होनांचे वर्षासन दिले असल्याची माहिती मिळते. अशाच प्रकारची वर्षासने त्यांनी पुळे येथील' श्रीधर भट, जालनापूरच्या तान पाठक, आणि दक्षिणेच्या स्वारीच्या वेळी तिरूपती येथील वेदमूर्ती पुरूषोत्तम भट यांना दिलेली होती. चिंचवडकर गोसावींना शिवाजींकडून सनद मिळालेली होती. वाराणसीच्या बालकराम तिवारी यांनाही इ.स. १६६५ मध्ये शिवाजींनी सनद दिलेली होती. विशेष म्हणजे पुणे परगण्यातील हवेलीच्या काजींची सनद इ.स.१६५६ मध्ये पुन्हा सुरू करून शिवाजींनी आपल्या सहिष्णु वृत्तीचे वेगळे उदाहरण निर्माण केले होते. शिवाजींनी इ.स. १६७१ मध्ये आळंदीच्या ज्ञानेश्वर मंदिरास व इ.स. १६७४ मध्ये हजरत पिरास इनाम दिलेले असल्याची माहिती प्राप्त होते.

संत तुकाराम आणि समर्थ रामदास हे शिवाजींचे समकालीन सत्पुरूष होते. इ.स. १६४९ तुकारामांचे निर्वाण मध्ये झाले असल्याने शिवाजींनी बालपणी त्यांचे किर्तन ऐकले असण्याची शक्यता आहे. मात्र त्यास विश्वसनीय पुरावा उपलब्ध नाही. रामदास स्वामी व शिवाजींची भेट नेमकी केव्हा झाली, याबाबत सुध्दा इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. रामदास स्वामी हे शिवाजी महाराजांचे गुरू होते, अशी माहिती उत्तरकालीन बखरकारांनी दिलेली आहे. परंतु या माहितीस अस्सल साधनांचा आधार नाही.

छत्रपती शिवाजींच्या धार्मिक धोरणाची आणखी एक विशेष बाब म्हणजे त्यांना परंपरागत स्वरूपाचे , बुरसटलेले विचार मान्य नव्हते. शहाजीच्या मृत्युनंतर जिजाबाईंनी सती जाऊ नये म्हणून त्यांनी आपल्या मातोश्रींची समजूत काढली होती. ब्राह्मण-कायस्थ वाद सोडविण्यासाठी त्यांनी पुरोगामी विचाराच्या गागाभट्टांची मदत घेण्यास संकोच केला नव्हता. किंबहुना शिवाजींच्या राज्याभिषेकाचे मुख्य पुरोहित पुरोगामीवादी गागाभट्टच होते.

तर परधर्मात गेलेल्या स्वकीयांना शुध्द करून घेऊन त्यांना पुन: हिंदूधर्मात सामावून घेण्याचा शिवाजींचा मार्ग निश्चितच पुरोगामी व काळाच्या दोन पाऊल पुढे असणारा होता. ज्यावेळी मुघलांकडे जाऊन मुस्लिम बनलेले नेताजी पालकर पश्चात्तापदग्ध होऊन परत आले तेव्हा शिवाजींनी त्याचे शुध्दीकरण करून पुन:श्च हिंदू धर्मात घेतले, ही ऐतिहासिक घटना अत्यंत उल्लेखनिय आहे. तर बजाजी निंबाळकरांनी मुस्लिम धर्म स्वीकारला होता. त्यांनाही शिवाजींनी शुध्द करून घेऊन स्वधर्मात घेतल्याचे सांगितले जाते , मात्र त्याचा विश्वसनीय आधार सापडत नाही. असे असले तरी शिवकालात पतितपावन पध्दतीचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार करण्यात आला होता ही बाब नि:संशय मानावी लागते.

शिवाजींनी औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रांतून त्यांचे धार्मिक धोरण स्पष्ट होण्यासोबतच त्यांची सहिष्णु वृत्ती , विशाल दृष्टीकोन व सहृदय अंत:करणाची या पत्रातील मजकुराने साक्ष पटते. हे मूळ फारसी पत्र ' खुतुते शिवाजी' या पत्रसंग्रहात आढळून येते. औरंगजेबाने लादलेल्या जिझिया कराचा निषेध करतांना छत्रपती शिवाजी नमूद करतात की, 'इस्लाम आणि हिंदूधर्म हे दोन्ही परमेश्वराच्या रुपाचे मधूर अविष्कार आहेत. मशिदीत परमेश्वराचे स्मरण करण्यासाठी बांग देतात, तर मंदिरातील घंटानांद हा परमेश्वराच्या आराधनेसाठीच असतो. त्यामुळे धर्माच्या बाबतीत द्वेष आणि कट्टरपणा दाखविणारा प्रत्येकजण परमेश्वराच्या आज्ञेविरूध्द वागत आहे असेच म्हटले पाहिजे. परमेश्वराने निर्माण केलेल्या या चित्रावर रेघोटया ओढू पाहाणे म्हणजे चित्रकारावर (परमेश्वरावर) दोषारोप करणे आहे.....'

छत्रपती शिवाजींच्या धार्मिक उदारतेची प्रशंसा करताना खाफीखान हा शत्रुपक्षीय इतिहासकार नमूद करतो की, शिवाजींनी सैनिकांकरिता असा सक्त नियम केला होता की, सैनिक ज्या ज्या ठिकाणी लुटालुट करण्यास जातील तेथे तेथे त्यांनी मशिद , कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस तोशीस अगर त्रास देऊ नये. जर कुराणाचा एखादा ग्रंथ त्यांच्या हाती लागला, तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून ते त्यांच्या मुसलमान नोकराच्या स्वाधीन करीत.

छत्रपती शिवाजी हे सर्वधर्मांना समान लेखतात अशा आशयाचे उद्‌गार वखारवाल्यांच्या पत्रांतूनही सापडतात. धर्मांन्तर्गत भांडणाला शिवाजींचा विरोध होता. त्यामुळेच दि. २ नोव्हेबर, १६६९ च्या एका पत्रात रघुनाथ पंडितरावनी शिवाजीची आज्ञा उद्धृत केली असून त्यात 'श्रीमंत महाराज राजे यांनी ज्याचा जो धर्म त्याचा-त्यानी करावा. यात कोणी बखेडा करू नये, धर्मस्थापनेकरिता आमचे साहस त्या अधर्माचा दोष न यावा. अशी आज्ञा जाली....' अशा प्रकारच्या शिवाजींच्या धार्मिक नीतीचा उल्लेख केलेला आढळून येतो.

छत्रपती शिवाजींनी मुस्लिमांप्रमाणे पोतृगीज किंवा फिरंगी लोकांनाही त्यांच्या पदरी ठेवले होते. स्वराज्यावर निष्ठा असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शिवाजींच्या नोकरीत प्रवेश होता. शिवाजींच्या वर्चस्वाखाली केवळ मुस्लिम होते हा निष्कर्ष सहिष्णु वृत्ती स्पष्ट करण्यास पुरेसा नाही तर शिवाजींच्या सहिष्णुतेचे प्रकटन विशेषत्वाने शत्रुबरोबरच्या त्यातही पराभूत शुत्रबरोबरच्या वर्तनातून झालेले आढळून येते. ज्यावेळी अफझलखानाच्या वधानंतर शिवाजींनी शत्रुपक्षातील पराभूत सैनिकांना व त्याच्या निकटवर्तीयांना मोठा दिलासा दिला होता. याबाबत सभासद लिहितो, 'अफझलखानाचे लोक व त्यांचे पुत्र भांडते माणूस होते तितकियास भेटून, पोटाशी धरून, दिलासा दिला.....'

शिवाजींच्या पदरी मुसलमान सरदार व चाकर होते म्हणून शिवाजी हा सहिष्णु वृत्तीचा राजा होता असे काही लेखक नमूद करतात. मात्र सतराव्या शतकात शाही राज्यकर्त्यांच्या पदरी हिंदू नोकरही असल्याचे किती तरी दाखले मिळतात. निजामशाही, आदिलशाही आणि कुतुबशाही या राजवटींमध्ये अनेक मानाच्या जागा हिंदूंनी पटकावल्या होत्या. यासंदर्भात उदाहरण द्यावयाचे झाल्यास शहाजीराजांना निजामशाहीत आणि आदिलशाहीतही प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले होते. तर कुतुबशाहीतही शिवाजींच्या काळात मादण्णा आणि अकण्णा यांनी त्यांच्या कर्तृत्वाच्या बळावर मानाच्या जागा पटकावल्या होत्या. असे असले तरी सर्वच शाही राज्यकर्ते सहिष्णु वृत्तीचे होते असा होत नाही.

शिवाजींनी स्वराज्यातील धर्मदाय व्यवस्थेतही लक्ष दिले होते. शिवाजींनी धर्मदाय व्यवस्था कशी लावली होती ते सांगतांना सभासद लिहितो, ‘मुलखात देव देवस्थाने जागोजागी होती. त्यास दिवाबत्ती , नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविले जात होते. तर मुसलमानांचे पीर, मशिदी, त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविले जात होते.’ यावरून शिवाजीच्या सहिष्णु वृत्तीची ओळख मिळण्यास मदत होते.

### ७.२.४ मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील छत्रपती शिवाजींची भूमिका–

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात इ.स.१३ व्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत जवळपास ५०० वर्षांपर्यंत येथील जनता सातत्याने दहशत, पराधिनता, जुलूम आणि संकटे यांना तोंड देत होती. अशा या पिडीत जनतेला या छळापासून मुक्ती देण्याचे कार्य शिवाजी महाराजांनी केले. महाराष्ट्राच्या जीवनावर त्यांनी त्यांचा कर्तव्याचा जो ठसा उमटविला तो आजही तसाच आहे.

शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या कुशीत स्वराज्याच्या निर्मितीसोबतच एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या समाजाची बांधणी केली. तत्कालीन समाजात जातीभेद, संप्रदाय भेद व आर्थिक श्रेष्ठ– कनिष्ठता असे अनेक भेद होते. मात्र शिवाजींनी सर्वांना या भेदाभेदांच्या पलिकडे जाऊन राष्ट्रकार्यात गुंतविण्याचे मोठे कार्य केले.

शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या निर्मिती कामी लोकांमध्ये अशाप्रकारे कर्तव्यनिष्ठा आणि चेतना जागृत केली होती की, त्यांच्या अनुपस्थितीत आपत्काळीसुध्दा त्यांच्या लोकांनी राज्य फार कौशल्याने चालविले होते. ज्यावेळी शिवाजी महाराज आग्र्याला कैदेत होते, त्यावेळी सुध्दा आपण स्थापिलेले राज्य नष्ट होणार नाही, याची त्यांना पूर्णपणे खात्री होती. इतकेच नव्हेतर त्यांच्या मृत्युनंतर सुध्दा ही व्यवस्था सातत्याने टिकून राहिली. शिवाजींच्या मृत्युनंतर औरंगजेब मराठ्यांचे राज्य संपविण्याच्या दृढ निश्चयाने दक्षिणेत आला होता. या संकटसमयी संभाजी राजांची निघृण हत्या केली गेली आणि राजाराम हे फार लहान होते, तरी सुध्दा मराठ्यांचे राज्य नामशेष झाले नाही. त्यामुळे शिवाजींने आपल्या लोकांमध्ये स्वातंत्र्याची किती प्रबळ इच्छाशक्ती निर्माण केली होती हे लक्षात येते. परिणामी त्यामुळेच येथील लोकांच्या नेतृत्वाने हिंदवी स्वराज्याचा झेंडा सातत्याने फडकत ठेवलेला असल्याचे दिसून येते.

शिवाजी महाराजांनी त्यांच्या कार्यकाळात सर्व जातीधर्माच्या लोकांना गुणवत्तेप्रमाणे काम दिले. त्यांच्या हिंदवी स्वराज्यात पराक्रमी आणि गुणीजन यांना स्थान होते. म्हणूनच

शिवाजी महाराजांचे प्रशासन कार्यक्षम बनले. सर्व लोकांना हे शासन माझे आहे असा विश्वास वाटू लागला होता. राजा आणि शासन यांना प्रजेची आपुलकी लाभली ही बाब शिवाजींच्या व्यक्तिमत्वाला एक वेगळी झळाळी प्राप्त करून देते.

शिवाजी महाराज युगद्रष्टे होते. प्रजेच्या आशा-आकांक्षा साकार करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर अविश्रांत प्रयत्न केले. त्यांचे नेतृत्व लोकांमुळे पुढे आले. लोकांच्या सामर्थ्यामुळे ते वाढले. त्यामुळे त्यांची पाळेमुळे मजबूत होती.

शिवाजीचे स्वराज्य म्हणजे परकीय मुसलमानी राजकीय सत्तेच्या अंताची सुरुवात आणि पारंपारिक हिंदू राजशाहीचे पुनरुज्जीवन होय. सत्ताधारी इस्लामी शासक कितीही सहिष्णु मानले तरी ते अखेर परकीय होते. कारण त्यांचा धर्म व संस्कृती बहुसंख्य प्रजेच्या धर्म व संस्कृतीपेक्षा अगदी निराळी होती. यामुळे राजा आणि प्रजा यांच्यातील दरी कायम राहात असे. शिवछत्रपतींच्या स्वराज्याने प्रजेला हवी असलेली राजसत्ता मिळून राजा व प्रजा एकजीव झाले. ऐतिहासिकदृष्ट्या स्वराज्याचा हाच खरा अर्थ होय.

मध्ययुगीन कालखंडात एकीकडे उत्तरेत सुलतानशाही व मोगलशाहीच्या रुपाने परकीय सत्तेने आपली पाळेमुळे मजबूत केली होती. एक नवी संस्कृती आणि परंपरा येथील भूमीत एकरूप होण्याचा प्रयत्न करीत होती. त्याचा प्रभाव दक्षिणेतही हळूहळू फोफावू लागला होता. अल्लाउद्दिन खिलजीच्या रुपाने दक्षिणेत परकीय सत्तेचा प्रवेश झाला होता. पुढे बहामनी व त्याच्यानंतर आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांच्या रूपाने परकीयांनी दक्षिणेत त्यांचे जाळे घट्ट केले होते. विजयनगरच्या पराभवानंतर आता आपल्याला पराभूत करणारे कोणी हिंदू राजे उरले नाहीत, असा एक प्रकारे त्यांच्यात अहंभाव निर्माण झाला होता. अनेक पराक्रमी हिंदू सरदार आपल्या चाकरीत आहेत. त्यामुळे आम्ही येथील शासकच्या रूपाने सातत्याने वर्चस्व गाजवत राहू असा आशावाद निजामशाही व आदिलशाहीमध्ये काही प्रमाणात निर्माण झाला होता. त्याला छेद देण्याचे कार्य शिवाजी महाराजांनी केले होते. 'अफझलखानाचा वध' हे त्यांच्या कार्याचा झेंडा डोलाने फडकवणारी महत्त्वाची घटना म्हणून ओळखली जाते.

दक्षिणेतील इस्लामी सत्तेशी सतत दोन हात करतांना हिंदवी स्वराज्याची उभारणी करीत असतांना उत्तरेतून मोगलांच्या रूपाने औरंगजेबाचे दक्षिण हस्तगत करण्याचे प्रयत्न, शाहिस्तेखान प्रकरण, मिर्झाराजे जयसिंह यांची मोहीम यामुळे शिवाजी महाराज कात्रीत सापडतात की काय? मोगलांच्या सामर्थ्यांपुढे मराठ्यांचे राज्य बेचिराख होते की काय ? असे वाटत असतांना शिवाजी महाराजांनी मोठ्या धैर्याने आणि सामर्थ्याने त्या विरोधात लढा देत आपले वर्चस्व अबाधित राखले होते. कधी आक्रमक होत शत्रुच्या राज्यात मुसंडी मारली तर कधी युध्दनीतीने दोन पाऊले माघारी घेत त्यांनी आपले हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार केले होते. रायगडावर राज्याभिषेकाच्या रूपाने त्यांनी नव्या राज्याचा हुंकार भरला होता. येथील जनतेला व मराठमोळ्या मावळ्यांना सोबत घेऊन हिंदवी पताका सह्याद्रीच्या माथ्यावर मोठ्या डोलाने फडकवली होती. ही असामान्य बाब शिवाजींनी केली . त्यामुळे शिवाजी महाराज हे मध्ययुगीन कालखंडातील एक असामान्य व्यक्तिमत्व होते याची साक्ष पटते.

छत्रपती शिवाजींने केवळ मराठा राज्याची निर्मितीच केली नाही तर अष्टप्रधान मंडळाच्या रूपाने नवी प्रशासकीय प्रणाली, लष्करी, मुलकी प्रणालीतही मोठे फेरबदल करून हे राज्य माझे आहे ही भावना लोकांच्या मनात रूजवली. ही मध्ययुगीन इतिहासाच्या कालखंडातील वैशिष्टपूर्ण घटना मानावी लागेल. शिवाजींनी काळाच्या पुढे दोन पाऊले जात आरमाराची उभारणी केली तर पुरोगामी विचारांची मुहर्तमेढ या भूमीत रोवून महाराष्ट्राला पुरोगामीत्व प्रदान केले. ही बाब महाराष्ट्राला व येथील मातीला शिवाजी महाराजांकडून मिळालेली देणगीच आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे मध्ययुगीन कालखंडाच्या इतिहासात एक नवीन पर्व, नवीन राज्य, नवीन प्रशासकीय प्रणाली, नवीन राजसंकल्पना निर्माण करणारे राजे म्हणून आम्हांला शिवाजी महाराजांच्या कार्याचा व त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अभिमान वाटतो.

## ७.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न –

१. छत्रपती शिवाजी यांच्या मुलकी प्रशासनातील चौथाई व सरदेशमुखी विषयी माहिती द्या.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

२. शिवाजी महाराजांच्या लष्करी नीतीतील गुप्तहेरांचे महत्त्व विशद करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

३. छत्रपती शिवाजींचा आरमार निर्मिती मागील दृष्टीकोन स्पष्ट करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

४. छत्रपती शिवाजींचे धार्मिक धोरण कसे होते? याविषयी थोडक्यात माहिती द्या.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

५. मध्ययुगीन कालखंडातील शिवाजींच्या कार्याचे वेगळेपण याविषयी भाष्य करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

## ७.४ सारांश –

छत्रपती शिवाजींने दक्षिणेतील किल्ल्यांच्या मदतीने व मावळ्यांच्या पाठबळावर मराठा साम्राज्याची उभारणी करून एक वेगळे पर्व निर्माण केले होते. स्वराज्याची मुहर्तमेढ ते राज्याभिषेक हा त्यांचा थक्क करणारा प्रवास अभ्यासताना त्यांच्या सतत ध्येयनिष्ठ, कार्यतत्पर, स्वतंत्रतेची वृत्ती, सेवाभावी, दृढनिश्चयी अशा व्यक्तिमत्वाची ओळख पटते. असे असले तरी त्यांनी निर्माण केलेल्या स्वराज्यामध्ये लोकांना आवश्यक त्या सुधारणा करून देण्याची त्यांची तळमळ सुध्दा या निमित्ताने प्रकर्षाने पुढे येते. शिवाजींनी ज्यापध्दतीने प्रशासकीय सुधारणांमध्ये अष्टप्रधानांची नियुक्ती केली. त्याचप्रमाणे त्यांनी लष्करी व मुलकी सुधारणांनाही प्राधान्य दिले होते.

पूर्वापार चालत आलेल्या कालबाह्य परंपरा दूर सारून शिवाजींनी नवी महसूल प्रणाली विकसित करण्यावर भर दिला होता. 'शिवशाही काठी' हे त्याचेच द्योतक आहे. याशिवाय धार्मिकतेच्या दृष्टीने समभाव विकसीत करून अन्य धर्मियांना त्रास न देण्याचा त्यांचा मनोदय त्यांच्या व्यक्तिमत्वाला भरारी देतो. कुराणाची प्रत मुस्लिम सैनिकाला सन्मानपूर्वक सोपविणे हे मध्ययुगीन कालखंडातील त्यांच्या सहिष्णु धोरणाची एक वेगळी ओळख म्हणून लक्षात घ्यावी लागते. यासर्व बाबींचा परिणाम येथील जनजीवनावर व मराठ्यांच्या राज्याच्या संरक्षणासाठी लढणाऱ्या सैनिकांवर व सेनानींवर निश्चितपणे झालेला होता. त्याचाच परिपाक म्हणजे शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतरसुध्दा त्यांनी स्वराज्याच्या रक्षणार्थ दिलेला अविरत लढा हे त्यांच्या शिकवणुकीचे आणि दिलेल्या प्रेरणेचेच स्रोत आहे असे म्हणता येईल.

## ७.५ पारिभाषिक शब्द :

१. चौथाई – आपल्या राज्याच्या रक्षणासाठी दुर्बल राज्यकर्ते आपल्या अधिकार क्षेत्रातील एकंदर महसुलाच्या उत्पन्नाचा १/४ किंवा १/८ भाग प्रबळ राज्यकर्त्यांना प्रदान करीत. त्यास चौथाई असे म्हटले जात असे.

२. स्वराज्य – छत्रपती शिवाजींच्या काळातील त्यांच्या अधिपत्याखाली असलेला प्रदेश

३. मोगलाई – परकियांच्या अधिपत्याखालील प्रदेश मात्र त्या प्रदेशाचे शासक शिवाजींना खंडणी देत असत.

४. शिवशाही काठी – शिवकाळात जमिन मोजण्यासाठी निर्माण केलेले एक माप वजा काठी जिची लांबी ५ हात व ५ मुठ एवढी होती.

## ७.६ संदर्भग्रंथ सूची –


१. सहस्त्रबुध्दे पु.ग. – १९९४, महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

२. सतिशचंद्र – २०१० मध्यकालीन भारत, ओरियंट ब्लैकस्वॉन, नवी दिल्ली.

३. आचार्य कृ.अ. व आपटे भा.कृ. – १९७८, मध्ययुगीन भारत, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

४. संपादक हरिश्चंद्र वर्मा – २००७ मध्यकालीन भारत, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली.

५. देशमुख मा.म. – १९९८, मध्ययुगीन भारताचा इतिहास, विश्वभारती प्रकाशन, नागपूर.

६. प्रमुख संपादक, डॉ.जयसिंगराव पवार – २०११, छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

७. संपादक कुळकर्णी अ.रा., खरे ग.ह. – २०१०, मराठ्यांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

८. कुळकर्णी अ.रा. व देशपांडे प्र.न. – १९९९, मराठ्यांचा इतिहास, स्नेहवर्धन पब्लिशिंग, पुणे.

९. प्राचार्य गायकवाड आर.डी. व इतर– १९८७, मराठेकालीन संस्था व विचार, फडके बुक सेलर्स, कोल्हापूर.

१०. प्रा.शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र.न.– २००६, महाराष्ट्राचा सामाजिक– सांस्कृतिक इतिहास, के.सागर प्रकाशन, पुणे.

११. आवळसकर शांताराम विष्णू – २००८, रायगडची जीवनकथा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

१२. कुळकर्णी गो.रा. – २००२, युगद्रष्टे छत्रपती शिवाजी, श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट, श्रीक्षेत्र डेरवण.

१३. सुभाष पाटील व इतर – २०११, शिवकाळ व पेशवाईतील दुष्काळाचा इतिहास, पुनम प्रकाशन, कंधार.

१४. कदम रा.आ. – छत्रपती श्री.शिवाजी महाराज, २००६, राजमयूर प्रकाशन, पुणे,

१५. संपादक– अ.स. कुलकर्णी – मराठ्यांचा इतिहास

१६. अ. रा. कुलकर्णी व प्र. न. देशपांडे – मराठ्यांचा इतिहास

१७. प्राचार्य आर. डी. गायकवाड व इतर – मराठे कालीन संस्था व विचार

# घटक ८

# मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध

**अनुक्रमणिका**


**८.० उद्दिष्टे**

**८.१ प्रस्तावना**

**८.२ विषय विवेचन**

**८.२.१ संभाजी महाराजांचे कार्य**

**८.२.२ महाराणी येसूबाईचे कार्य**

**८.२.३ छत्रपती राजाराम महाराजांचे कार्य**

**८.२.४ रामचंद्रपंत अमात्यांचे कार्य**

**८.२.५ महाराणी ताराबाईचे कार्य**

**८.२.६ संताजी घोरपडे यांचे कार्य**

**८.२.७ धनाजी जाधवांची कामगिरी**

**८.३ स्वयं अध्ययन प्रश्न**

**८.४ सारांश**

**८.५ पारिभाषिक शब्द**

**८.६ संदर्भ ग्रंथ सूची**


## ८.० उद्दिष्टे : (Objective)

१. छत्रपती संभाजी महाराजांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात बजावलेली भूमिका व त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेता येईल.

२. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्य रक्षणासाठी केलेल्या संघर्षाची माहिती होईल.

३. मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील महाराणी येसूबाईंची भूमिका स्पष्ट करता येईल.

४. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीच्या किल्ल्याचा आश्रय घेऊन स्वराज्य रक्षणासाठी केलेल्या कार्याचीमाहिती मिळवाल.

५. छत्रपती राजारामांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेता येईल.

६. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात रामचंद्रपंत अमात्य, महाराणी ताराबाई, संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांनी केलेल्या कामगिरीची माहिती घेता येईल.

७. महाराणी ताराबाईंनी औरंगजेबाशी इ.स.१७०० ते १७०७ या कालावधीत समर्थपणे

लढा दिला याचा अभ्यास करता येईल.

८. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यातील संघर्ष तसेच त्यांनी स्वराज्यासाठी केलेल्या योगदानाचा अभ्यास करता येईल.

९. मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामात मराठा राज्याच्या सैन्य व्यवस्था, प्रशासन व्यवस्था यामध्ये झालेल्या बदलांचा अभ्यास करता येईल.

१०. औरंगजेब बादशहाने केलेल्या संघर्षाचा व त्याच्या दक्षिण मोहिमेतील यशापयशाची चर्चा करता येईल.

## ८.१ प्रस्तावना :

इ.स.१६८० ते इ.स.१७०७ या कालावधीत मराठ्यांनी औरंगजेबाच्या आमक्रमणापासून स्वराज्याचा बचाव करण्यासाठी अत्यंत शौर्याने जो संघर्ष केला, त्यास मराठ्यांच्या इतिहासात 'मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध' म्हणून ओळखले जाते. या कालावधीत छत्रपती संभाजी महाराज, महाराणी येसूबाई, राजाराम महाराज, रामचंद्रपंत अमात्य, महाराणी ताराबाई, धनाजी जाधव, संताजी घोरपडे तसेच मराठा सरदारांनी महत्वपूर्ण योगदान दिले. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रथमत: छत्रपती संभाजी महाराजांचे जीवनकार्य व त्यांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामात पार पाडलेली भूमिका यांचा आढावा घेऊ.

## ८.२ विषय विवेचन :

### ८.२.१ संभाजी महाराजांचे जीवन कार्य व कामगिरी

छत्रपती संभाजी महाराज हे शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र होते. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर संभाजी बालपणी आग्र्याला जाऊन आले होते. राज्याभिषेकाच्या वेळी युवराज म्हणून संभाजी महाराजांना ही राज्याभिषेक करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचा ३ एप्रिल १६८० रोजी रायगडावर मृत्यू झाला. त्यानंतर मराठी राज्यात अधिक गुंतागुंत निर्माण झाली. मराठा-मोगल संघर्ष पुन्हा नव्याने सुरू झाला. संभाजीचा राजगादीवर बसण्याचा हक्क असतानाही त्याविरूद्ध कटकारस्थाने होऊन राजारामाला गादीवर बसविण्याचा प्रयत्न झाला. या सर्व अडचणींवर मात करून संभाजीला अधिकार असूनही राजारामाला गादीवर बसविण्याचा प्रयत्न झाला. या सर्व अडचणींवर मात करून संभाजी महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. संभाजी महाराजांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती पुढिलप्रमाणे.

**छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म व बालपण :**

संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदरच्या किल्ल्यावर राणी सईबाईंच्या पोटी झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या त्या प्रथम पत्नी होत्या. संभाजीराजांच्या वेळी बाळंतपणातच त्या आजारी पडल्या व राजे दोन वर्षाचे असताना राणी सईबाईंचा मृत्यू झाला. संभाजी महाराजांचा सांभाळ त्यांच्या आजी जिजाबाई यांनी केला. आईविना पोरके

झाल्याने त्यांचे खूप कोड-कौतुक झाले. वयाच्या १२/१३ वर्षापर्यंत संभाजीचे बालपण आनंदात गेले. १७ जून १६७४ रोजी जिजाबाईंचाही मृत्यू झाला. त्यामुळे संभाजी महाराज पोरके झाले.

**संभाजी महाराजांचे शिक्षण :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी संभाजीच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था केली होती. संभाजीला शिकविण्यासाठी केशव भट्ट व उमाजी पंडित यांना नियुक्त केले होते. "बुधभूषणम" या संस्कृत ग्रंथातील उल्लेखावरून संभाजीने घोड्यावर बसणे, तलवार व भाला चालविणे, धनुष्यबाण चालविणे, मल्लयुद्ध करणे इ. शिक्षण प्राप्त केले होते. संभाजीने प्राप्त केलेल्या शिक्षणाची माहिती सभासद बखर व चिटणीसी बखर यामध्ये मिळते. तसेच संभाजीस संस्कृत भाषाही अवगत होती.

**औरंगजेबाचा पंचहजारी मनसबदार :**

पुरंदरच्या तहानुसार शिवाजी महाराजांना आग्रा भेटीसाठी छोट्या संभाजीला बरोबर घेऊन जावे लागले होते. पुरंदरच्या तहानुसार संभाजीराजे वयाच्या ८ व्या वर्षीच औरंगजेब बादशहाचे पंचहजारी मनसबदार बनले होते. आग्रा भेटीच्या वेळी संभाजीला बादशाही दरबारातील चालीरिती, परंपरा, दरबाराचे वैभव पहावयास मिळाले. आग्रा येथील सुटकेनंतर १६७१ मध्ये संभाजी राजांचा पहिला विवाह पिलाजी शिर्के यांच्या कन्या राजसबाईबरोबर झाला. पुढे राजसबाईंचे नाव येसूबाई असे ठेवण्यात आले.

**संभाजीस युवराज्याभिषेक :**

रायगडावर शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला म्हणजेच ६ जून १६७४ या दिवशी शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करण्यात आला. यावेळी निळोपंत यांना पेशवेपद देण्यात आले. अण्णाजी दत्तो यांस अमात्य पद, प्रल्हाद निराजी-न्यायाधीश, बाळाजी आवजी - चिटणीस अशी अष्टप्रधान मंडळातील पदे देण्यात आली. तसेच संभाजी महाराजांना युवराज म्हणून राज्याभिषेक करण्यात आला.

## ८.२.६ संभाजीचा राज्यकारभारात सहभाग :

शिवाजी महाराजांनी दि.२६ जानेवारी १६७१ या दिवशी संभाजीला कारभार सांगितला व त्यास स्वतंत्र लेखनिकही देण्यात आला, असा उल्लेख 'शिवपुत्र-संभाजी' या ग्रंथात डॉ.सौ.कमल गोखले यांनी केला आहे. तसेच वयाच्या १४ व्या वर्षीच रायगडावरील लष्कराची व्यवस्था संभाजी महाराजांवर सोपविण्यात आली होती. फ्रेंच प्रवासी ॲबे कॅरे याने देखील युवराज संभाजी अत्यंत धैर्यशील व पित्याच्या किर्तीला साजेसा व शूर धाडसी, युद्धकलेत पारंगत असा आहे असे वर्णन केले आहे. या सर्व बाबीं वरून संभाजीने लहानपणापासूनच राज्यकारभारात सहभागी होण्यास सुरूवात केली होती असे दिसून येते.

**राजमहालातील कलह :**

इ.स.१६७० मध्ये राणी सोयराबाईच्या पोटी राजाराम महाराजांचा जन्म झाला होता.

१६७४ मध्ये संभाजी महाराजांना युवराज म्हणून राज्याभिषेक झाला होता. सोयराबाईस राजारामाला युवराजपद मिळावे असे वाटत होते. १६७४ मध्ये जिजाबाईंचा मृत्यू झाल्यानंतर संभाजीची बाजू घेणारे राजमहालात कोणीच नव्हते. या पार्श्वभूमीवर संभाजीच्या दुर्वर्तनाच्या कथा रंगविल्या जात होत्या. याच काळात संभाजी, कवी कलश व निश्चलपुरीच्या संपर्कात आले होते. कर्नाटक स्वारीवर जातेवेळी शिवाजी महाराजांनी संभाजीस श्रृंगारपूरला पाठवले होते. या काळात राणी सोयराबाई व दरबारातील मंडळी मातब्बर बनली होती.

**संभाजी मोगली सत्तेच्या आश्रयास :**

शिवाजी महाराज कर्नाटक मोहीम आटोपून परत आल्यानंतर दरबारातील लोकांनी संभाजीच्या कारवाया शिवाजी महाराजांना सांगितल्या. त्यामुळे शिवाजी महाराजांनी संभाजीची रवानगी सज्जनगडावर रामदास स्वामींकडे केली. मात्र तेथे संभाजी फार काळ राहू शकले नाहीत. संभाजीराजे सज्जनगडावरून निघाले. व थेट दिलेरखानाच्या छावणीत दाखल झाले. त्यांचा अगोदरच दिलेरखानाशी पत्रव्यवहार झाला होता. १३ डिसेंबर १६७८ या दिवशी संभाजी आपल्या निवडक घोडेस्वारांसोबत दिलेरखानाच्या गोटात दाखल झाले.

संभाजी मोगल छावणीत दाखल झाल्याचे कळल्यावर छावणीत सर्वत्र आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मोगलांना मराठ्यांविरूद्ध मिळालेला हा मोठा विजय होता. स्वराज्यात या घटनेने सर्वांना धक्का बसला. या घटनेमुळे आग्र्याहून सुटलेला संभाजी आपोआपच तावडीत सापडला. औरंगजेबाने खुष होऊन संभाजीसाठी सात हजारी मनसब, राजा हा किताब, हत्ती व अंबारी व इतर सरंजाम पाठविला. आणि आदिलशाहीवर आक्रमण करण्याचा आदेश देण्यात आला.

**दिलेरखानासोबत संभाजीची मोहीम :**

संभाजी दिलेरखानाला येऊन मिळाल्यानंतर दिलेरखानाने आदिलशाही विरूद्ध मोहीम उघडली. आदिलशहाच्या मदतीसाठी शिवाजीराजांनी सात हजार घोडदळ पाठविले होते. परंतु आदिलशहाचा सरदार मसूदखान याने दिलेरखानाशी तह केला. मोगल व आदिलशाही फौजा एकत्र झाल्या व त्यांनी स्वराज्याविरूद्ध चढाई सुरू केली. विजापूरच्या मदतीस गेलेल्या मराठी सैन्याने विजापूरची उपनगरे लुटली. दिलेरखान, आदिलशाही फौजा व संभाजी महाराज या सर्वांनी मिळून स्वराज्यावर हल्ला केला. दिलेरखानाने साताऱ्याजवळील भोपाळगडाला वेढा दिला. २ एप्रिल १६७९ या दिवशी मोगलांनी भोपाळगड जिंकला. यावेळी मोगलांनी मराठ्यांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. अनेक लोकांची कत्तल केली. अनेकांना गुलाम बनविण्यात आले. यावेळी रायगडावरून मराठा सैन्य भोपाळगडाच्या मदतीसाठी आले होते. दरम्यान आदिलशाही-मोगल संबंधात वितुष्ट आले. दिलेरखानाने विजापूरवर हल्ला करण्याचे ठरविले. पुन्हा विजापूरच्या मसूदखानाने मराठ्यांची मदत मागितली. छत्रपती शिवाजी महाराजांनी दहा हजार घोडदळ मदतीसाठी पाठविले. यामुळे आदिलशहा-मोगल-मराठा असा संघर्ष सुरू झाला. १६७९मध्ये मोगलांनी पन्हाळगडावर आक्रमण केले. वाटेत स्वराज्यातील अनेक गावे मोगलांनी जाळून बेचिराख केली. अनेक निरपराध हिंदूंच्या कत्तली केल्या हे पाहून संभाजी राजे अस्वस्थ झाले. त्यांनी आपली नाराजी दिलेरखानाजवळ बोलून दाखविली.

२० नोव्हेंबर १६७९ रोजी संभाजी महाराजांनी संधी साधून गुप्तपणे मोगली छावणी सोडली. त्यानंतर ते विजापूरला मसूदखानाकडे गेले. तेथेही मोगलांपासून धोका होणार असे वाटल्याने त्यांनी विजापूर सोडून ४ डिसेंबर १६७९ रोजी संभाजी राजे पन्हाळगडावर दाखल झाले. यामुळे स्वराज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

**संभाजीस राज्यपदाची प्राप्ती :**

संभाजी महाराज पन्हाळगडावर असतानाच त्यांची व शिवाजी महाराजांची भेट झाली. त्यानंतर शिवाजी महाराज रायगडावर परतले. १५ मार्च १६८० या दिवशी राजाराम व जानकीबाई यांचा विवाह सोहळा रायगडावर पार पडला. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांची प्रकृती बिघडल्यामुळे वातावरणात गांभिर्य निर्माण झाले. रायगडावर गृहकलह सुरू होऊन राजारामाला गादीवर बसविण्यासाठी कट-कारस्थाने सुरू झाली. शिवाजी महाराजांची प्रकृती खालावत जाऊन शेवटी ३ एप्रिल १६८० रोजी महाराज स्वर्गवासी झाले. यामुळे स्वराज्याचा वारस शिवाजी महाराजांना नियुक्त करता आला नाही.

शिवराज्याभिषेकावेळी संभाजीस युवराज्याभिषेक झाला होता. ज्येष्ठ या नात्याने संभाजीचा राजगादीवर हक्क होता. परंतु संभाजी महाराज मोगलांना जाऊन मिळाल्यामुळे अष्टप्रधान मंडळ व इतर अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. यावेळी राणी सोयराबाईने आपला मुलगा राजाराम याला गादीवर बसविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. मोरोपंत पिंगळे, प्रल्हाद निराजी, बाळाजी आवजी आणि अण्णाजी दत्तो यांना विश्वासात घेऊन संभाजीस बाजूला सारण्याचे प्रयत्न सुरू झाले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रायगडावर गोंधळ सुरू होता. २१ एप्रिल १६८० रोजी अण्णाजी दत्तोच्या पुढाकाराने राजारामाचे राज्यारोहण झाले. आणि पन्हाळगडावर संभाजीस कैद करण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना पाठविण्यात आल्या. अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे संभाजीस पकडण्यासाठी पन्हाळगडाकडे निघाले. कऱ्हाडमध्ये त्यांनी सेनापती हंबीरराव मोहित्यांची भेट घेतली. हंबीररावांना सगळे राजकारण माहिती होते. त्यांनी संभाजीची बाजू घेऊन या दोघांना कैद केले. संभाजीराजांना कटाचा सुगावा लागल्याने त्यांनी पन्हाळा किल्ल्यावरील अधिकाऱ्यांना कैदेत टाकून रायगडावर स्वारी काढली. हंबीरराव मोहित्यांनी सहकार्य केल्यामुळे संभाजी रायगडावर पोहचले त्यावेळी २०हजार सैन्य जमा झाले होते. २० जून१६८० रोजी संभाजींने रायगड जिंकला. सोयराबाई, राजारामांसह कटातील सहभागी लोकांना कैद करण्यात आले. १६ जानेवारी १६८१ रोजी राज्याभिषेक होऊन संभाजी महाराजांना राज्यपदाची प्राप्ती झाली.

**अंतर्गत कलह व संभाजी विरूद्ध कट :**

राज्याभिषेकाच्या अगोदर सोयराबाईस मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांचा बंदोबस्त करण्यात आला. काही अधिकाऱ्यांना कैदेत टाकले. तर काहींना क्षमा करण्यात आली. आणि त्यांना प्रशासनात सामावून घेण्यात आले. या काळात संभाजी महाराजांनी आपली प्रशासन व्यवस्था भक्कमपणे निर्माण केली. तरी देखील संभाजीस असणारा विरोध संपला नव्हता. मोगल, सिद्धी, पोर्तुगिज ही मंडळी मराठी सत्तेविरूद्ध टपून बसलेले होते. स्वराज्यावर अंतर्गत व बाहेरून दोन्ही बाजूने संकट निर्माण झाले होते. याच काळात संभाजी महाराजांवर अंतर्गत कलहातून

विषप्रयोग झाला. मात्र हा प्रयोग फसल्यानंतर संभाजी विरूद्ध एक मोठा कट पुन्हा रचण्यात आला. मोगल राजपूत्र अकबराशी संधान साधून त्याची मदत घेऊन संभाजीस पदच्युत करायचे व त्याच्या जागी राजारामास गादीवर बसविण्याचा कट रचण्यात आला. प्रत्यक्ष अकबरानेच संभाजीस या कटाविषयी माहिती दिली. त्यामुळे संभाजी महाराजांनी कटवाल्यांना अटक केली. या कटात सोयराबाई, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद, अण्णाजी दत्तो, सोमाजी दत्तो इ.चा सहभाग होता. समकालीन इंग्रजी कागदपत्रांवरून पुढे सोयराबाईवर विषप्रयोग झाल्याचे स्पष्ट होते. बाळाजी आवजी व सोमाजी दत्तो यांना देहदंडाची शिक्षा ठोठाविण्यात आली. आपल्या विरुध्दच्या लोकांचा संभाजीने अशा प्रकारे बंदोबस्त केला.

राजदरबारातील कट-कारस्थानांमुळे या घटनेचे वर्णन काही ठिकाणी वास्तव तर काही ठिकाणी अतिरंजीत स्वरूपात करण्यात आले. त्यामुळे सुरुवातीला संभाजी विषयी इतिहासकरांनी क्रूर, व्यसनी, लहरी असे वर्णन केले आहे. परंतु वा.सी.बेंद्रे, डॉ.कमल गोखले या इतिहासकारांनी अस्सल कागदपत्रांचा शोध घेऊन संभाजीचे खरे स्वरूप व कार्य शोधले आहे व इतिहासात नव्याने मांडणी केली.

### संभाजी मोगल संबंध :

इ.स.१६७९ पर्यंत मोगल-मराठा संघर्ष चालू होता. १६७९च्या शेवटी मोगल-रजपूत संघर्ष उत्तरेत सुरू झाल्याने मोगल उत्तरेत अडकले. दक्षिणेतील दिलेरखान व राजपुत्र शहाआलम यांनाही उत्तरेकडे बोलाविण्यात आले. मराठी राज्यातही या काळात छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला होता. संभाजी-राजाराम या दोन पक्षात अंतर्गत कलह निर्माण झाला होता. १६८०मध्ये मराठी फौजा मोगल प्रदेशात घुसल्या. जुलै १६८० मध्ये मोगल सैन्याने खानदेश व बागलाण मध्ये मराठ्यांवर हल्ला केला. यानंतर मराठा-मुगल संघर्षास सुरूवात झाली. मोगल सैन्याने अहिवंत गडास वेढा दिला. पण मराठ्यांनी हा गड हिंमतीने लढविला. खान-ए-जहान बहादूरखान या मोगलांच्या सरदाराने हा वेढा दिला होता. १६८०च्या ऑक्टोबर महिन्यात मराठ्यांनी खानदेशाच्या प्रदेशात हल्ला चढविला. काही फौज सुरतकडे गेली तर काही मराठी फौज जालनापूर लूटून औरंगाबादहून बऱ्हाणपूरला आली. बऱ्हाणपूर लूटीचे वर्णन खाफीखान या इतिहासकाराने आपल्या वर्णनात केले आहे. तेथून मराठी फौजा साल्हेरपर्यंत पोहचल्या. औरंगाबाद परिसरातील मराठे-मोगल संघर्षाचे वर्णन मोगली इतिहासकार भीमसेन सक्सेना याने केले आहे. १६८१सालच्या मराठ्यांच्या या स्वारीनंतर औरंगाबाद शहराला तटबंदी घालण्याचा विचार झाला.

### राजपुत्र अकबर-संभाजी भेट :

मोगल-मराठा संघर्ष चालू असताना मोगल-राजपूत संघर्षही चालू होता. राजपूत्र अकबराकडे राजपुतांविरूद्धच्या मोहिमेचे नेतृत्व होते. मोगल-राजपूत संघर्ष वर्षभर चालू होता. शेवटी अकबराने औरंगजेबाच्या इच्छेविरूद्ध राजपूतांशी तह केला ही गोष्ट औरंगजेबास आवडली नाही. अकबराने स्वत:स बादशहा घोषित करून राजपूत राजा दुर्गादास राठोड चे सहकार्य घेऊन तो औरंगजेबावर चालून गेला. अजमेरजवळ दोन्ही सैन्याची गाठ होऊन मोगलांनी अकबर-राजपूत यांस कोंडीत पकडले. याचवेळी मराठ्यांची मदत मिळविण्याच्या हेतूने अकबराने संभाजीस पत्रव्यवहार केला. एवढेच नव्हे तर अकबर संभाजीच्या आश्रयासाठी

खानदेशमार्गे कोकणात आला. पाली या ठिकाणी अकबराच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. नेताजी पालकर व हिरोजी फर्जंद हे अकबराच्या मदतीसाठी ठेवण्यात आले.

अकबर आपल्या बापाविरूद्ध म्हणजेच औरंगजेबाविरूद्ध बंड करून दक्षिणेत आला होता. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी पहिली प्रत्यक्ष भेट अकबर व संभाजी यांची पाली येथे झाली. या भेटीच्या वेळी दोघांनीही एकमेकांना मदत करण्याचे आश्वासन दिले. परंतु यावर त्यानंतर प्रत्यक्षात काहीही कृती झाली नाही.

**औरंगजेबाचे दक्षिणेत आगमन :**

अकबर दक्षिणेत जाऊन संभाजीस मिळाला आहे हे समजताच अकबराने संभाजी-अकबर यांचा बंदोबस्त करण्यासाठी दक्षिणेत मोहीम काढली. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी तो बऱ्हाणपूर येथे पोहचला. २२ मार्च १६८२ रोजी औरंगजेबाने औरंगाबाद येथे लष्करी छावणी घातली. सेतू माधवराव पगडी यांच्या मतानुसार, यावेळी औरंगजेबाबरोबर अनेक शूर सरदार ३ लाख घोडेस्वार आणि ४ लाख पायदळ होते.

**रामसेजचा वेढा :**

औरंगजेब दक्षिणेत आल्यानंतर त्याने सर्वप्रथम नाशिक जवळील रामसेजच्या किल्ल्यास वेढा देण्यासाठी गाजीउद्दीन फिरोजजंग यास पाठविले. त्यास अपयश आल्यानंतर बहादूरखान, त्याच्यानंतर कासीमखान यास पाठविले. या तीनही सरदारांना हा किल्ला जिंकण्यात अपयश आले. कारण वेढा देऊन बसलेल्या मोगल फौजेवर मराठ्यांचे बाहेरून सतत हल्ले चालू होते. रामसेजच्या घाटातून अपयशी होऊन परतणाऱ्या मोगली सेनेचे वर्णन निकोलस मनुचीने आपल्या प्रवास वर्णनात केले आहे. त्याच्या मतानुसार मोगल सैन्यास रोगाची लागण झाली होती. माणसे मृत्यूमुखी पडली होती. घोडीही मोठ्या संख्येने मेल्यामुळे अनेकांना पायी चालण्याची वेळ आली.

**मोगलांची कोंकण स्वारी :**

रामसेजचा वेढा चालू असताना राजपुत्र मुअज्जम व शहाबुद्दिन यांना कोंकण जिंकण्यासाठी पाठविले. इ.स.१६८२ मध्ये हसनअली खानने कल्याण जिंकले. त्याची पाठ फिरताच मराठ्यांनी कल्याण पुन्हा जिंकले. नोव्हेंबर १६८२ मध्ये पुन्हा मोगलांनी कल्याण जिंकले. परंतु रूपाजी भोसलेंने पुन्हा कल्याण जिंकले. याचवेळी राजपुत्र मुअज्जम कोंकणात आला. संभाजी राजे यावेळी पोर्तुगिजांशी लढण्यात गुंतले होते. परंतु मुअज्जमच्या नेतृत्वाखाली मोगलांचे आक्रमण स्वराज्यावर येत आहे हे समजताच पोर्तुगिजांविरूद्धची मोहीम अर्धवट सोडून मोगली आक्रमणाचा प्रतिकार करण्याचे संभाजीने ठरविले. मुअज्जमचा २-३ महिने कोंकणात मुक्काम होता. मालवण, वेंगुर्ले, कुडाळ ही गावे त्याने उध्वस्त केली. कोल्हापूर भागात हंबीरराव मोहिते यांनी मुअज्जमचा पराभव केला. इ.स.१६८१-८५ या काळात मोगल-मराठा संघर्ष शिगेला पोहचला होता.

**आदिलशाही व कुतूबशाहीचा पाडाव :**

संभाजीने प्रखर विरोध केल्यामुळे संभाजी विरूद्धची मोहीम तात्पुरती थांबवून औरंगजेबाने संभाजीस मदत करणाऱ्या आदिलशाही व कुतूबशाही या दक्षिणेतील सत्तांविरूद्ध

आपले लक्ष केंद्रित केले. इ.स.१६८५मध्ये मोगलांनी विजापूरवर आक्रमण करण्याचे ठरविले. बहादूरखान, रूहल्लाखान, राजपुत्र मुअज्जम इ. सरदारांनी या मोहिमेत भाग घेतला. स्वत: औरंगजेब विजापूरवर चालून गेला. संभाजी व कुतूबशहा यांनी विजापूरकरांसाठी मदत पाठविली. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. १२ सप्टेंबर १६८६ ला मोगलांनी विजापूर जिंकून घेतले. व तेथे रूहुल्लाखानाची सुभेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली. आदिलशाही नष्ट करण्यात आली.

गोवळकोंड्याच्या अब्दुल हसनने मोगलांविरूद्ध विजापूरकरांना मदत केली होती. त्यामुळे विजापूर जिंकल्यानंतर मोगलांनी आपला मोर्चा गोवळकोंड्याकडे वळविला. २२ सप्टेंबर १६८७ ला गोवळकोंड्याचा किल्ला औरंगजेबाने जिंकला. अशा प्रकारे औरंगजेबाने दक्षिणेतील दोन्ही सत्ता जिंकून घेतल्या.

**मोगल–मराठा संघर्ष १६८७–८९ :**

आदिलशाही व कुतूबशाहीचा पाडाव केल्यानंतर औरंगजेबाने आपली सर्व शक्ती संभाजी विरूद्ध एकत्र केली. संभाजीस कोंडीत पकडण्यासाठी मातबरखान यास नाशिक भागात तर राजपुत्र आझम यास बेळगाव, शेख निजाम यास कोल्हापूर भागात पाठवले. कर्नाटकात हरजी महाडीक व संताजी घोरपडे यांचे ऐक्य नसल्यामुळे त्यांना मोगलांचे आक्रमण थांबविता आले नाही. नाशिक, बागलाण व कोल्हापूर भागात मोगलांना काही किल्ले मिळाले. परंतु कोंकण व रायगड मोगलांना जिंकता आले नाही.

इ.स.१६८७ मध्ये मोगल सरदार सर्जाखान व हंबीरराव मोहिते यांच्यात वाई या ठिकाणी युद्ध झाले. वाईच्या युद्धात हंबीरराव मोहित्यांना तोफेचा गोळा लागून हंबीररावांचा मृत्यू झाला. त्यामुळे संभाजीचा फार मोठा आधार निखळला.

**अकबराचे इराणकडे प्रयाण :**

छत्रपती संभाजी व अकबर यांची भेट होऊनही संभाजी अकबरास भरीव मदत करू शकले नाहीत. यासंदर्भात इतिहासकार गो.स.सरदेसाई यांनी संभाजीस दोष दिला आहे. परंतु यावेळी स्वराज्यावरील संकटांमुळे संभाजीस वेळ मिळाला नाही. अकबराजवळ पैसाही नव्हता व लष्करही नव्हते. तसेच औरंगजेब सतत त्याच्या पाठलागावर होता. चाकणजवळच्या लढाईत मोगली सैन्याने अकबराचा पराभव केला. या लढाई व्यतिरीक्त त्याने दक्षिणेत संघर्ष केल्याचे आढळत नाही. शेवटी निराश परिस्थितीत फेब्रुवारी १६८७ मध्ये त्याने आपल्याबरोबर ४५ माणसे घेऊन एक इंग्रज जहाज भाड्याने घेऊन भारत सोडण्याचा निर्णय घेतला. तेथून तो मस्कतमार्गे इराणला पोहचला. तेथील शहा सुलेमानने त्याचे स्वागत केले. इ.स.१७०४ मध्ये इराणमध्येच अकबराचा मृत्यू झाला. संभाजी–अकबर युतीस फारसे काही साध्य करता आले नाही.

**संभाजी पोर्तुगीज संबंध :**

स्वराज्यावरील मोगल आक्रमणाविरूद्ध संभाजी महाराजांनी सतत नऊ वर्षे प्रखर लढा देऊन प्रतिकार केला होता. यावेळी गोव्यातील पोर्तुगीजांनीही संभाजीविरूद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला. छत्रपती संभाजी व पोर्तुगीज संबंध पुढीलप्रमाणे :

**आंजेदीव बेटावर पोर्तुगीज आक्रमण :**

गोवा किनारपट्टीजवळील आंजेदीव बेटावर पोर्तुगीजांनी आक्रमण करून हे बेट ताब्यात घेतले. व तेथे किल्ला बांधला. आंजेदीव बेट आमच्या ताब्यात असल्याने तेथील हिशोब मराठ्यांना देण्याचे काही कारण नाही. अशी भूमिका पोर्तुगीजांनी घेतली होती.

**पोर्तुगीज-मोगल मैत्री :**

१६८२ मध्ये औरंगजेबाने शेख मोहम्मद नावाचा वकील गोव्याच्या व्हाईसरॉयकडे पाठविला होता. यावेळी संभाजी विरूद्ध मदत करण्याचे पोर्तुगीजांनी मान्य केले. मोगल आरमार व सैन्याला कोणताही त्रास न देण्याचे तसेच त्यांना वस्तु विकत घेण्यास परवानगी दिली. त्याबदल्यात दक्षिण कोकणचा भाग पोर्तुगीजांना देण्याचे मान्य करण्यात आले.

**संभाजी महाराजांचा पोर्तुगीज प्रदेशावर हल्ला :**

मोगल-पोर्तुगीज मैत्री करारामुळे पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजी महाराजांनी पोर्तुगीज प्रदेशावर हल्ला करण्यास सुरूवात केली. संभाजीराजांनी ठाणे जिल्ह्यातील डहाणू, असेरी, तारापूर या ठिकाणांवर हल्ले केले. तारापूर येथे ८ दिवस संघर्ष झाला. मराठ्यांनी अनेक खेड्यांची जाळपोळ करून पोर्तुगीजांच्या नौका हस्तगत केल्या. जुलै १६८३ मध्ये मराठ्यांनी पोर्तुगीजांच्या चौल या बंदरावर हल्ला केला. चौल चा वेढा ६ महिने चालू होता.

**फोंडा किल्ला हस्तगत :**

चौलचा वेढा मराठ्यांनी उठवावा म्हणून पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या ताब्यातील फोंडा किल्ल्यावर आक्रमण केले. या किल्ल्यावर तोफा डागून किल्ल्यास भगदाड पाडले. यावेळी पोर्तुगीजांच्या ताब्यात किल्ला जाणार तेवढ्यात स्वत: संभाजी महाराज, येसाजी कंक, कृष्णाजी कंक यांनी फोंडा किल्ल्यावर आक्रमण करून पोर्तुगीजांना पराभूत केले. फोंडा किल्ल्याच्या या युद्धात कृष्णाजी कंक मारले गेले. स्वत: संभाजी राजे ८००० घोडदळ व १५०० पायदळ घेऊन युद्धात सहभागी झाले होते.

**जुवे बेटावर पोर्तुगीजांची वसाहत :**

फोंडा घाटाच्या संघर्षानंतर संभाजी महाराज रायगडाकडे जातील असे पोर्तुगीजांच्या व्हाईसरायला वाटले. फोंडा किल्ल्यानंतर मराठ्यांनी गोव्याच्या साष्टी आणि बारदेश प्रदेशावर हल्ला केला. २४ डिसेंबर १६८३ रोजी पोर्तुगीज व्हाईसराय ने गोव्यातील प्रमुख नागरिकांची बैठक बोलावली. त्याच दिवशी संभाजी महाराजांनी जुवे बेटावर हल्ला केला. या हल्ल्यात १५० पोर्तुगीज सैनिक ठार झाले. उर्वरित सैन्य पळून गेले. जुवे बेट मराठ्यांच्या ताब्यात आले.

**मराठ्यांची गोव्यावर स्वारी :**

जुवे बेट जिंकल्यानंतर संभाजीने गोव्यावर स्वारी करण्याची तयारी केली. यावेळी गोवा सोडून व्हाईसरायने पळ काढला. परंतु त्याचवेळी शहाआलम हा मोगल सुभेदार प्रचंड सैन्य घेऊन कोकणात येत आहे. ही बातमी समजल्यामुळे संभाजीराजांनी ही मोहीम अर्धवट

सोडून रायगडाकडे प्रयाण केले. त्यामुळे गोवा जिंकता आला नाही.

## मराठा–पोर्तुगीज तह :

मराठा–पोर्तुगीज संघर्ष १६८३च्या अखेरीस संपला. १६८४ मध्ये तहाची प्रथम बोलणी रायगडावर झाली. त्यावेळी कवी कलष व अकबर हे संभाजीच्या वतीने हजर होते. या तहानुसार :

१. मराठे व पोर्तुगीजांनी एकमेकांची पकडलेली जहाजे परत करावीत.
२. पोर्तुगीजांनी वसईचा कर व दमणची चौथाई मराठ्यांना द्यावी. त्याबदल्यात मराठ्यांनी या प्रदेशाचे संरक्षण करावे.
३. दोघांचाही व्यापार पूर्वीप्रमाणे चालू राहील.
४. मराठ्यांनी पोर्तुगिजांचा जिंकलेला प्रदेश व किल्ले परत करावेत व यापुढे मराठ्यांनी नवे किल्ले बांधू नयेत.

परंतु या तहात आंजेदीव बेटाबाबत एकमत न होऊ शकल्याने तहाची बोलणी फिसकटली. या तहाची दुसरी फेरी गोव्यात झाली. यावेळी रंगोजी लक्ष्मीधर व सिधोजी फर्जंद हे मराठ्यांचे वकील होते. शेवटी या तहाच्या मसुद्याला अंतिम स्वरूप आले नाही. त्यामुळे पोर्तुगिजांशी संघर्ष सुरू राहिला.

## देसायांचे बंड :

मराठे–पोर्तुगीज तह फिसकटल्यामुळे पोर्तुगीजांनी कोल्हापूर प्रांतातील देसायांना मराठ्यांविरूद्ध चिथावणी देण्यास प्रारंभ केला. त्यामुळे पुन्हा पोर्तुगीज–मराठे संघर्ष सुरू झाला. या देसायांनी पोर्तुगीजांची मदत घेऊन साखळी, पेडणे, डिचोली, फोंडे, कुडाळ या भागात बंडाळी करून चौथाई व सरदेशमुखी देण्याचे नाकारले. खेम सावंत या कुडाळच्या देसायाने पोर्तुगिजांशी मैत्रीचा करार केला होता.

अश्या प्रकारे पोर्तुगीज व देसाई यांनी एकत्र येऊन मराठ्यांविरूद्ध संघर्ष चालू केला. १६८७ मध्ये पोर्तुगीजांनी मराठ्यांकडे गेलेला प्रदेश जिंकला. यावेळी किनारपट्टीवरील सावंत, दळवी, नाईक, देसाई हे वतनदारही मोगलांना मिळाले होते. मोगलांनी या वतनदारांना वतनदारीचे अमिष दाखविले होते. संभाजी महाराजांच्या अखेरपर्यंत पोर्तुगीजांशी मराठ्यांचा संघर्ष चालू होता.

## संभाजी–सिद्दी संबंध :

छत्रपती शिवाजी महाराजांनाही सिद्दीचा बंदोबस्त करता आला नाही. त्यामुळे पश्चिम किनारपट्टीवर सिद्दी प्रबळ बनला होता. त्याच्या राज्यात जंजिरा, मुरूड, नांदगाव, मांडले, श्रीवर्धन, म्हसले, गोवले, पंचायतन इ. प्रदेशाचा समावेश होता. याशिवाय मोगलांचीही मदत सिद्दीस मिळत होती. संभाजी–सिद्दी संबंध पुढीलप्रमाणे :

## उंदेरी बेटावरील संघर्ष :

सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी त्याच्या ताब्यातील उंदेरी बेटावर संभाजीने हल्ला

केला. १८ जुलै १६८० रोजी मराठ्यांनी या बेटावर प्रत्यक्ष हल्ला केला. परंतु सिद्दीला इंग्रजांकडून मदत मिळत असल्याने मराठ्यांना अपयश आले. सप्टेंबर १६८० मध्ये स्वत: संभाजीने २०० सैनिकांसह उंदेरी बेटावर हल्ला केला.परंतु त्यांस हे बेट जिंकता आले नाही.

### दंडराजपुरीस वेढा :

जंजिरा किल्ला हे सिद्दीचे मूळ स्थान होते. जंजिरा किल्ल्यासच दंडराजपूरी असे म्हणत. डिसेंबर १६८१ मध्ये सिद्दीने मराठ्यांच्या ताब्यातील नागोठणे, आपटे ही ठिकाणी लुटली. यावेळी अनेकांना कैद केले. त्यामूळे डिसेंबर १६८१ मध्ये संभाजीराजांनी जंजिऱ्यास वेढा दिला. यावेळी अकबरही बरोबर होता. जंजिऱ्या समोरील खाडी बुजविण्याचा प्रयत्न यावेळी संभाजीने केला. परंतु तो असफल ठरला. परंतु याचवेळी हसन अलीखान या मोगल सुभेदाराने कल्याण प्रांतात आक्रमण केल्याने जंजिरा मोहिमेची जबाबदारी दादाजी व विसाजी रघुनाथकडे सोपविण्यात आली. स्वत: संभाजी कल्याण प्रांताकडे गेले. मराठ्यांना जंजिरा जिंकता आला नाही.

### संभाजीचा सिद्दीकडून पराभव :

ऑगस्ट १६८२ मध्ये सिद्दीने मराठ्यांच्या ताब्यातील नागोठणे या ठिकाणावर हल्ला केला. तेथे लुटालूट करून जाळपोळ केली. अनेकांना कैद केले. यावेळी संभाजीने दौलतखान कावजी व सिद्दी मिस्त्र या दोन आरमार प्रमुखांना सिद्दी विरूद्ध पाठविले. यावेळी कोल गावाजवळ लढाई होऊन सिद्दी मिस्त्री मारला गेला. यावेळी संभाजीच्या आरमाराचा पराभव झाला.

### सिद्दी-मराठे अखेरचा संघर्ष :

१६८६ मध्ये जंजिऱ्याच्या सिद्दी खैरियतने औरंगजेबाच्या चिथावणीवरून मराठ्यांच्या प्रदेशावर आक्रमणे करण्यास सुरूवात केली. त्याने मराठ्यांचे काही प्रदेश, किल्ले जिंकले. जैतपूरच्या खाडीत मराठ्यांनी सिद्दीला चांगला धडा शिकविला. ही मोहीम अर्धवट सोडून मोगलांच्या आक्रमणाचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजीस जावे लागले.

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून जंजिऱ्याच्या सिद्दीचा मराठ्यांना पूर्णपणे पाडाव करता आला नाही. छत्रपती संभाजी महाराजांना देखील अनेक संकटांमुळे सिद्दीचा पूर्णपणे बंदोबस्त करता आला नाही.

### संभाजी महाराज व इंग्रज संबंध :

इंग्रज व संभाजी राजे यांच्यातील संबंध कधी मैत्रीचे तर कधी शत्रुत्वाचे तर कधी तटस्थतेचे होते. शिवाजी महाराजांच्या काळात मराठे इंग्रज यांच्यात झालेल्या तहान्वये इंग्रजांनी सिद्दीला मुंबईत आश्रय न देण्याचे मान्य केले होते. शिवाय राजापूरच्या वखारीची नुकसान भरपाई इंग्रज मागत होते. इंग्रजांनी मराठ्यांविरूद्ध सिद्दीला आश्रय दिला होता. त्यामुळे संभाजी व इंग्रज संबंध ताणलेले होते.

### इ.स. १६८४चा करार :

इ.स. १६८२ मध्ये प्रल्हाद निराजीस मुंबईस पाठवून मराठा-इंग्रज संबंधात वाटाघाटी

करण्यात आल्या. हेन्री स्मीथ हा मराठा दरबारात येऊन गेला. परंतु यावेळी फारसे काही साध्य झाले नाही. इ.स. १६८४ मध्ये इंग्रज-मराठे यांच्यात करार झाला. कारण संभाजीने मुंबईजवळ कोलाबा, कारंजा, सोपारा, एलिफंटा ही ठांणी जिंकून घेतली होती. त्यामुळे इंग्रजांना हा करार करणे भाग पडले.

या करारानुसार : -

१. इंग्रजांनी वाटेल त्या ठिकाणी वखारी स्थापन करव्यात. नागोठाणे व पेण येथेही वखार स्थापण्याची परवानगी देण्यात आली.

२. इंग्रजांनी मराठा राज्यातील कोणत्याही व्यक्तीस गुलाम म्हणून किंवा ख्रिश्चन बनविण्यासाठी विकत घेऊ नये.

३. इंग्रजांच्या आयात मालावर अडीच टक्के जकात तर निर्यात माल जकातमुक्त राहील.

४. इंग्रज-मराठे यांचे अधिकारी गुन्हा करून एकमेकांच्या हद्दीत पळून गेल्यास त्यांच्या अदलाबदली करणे.

५. पोर्तुगीज-इंग्रज-डच या संघर्षात मराठे तटस्थ राहतील.

६. इंग्रज व त्यांच्या व्यापाऱ्यांना मराठा राज्यात येण्यास परवानगी राहील.

७. मोगल-मराठा युद्धात एकमेकांची जहाजे(इंग्रज-मराठा) एकमेकांच्या हद्दीत सापडल्यास मालासह

   जहाजे एकमेकांना परत करणे.

८. इंग्रजांना मराठा राज्यात जळतण कोठेही विनाजकात विकत घेण्याची परवानगी राहील.

९. मुंबईच्या इंग्रजांनी सिद्दीला आश्रय देऊ नये.

अशा प्रकारे १६८४ च्या करारात वरीलप्रमाणे तरतुदी ठरल्या होत्या. १६८५ मध्ये मोगलांनी सुरत, मच्छलीपट्टणम, हुबळी या इंग्रजांच्या वखारी जप्त करण्याची धमकी दिल्याने त्यांना संभाजीबरोबर मैत्री करण्याशिवाय पर्याय नव्हता. इ.स.१६८७ मध्ये झालेल्या करारानुसार मुंबईजवळच्या खाडीचे संरक्षण इंग्रजांनी करावे तर जमिनीच्या संरक्षणाची जबादारी मराठ्यांनी घ्यावी असे ठरले. त्यामुळे सिद्दीचा मराठ्यांना होणारा उपद्रव कमी झाला. संभाजी महाराजांच्या अखेरच्या कारकिर्दीपर्यंत मराठे-इंग्रज संबंध सुरळीत राहीले.

**संभाजी महाराजांना अटक :**

इ.स.१६८७ नंतर मराठ्यांचा पाडाव करण्यासाठी औरंगजेबाने आपली सर्व शक्ती पणाला लावली होती. चोहीकडून संभाजीस कोंडीत पकडण्याचे प्रयत्न सुरू झाले. १६८९ मध्ये संभाजी महाराज खेळणा किल्ल्यावरून रायगडास निघाले होते. मोगलांचा सुभेदार शेख निजाम(मुकर्रबखान) हा पाठलागावर होता. १ फेब्रुवारी १६८९ला संभाजीचा मुक्काम

संगमेश्वर येथे एका वाड्यात होता. त्याच्याबरोबर कवी कलश हाही होता. शेख निजामला ही बातमी समजताच त्याने संभाजीवर अचानक हल्ला केला. यावेळी दोन्ही बाजूचे सैनिक ठार झाले. कवी कलश व संभाजी यांना अटक करून बहादूरगडावर नेण्यात आले. यावेळी औरंगजेबाची छावणी बहादूरगडावर होती. औरंगजेबाच्या छावणीपासून दोन मैल दूर अंतरावरून दोघांनाही विदूषकासारखे पोशाख घालण्यात आले. छावणीत संभाजी राजांची व इतर कैद्यांची विटंबना करण्यात येऊन अपमानित केले. याबाबतची माहिती बखर वांङ्मयातून मिळते. तसेच साकी मुस्तैदखानानेही या प्रसंगाचे वर्णन केले आहे. यावेळी बादशहाने आपल्या अधिकाऱ्यांमार्फत तीन मागण्या केल्या.

१. संभाजीने मोगलांचे जिंकलेले किल्ले परत करावेत.

२. मराठा राज्याच्या खजिन्याची माहिती बादशहास द्यावी.

३. फितूर मोगल अधिकाऱ्यांची नावे सांगावीत.

अर्थातच संभाजी राजांनी या सर्व मागण्या फेटाळून लावल्या.

**संभाजी राजांचा दुर्दैवी अंत :**

बादशहाच्या हुकूमाने संभाजी राजे व कवी कलश यांना तुरूंगात टाकण्यात आले. यावेळी या दोघांचाही खूप छळ करण्यात आला. या प्रसंगाचे वर्णन सभासद बखरीत आले आहे. मल्हार रामराव चिटणीस यांच्या बखरीत असे वर्णन आले आहे की, औरंगजेबाने संभाजीस म्हटले की, त्याने जर धर्म परिवर्तन केले तर आपण त्यास सर्व राज्य देऊ यावर संभाजी राजांनी उत्तर दिले की, तुमची मुलगी देत असाल तर बाटतो. या उत्तराने संतप्त होऊन बादशहाने संभाजीराजांस ठार मारले. परंतु बखरीतील हे मत चुकीचे आहे असे प्रा.वा.सी.बेंद्रे व डॉ.कमल गोखले यांनी संशोधनाअंती सिद्ध केले आहे. संभाजी महाराजांचा कैदेत छळ चालू होता. १५ फेब्रुवारी १६८९ रोजी त्यांचे डोळे काढण्यात आले. कवी कलशांची जीभ छाटण्यात आली. शेवटी संभाजीराजांनी अन्नत्याग केला. ११ मार्च १६८९ रोजी संभाजीराजांचा वध करण्यात आला. याबाबत मोगल इतिहासकार खाफीखान लिहितो की, दोघांच्याही शरीरात पेंढा भरण्यात आला व त्यांच्या प्रेतांची मिरवणूक काढण्यात आली. संभाजीराजांच्या बाणेदारपणाने व धीरोदात्त मृत्यूमुळे मराठ्यांना दु:ख झाले व या वधाचा सूड घेतला पाहिजे अशी जिद्द मराठी माणसामध्ये निर्माण झाली. असे मत डॉ.एच.एन.सिन्हा यांनी नोंदविले आहे.

**छत्रपती संभाजी राजांच्या कार्याचे मूल्यमापन :**

११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी हौतात्म्य स्विकारले. संभाजीराजांचे हे बलिदान व्यर्थ ठरले नाही. याबाबत डॉ.कमल गोखले म्हणतात, 'हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने मराठ्यांच्या ३२वर्षीय राजाला हालहाल करून ठार मारले. नियतीने औरंगजेबाच्या हातून मराठ्यांचा राजा ठार झाला. पण औरंगजेबाला हिंदवी स्वराज्याचा नाश करण्याची आपली महत्वाकांक्षा पूर्ण करता आली नाही.' म्हणजेच संभाजीच्या मृत्यूनंतर हिंदवी स्वराज्य नष्ट झाले नाही. उलट संभाजीच्या बलिदानातून प्रेरणा

घेऊन पुढे मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध मराठ्यांनी जोरदारपणे लढवले.

**संभाजी राजांविषयी गैरसमज :**

संभाजी महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन करावयाचे झाल्यास संभाजी राजांबद्दल कथा-कादंबरीकार तसेच गृहकलहातील विरोधक यांनी बरेच गैरसमज व दंतकथा पसरविल्या आहेत.

मल्हार रामराव चिटणीसांच्या बखरीमध्ये, रायगडावर हळदीकुंकवाच्या समारंभात एका सुंदर ब्राह्मण स्त्रीला संभाजी राजांनी ओढून नेले व तिच्याशी बदकर्म केले. पुढे या भीतीपोटी संभाजी दिलेरखानाकडे पळून गेला. परंतु वा.सी.बेंद्रे यांनी हे प्रकरण पूर्णपणे खोटे आहे हे संशोधनाने सिद्ध केले आहे.

तसेच नाटककारांनीही संभाजी स्त्रीलंपट, तापट, व्यसनी, क्रूर, दुराचारी होता असे वर्णन केले आहे. 'थोरातांची कमळा' हा ऐतिहासिक चित्रपटही अशीच भूमिका रंगवितो.

संभाजीने राज्यरोहणाच्या वेळी त्यास विरोध करणाऱ्यांची कत्तल केली. त्यामुळेही बखरकारांनी त्याच्यावर अनेक आरोप केले आहेत. परंतु हे सर्व आरोप चुकीचे आहेत.

**संभाजी विषयीचे नवे संशोधन :**

अलिकडच्या काळात ऐतिहासिक कागदपत्रांचा आधार घेऊन संभाजीच्या कारकीर्दीचे सूक्ष्म संशोधन वा.सी.बेंद्रे यांनी केले आहे. परंपरागत वांङमयाने संभाजीवर केलेले सर्व आरोप चुकीचे आहेत. हे त्यांनी संशोधनाने मांडले आहे. डॉ.कमल गोखले यांनी देखील 'शिवपुत्र-संभाजी' या संशोधनात्मक ग्रंथात संभाजीचे चरित्र विस्ताराने मांडले आहे.

**संभाजी कर्तृत्ववान राजा :**

संभाजी महाराजांची कारकीर्द १६८० ते १६८९ अशी ९ वर्षांची होती. या काळात महाकाय मोगली साम्राज्याशी त्यांनी महत्वपूर्ण झुंज दिली. औरंगजेबाचे सैन्य अफाट होते. तो संपूर्ण हिंदुस्थानचा सम्राट होता. त्याने सतत तीन वर्षे संभाजीवर हल्ला चढवूनही त्याला यश मिळाले नाही. आदिलशाही, कुतूबशाही मोगली आक्रमणामुळे नष्ट झाल्या. तरी देखील संभाजीच्या नेतृत्वाखाली मराठी राज्य या बलाढ्य आक्रमणास तोंड देत होते. खाफीखान हा मोगली इतिहासकार सुद्धा संभाजीच्या शौर्याची स्तुती करताना संभाजीस 'सवाई शिवाजी' म्हणून संबोधतो. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, सिद्दी या सर्वांना देखील संभाजीने आपल्या कर्तृत्वाने आचंबित केले होते.

**गनिमी कावा व कुशल सेनापती :**

संभाजीवर मोगलांसारखे आक्रमण चालून आले असताना देखील त्याने सैन्यभरतीसाठी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. दारूगोळा निर्मितीचे कारखाने काढण्याचा प्रयत्न केला. आरमार उभारणीचाही प्रयत्न केला असे ऐतिहासिक कागदपत्रांवरून दिसून येते. संभाजी राजांनी ९ वर्षाच्या कारकीर्दीमध्ये गनिमी काव्याचा वापर करून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत एक कुशल सेनापती म्हणून स्वराज्याचे संरक्षण केले.

**संभाजीची राजकारण पटुता :**

संभाजीने तत्कालीन राजकारणात आपले कर्तृत्व निर्माण केले. आदिलशाही व कुतुबशाही वाचविण्यासाठी त्याने त्यांना मदत केली. अकबरास आश्रय दिला. गोव्यावर हल्ला करून पोर्तुगीजांवर वचक बसविला. या सर्व प्रकरणांमध्ये संभाजीने यशस्वीपणे राजकारण केले आहे असे दिसून येते.

**मराठी स्वराज्याचे संरक्षण :**

इ.स.१६८१ पासून संभाजी राजे मोगलांविरूद्ध संघर्ष करत होते. औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेत तळ देऊन बसला होता. १६८३ साली रामसेजचा किल्ला मराठी सेनापतींच्या पराक्रमामुळे औरंगजेबास तीन वेगवेगळे सरदार पाठवूनही जिंकता आला नाही. १६८१-८५ या काळात संभाजीने मोगल, सिद्धी, पोर्तुगीज या सत्ताधिशांपासून स्वराज्याचे संरक्षण केले. आदिलशाही व कुतूबशाही मोगलांनी नष्ट केल्यानंतर मोगलांचा प्रभाव अधिक वाढला. दक्षिणेतील अनेक सरदार मोगलांना जाऊन मिळाले. मराठी स्वराज्यावर मोगलांनी चोहोबाजूंने हल्ले चढविले. या सर्व आक्रमणांना संभाजी राजांनी यशस्वीपणे तोंड दिले. आदिलशाही व कुतूबशाही या सत्ता कोसळल्या तरी मराठी स्वराज्य टिकले यातच संभाजीचे कार्य दिसून येते.

**सुविद्य व जाणता राजा :**

संभाजीराजे स्वत: काव्य, शास्त्र, पुराण, चांगले जाणत होते. तसेच धनुर्विद्या, मल्लविद्या व नितीशास्त्राचाही अभ्यास होता. संभाजी महाराजांनी स्वत: वयाच्या २० व्या वर्षी 'बुधभूषणम्' हा संस्कृत ग्रंथ लिहीला. यावरून त्यांना हिंदी व संस्कृत भाषा अवगत होत्या. संभाजी महाराजांनी लिहिलेले 'नायिकाभेद', 'नखशिख' हे ग्रंथ शृंगारप्रधान असून 'सातसतक' हा अध्यात्मवादी ग्रंथ लिहिला. हे तीनही ग्रंथ हिंदी (ब्रजभाषा) भाषेमध्ये आहेत. वा.सी.बेंद्रे यांनी संभाजी महाराज 'नीतिशास्त्र' उत्तम जाणत होते असे म्हटले आहे. मराठ्यांच्या इतिहासात स्वत: ग्रंथाचे लेखन करणारे संभाजी महाराज एकमेव राजे होते.

**लोककल्याणकारी राजा :**

संभाजी महाराजांचे संपूर्ण आयुष्य संघर्षात गेले. तरी देखील त्यांनी लोककल्याणाची कामे केलेली दिसतात. इंग्रजांबरोबरच्या तहात त्यांनी धर्मांतर व गुलामांच्या व्यापारावर बंदी घातली. स्वधर्मात परत येण्यास प्रोत्साहन दिले. जाळपोळीत उध्वस्त झालेल्या बाजारपेठा पुन्हा वसविल्या. युद्धात मृत्यू पावलेल्या सैनिकांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत केली. धर्मस्थळे, मंदिरे, उत्सव यांना इनाम व वर्षासने दिली. यावरून त्यांनी लोककल्याणाची कामे केल्याचे दिसून येते.

**न्यायप्रिय व कठोर शासक :**

संभाजी महाराजांना शासनाचा उत्कृष्ट वारसा शिवाजी महाराजांकडून प्राप्त झाला होता. संभाजी राजे आणि राणी येसूबाई यांचा कारभार अत्यंत चोख व दक्ष होता. राजदरबारातील अंतर्गत कलह त्यांनी संयमाने व वेळप्रसंगी निष्ठुरतेने हाताळले. या कारस्थानात सहभागी असणाऱ्या लोकांना देहांत शासन केले. तर काहींना उदार मनाने क्षमा देखील केली. त्यामुळे ते न्यायप्रिय व कठोर शासक होते असे दिसते.

**स्वधर्म संरक्षण :**

स्वराज्य संरक्षणाबरोबरच संभाजीने स्वधर्म संरक्षणाचेही महत्वपूर्ण कार्य केले. इ.स. १६८२ मध्ये रामसिंगला जे पत्र लिहिले, त्यामध्ये स्वधर्म-क्षात्रधर्म-प्रजापालनधर्म इ. बाबतचे विचार सापडतात. वेद, स्मृती, श्रृतींचाही उल्लेख या पत्रात आढळतो. या पत्रात आपला धर्म सुरक्षित रहावा ही तळमळ व्यक्त झालेली दिसते. याशिवाय बादशाही छावणीत अंत्यसमयी त्यांनी स्वधर्म संरक्षणार्थ केलेला त्याग सर्वश्रृत आहे. धर्मांतराचे प्रलोभन दाखवून औरंगजेबाने त्यांना जीवदान देण्याचे कबूल केले होते. यावेळी त्यांनी धर्मांतराऐवजी मृत्यूला कवटाळले. यावरून संभाजी महाराजांची प्रबळ धर्मनिष्ठा दिसून येते.

संभाजी राजांच्या मृत्यूच्या वेळी सर्व किल्ल्यांवर दारूगोळा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होता. मराठ्यांच्या फौजेत वाढ झाली होती. मुलकी कारभाराची व्यवस्था चोख होती. खाफीखान याने वर्णन करताना म्हटले आहे की, 'शिवाजीपेक्षा दहापटीने अधिक तापदायक राजा'. या शब्दात संभाजी महाराजांचे वर्णन केले आहे. मोगल हे आर्थिक, लष्करीदृष्टीने मराठ्यांपेक्षा अधिक संपन्न होते. तरी देखील संभाजी महाराजांनी सतत ९ वर्षे यशस्वी लढा मोगलांविरूद्ध दिला. याबाबत वा.सी.बेंद्रे म्हणतात, "एकट्या संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यासाठी सुसंघटितपणे दीर्घकाळ दिलेल्या लढ्याचा विचार केल्यास महाराष्ट्राची अखिल हिंदुस्तानात व परदेशात गाजलेली खरी कर्तबगारी, उज्ज्वल संस्कृती व तेजस्वी राष्ट्रीय संघटना यांच्या खऱ्या कसोटीचा आदर्श संभाजी महाराजांच्या कारकीर्दितच दिसतो."

सेतू माधवराव पगडींच्या मते, "संभाजी महाराजांच्या व्यसनाधिनतेची व विलासी वृत्तीची चर्चा करणे योग्य नाही. संभाजी महाराजांनी आपले प्राण पणाला लावून ९ वर्षापर्यंत स्वराज्य सुरक्षित ठेवले आणि औरंगजेबाची आक्रमणे हाणून पाडली. हे संभाजीचे खरे व्यक्तिमत्व आहे." डॉ.कमल गोखले यांनी देखील संभाजी महाराजांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढताना म्हटले आहे की, "शिवाजी राजांसारख्या सिंहाला शोभेल असेच कृत्य त्यांच्या छाव्याने करून दाखविले."

अशा प्रकारे संभाजी महाराजांचे कर्तृत्व मराठ्यांच्या इतिहासात अजरामर ठरते.

## ८.२.२ महाराणी येसूबाईंचे कार्य

छत्रपती संभाजी महाराजांना शेख निजाम (मुकर्रबखान) याने संगमेश्वर येथे पकडून बहादूरगडच्या मुक्कामी औरंगजेबासमोर हजर केले. बादशहाने देऊ केलेल्या कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी बलिदान केले. दि.११ मार्च१६८९ रोजी औरंगजेबाने अतिशय हालहाल करून छत्रपती संभाजी महाराजांना ठार केले. याचवेळी झुल्फीकारखानाने रायगडास वेढा घालून रायगडावर महाराणी येसूबाई, छत्रपती शाहू, छत्रपती राजाराम व स्वराज्यातील अनेक सरदार मंडळी यांना रायगडात अडकवून ठेवले होते. अशा कठीण वेळी महाराणी येसूबाईंनी मनाचा मोठेपणा दाखवून रायगडावरील मुत्सद्यांबरोबर सल्लामसलत करून स्वराज्य वाचविण्यासाठी राजारामास रायगडावरून निसटून जाण्याचा सल्ला दिला. या योजनेनुसार राजाराम महाराज निसटले. १९ ऑक्टोबर १६८९ रोजी रायगड मोगलांच्या ताब्यात गेला. महाराणी येसूबाई, छत्रपती शाहू

व त्यांच्याबरोबरच्या मंडळींना मोगलांनी बंदी बनविले. औरंगजेबाने त्यांना सन्मानाने वागविले. महाराणी येसूबाईंच्या बंदीवासाच्या काळात मराठे-मोगल संघर्ष चालूच होता. इ.स.१७१९ पर्यंत त्या मोगलांच्या कैदेत होत्या. ४ जुलै १७१९ रोजी छत्रपती शाहू व महाराणी येसूबाई या दोघा माय-पुत्राची भेट झाली. महाराणी येसूबाईंचे जीवनकार्य पुढीलप्रमाणे :

**१. महाराणी येसूबाईंचे बालपण :**

महाराणी येसूबाईंचे माहेरी जिऊबाई असे नाव होते. येसूबाईंना गणोजी व देवजी असे दोघे भाऊ असून त्या पिलाजी शिर्के यांच्या कन्या होत्या. येसूबाईंच्या जन्मासंबंधी निश्चित तारीख उपलब्ध नाही. त्यांचा व संभाजी महाराजांचा विवाह इ.स.१६६५ मध्ये झाला. यावेळी त्या ५-६ वर्षाच्या होत्या यावरून त्यांचा जन्म १६५९-६० च्या दरम्यानचा असावा.

**२. येसूबाईंचे बालपण व शिक्षण :**

येसूबाईंच्या बालपणाविषयी निश्चित उल्लेख आढळत नाही. विवाहाच्या वेळी त्यांचे वय ५-६ वर्षाचे होते. त्या मोठ्या झाल्यावर सासरी आल्या असाव्यात. माहेरी शिर्के घराण्याच्या पदरी असलेले केशव पंडित व रघुनाथ पंडित हे विद्वान ब्राह्मण येसूबाईंसमवेत रायगडावर आले असावेत. शिवाजी महाराजांनी केशव पंडित यास दानाध्यक्ष हे पद दिले होते. तो महाराजांचा पुरोहित म्हणून काम पहात होता. या विद्वान ब्राह्मणांच्या सहवासात येसूबाईंचे माहेरी व सासरी शिक्षण झाले. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज व जिजाऊ मातेच्या सहवासात त्यांच्यावर सुसंस्कार घडले. येसूबाईंना बालवयापासूनच गंभीर प्रसंगांना तोंड द्यावे लागले. पुरंदरच्या तहानुसार १२ मे १६६६ रोजी शिवाजी महाराज व संभाजी हे औरंगजेबास आग्र्यास भेटले. आग्र्याच्या कैदेतून शिवाजी महाराज संभाजीसह सुटले. संभाजी राजांना त्यांनी सुरक्षेच्या कारणामुळे मथुरेत ठेवले. आणि राजगडावर येऊन 'वाटेतच संभाजी मृत्यू पावला.' असे जाहीर केले. यावेळी येसूबाई ६-७ वर्षाच्या होत्या. नंतर संभाजी राजे राजगडावर सुखरूप पोहचले.

**३. शिवराज्याभिषेक व संभाजीस युवराज्याभिषेक :**

६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. यावेळी त्यांचे जेष्ठपुत्र संभाजी महाराज यांना युवराज म्हणून अभिषेक करण्यात आला. यावेळी महाराणी येसूबाई यांना युवराज्ञी म्हणून मान मिळाला. छत्रपती शिवाजी महाराज कर्नाटक मोहिमेवर ६ ऑक्टोबर १६७६ला गेले. जाते वेळी त्यांनी प्रभावळीचे सुभेदार म्हणून संभाजीराजांची नियुक्ती केली. १६७६ मध्ये शृंगारपूरला येऊन संभाजी राजे येसुबाईंसह कारभार पाहू लागले. शृंगारपूरातच संभाजी राजे व येसूबाई यांना मुलगी झाली. तिचे नाव 'भवानीबाई' असे ठेवण्यात आले. याच काळात संभाजी राजे दिलेरखानास जाऊन मिळाले होते.

**४. येसुबाईस महाराणी पदाची प्राप्ती :**

३ एप्रिल १६८० रोजी शिवाजी महाराजांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूची बातमी

संभाजी राजांना कळविण्यात आली नाही. यावेळी सोयराबाई व मंत्रीमंडळाच्या योजनेनुसार राजारामास छत्रपती पद देण्याचे ठरले व संभाजी राजांना कैद करण्यासाठी अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांना पन्हाळगडावर पाठविण्यात आले. वाटेत हंबीरराव मोहिते यांची भेट झाल्यावर त्यांनी वरील कारस्थान झुगारून दिले. अण्णाजी व मोरोपंत यांना कैद करून संभाजी राजांसमोर हजर केले. २० जुलै १६८० रोजी संभाजीराजांनी संघर्ष करून रायगडावर वर्चस्व मिळविले. ९ जानेवारी १६८१ रोजी संभाजी राजांनी स्वत:स विधीयुक्त राज्याभिषेक केला. यावेळी येसुबाईंना पट्टराणी म्हणून राज्याभिषेक करण्यात आला. व त्यांना महाराणीपदाची प्राप्ती झाली. येसूबाईंचा राज्यकारभारातही सहभाग होता. 'सखी राज्ञी जयति।।' अशा मुद्रेचे एक पत्र उपलब्ध आहे. यावरून येसूबाई राज्यकारभारात मदत करीत असत असे दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करायचे या हेतुने औरंगजेबाने दक्षिणेची मोहीम काढली. १३ नोव्हेंबर १६८१ ला औरंगजेब बऱ्हाणपुरला पोहचला. औरंगजेबाने औरंगाबाद येथे छावणी टाकली. आणि त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज व औरंगजेब यांच्यात संघर्ष सुरू झाला. या संघर्षाचा आढावा मागील प्रकरणात सविस्तरपणे घेण्यात आला आहे. दरम्यानच्या काळात दिनांक १८ मे १६८२ रोजी येसूबाई प्रसुत झाल्या. त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव शिवाजी राजे असे ठेवण्यात आले. पुढे शिवाजी राजे छत्रपती शाहू म्हणून स्वराज्याच्या गादीवर आले. कवींद्र परमानंद नेवासकर यांच्या सुर्यवंश काव्यातील गोविंद कवींद्र यांनी प्रकाशित केलेल्या काव्यातील अंशावतरण यातील पुत्रजनन नावाच्या अध्यायात छत्रपती शाहूच्या जन्माचे वर्णन आले आहे.

### ५. रायगडाचा पाडाव व येसूबाईंस अटक :

३ फेब्रुवारी १६८९ रोजी संभाजी महाराजांना मुकर्रबखानाने संगमेश्वर येथे कैद केले. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा वध करण्यात आला. त्यापूर्वीच म्हणजेच १२ फेब्रुवारी १६८९ रोजी राजारामास रायगडावर राज्याभिषेक करण्यात आला. यावेळी रायगडावर महाराणी येसूबाई, शाहू जनार्दनपंत हणमंते, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, मानसिंग मोरे, राहुजी सोमनाथ, खंडो बल्लाळ, निळोपंत पेशवा, प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण, हिंदूराव घोरपडे इ. मराठा मंडळी हजर होती.

२५ मार्च १६८९ रोजी झुल्फीकारखानाने रायगडास वेढा दिला. या मोहीमेसाठी बादशहाने २ लाख रुपये सरकारी खजिन्यातून दिले होते. एतिकादखान, बखाबरामंद खान हेही सरदार या मोहीमेत सहभागी झाले होते. मोगलांनी रायगड जिंकण्याचा कसोशिने प्रयत्न केला. १९ ऑक्टोबर १६८९ ला रायगड जिंकून महाराणी येसूबाई व शाहू यांना अटक करण्यात आली.

### ६. येसूबाईंचा सूज्ञ सल्ला :

मोगलांचे रायगड जिंकण्यासाठी जोरदार प्रयत्न चालू होते. किल्ल्यावरील रसद संपत आलेली होती. यावेळी सर्वांनी एकत्र रायगडावर राहण्यात धोका आहे; हे ओळखून येसूबाईंनी पतिनिधनाचे दु:ख बाजूस सारून स्वराज्यासाठी सर्वांना एक सूज्ञ सल्ला दिला. तो पुढीलप्रमाणे :

'मोगली आक्रमणाच्या संकटात रायगड फार दिवस आपण लढवू शकत नाही. तेव्हा राजारामाचे नेतृत्व सर्व सरदारांनी मान्य करून राजारामासह किल्ल्याबाहेर पडून कर्नाटकातील जिंजीचा आश्रय घ्यावा व तेथून राज्यकारभार करावा.' असा सल्ला येसूबाईंनी दिला. त्यानुसार ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम महाराज, रामचंद्रपंत अरमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण, बाजी पारसनीस, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, संताजी घोरपडे, धनाजी जाधव इ. मुत्सद्दी किल्ल्याबाहेर पडले. पुढील काळात छत्रपती राजारामांनी जिंजीस आश्रय घेऊन स्वराज्याचे रक्षण केले.

### ७. येसुबाईंच्या सल्ल्याचे मूल्यमापन :

१९ ऑक्टोबर १६८९ रोजी रायगड मोगलांच्या ताब्यात गेला. रायगड जिंकल्यास मराठ्यांविरूद्धचे युद्ध संपुष्टात येईल असे औरंगजेबास वाटत होते. परंतु येसूबाईंच्या सल्ल्यामुळे औरंगजेबाची ही अपेक्षा पूर्ण होऊ शकली नाही. फ्रेंच गव्हर्नर फ्रान्सिस मार्टिन याने या सल्ल्याची नोंद एप्रिल १६८९ च्या रोजनिशीमध्ये केली आहे. त्याच्या मते शाहूला व येसूबाईंना रायगडावर ठेवण्यामध्ये काही मुत्सद्यांचा हात होता. साकी मुस्तैदखान, वा.सी.बेंद्रे यांनी ही या मतास दुजोरा दिला आहे. सेतुमाधवराव पगडी यांनी आपल्या 'नियतीच्या विळख्यात औरंगजेब' या ग्रंथात देखील येसूबाईंच्या या सल्ल्याबद्दल कौतुक केले आहे. त्यांच्या मते येसूबाईंच्या या सल्ल्यामुळेच सहा महिन्यात आटोपणारी औरंगजेबाची मोहीम २० वर्षे लांबली व औरंगजेबास आपल्या हयातीत मराठ्यांची सत्ता नष्ट करता आली नाही. डॉ.जयसिंगराव पवार, स.मा.गर्गे यांनीही येसूबाईंच्या या सल्ल्याबद्दल गौरव केला आहे.

### ८. येसुबाईंची बादशहाच्या छावणीत रवानगी :

मोगलांनी रायगड जिंकल्यानंतर रायगडावरील संभाजीची बायका-मुले यांना बरोबर घेऊन यावे अशी झुल्फीकारखानास आज्ञा केली. त्याने संभाजीची मुले, शिवाजी (शाहू), मानसिंग, मदनसिंग, महाराणी येसुबाई यांना बरोबर घेऊन तो बादशहाकडे आला. संभाजीच्या मालमत्तेच्या दोन पेट्या जडजवाहिऱ्यांनी भरलेल्या होत्या. बादशहाने यावेळी महाराणी येसूबाई यांना व संभाजीच्या मुलांना सन्मानाने वागवले. संभाजीचा मुलगा शाहू यास सात हजारांची मनसब देण्यात आली व त्याचा गौरव करण्यात आला, येसूबाई व छत्रपती शाहू यांच्या निवासाची विशेष सोय करण्यात आली. औरंगजेबाच्या छावणी शेजारीच त्यांच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. पुढे ४ जुलै १७१९ पर्यंत मोगलांच्या छावणीत त्यांना बंदी म्हणून रहावे लागले. बादशहाची छावणी जसा प्रवास करत होती, त्याप्रमाणेच त्यांचाही प्रवास होत असे.

### ९. येसुबाईंच्या कार्याचे मूल्यमापन :

२० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर या ठिकाणी औरंगजेबाचा मृत्यू झाला. बापाच्या मृत्यूची बातमी समजताच शहजादा आज्जम याने ५ मार्च १७०७ रोजी स्वत:स बादशहा म्हणून घोषित केले. वडिलांचा दफनविधी करून तो दिल्लीला जाण्यासाठी निघाला.

शाहू, येसूबाई व सर्व कबिला बरोबर घेऊन तो दिल्लीला जाण्यासाठी निघाला. वाटेत रजपूत सरदार व काही मनसबदारांकरवी शाहूने आज्जमशहाचे मन वळविले. नर्मदा नदी पार केल्यावर सिरोंचे येथे छावणीचा तळ पडला. झीनत बेगमच्या मध्यस्तीने दोहरा या ठिकाणी शाहूस मुक्त करण्यात आले. यावेळी महाराणी येसूबाई व इतर हे बादशहाच्या कैदेतच होते.

महाराणी येसूबाईच्या दिल्लीतील बंदीवासाची फारशी माहिति उपलब्ध नाही. पुढे बाळाजी पेशव्यांच्या मार्फत ४ जुलै १७१९ रोजी येसुबाईंची सुटका होऊन त्या स्वराज्यात परत आल्या.

महाराणी येसूबाईंच्या कार्याचे मूल्यमापन करताना महाराणी येसूबाईंनी आपल्या जीवनात अतिशय कठीण प्रसंगांना धीरोदात्तपणे तोंड दिले. छत्रपती शिवाजी महाराजांची सून व छत्रपती संभाजी राजांच्या पत्नी म्हणून येसूबाईंनी अत्यंत वैभवाचे दिवस अनुभवले होते. परंतु संभाजी महाराजांच्या वधानंतर त्यांच्या जीवनातील दुर्देवाला सुरूवात झाली. छत्रपती संभाजी महाराजांना त्यांनी प्रशासनात मदत केली. पती निधनाचे दुःख बाजूला सारून रायगडावरील सल्लामसलतीने राजाराम महाराजांना जिंजीस पाठविले. त्यांच्या या सल्ल्यामुळेच स्वराज्य वाचू शकले. स्वत: मुलासह बादशहाच्या कैदी बनल्या. यावेळी येसूबाईंच्या मनाचा थोरपणा दिसून येतो. आपल्या आयुष्यातील जवळजवळ ३० वर्षे त्यांना मोगली छावणीत कैद म्हणून रहावे लागले. या बंदीवासाच्या काळातही त्यांनी आपल्या पुत्राचे शाहूचे संगोपन करून शाहूवर उत्तम संस्कार केले. या महान राणीच्या मृत्यूविषयी इतिहासकारांमध्ये एकमत नाही. वा.सी.बेंद्रे यांच्या मते येसूबाई इ.स.१७२७ मध्ये वारल्या असाव्यात असे म्हटले आहे. तर इतिहासकार स.मा.गर्गे यांच्या मते वारणेच्या तहानंतर येसूबाईंचा मृत्यू झाला असावा असे अनुमान नोंदले आहे. महाराणी येसूबाईंचे वृंदावन छत्रपती शाहूंनी संगम माहूली येथे बांधले. मराठ्यांच्या इतिहासात या महाराणीचे कार्य निश्चितच महत्वाचे आहे.

### ८.२.३ छत्रपती राजाराम महाराजांचे कार्य

छत्रपती संभाजी महाराजांना मोगलांनी कैद केल्यामुळे स्वराज्यावर महान संकट कोसळले. हिंदवी स्वराज्याचा प्रत्यक्ष नेताच मोगलांच्या ताब्यात सापडल्याने गंभीर प्रसंग निर्माण झाला. आता मराठी राज्य संपते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. संभाजी महाराजांना पकडल्यावर मोगलांनी लगेचच रायगडास वेढा दिला. यावेळी रायगडावर महाराणी येसूबाई, राजाराम महाराज व स्वराज्यातील कारभारी मंडळी रायगडच्या वेढ्यात अडकून पडली. परंतु अशा विचित्र परिस्थितीतून मराठी स्वराज्य पुन्हा उभे राहिले. इ.स.१६८९ ते १७०० या कालखंडातील स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व राजाराम महाराजांनी केले. त्यांचे स्वराज्याविषयीचे कार्य पुढीलप्रमाणे :

**१. छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म व बालपण :**

छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म गुरूवार दि. २४ फेब्रुवारी १६७० या दिवशी झाला. राजारामांच्या शिक्षणाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. परंतु त्यांना लिहिता-

वाचता येत असावे असे दर्शविणारे पुरावे आहेत. हंबीरराव मोहिते या शिवाजी महाराजांच्या सेनापतीच्या देखरेखीखाली राजारामांचे लष्करी शिक्षण पूर्ण झाले असावे. दि. १५ मार्च १६८० रोजी सेनापती प्रतापराव गुजर यांची कन्या जानकीबाई हिच्याबरोबर राजारामांचा विवाह शिवाजी महाराजांनी थाटामाटाने पार पाडला. आणि ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाले. छत्रपती संभाजी महाराजांनी राजाराम महाराजांचे दुसरे लग्न सेनापती हंबीरराव मोहित्यांच्या ताराबाई या मुलीशी लावून दिले. पुढे ताराबाईंनी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात महत्वाची भूमिका पार पाडली.

**२. संभाजी महाराजांचा वध आणि रायगडास वेढा :**

१ फेब्रुवारी १६८९ रोजी संगमेश्वर येथे संभाजी महाराजांना अटक करण्यात आली. आणि मोगलांना मराठ्यांची राजधानी असलेल्या रायगडाला वेढा दिला. यावेळी रायगडावर महाराणी येसूबाई, राजपुत्र शाहू, संभाजी राजांचे धाकटे बंधू राजाराम व अन्य कारभारी मंडळी रायगडाच्या वेढ्यात अडकली. रायगडाचा पाडाव केल्यास या सर्वांना अटक करून मराठी स्वराज्य संपुष्टात आणता येईल असे मोगलांना वाटत होते. त्यामुळे रायगडाचा वेढा अत्यंत प्रखर व काटेकोरपणे चालू होता. झुल्फीकारखानाकडे या वेढ्याचे नेतृत्व होते. स्वराज्याच्या इतर भागात मोगली फौजांनी धुमाकूळ घालून अनेक किल्ले जिंकले. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा वध करण्यात आला.

**३. राजारामास छत्रपती पद :**

संभाजी महाराजांना मोगलांनी कैद केले त्यामुळे स्वराज्याचे छत्रपती पद रिकामे झाले होते. संभाजी महाराजांची मोगलांच्या कैदेतून सुटका होणे शक्य नव्हते. यापुढील काळातील स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व राजारामाने स्विकारावे हा विचार रायगडावर झाला. ९ फेब्रुवारी १६८९ रोजी राजारामाला छत्रपती पद देण्यात आले. राज्यारोहणाचा समारंभ होऊन संभाजी महाराजांनी तुरूंगात टाकलेले मुत्सद्दी मुक्त करण्यात आले.

**४. राजारामाचे जिंजीकडे प्रयाण :**

मराठी स्वराज्यातील सर्व महत्वाची मंडळी रायगडाच्या वेढ्यात अडकून पडली होती. रायगड लढविणे फार दिवस शक्य नव्हते. मोगल स्वराज्यात धुमाकूळ घालत होते. अशा परिस्थितीत महाराणी येसूबाईंनी रायगडावरील मुत्सद्यांबरोबर सल्लामसलत केली. यानुसार राजारामांनी रायगडावरून निसटून जावे आणि मोगलांवर गनिमी काव्याने हल्ले करावे असे ठरले. दि.५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम निवडक लोकांसह रायगडावरून निसटले. यावेळी राजारामांसोबत रामचंद्रपंत आमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी प्रल्हाद, बाजी पारसनीस, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, धनाजी जाधव, संताजी घोरपडे इ. मंडळी रायगडावरून निसटली. ही बातमी समजताच औरंगजेबास धक्का पोहचला. छत्रपती राजारामाने प्रतापगडावर मुक्काम केला. मोगलांना हे कळताच मोगलांनी प्रतापगडास वेढा देऊन एप्रिल १६८९ मध्ये प्रतापगड जिंकला. त्यानंतर राजाराम साताऱ्यास आले. तेथून अजिंक्यतारा या किल्ल्यावर गेले. तेथून राजाराम पन्हाळगडाकडे आले. मोगली फौजांनी पाठलाग करून एकापाठोपाठ एक किल्ले घेण्यास सुरूवात केली.

राजाराम सप्टेंबर १६८९ मध्ये पन्हाळगडावरून निसटले. व १५ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीस पोहचले. राजारामाचे उपाध्याय केशव पुरोहित याने लिहिलेल्या 'राजारामचरित' या ग्रंथात पन्हाळा ते जिंजी प्रवासवर्णन आले आहे. वा.सी.बेंद्रे यांनी 'छत्रपती राजाराम' या ग्रंथात हे प्रवासवर्णन केले आहे. छत्रपती राजाराम यांनी लिंगायत वाण्याचा वेष प्रवासात धारण केला. याशिवाय मार्टिनच्या रोजनिशीतही या प्रवासाचे वर्णन आले आहे. या प्रवासात राजारामाबरोबर बहिर्जी घोरपडे, रूपाजी भोसले, संताजी जगताप, प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ चिटणीस नीळकंठ मोरेश्वर पिंगळे, सेनापती पानसंबळ इ. मंडळी होती. मोगलांनी राजारामाच्या जिंजीकडील मार्गावर नाकेबंदी केली. बहादूरखान याने तुंगभद्रा नदीच्या तीरावर राजारामावर हल्ला केला. बहिर्जी घोरपडे यांनी यावेळी राजारामास सुरक्षितपणे जिंजी किल्ल्यावर नेऊन पोहचविले. राजाराम २ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीवर पोहचले.

### ५. जिंजी येथील राजारामाचे कार्य :

राजाराम महाराज जिंजीला पोहचल्यानंतर मराठी सत्तेचे केंद्र जिंजीचा किल्ला बनला. जिंजीचा किल्ला प्रबळ व अभेद्य होता. जिंजीचे अंतर स्वराज्यापासून ६०० मैल होते. महाराष्ट्रात रामचंद्रपंत आमात्य स्वराज्याचा कारभार पहात होते. एप्रिल १६९० मध्ये राजाराम महाराजांनी आपले अष्टप्रधान मंडळ घोषित केले. रामचंद्रपंत आमात्यांस 'हुकूमतपन्हा' हा किताब देण्यात आला.

अष्टप्रधान मंडळ खालील प्रमाणे होते :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | निळोपंत पिंगळे | – | पेशवा |
| २. | शंकराजी नारायण | – | सचिव |
| ३. | जनार्दनपंत हणमंते | – | आमात्य |
| ४. | श्री शंकराचार्य कागलगावकर | – | पंडितराव |
| ५. | रामचंद्र पुंडे | – | मंत्री |
| ६. | महादजी गदाश्वर | – | सुमंत |
| ७. | खंडो बल्लाळ | – | चिटणीस |
| ८. | खंडेराव पानसंबळ | – | सेनापती |

राजाराम महाराजांनी आपले अष्टप्रधान मंडळ नेमून जिंजीहून स्वराज्याचा कारभार सुरू केला. प्रल्हाद निराजी यांची प्रतिनिधी पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी जिंजीहून राजारामांनी राज्यकारभार सुरू केला.

### ६. रायगडचा संघर्ष :

संभाजी महाराजांना पकडल्यानंतर झुल्फीकारखानाच्या नेतृत्वाखाली रायगडास मोगली सैन्याने वेढा दिला. २५ मार्च १६८९ रोजी इफ्तिकारखान ही त्याच्या मदतीस आला. हा वेढा दिवसेंदिवस कडक होत चालला होता. त्यातच ५ एप्रिल १६८९ रोजी

राजाराम रायगडावरून निसटले, तरी देखील महाराणी येसूबाई, छत्रपती शाहू हे रायगडावरच अडकलेले होते. मराठे किल्ला नेटाने लढवत होते. शेवटी ६ नोव्हेंबर १६८९ या दिवशी किल्ला मोगलांच्या स्वाधीन करण्यात आला. राणी येसूबाई, राजपुत्र शाहू यांना मोगलांनी बंदी बनविले. राजपुत्र शाहूस सप्तहजारी मनसब दिली व त्यांची खास व्यवस्था करण्यात आली. व रायगड ही मराठ्यांची राजधानी असलेला किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला.

**७. मराठा स्वराज्यातील वतनदारी पद्धती :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी वतनदारी पद्धती बंद करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी नवीन वतने दिली नाहीत. मध्ययुगीन सरंजामदारांना वतनाबद्दल नेहमीच आकर्षण होते. वतनाच्या लोभाने कित्येक सरदार मोगलांना मिळाले होते. अनेक मराठी सरदारही वतनाच्या लोभानेच औरंगजेबाच्या सेवेत होते. ही गोष्ट लक्षात घेऊन स्वराज्याच्या कठीण प्रसंगी राजारामाने वतनदारी पद्धती पुन्हा सुरू केली. मराठी सरदारांनी मोगलांच्या ताब्यातील प्रदेश जिंकावा, त्यांनी जिंकलेला प्रदेश त्यांनाच वतन म्हणून देण्यात येईल. अशा वतनदारांवर छत्रपतींच्या ठायी आपली निष्ठा ठेवण्याचे बंधन होते. अशा प्रकारचे धोरण राजाराम महाराजांनी सुरू केल्यामुळे नागोजी माने, नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे, हणमंतराव निंबाळकर, बाबाजी डफळे इ. मोगलांना जाऊन मिळालेले सरदार स्वराज्यात आले.

**८. संताजी–धनाजीचा पराक्रम :**

छत्रपती राजाराम महाराज जिंजीला पोहचल्यावर मोगल सैन्यही त्यांचा पाठलाग करत जिंजीला पोहचले. ऑक्टोबर १६९० मध्ये मोगल–मराठा संघर्षाचे नवे पर्व सुरू झाले. मोगलांनी जिंजीला वेढा देऊन या किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला. झुल्फीकारखानाकडे या मोहीमेचे नेतृत्व होते. मोगल सैन्यातून अनेक मराठा सरदार बाहेर पडल्याने झुल्फीकारखानास सैन्य अपुरे पडू लागले. खुद्द वजीर आसदखान व शहाजादा कामबक्ष हे आपल्या सैन्यासह जिंजीस येऊन पोहचले. मद्रास प्रांतातही मोगल–मराठा संघर्ष चालू होता. महाराष्ट्रात संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी मोगली सैन्यास त्रासून सोडले होते. गनिमी काव्याचा वापर करून मोगली सैन्याची रसद तोडण्याचे महत्वाचे काम संताजी व धनाजीने केले. मोगल सैन्यामध्ये या दोघांची दहशत निर्माण झाली. खुद्द बादशहाच्या छावणीतील तंबूचे सोन्याचे कळस या दोघांनी कापून आणले. संताजी–धनाजीच्या पराक्रमामुळे मोगल सैन्य हतबल झाले होते.

**९. जिंजीचा वेढा :**

झुल्फीकारखान, शहाजादा कामबक्ष आणि आसदखान या तिघांचेही सैन्य जिंजीच्या किल्ल्यास वेढा देऊन बसले होते. कर्नाटकातील ऑक्टोबरमधील पावसाळ्यामुळे मोगल सैन्य जेरीस आले होते. अशातच संताजी घोरपडे व धनाजी जाधव जिंजीच्या दिशेने निघाले. धनाजीने जिंजीच्या वेढा देऊन बसलेल्या सैन्यावर हल्ला केला. यामध्ये इस्माईलखान पकडला गेला. कर्नाटकात संताजी घोरपडेने अलीमर्दखानावर हल्ला केला.अलीमर्दखान मोठी रसद घेऊन जिंजीकडे निघाला होता यावेळी संताजी व अलीमर्दखान यांच्या सैन्यात घनघोर युद्ध झाले. अलीमर्दखान पराभूत होऊन पकडला गेला. त्यामुळे मोगलांना जिंजीचा वेढा उठवावा लागला.

## १०. महाराष्ट्रातील संघर्ष :

राजाराम महाराज जिंजीला गेले तरी महाराष्ट्रात मोगल-मराठा संघर्ष सुरू होता. रामचंद्रपंत अमात्य, शंकरजी नारायण, संताजी व धनाजी यांनी महाराष्ट्रातील लढ्याचे यशस्वी नेतृत्व केले होते. या काळात मराठ्यांनी गनिमी काव्याचा वापर करून मोगलांनी जिंकलेले किल्ले परत मिळविण्याचा उद्योग सुरू केला. मराठ्यांनी पुन्हा आपली लष्करी ठाणी निर्माण केली. शेख निजाम, जान निस्साखान, तहब्बूरखान, मतलबखान, यांसारख्या मातब्बर सेनानींचा पराभव मराठ्यांनी केला. रामचंद्रपंत आमात्यांनी या कठीण प्रसंगी महत्वपूर्ण भूमिका बजावली. इ.स.१६९०पर्यत संताजी धनाजीने वाईपर्यंतचा प्रदेश जिंकला. सर्जाखानाचा या दोघांनी अजिंक्यताऱ्याच्या वेढ्यात पराभव करून त्यास बंदी बनविले. दोन लाख होन दंड घेऊन सर्जाखानास सोडण्यात आले. याच काळात मावळातील किल्ले पुन्हा जिंकण्यास मराठ्यांनी सुरूवात केली. रोहीडा किल्ला जेध्यांनी जिंकला. तोरणा, राजगड, पन्हाळा हे किल्ले मराठ्यांनी जिंकले. मोगली सैन्य जिंजीकडे वळताच महाराष्ट्रातील किल्ले घेण्याचा सपाटा मराठ्यांनी लावला. इ.स. १६९३ मध्ये पन्हाळा जिंकण्यासाठी वेढा देऊन बसलेल्या मोईनोद्दीनखानास वर्षभर वेढा चालवूनही पन्हाळा जिंकता आला नाही. शंकराजी नारायण व रामचंद्रपंत आमात्यांनी मोईनोद्दीनखानावर आक्रमण केले यावेळी घनघोर संघर्ष झाला. फिरोजजंग, खानजादाखान व शहाजादा बेदरबख्त हे मदतीस येऊनही पन्हाळगड मोगलांना जिंकता आला नाही.

## ११. जिंजीचा संघर्ष :

१६९२ मध्ये जिंजीचा वेढा मोगलांना उठवावा लागला होता. इस्माईलखानास पकडण्यात येऊन धनाजीने त्यास जिंजीच्या किल्ल्यात कैद केले होते. झुल्फीकारखान वांदीवॉश या ठिकाणी छावणी टाकून होता. शहाजादा कामबक्ष औरंगजेबाच्या भेटीस गेला होता. छत्रपती राजाराम आणि संताजी घोरपडे यांनी त्रियनापल्लीच्या नायकाचा पराभव करून खंडणी वसूल केली. यावेळी तंजावरचा दुसरा शहाजी मोगलांकडून पराभूत झाला. बहिर्जी घोरपडे याने यावेळी दुसऱ्या शहाजीस मदत केली होती. मोगलांचा प्रभाव वाढल्याने इ.स. १६९४ मध्ये झुल्फीकारखानाने पुन्हा जिंजीस वेढा दिला. पुढे जिंजीच्या पायथ्याशी मोगल-मराठ्यांचे अनेक संघर्ष झाले. संताजी आणि धनाजीने कर्नाटक आणि विजापूरच्या प्रदेशात मोगलांवर असंख्य छुपे हल्ले केले. १६९५ मध्ये धनाजी जाधव जिंजी परिसरात पोहचला. त्यामुळे झुल्फीकारखानाने लढ्याची तयारी सुरू केली. त्याने जनानखाना व इतर सामान अर्काटला पाठवले. तिरूवडीजवळ मोगल-मराठा सैन्याची गाठ होऊन संघर्षाला सुरूवात झाली. संताजी घोरपडेही धनाजीच्या मदतीस आला. झुल्फीकारखानाने अर्काटच्या किल्ल्यात आश्रय घेतला.जिंजीच्या परिसरात मराठ्यांचे सामर्थ्य वाढले. कासिमखान संताजी व धनाजीच्या हालचालीस पायाबंद घालू शकला नाही. संताजी-धनाजीच्या बंदोबस्तासाठी खानजादाखान, सफशिकनखान, सय्यद अस्सलतखान हे सरदार जिंजीकडे पाठविले. संताजी मोगलांच्या सैन्यावर लक्ष ठेवून होता. कासिमखानाने खानजादाखानाच्या स्वागतासाठी शामीयाना उभारला होता. संताजीने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या केल्या होत्या. एका तुकडीने भल्या पहाटे हा शामियाना जाळला. दुसऱ्या तुकडीने छावणीवर हल्ला केला. आणि तिसऱ्या तुकडीने कासिमखान व इतर सरदारांच्या तंबूवर हल्ले केले. यावेळी

निकराची लढाई होऊन मोगलांनी माघार घेतली. व दिंडोरीच्या किल्ल्याचा आश्रय घेतला.

## १२. दिंडोरीची लढाई व संताजीचा पराक्रम :

दिंडोरीचा किल्ला लहानश्या गढीएवढा होता. मोगलांचे सैन्य गढीत सामावू शकले नाही. गढीत पुरेशी रसद नव्हती. तशातच संताजीने या सैन्यास वेढा दिला. गढीतील मोगलांची उपासमार होऊ लागली. खफ़ीखान याने दिंडोरीच्या लढ्याचे वर्णन केले आहे. उपासमारीने मोगल हैराण झाले. अनेकांनी गढीवरून उड्या मारून आत्महत्या केल्या. लष्करातील गुरेढोरे व घोडे देखील मारून खाण्यात आले. कासिमखानाच्या मृत्यूनंतर परिस्थिती बिकट बनली. संताजीने हा वेढा अगदी तडफेने चालविला होता. शेवटी खानजादाखानाने नाईलाजाने संताजी बरोबर तह केला. २० लाख होन खंडणी संताजीने वसूल केली. मोगल या लढाईत पूर्णपणे पराभूत झाले होते.

## १३. बसवपट्टणची लढाई :

संताजीने आपल्या पराक्रमाने मोगलांना पराभूत केले होते. हिम्मतखान नावाचा मोगल सरदार कर्नाटकात बसवपट्टणच्या किल्ल्यात होता. संताजीने बसवपट्टणच्या किल्ल्यावर हल्ला केला. खान किल्ल्यातून बाहेर आला. मोगल-मराठा सैन्यात मोठा संघर्ष झाला. संताजी आणि मराठी सैन्याने पराक्रमाची शर्थ केली. हिम्मतखान लढाईत मारला गेला. यावेळी मराठ्यांना प्रचंड लूट मिळाली. मोगल सैन्य पळून गेले.

## १४. जिंजीवर मोगलांचे वर्चस्व :

संताजी व धनाजी यांच्यामध्ये सेनापतीपदावरून संघर्ष निर्माण झाला. या संघर्षातून १६९७ च्या जूनमध्ये संताजी मारला गेला. नागोजी मानेने संताजीचा खून केला. १६९० पासून मोगल जिंजीचा किल्ला जिंकण्याच्या प्रयत्नात होते. सात-आठ वर्षे प्रयत्न करूनही मोगलांना हा किल्ला जिंकता आला नाही. १६९८ मध्ये झुल्फीकारखानाने जिंजीला पुन्हा वेढा दिला. मराठ्यांनी किल्ला काही काळ लढविला. शेवटी खंडो बल्लाळ चिटणीसाने खानाची भेट घेतली. राजाराम व इतर दरबारी मंडळींना सुरक्षित बाहेर जाऊ देण्याच्या अटीवर जिंजीचा किल्ला खानास देण्याचे ठरले. त्यानुसार राजारामासह दरबारी मंडळी किल्ल्याच्या बाहेर पडली. व जिंजीचा किल्ला झुल्फीकारखानाच्या ताब्यात देण्यात आला. गणोजी शिर्के, मोहिते या मोगल सरदारांनी व धनाजी जाधव यांच्या सोबत राजाराम २२ फेब्रुवारी १६९८ रोजी विशाळगडावर येऊन पोहचले.

## १५. महाराष्ट्रातील संघर्ष :

छत्रपती राजाराम महाराज महाराष्ट्रात पोहचल्यावर मराठ्यांच्या हालचालींना प्रेरणा मिळाली. बागलाण आणि खानदेशात मराठ्यांनी मोगलांवर हल्ले चढविले. येसाजी, खंडोजी, परसाजी, नेमाजी हे सरदार मोहीमा मारू लागले. धनाजी जाधव व हणमंत निंबाळकर यांनी वऱ्हाडात हल्ले केले. बहिर्जी व राणोजी घोरपडे यांनी कर्नाटकात मोगलांवर हल्ले सुरू केले. कान्होजी आंग्रेनेही कोकणात पराक्रम गाजविला. यावेळी मराठी सरदारांनी माळव्यापर्यंत मुसंडी मारली. पुन्हा एकदा मोगल-मराठा संघर्षास सुरूवात झाली. मराठी सरदारांनी गनिमी काव्याने हल्ले करून मोगल सरदारांना जेरीस आणले.

## १६. राजाराम महाराजांचा शेवट :

राजाराम महाराज २० हजार सैन्य जमवून वऱ्हाड-खानदेशात गेले. उस्मानाबाद जिल्ह्यातील परांड्याजवळ मोगल-मराठा संघर्षास सुरूवात झाली. शहाजादा बेदरबख्त व झुल्फीकारखान यावेळी वऱ्हाडात होते. मराठ्यांचे सैन्य औरंगाबाद, जालना, बीड या परिसरात विखुरले होते. औरंगजेब बादशहादेखील मिरजेला आला. तेथून त्याने साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्ल्यास वेढा दिला. यावेळी मोगल-मराठा संघर्ष सुरूच होता. जानेवारी १७०० मध्ये राजाराम महाराज आजारी पडले. दोन महिन्यांच्या आजारपणानंतर २ मार्च १७०० रोजी सिंहगडावर राजाराम महाराजांचे निधन झाले. वयाच्या ३०व्या वर्षी राजाराम महाराज काळाच्या पडद्याआड गेले. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व त्यांची पत्नी महाराणी ताराबाई यांच्याकडे आले.

## १७. छत्रपती  राजारामांची योग्यता :

मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामामध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी बजाविलेल्या भूमिकेला महत्वाचे स्थान आहे. शिवाजी महाराजांप्रमाणे पराक्रमी, मुत्सद्दी किंवा संभाजीराजांसारखा धाडसीपणा व बेडरवृत्ती हे गुण राजाराम महाराजांजवळ नव्हते. परंतु अतिशय लहान वयात औरंगजेबासारख्या प्रबळ शत्रुशी लढा देऊन स्वराज्यास नवजीवन देण्याचे महत्वाचे काम राजाराम महाराजांनी केले. औरंगजेबाच्या वाढत्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी व मराठी सरदारांमधील लढाऊ वृत्तीला प्रोत्साहन देऊन स्वराज्याचे रक्षण करण्याच्या उद्देशाने त्यांनी वतनदारी पद्धतीस प्रोत्साहन दिले. आणि त्यामुळेच अतिशय कठीण कालखंडात स्वराज्याचे रक्षण होऊ शकले. सेतू माधवराव पगडी यांच्या मते, "मराठ्यांच्या राष्ट्रजीवनाशी या आणीबाणीच्या काळात पूर्णपणे समरस झालेल्या छत्रपती राजारामांचे स्थान मराठ्यांच्या इतिहासात श्रेष्ठ व अढळ समजले पाहिजे."

रियासतकार गो.स.सरदेसाई यांच्या मते, "राजारामाची कारकीर्द म्हणजे कर्ती माणसे निपजण्याची खाण, स्वराष्ट्राभिमान शिकविण्याची उत्तम शाळा व पराक्रम आणि कीर्ती गाजविण्याची उत्तम रंगभूमी होय."

प्रचंड इच्छाशक्ती आणि दुर्दम्य आत्मविश्वासाच्या जोरावर राजाराम महाराजांनी मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध नेटाने लढविले. त्याच्या विवेकी वागण्यामुळेच रामचंद्रपंत आमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण, हणमंतराव निंबाळकर, संताजी घोरपडे, धनाजी जाधव इ. सहकाऱ्यांनी राजारामास सहकार्य केले. या मराठी सैनिकांचा पराक्रम याच काळात उदयास आला. आणि या पराक्रमाच्या सहाय्यानेच मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध यशस्वी झाले. त्यामुळेच सर जदुनाथ सरकार राजाराम महाराजांविषयी म्हणतात, 'राजाराम हा सैन्य नसलेला राजा होता. त्याच्याजवळ खजिना नव्हता. किल्लेबंद होऊन पडल्याने त्यास प्रत्येकास होकार द्यावा लागे. नोकरांना तो शिस्त लावू शकत नव्हता. कोणीही मराठी सरदाराने उठावे, १०००-५०० स्वार गोळा करावेत आणि आपल्या सेवा करण्याबद्दलच्या अटी सांगाव्यात. असा सगळा प्रकार होता.'

असे असले तरी राजाराम महाराजांचे कर्तृत्व हे मराठा स्वातंत्र्य युद्धातील एक वेगळे

पर्व आहे. त्यांनी स्वत: तलवार गाजविली नसली तरी कठीण प्रसंगात स्वराज्य ज्योतीचे रक्षण केले. छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या मृत्यूपूर्वी ६ महिने अगोदर प्रतापगडावरील देवीला नवस केला होता, "मराठ्यांना दिल्लीपर्यंत राज्य हस्तगत व्हावे असा हा नवस होता." यावरून त्यांची स्वराज्याबद्दलची व मराठी राज्याची वृद्धी व्हावी अशी इच्छा होती असे दिसते. त्यामुळे मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामात राजाराम महाराजांच्या कार्यास महत्व प्राप्त झाले आहे.

## ८.२.४ रामचंद्रपंत आमात्यांचे कार्य

आमात्यांच्या घराण्याविषयी माहिती देणारी इतिहासाची साधने अल्पप्रमाणात उपलब्ध आहेत. १५ व्या शतकात कल्याण प्रांतात तर्फ सोनवले मधील भादाणे हे गाव कुळकर्णी वतनासाठी आमात्यांच्या घराण्याकडे आले होते. आणि त्यामुळे या घराण्यातील पुरुष भादाणे नावाने ओळखले जात होते. रामचंद्रपंतांचे आजोबा सोनोपंत हे शिवाजी महाराजांच्या पदरी होते. त्यांना डबीर (परराष्ट्रमंत्री) म्हणून नेमले होते. सोनोपंतांस आबाजी व निळोपंत अशी दोन मुले होती. निळोपंतास नारोपंत व रामचंद्रपंत अशी दोन मुले होती. त्यापैकी रामचंद्रपंत यांना शिवाजी महाराजांनी मुजूमदारी दिली. पुढे शिवराज्याभिषेक प्रसंगी रामचंद्रपंतांना आमात्यपद मिळाले व तेथून पुढे ते रामचंद्रपंत आमात्य नावाने ओळखले जाऊ लागले. रामचंद्रपंतांच्या जन्माविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही.

### १. रामचंद्रपंतांची कामगिरी :

मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामात रामचंद्रपंत आमात्यांचे कार्य अत्यंत महत्वाचे आहे. रामचंद्रपंत आमात्यांनी शिवाजी महाराजांच्या काळातही स्वराज्याची सेवा केली होती. संभाजी महाराजांच्या काळात त्यांना फारसे महत्व नव्हते व पदही नव्हते.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात निर्माण झालेल्या गोंधळात मराठ्यांचे राज्य वाचविण्यासाठी राजाराम महाराज, महाराणी ताराबाई, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण यांच्या प्रमाणेच रामचंद्रपंत आमात्यांनीही महत्वाची भूमिका बजावली होती. संभाजी महाराजांच्या वधानंतर राजाराम महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची पुनर्रचना केली होती. त्यामध्ये रामचंद्रपंतास 'हुकुमतपन्हा' हा किताब देण्यात आला. छत्रपती संभाजी राजे मोगलांच्या कैदेत गेल्यावर राजाराम महाराजांची कारकीर्द सूरू झाली. हिंदवी स्वराज्य संपुष्टात आणण्यासाठी मोगलांनी रायगडाला वेढा दिला. या वेढ्यात राजाराम महाराज, महाराणी येसूबाई, शाहू व इतर अनेक मराठा सरदार अडकले होते. रायगडावरील सल्लामसलतीनुसार छत्रपती राजारामांना रायगडाच्या वेढ्यातून बाहेर पडण्यासाठी रामचंद्रपंतांनी मदत केली. त्याचप्रमाणे राजाराम महाराज रायगड ते जिंजी असा प्रवास करत असताना महाराष्ट्रातील स्वराज्याचा कारभार आमात्यांनी सांभाळला.

राजाराम महाराजांचा जिंजीला मुक्काम असताना रामचंद्रपंतच स्वराज्याचा कारभार पाहत होते. संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे दोन सेनापती आमात्यांच्या नेतृत्वाखाली अनेक लष्करी मोहीमा राबवित होते. रामचंद्रपंतांच्या या स्वराज्यरक्षणाच्या व स्वामीनिष्ठ कार्यावर खूश होऊन राजाराम महाराजांनी त्यांना इ.स. १६९७ मध्ये "हुकुमतपन्हा" हा किताब दिला होता.

रामचंद्रपंत आमात्य हे श्रेष्ठ दर्जाचे मुलकी अधिकारी असले तरीही प्रसंगानुसार त्यांनी या काळात अनेक लष्करी मोहीमा केल्याचेही दिसून येते. सप्टेंबर-ऑक्टोबर १६८९ मध्ये रामचंद्रपंत आमात्य यांनी लष्करी मोहीम काढून महाराष्ट्रात धुमाकूळ घालणाऱ्या मोगल सैन्याचे पारिपत्य करण्याची कारवाई केली. विशाळगडावरून आपले सैन्य घेऊन ते निघाले. तेथून महिमती गडावर गेले, तेथून ते संगमेश्वर येथे गेले. या सर्व ठिकाणी त्यांनी मोगली सरदारांचा पाडाव केला.

छत्रपती राजाराम महाराज जिंजीत असताना मराठी सरदारांना एकत्र करून एक-एक किल्ला घेण्यासाठी त्यांनी प्रोत्साहित केले. भिन्न विचारसरणीच्या सरदारांना एकत्र आणून स्वराज्य रक्षणाची महत्वाची कामगिरी पार पाडली. गुणवंतगड, सुंदरगड काबीज करून दंतपाटन येथे त्यांनी आपला अंमल प्रस्थापित केला. तेथून ते वसंतगड येथे गेले. इ.स. १६९० मध्ये सर्जाखान या मोगल सरदाराने वेढा दिला तेव्हा रामचंद्रपंत आमात्य, शंकराजी नारायण, संताजी-धनाजी हे एकत्र चालून गेले. त्या सर्वांनी मिळून सर्जाखानाचा पराभव केला. रामचंद्रपंतांनी परशुराम त्र्यंबक यांच्या हाताखाली फौज देऊन पन्हाळा किल्ला मोगलांकडून जिंकला होता.

राजाराम महाराजांच्या कारकीर्दीमध्ये स्वराज्याचे सर्वश्रेष्ठ अधिकारी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. महाराणी ताराबाईच्या काळात त्यांचे महत्व कमी झाले असले तरी स्वराज्याचा आमात्य म्हणून तेच कारभार पाहत होते.

शाहूमहाराजांची मोगलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर शाहूराजे-ताराबाई संघर्षाच्या वेळी ते ताराबाईंच्या पक्षात होते. पुढे कोल्हापूर गादीची नव्याने स्थापना करण्यात त्यांनी ताराबाईंना सहकार्य केले. परंतु ताराबाईंचे व त्यांचे मतभेद झाल्यानंतर ताराबाईंच्या विरोधात असणाऱ्या अधिकाऱ्यांना एकत्र करून ताराबाई व त्यांचे पुत्र दुसरा शिवाजी यांस पदच्युत करून राजाराम महाराजांची दुसरी राणी व त्यांचा पुत्र दुसरा संभाजी यांना गादीवर बसविले. या घटनेला "कोल्हापूर दरबारातील क्रांती" असे म्हणतात. परंतु या क्रांतीमध्ये रामचंद्रपंतांचा प्रत्यक्षात हात होता असा एकही पुरावा उपलब्ध नाही.

डॉ.अ.रा.कुलकर्णी म्हणतात, "ताराबाईंच्या पक्षाला आता दीर्घकाळ चिकटून राहणे रामचंद्रपंतांना अशक्य झाले होते म्हणून त्याने तटस्थतेचे धोरण स्विकारले असावे. कदाचित त्यांच्या या धोरणामुळेच संभाजीराजांनी आमात्यपद त्यांच्याकडेच ठेवले आणि नंतर १७१५ मध्ये शिवकालीन राजनितीविषयी ग्रंथ म्हणजेच मआज्ञापत्रफ लिहिण्याची आज्ञा केली असावी."

**समारोप :**

मराठी स्वाराज्याच्या अत्यंत कठीण काळामध्ये स्वराज्यचे रक्षण करण्याची महत्वाची जबाबदारी रामचंद्रपंतांनी पार पाडली होती. एवढेच नव्हे तर स्वराज्यात छत्रपती नसतानाही मोगली आक्रमणाचा प्रतिकार करून मोगलांच्या ताब्यातील किल्ले जिंकण्यास सुरूवात केली होती. रामचंद्रपंतांची सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी शिवराजनितीविषयी लिहिलेले 'आज्ञापत्र' होय. वृद्धपणामुळे आमात्यांना आपल्या या कामाची जबाबदारी

आपला पुत्र भगवंतराव यांच्याकडे सोपवावी लागली. त्यांच्या जन्मतिथी प्रमाणे त्यांच्या मृत्यूची तिथीही उपलब्ध नाही. त्यांची समाधी दुसऱ्या संभाजी राजाने विशाळगडावर बांधलेली आढळून येते. मराठा स्वातंत्र्य युद्धामध्ये मराठी स्वराज्य वाचविण्यासाठी त्यांनी दाखविलेली स्वामीनिष्ठा व त्यांनी केलेले कार्य मराठ्यांच्या इतिहासात अत्यंत महत्वाचे आहे.

## ८.२.५ महाराणी ताराबाई

महाराणी ताराबाई या सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत. ताराबाईंचा जन्म १६७५ साली झाला. इ.स.१६८३ मध्ये म्हणजे वयाच्या ८व्या वर्षी त्यांचा विवाह छत्रपती  राजाराम महाराजांबरोबर झाला होता. राजाराम महाराजांबरोबर ताराबाईंचेही आयुष्य संभाजी महाराजांच्या कैदेत गेले. १२ फेब्रुवारी १६८९ रोजी राजाराम महाराजांना छत्रपती  पद प्राप्त झाले. परंतु मोगलांचा पाठलाग चुकविण्यासाठी ताराबाईंना सतत धावपळ करावी लागली. राजाराम महाराजांबरोबर त्या जिंजीच्या किल्ल्यावर वास्तव्यास होत्या. जिंजीच्या वास्तव्यातच ताराबाईंना ९ जून १६९६ रोजी मशिवाजीफ हा पुत्र झाला.

२ मार्च १७०० रोजी सिंहगडावर आजारपणाने राजाराम महाराजांचा मृत्यू झाला. यावेळी ताराबाईंचे वय केवळ २५ वर्षे होते. वैधव्याचे दु:ख बाजूस सारून त्यांनी आपला मुलगा शिवाजी यास गादीवर बसवून राज्यकारभार हाती घेतला. इ.स. १७०० ते इ.स. १७०७ या काळात ताराबाईंनी राज्यकारभार केला.

### १. ताराबाईंच्या औरंगजेबाकडील मागण्या :

राज्यकारभार हाती घेतल्यानंतर ताराबाईंनी औरंगजेबाकडे खालील मागण्या केल्या,

१. आपल्या पुत्रास ७००० मनसबदारी मिळावी व देशमुखीचे हक्क मिळावेत.

२. मोगलांना सातारा, पन्हाळा, चंदन-वंदन, परळी इ. ७ किल्ले मिळतील.

३. दक्षिणेच्या मोगल सुभेदाराच्या सेवेत ५००० मराठी फौज राहील.

४. आपले पुत्र शिवाजी राजे यांना मोगल बादशहाच्या दरबारात जाऊन मुजरा करण्याची सक्ती नसावी.

औरंगजेबाने ताराबाईंच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. त्यामुळे ताराबाईंनी मोगलांविरूद्ध आपला संघर्ष चालूच ठेवला. ताराबाईंचे कार्य पुढीलप्रमाणे :

### २. सातारा येथील संघर्ष :

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने मराठ्यांच्या विरूद्धची मोहीम आणखी तीव्र केली. साताऱ्याचा किल्ला जिंकण्यासाठी स्वत: औरंगजेब, शहाजादा मुअज्जम व इतर सेनापतींना बरोबर घेऊन  सातारच्या किल्ल्यास वेढा दिला. किल्ल्याची तटबंदी व बुरूज यावर मोगली तोफखान्याने हल्ला चढविला. सातारचा वेढा चालू असताना मराठा सैन्याने मोगलांची रसद तोडणे, सैन्यावर हल्ले करणे इ. प्रकारे संघर्ष सुरू केला. किल्ल्यावरील साधनसामुग्री संपल्यामुळे २१ एप्रिल १७०० रोजी किल्लेदार सुभानजी याने किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला.

### ३. परळीचा संघर्ष :

परळी (सज्जनगड)चा किल्ला हा साताऱ्याच्या पश्चिमेला ३ मैल अंतरावर आहे. ३०

एप्रिल १७०० रोजी औरंगजेबाने या किल्ल्यास वेढा दिला. परळीचा किल्ला विजापूरच्या इब्राहीम आदिलशहाने बांधला होता. व त्यास 'नवरसतारा' हे नाव देण्यात आले होते. या वेढ्याच्या वेळी मराठी फौजेने गनिमी काव्याने हा किल्ला लढविला. गनिमी काव्यामुळे मोगली फौज प्रचंड त्रस्त झाली होती. शेवटी ९ जून १७०० रोजी किल्लेदाराने पैसे घेऊन हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला.

### ४. भूषणगडावर आक्रमण :

परळीचा किल्ला जिंकल्यानंतर भूषणगड घेण्याच्या उद्देशाने भूषणगडाकडे कूच केले. परळी ते भूषणगड हे ४५ मैलाचे अंतर होते. १५ जून १७०० ला ही मोहीम सुरू झाली. वाटेत प्रचंड पाऊस, चिखल, अन्नधान्याची टंचाई इ.मुळे मोगल सेना त्रासून गेली होती. लष्कराच्या सामान वाहतूकीचाही प्रश्न गंभीर होता. १७ जुलै १७०० रोजी मोगलांनी भूषणगडाला वेढा दिला. तेथून औरंगजेबाने आपल्या सरदारांना प्रत्येकी १००० सैन्य मदतीसाठी भूषणगड येथे पाठवावे असा आदेश दिला. यावेळी धनाजी जाधव, संताजी घोरपडे, हणमंतराव घोरपडे, शंकरजी नारायण इ.नी गनिमी कावा पध्दतीने बादशहाच्या छावणीस त्रास देणे चालूच ठेवले होते.

### ५. मोगलांचा पन्हाळा किल्ल्यास वेढा :

पन्हाळा जिंकण्याच्या उद्देशाने औरंगजेब स्वत: पन्हाळ्याकडे निघाला. बेदारबख्त व झुल्फीकारखानाला त्याने पन्हाळ्यावर पाठविले होते. औरंगजेबाचा मिरज येथे मुक्काम असताना १ जानेवारी १७०१ रोजी धनाजी जाधवने मोगलांच्या छावणीवर हल्ला चढविला. पन्हाळ्यास वेढा देऊन बसलेल्या मोगली सेनेवरही मराठ्यांचे हल्ले चालू होते. ९ सप्टेंबर १७०० रोजी मोगलांनी पन्हाळ्यास वेढा दिला होता. ताराबाईंनी किल्ला लढविण्याची तयारी केली होती. शेवटी २८ मे १७०१ रोजी ५५,००० रूपये घेऊन किल्ला मोगलांच्या स्वाधीन करण्यात आला.

### ६. मोगलांचे विशाळगडावर आक्रमण :

औरंगजेबाने पावसाळा सुरू होण्यापूर्वी आपला मुक्काम खटाव येथे हलविला. नोव्हेंबर १७०१ पर्यंत तो खटाव येथेच होता. दरम्यानच्या काळात फत्तेऊल्लाखान याने चंदन-वंदन, वर्धनगड व नांदगिरी हे मराठ्यांच्या ताब्यातील किल्ले जिंकले. जानेवारी १७०२ मध्ये फत्तेऊल्लाखानाने विशाळगडास वेढा दिला. गडातील शिबंदीनेही मोठ्या शौर्याने हा किल्ला लढविला. पावसाळा सुरू होण्यापूर्वी किल्ला हाती येणे आवश्यक होते. शेवटी बेदरबखतच्या मध्यस्थीने मराठ्यांनी दोन लाख रूपये घेऊन दि.७ जून १७०२ रोजी किल्ला औरंगजेबाचे स्वाधीन केला. परतीच्या प्रवासात मुसळधार पाऊस सुरू झाला. 'मोगलांची ६००० माणसे मृत्यू पावली'असे मनुची म्हणतो. यावेळी मोगल-मराठा संघर्ष शिगेला पोहचला होता. भीमसेन सक्सेना याबाबत म्हणतो, 'या सुमारास नर्मदेच्या दक्षिणेस दख्खन, खानदेश, वऱ्हाड, कोंकण या प्रांतातील परगण्यांतून व खेड्यांतून मराठे हे टोळ व भुंग्याप्रमाणे पसरले होते.'

इ.स.१७०३ च्या सुरूवातीस तीस हजार मराठी लष्कर गुजरातमध्ये घुसले होते. याच वर्षी ऑक्टोबरमध्ये नेमाजी शिंदे याने नर्मदा पार करून माळव्यात भोपाळच्या उत्तरेस जाऊन थडकला व धामधूम माजविली. 'माळव्यात घुसणारा हा पहिला मराठी वीर होय' असे डॉ. जयसिंगराव पवार यांनी म्हटले आहे.

### ७. सिंहगड, राजगड व तोरणा मोगलांकडे :

औरंगजेबाने बहादूर गडावर आपला मुक्काम फार काळ ठेवला नाही. सिंहगड जिंकण्यासाठी त्याने सिंहगडाकडे कूच केले. २७ डिसेंबर १७०२ रोजी सिंहगडचा वेढा सुरू झाला. सिंहगडचा किल्ला हल्ला करून जिंकण्यासारखा नव्हता. हा वेढा तीन महिने रेंगाळला. शेवटी तरबियतखानाने किल्लेदारास ५०,००० रुपये देऊन तो ताब्यात घेतला. बादशहास हा किल्ला ईश्वराची देणगी वाटून त्याने त्याचे नाव 'बक्षिदाबक्ष'असे ठेवले. १४ एप्रिल १७०३ मध्ये मोगलांना हा किल्ला मिळाला.

यानंतर औरंगजेबाने सहा-सात महिने पुण्यातच वास्तव्य केले. यावेळी महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला होता. हजारो माणसे अन्नान्न करून मेली. साकी मुस्तैदखान याबाबत म्हणतो, "बादशाही लष्करातील धान्याचा बाजार तर गोरगरिबांच्या आक्रोशांनी भरून गेला होता." अशाही कठीण परिस्थितीत औरंगजेबाने आपली मोहीम पुढे चालूच ठेवली. २ डिसेंबर १७०३ रोजी मोगलांनी राजगडास वेढा दिला. सतत दोन महिने तोफांचा मारा किल्ल्यावर चालू होता. किल्ल्याच्या बाहेरचा तट पडून मोगल बालेकिल्ल्यापर्यंत पोहचले. मराठ्यांनी दहा दिवस बालेकिल्ला शौर्याने लढविला. शेवटी १६ फेब्रुवारी १७०४ रोजी द्रव्य देऊन मोगलांनी किल्ला ताब्यात घेतला. राजगड ताब्यात येताच औरंगजेबाने तोरण्याकडे लष्कर पाठविले. १० मार्च १७०४ रोजी मोगलांनी लढाई करून हा किल्ला जिंकून घेतला.

इ.स. १६८९ पासून मराठ्यांच्या विरूद्धच्या लढ्यात औरंगजेबाची कमीत कमी २०कोटी रूपये, २० लक्ष माणसे, २०लक्ष जनावरे खर्च झाली होती. औरंगजेबाचे सैन्य व सरदारही नेहमीच्या लढायांना कंटाळले होते. औरंगजेबाने इ.स.१६९९ ते इ.स.१७०४ या काळात मराठ्यांचे १४ किल्ले जिंकले होते. यापैकी अनेक किल्ले त्याने मराठ्यांना पैसे देऊन घेतले होते. जिंकलेल्या किल्ल्यांच्या संरक्षणाची व्यवस्था औरंगजेबाने केली नव्हती. त्यामुळे मराठ्यांनी हे किल्ले जिंकण्यास पुन्हा सुरूवात केली.

### ८. ताराबाईंचा पराक्रम :

मोगली आक्रमणांची पाठ वळताच ताराबाईंच्या नेतृत्वाखाली मराठी सरदारांनी मोगलांच्या ताब्यातील किल्ले जिंकण्यास सुरूवात केली.

१. इ.स. १७०५ च्या जानेवारीत धावजी विसार याने लोहगड जिंकला.

२. एप्रिल १७०५, रामजी फाटक, वेताजी शिवदेव, त्र्यंबक शिवदेव यांनी मसिंहगडफ जिंकला.

३. इ.स. १७०५ जूनमध्ये गुणाजी सावंत व धावजी विसार यांनी मराजमाचीफ जिंकला.

४. रोहिडा-राजगड, शंकराजी नारायण यांनी जिंकले.

५. पन्हाळा, पावनगड, सातारा, वसंतगड हे किल्ले परशुराम त्र्यंबकने जिंकले.

**९. औरंगजेबाचे वाकीनखेड्यावर आक्रमण :**

भीमा व कृष्णा नदीच्या दुआबात मबेरडफ जमात रहात होती. या बेरडांचा औरंगजेबाशी संघर्ष चालू होता. २२ ऑक्टोबर १७०४ रोजी पुण्याहून त्याने वाकीनखेड्याकडे कूच केले. ७ फेब्रुवारी १७०५ला तो वाकीनखेडा येथे पोहचला. बेरडांचा सेनापती पिंडनायक याने १०-१२ हजारांची फौज जमवून संघर्ष सुरू केला. यावेळी धनाजी जाधव व हिंदुराव घोरपडे सैन्यासह बेरडांच्या मदतीस गेले. २७ एप्रिल १७०५ रोजी औरंगजेबाने वाकीनखेडा जिंकले. हा त्याच्या जीवनातील शेवटचा विजय होय. २० जानेवारी १७०६ रोजी औरंगजेब अहमदनगरास परत आला. मराठ्यांचे मोगलांच्या छावणीवर सतत हल्ले चालूच होते. मराठ्यांच्या त्रासापासून आपल्या सरदारांचे संरक्षण व्हावे म्हणून बादशहाने त्यांना ताईत दिले. मराठ्यांनी आपले किल्ले जिंकण्यास सुरूवात केली. धनाजी जाधवने १५ हजार सैन्य घेऊन गुजरातमध्ये आक्रमण केले. वऱ्हाड, खानदेश उत्तर कर्नाटकात मराठ्यांनी लूटमार सुरू केली. त्यामुळे अत्यंत निराश होऊन अहमदनगर मुक्कामीच २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला व दीर्घकाळ चालू असलेला मोगल-मराठा संघर्ष संपुष्टात आला.

**१०. ताराबाईंची योग्यता :**

मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील इ.स. १७०० ते इ.स.१७०७ हा कालखंड ताराबाईंच्या कर्तृत्वाचा कालखंड होय. पराक्रम, शौर्य, धाडस, राजकारणपटुत्व इ. गुणांच्या जोरावर तिने बादशहाला चांगलीच टक्कर दिली. याबाबत भीमसेन सक्सेना म्हणतो, "राजारामाची बायको ताराबाई हिचा आपल्या नवऱ्यापेक्षाही अधिक दरारा होता."

ताराबाईंना वयाच्या २५व्या वर्षीच वैधव्य प्राप्त झाले. याचवेळी औरंगजेबाचे स्वराज्यावरील संकट अधिक प्रभावी बनले.ताराबाईंनी रामचंद्रपंत आमात्य, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, परशुराम त्रिंबक, नेमाजी शिंदे, परसोजी भोसले इ. सरदार मंडळींमधील मतभेद मिटवून स्वराज्य कार्यात त्यांचे सहकार्य मिळविले.

किल्ले मोगलांच्या ताब्यात देताना मराठा सरदारांना पैसे घेण्याची परवानगी तिने दिली. औरंगजेबाला जे किल्ले जिंकण्यासाठी ६वर्ष लागली ते किल्ले ताराबाईंनी मराठी सरदारांमार्फत २ वर्षात जिंकले. प्रा.शं.श्री.पुराणिक यांनी 'मराठ्यांचे स्वातंत्र्य समर' या ग्रंथात ताराबाई ही कठोर, करारी, हुकूमत गाजविणारी व हेकेखोर स्वभावाची होती, असे म्हटले आहे. त्यामुळे संकटकाळात जीवास जीव देणारी माणसे ताराबाईस निर्माण करता आली नाहीत.

अत्यंत कठीण परिस्थितीत ताराबाईने स्वराज्याचा कारभार पाहिल. पति राजाराम महाराजांचे निधन, पुत्र संभाजी १४ वर्षाचे, पुत्र शाहू मोगलांच्या कैदेत या पार्श्वभूमीवर ती सत्तेवर आली होती.

ताराबाईंच्या चरित्राचा अभ्यास करताना डॉ. जयसिंगराव पवार यांनी म्हटले आहे

की, 'पंचवीस वर्षाची एक विधवा राणी औरंगजेबासारख्या मुरब्बी सम्राटाशी लष्करी संघर्ष करावयास उभी राहते आणि सतत सात वर्षे संघर्ष करूनही पराजित होत नाही, ही घटनाच तिच्या कर्तृत्वाविषयी बोलते.'

तत्कालीन मराठी कवी गोविंद याने ताराबाईच्या पराक्रमाचे वर्णन करताना म्हटले आहे,

दिल्ली झाली निवाणी । दिल्लीशाचे गेले पाणी ।
ताराबाई रामराणी । भद्रकाली कोपली ।।
ताराबाईच्या बखते । दिल्लीपतीची तख्ते ।
खचो लागली तेवि मते । कुराणेही खंडली ।।
रामराणी भद्रकाली । रणरंगी क्रुद्ध झाली ।
प्रलयाची वेळ आली । मुगल हो सांभाळा ।।

यावरून ताराबाईच्या कार्याला मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धामध्ये निश्चितच महत्व प्राप्त झाले आहे.

## ८.२.६ संताजी घोरपडे यांचे कार्य

इ.स. १६४५ मध्ये संताजी घोरपडेंचा जन्म झाला असावा असे मानले जाते. संताजी घोरपडेच्या कार्याचे दोन भाग पडतात.

१. छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या काळातील कार्य,

२. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील कार्य.

यापैकी संताजीच्या पहिल्या कारकीर्दीचे फारसे उल्लेख सापडत नाहीत. कारण शिवकाळातील त्यांच्यासंदर्भातील ऐतिहासिक साधने कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. व शिवकाळ हा संताजीच्या उमेदीचा काळ होता व त्याने स्वतंत्रपणे मोहीम राबविली नव्हती. शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेपासून संताजीने पराक्रमास सुरूवात केली होती.

छत्रपती संभाजी महाराजांनी इ.स.१६८२ मध्ये संताजी घोरपडेस सनद दिली होती. संताजीने कर्नाटकातील पठाण, बेरड इ. बंडखोरांविरूद्ध १२००० फौज जमवून ३ महिने संघर्ष करून त्यांचा पराभव केला होता. त्यामुळे वरील सनद त्यास मिळाली होती.

१ फेब्रुवारी १६८९ रोजी मुकर्रबखानाने संभाजी महाराजांना संगमेश्वर या ठिकाणी अटक केली. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा वध करण्यात आला. दरम्यानच्या काळात ०९ फेब्रुवारी १६८९ रोजी राजारामास रायगडावर छत्रपती म्हणून घोषित करण्यात आले. त्यावेळी झुल्फीकारखानाने रायगडाला वेढा दिलेला होता. हा वेढा चालू असतानाच ५ एप्रिल १६८९ रोजी राजाराम मोठ्या युक्तीने रायगडावरून निसटले. तेव्हा त्यांच्या सोबत प्रल्हाद निराजी, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, संताजी घोरपडे, धनाजी जाधव इ. सरदार मंडळी होती.

**१. संताजी घोरपडेचा पराक्रम :**

राजाराम महाराजांना जिंजीच्या किल्ल्यापर्यंत पोहचविण्यास संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजाविली. राजाराम महाराज जिंजीस आश्रयास आल्यावर पाठलागावर असणारा झुल्फीकारखानही सप्टेंबर १६९० मध्ये जिंजीस पोहचला व त्याने जिंजीच्या किल्ल्यास वेढा दिला. मोगलांचे सैन्या जिंजीस पोहचण्यापूर्वीच मराठा फौजेने आजूबाजूचा प्रदेश उध्वस्त केला होता. कर्नाटकचा मोगला सुभेदार अलीमर्दखान हा मोठी रसद घेऊन जिंजीकडे निघाला होता. तेव्हा संताजीने त्यास रस्त्यात गाठून गनिमी हल्ले करून त्यांची रसद पळविली. एवढेच नव्हे तर अलीमर्दखान व इस्माईलखान या दोन मोगली सरदारांनाही अटक केली.

जिंजीचा वेढा झुल्फीकारखानानेही नेटाने चालविला होता. जिंजीचा किल्ला मजबूत होता. मोगलांच्या तोफखान्याचा जिंजीवर काहीही परिणाम होत नव्हता. यावेळी मोगलांकडे असणारे नागोजी माने, माणकोजी पांढरे, अमृतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे इ.सरदार राजारामास मिळाले. शिवाय तंजावरच्या शहाजी राजांचीही राजारामास मदत मिळाली. जिंजीच्या वेढ्यात मोगल-मराठे यांच्यात अनेक वेळा चकमकी झाल्या परंतु हा किल्ला घेण्यात मोगलांना यश येत नव्हते. संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे सतत बाहेरून मोगलांच्या सेनेवर हल्ले करत होते.

**२. संताजीस सेनापती पदाची प्राप्ती :**

इ.स. १६९१च्या सुमारास राजाराम महाजारांनी संताजीस सरसेनापती हे पद दिले. संताजी घोरपडेने मोगली फौजेवर जे विजय मिळविले व शत्रुवर दहशत निर्माण केली म्हणून राजाराम महाराजांनी संताजीस हे पद दिले. रामचंद्रपंत आमात्यांनीही याबाबत राजारामांकडे शिफारस केल्याने त्यांना हे पद मिळाले. परंतु छत्रपती राजारामांशी न पटल्याने राजारामांनी हे पद इ.स. १६९३ मध्ये धनाजी जाधवास दिले. धनाजी जाधवला सेनापती पदावर नियुक्त केले.

**३. संताजीचे खानदेशावर आक्रमण :**

इ.स. १७९५ मध्ये संताजी घोरपडेने २०,००० घोडदळ जमवून खानदेशातील बऱ्हाणपूर शहर लुटले. या लूटीत प्रचंड पैसा मिळाला. बऱ्हाणपूर नंतर त्याने नंदुरबार शहरास वेढा दिला. मोगली सैन्य पोहचण्यापूर्वीच त्याने आसपासचा प्रदेश लुटला व वेढा उठवून आपल्या लष्करासह संताजी साताऱ्यास परत आला. इ.स. १७९५ मध्ये त्याने खटाव हे ठाणे मोगलांकडून जिंकून घेतले.

इ.स. १६९५ मध्ये रामचंद्रपंत आमात्यांनी विशाळगडावर मराठा सरदारांना एकत्र करून मोगलांविरूद्ध आघाडी उभारण्याचा निर्णय घेतला. औरंगजेबानेही हिम्मतखान, बहादूरखान या सरदारांची मराठ्यांविरूद्ध नेमणूक केली. यावेळी संताजी घोरपडेने कर्नाटकात रामदुर्ग किल्ल्यास वेढा दिला. परंतु बहादूरखान तेथे पोहचण्यापूर्वीच त्याने वेढा उठविला व चित्रदुर्गच्या प्रदेशात गेला.

### ४. दिंडोरीची लढाई :

चित्रदुर्गचा नायक बरमाप्पा हा मोगली फौजांशी लढत होता. संताजीने त्याच्या बरोबर मैत्री केली. संताजी वेलोरकडे जात असताना औरंगजेबाच्या हुकूमाप्रमाणे कर्नाटकचा फौजदार कसिमखानाने संताजीस अडविण्याचे ठरविले. त्याच्या मदतीस महम्मद मुरादखान, सफशिकनखान, रूहुल्ला खान, मिजीहसन इ. सरदार होते. मोगलांच्या हालचाली लक्षात येताच संताजीनेच मोगल सरदारांना दिंडोरीजवळ अडविले. या ठिकाणच्या लढाईत मिर्जा हसन व इतर सरदार मारले गेले. या लढाईची माहिती खाफ़ीखानाने दिली आहे. संताजीने मोगली सेनेचा पराभव करून दोड्डेरीच्या गढीत कोंडले. एक महिना हा संघर्ष चालू होता. यावेळी कासिमखानाने विष पिऊन आत्महत्या केली असे म्हटले जाते.

### ५. बसवपट्टणची लढाई :

दोड्डेरीत विजय मिळाल्यानंतर संताजीने आणखी एक पराक्रम केला. दोड्डेरीच्या फजितीनंतर उरलेले मोगली सरदार औरंगजेबाकडे गेले. औरंगजेबाने त्यांच्यावर नाखूष होऊन त्यांच्या बदल्या दूरवरच्या प्रांतात केल्या. बसवपट्टणम येथे हिंमतखान हा तळ देऊन बसला होता. इ.स. १६९६ मध्ये संताजीने अचानक त्याच्यावर हल्ला केला. या चकमकीत हिंमतखान मारला गेला. मराठ्यांना लूट मिळून त्यांनी विजयोत्सव साजरा केला. संताजीच्या कारकीर्दीतील हा शेवटचा विजय होय.

### ६. संताजी–धनाजीचे भांडण :

इ.स. १६९१ च्या सुमारास राजाराम महाराजांनी संताजीस सेनापती हे पद दिले. धनाजी जाधवांचे पद गेल्यामुळे तो तक्रार घेऊन राजाराम महाराजांकडे गेले. राजाराम महाराजांनी १६९३ मध्ये धनाजीस पुन्हा सेनापती पद दिले. त्यामुळे दोघांमध्ये सेनापती पदावरून भांडण सुरू झाले असावे. याबाबत खाफ़ीखान म्हणतो, ‘संताजी व धनाजी हे दोघेही स्वत:ला सेनापती म्हणवित होते. अधिकारपदावरून त्यांच्यात वाद निर्माण झाला. त्यातून वैर वाढले. संताजीच्या गैरवर्तनामुळे त्याच्याकडून सेनापतीपद काढून धनाजीस देण्यात आल्याने त्याच्यात वाद निर्माण झाला.’

### ७. संताजी घोरपडेचा खून :

धनाजी व संताजी यांच्यात एवरगुडी येथे लढाई होऊन अमृतराव निंबाळकर हा मारला गेला होता. त्यामुळे त्याचा भाऊ हणमंतराव निंबाळकर व धनाजी जाधवाने संताजीचा काटा काढण्याचे ठरविला. प्रथमत: संताजीच्या अनुयायांना वेगळे करण्यात आले. राजाराम महाराजांनी संताजीस जिवंत पकडून आणावे असा आदेश धनाजीस दिला. मोगल बादशहानेही गाजीउद्दीन या सरदारास संताजीविरूद्ध पाठविले. धनाजी व गाजीउद्दीन या दोघांनीही संताजीचा पाठलाग सुरू केला. संताजीजवळ आता फारसे सैन्य उरले नव्हते. आपले प्राण वाचविण्यासाठी संताजी घोरपडे साताऱ्याजवळील शंभू महादेवाच्या डोंगरात आश्रयास गेला. जून १६९७ मध्ये दुपारी ओढ्यावर स्नान करीत असताना नागोजी माने व त्याच्या हस्तकांनी बेसावध अवस्थेत संताजीचा खून केला. नागोजी मानेने संताजीचे शिर

बादशहास पेश केले. बादशहाने त्यास बक्षीस म्हणून ७ लक्ष रुपयांची जहागिरी दिली. अशाप्रकारे संताजी घोरपडेच्या जीवनाचा दुःखद शेवट झाला.

### ८. संताजीच्या कार्याचे मूल्यमापन :

संताजी घोरपडेने मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. गो.स. सरदेसाई यांनी 'गनिमी काव्याचा आद्यजनक' अशी पदवी संताजीस दिली होती. संताजी घोरपडे हा शिवाजी महाराजांच्या काळातही स्वराज्याच्या सेवेत होता. राजाराम महाराजांनी त्याचे सेनापतीपद काढून घेतले. तरी देखील स्वराज्यनिष्ठेमुळे तो मोगलांना जाऊन मिळाला नाही. संताजीने गनिमी काव्याचा वापर करून मोगली सेनेस हैराण केले होते. व स्वतःच्या सामर्थ्यावर अनेक विजय मिळविले होते. याबाबत इतिहासकार स.मा. गर्गे म्हणतात, "युद्धनेतृत्व, संघटनकौशल्य, साहसी वृत्ती आणि अतुल पराक्रम या चार गुणांचा एकत्र संगम संताजी मध्ये होता. मराठा राज्य संकटात होते. त्यावेळी संताजीने महत्वपूर्ण कामगिरी केली." संताजी घोरपडेच्या पराक्रमाबाबत डॉ. जयसिंगराव पवार म्हणतात की, "पुढचा इतिहास असे सांगतो की, 'संताजीसारखा प्रतिसंताजी मराठ्यांना निर्माण करता आला नाही.' पुढे औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत मराठे मोगलांशी गनिमी युद्ध करीत होते. पण संताजीप्रमाणे एकामागून एक असे नेत्रदीपक विजय कोणाही मराठी सेनानीस कमविता आले नाही." संताजी घोरपडे व धनाजी जाधवासारखे पराक्रमी सेनानी मराठा राज्यास मिळाले नसते तर संभाजी महाराजांच्या वधानंतरच मराठ्यांचा इतिहास संपुष्टात आला असता. संताजीच्या पराक्रमाचा गौरव सर जदुनाथ सरकार, सेतू माधवराव पगडी या इतिहासकारांनीही आपल्या लेखनात केला आहे.

## ८.२.७ धनाजी जाधवांची कामगिरी

मराठ्यांच्या इतिहासात सिंदखेडचे जाधव घराणे प्रसिद्ध आहे. त्या घराण्यातील पराक्रमी सेनानी म्हणजे धनाजी जाधव होय. संताजी घोरपडे प्रमाणेच धनाजी जाधवही अतिशय पराक्रमी होता. पिलच्या लढाईत संताजीप्रमाणेच धनाजीनेही विलक्षण पराक्रम गाजविला होता.

### १. धनाजी जाधवाचे कार्य :

५ एप्रिल १६८९ रोजी छत्रपती राजाराम रायगडावरून जिंजीला जाण्यासाठी बाहेर पडले. त्यावेळी इतर मराठा सरदारांसमवेत धनाजी जाधव हेही होते. राजाराम महाराजांचा जिंजी प्रवास चालू असताना मोगली सरदारांसमवेत महाराष्ट्रात चकमकी चालू होत्या. राजाराम महाराज निसटल्यानंतर झुल्फीकारखान हा राजारामांच्या पाठलागावर होता. त्याने राजाराम महाराज जिंजीच्या किल्ल्यात आश्रयास गेल्यानंतर जिंजीच्या किल्ल्यास वेढा दिला. इ.स. १६९२ च्या अखेरीस संताजी व धनाजी हा वेढा उठविण्यासाठी जिंजीला गेले. यावेळी धनाजीने इस्माईलखानाच्या तळावर हल्ला करून मोगलांची तारांबळ उडविली. झुल्फीकारखानाने जिंजीचा वेढा उठविल्यानंतर धनाजी पुन्हा स्वराज्याच्या प्रदेशात आला. इ.स.१६९३ मध्ये मोगलांनी पन्हाळा किल्ल्यास वेढा घातला. रायगड मोगलांच्या ताब्यात गेल्यानंतर पन्हाळा हेच मराठ्यांचे महाराष्ट्रातील मुख्य केंद्र बनले होते. रामचंद्रपंत आमत्य,

धनाजी जाधव, शंकराजी नारायण यांच्या संयुक्त सेनेपुढे मोगलांना माघार घ्यावी लागली व पन्हाळ्याचा वेढा उठवावा लागला.

इ.स.१६९५ मध्ये झुल्फीकारखानाने पुन्हा कर्नाटकातील वेल्लोरला वेढा घातला. तेव्हा संताजीबरोबर धनाजीही वेल्लोरकडे निघाला. संताजी-धनाजी येत आहेत हे समजताच झुल्फीकारखानाने वेढा उठविला.

इ.स.१६९१ मध्ये रामचंद्रपंत आमात्यांच्या सल्ल्यावरून संताजी घोरपडे यास सेनापतीपद राजाराम महाराजांनी दिले. धनाजी जाधव या संदर्भात आपली तक्रार राजाराम महाराजांकडे घेऊन गेला. त्यावेळी राजाराम महाराजांनी धनाजी जाधवास 'जयसिंगराव' हा किताब दिला, व 'सरलष्कर' हे पद देऊन भूषविले. पुढे इ.स.१६९३ मध्ये राजाराम महाराजांनी पुन्हा धनाजीस सेनापतीपद दिले. यामुळे संताजी व धनाजी यांच्यात वैर निर्माण झाले. त्यामुळे संताजी व धनाजी यांच्यात एवरगुडी येथे लढाई झाली.याचा सविस्तर वृतांत संताजी घोरपडेंच्या कार्यात दिला आहे.

संताजी घोरपडे जिवंत असेपर्यंत धनाजी जाधवचा पराक्रम विशेष झळकला नव्हता. इ.स.१६९७ ते १७०७ या १० वर्षांच्या काळात मात्र धनाजी जाधवचे कर्तृत्व विशेष दिसते. राजाराम महाराज इ.स.१६९८ पर्यंत जिंजीस आश्रयास होते. या काळात धनाजीने वेळोवेळी मोगलांच्या वेढ्यावर बाहेरून हल्ले चढविले होते. इ.स.१७०० नंतर धनाजी जाधवने झुल्फीकारखानास सतत आपल्यामागे मैलोनमैल धावावयास भाग पाडले होते. इ.स.१७०० मध्ये रमजान महिन्यात औरंगजेबाचा मुक्काम मिरज येथे होता. तेव्हा धनाजी जाधवने औरंगजेबाच्या छावणीवर हल्ले करून त्यास त्रासून सोडले. औरंगजेबाने झुल्फीकारखानास बोलावून घेतले तेव्हा धनाजी कर्नाटकात निघून गेला. धनाजी जाधव व झुल्फीकारखान यांच्यात हा पाठलागाचा खेळ औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत चालू होता.

औरंगजेबाने २७ एप्रिल १७०५ला वाकीनखेड्याचा किल्ला जिंकला. हा विजय औरंगजेबाच्या जीवनातील शेवटचा विजय होता. त्यानंतर फेब्रुवारी १७०६ ला औरंगजेब अहमदनगर या ठिकाणी आला. यावेळी धनाजी जाधवने ६०,००० फौजेनिशी औरंगजेबाच्या छावणीवर आक्रमण केले. तेथून पुढे धनाजी जाधवाने ४ मार्च १७०६ रोजी गुजरातवर आक्रमण करून मोगलांचे सेनापती पराभूत केले. नर्मदा नदीच्या काठावर, रतनपूर या ठिकाणी युद्ध झाले. या युद्धात धनाजीस मोठा विजय मिळाला. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात विशेषत: राजाराम महाराजांच्या काळात धनाजीने संताजी घोरपडेच्या बरोबरीने विशाळगडापासून  जिंजीपर्यंतच्या प्रदेशात मोगलांना जेरीस आणले होते.

औरंगजेबाचा अहमदनगर या ठिकाणी मुक्काम असताना धनाजीने औरंगाबाद विभागात धुमाकूळ घातला होता. धनाजीने गोदावरी, भीमा, घटप्रभा, तुंगभद्रा एवढ्या नद्या पार केल्या होत्या. झुल्फीकारखान हा धनाजीच्या सतत पाठलागावर होता. दरम्यानच्या काळात २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर या ठिकाणी औरंगजेबाचे निधन झाले व त्याच्या निधनाबरोबरच मोगल-मराठा संघर्ष संपुष्टात येऊन मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध संपुष्टात आले.

### २. धनाजी जाधवांची योग्यता :

धनाजी जाधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून मराठा राज्याची सेवा केली होती. छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम, महाराणी ताराबाई या सर्वांच्या काळात तो स्वराज्याचा स्वामीनिष्ठ सेवक होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामात रामचंद्रपंत आमात्यांच्या नेतृत्वाखाली संताजी-धनाजी रणांगण सांभाळून मोगलांच्या आक्रमणापासून स्वराज्याचे रक्षण केले. इ.स.१६९८ मध्ये छत्रपती राजाराम महाराष्ट्रात आल्यानंतर धनाजीने बऱ्हाणपूर, नंदुरबार लुटून माळव्यापर्यंत धडक मारली होती. वासुदेवशास्त्री खरे यांच्या मतानुसार धनाजीस वतनाची आसक्ती होती. व समूहरूपाने कार्य करण्याची धनाजीची क्षमता नव्हती. असे असले तरी धनाजीने मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात केलेले कार्य इतिहासात अजरामर ठरले आहे.

## ८.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी)

१. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्य रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घ्या.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

२. छत्रपती संभाजी महाराज व मोगल संघर्षाची सविस्तर चर्चा करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

३. छत्रपती संभाजी महाराज व सिद्दी यांच्यातील संबंधाची चर्चा करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

४. छत्रपती संभाजी व इंग्रज यांच्यातील संघर्षाचे वर्णन करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

५. छत्रपती संभाजी व पोर्तुगीज यांच्यातील संघर्षाचे वर्णन करा.

६. छत्रपती राजाराम महाराजांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात केलेल्या कामगिरीचा आढावा घ्या.

........................................................................................................

७. महाराणी येसूबाईंनी मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात बजाविलेली भूमिका स्पष्ट करा.

८. महाराणी ताराबाई व औरंगजेब यांच्यातील संघर्षाची सविस्तर चर्चा करा.

९. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धातील रामचंद्रपंत आमात्यांचे कार्य स्पष्ट करा.

१०. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनी केलेल्या पराक्रमाची सविस्तर चर्चा करा.

टिपा (लघुत्तरी)

१. छत्रपती संभाजी – अकबर संबंध

२. छत्रपती संभाजी – अंतर्गत कलह

३. मराठा पोर्तुगीज तह

४. महाराणी येसूबाईंची रायगडावरील सल्लामसलत

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

५. छत्रपती राजारामांचे वतनविषयक धोरण

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

६. छत्रपती राजारामांचे अष्टप्रधान मंडळ

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

७. महाराणी ताराबाईंच्या कार्याचे मूल्यमापन

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

८. रामचंद्रपंत आमात्यांच्या कार्याचे मूल्यमापन

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

९. संताजी घोरपडेंचे कार्य थोडक्यात स्पष्ट करा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

१०. धनाजी जाधवांची कामगिरी थोडक्यात लिहा.

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

## ८.४ सारांश : मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध

मराठ्यांच्या इतिहासात इ.स.१६८० ते इ.स १७०७ या कालावधीत मराठ्यांनी औरंगजेबाबरोबर स्वराज्य रक्षणासाठी जो लढा दिला त्यास 'मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध' असे म्हटले जाते. ३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर मृत्यू झाला. त्यानंतर १६ जानेवारी १६८१ रोजी शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज यांना राज्याभिषेक होऊन संभाजी महाराजांना छत्रपती पद प्राप्त झाले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांमध्ये अंतर्गत कलह सुरू होता. तसेच दक्षिणेतील राज्य जिंकण्याच्या उद्देशाने औरंगजेबाने दक्षिणेची मोहीम हाती घेतली. दक्षिणेतील मराठे, आदिलशाही व कुतूबशाही या सत्तांचा पराभव करण्यासाठी १३ नोव्हेंबर १६८१ रोजी औरंगजेब बऱ्हाणपूर येथे पोहचला.

औरंगजेब महाराष्ट्रात आल्यावर त्याने सर्व मराठी मुलुखात आपल्या फौजा पाठविल्या. शहाजादा आज्जम, बहादूरखान, चिनकिलिजखान, हसनअलीखान या मोगली सरदारांनी मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ले सुरू केले. आणि मराठा स्वातंत्र्य संग्रामाला सुरूवात झाली. छत्रपती संभाजी महाराजांनीही इ.स.१६८१ ते इ.स.१६८९ या कालखंडात मोगली आक्रमणाविरूद्ध प्रखर झुंज देऊन स्वराज्याचे रक्षण केले. इतिहासातील नवीन संशोधनानुसार छत्रपती संभाजी देखील एक कर्तुत्ववान राजे होते. संभाजी महाराजांचा कालखंड ९ वर्षांचा होता. या काळात औरंगजेबाच्या अफाट सैन्याचा सामना संभाजीराजांनी केला होता. औरंगजेबाने मराठ्यांचा पराभव होत नाही हे पाहून मराठ्यांविरूद्धची मोहीम तात्पुरती थांबविली. व आपला मोर्चा आदिलशाही व कुतूबशाहीकडे वळविला. या दोन्ही शाह्या औरंगजेबाने नष्ट केल्या. त्यामुळे या शाह्यांकडून संभाजी महाराजांना मिळणारी मदत बंद झाली. त्यानंतर औरंगजेबाने आपली सर्व शक्ती मराठ्यांविरूद्ध एकत्र केली. तसेच यावेळी संभाजी महाराजांना इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, सिद्दी या परकीय सत्ताधिशांचाही सामना करावा लागला.

छत्रपती संभाजी महाराजांचे मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील योगदान महान आहे. औरंगजेब मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी दक्षिणेतच तळ देऊन बसला होता. तरी देखील संभाजी महाराजांनी औरंगजेबाच्या आक्रमणाचा सतत ९ वर्षे प्रखर प्रतिकार केला. या काळात संभाजी महाराजांचे कर्तृत्व, राजकारणपटुत्व, त्यांची गनिमी काव्याची पद्धती व त्यांनी मराठी स्वराज्य रक्षणासाठी केलेले बलिदान इ. गुण दिसून येतात.

१फेब्रुवारी १६८९ रोजी संभाजी महाराजांना संगमेश्वर येथे अटक करण्यात आली. त्यांच्याबरोबर कवी कलश हाही होता. बंदीवासात दोघांचाही अत्यंत छळ करण्यात आला. ११ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांचा वध करण्यात आला. संभाजी महाराजांनी स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी आपले बलिदान दिले. संभाजी महाराजांच्या या बलिदानातूनच प्रेरणा घेऊन मराठी सरदारांनी मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध जोरदारपणे लढविले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूच्या वेळी सर्व किल्ल्यांवर दारूगोळा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होता. मराठ्यांच्या फौजेत वाढ झाली होती. खाफ़ीखान या इतिहासकाराने संभाजी महाराजांच्या कार्याचे वर्णन करताना, 'शिवाजीपेक्षा दहा पटीने अधिक तापदायक

राजा' असे म्हटले आहे.

थोडक्यात संभाजी महाराजांनी औरंगजेबाच्या प्रचंड आक्रमणाविरूद्ध सतत ९ वर्षे यशस्वीपणे झुंज दिली. त्याचबरोबर पोर्तुगीज, सिद्दी, डच, इंग्रज या परकीयांचाही बंदोबस्त केला. त्यामुळे संभाजी महाराजांचे कार्य मराठ्यांच्या इतिहासात अजरामर ठरले आहे.

मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध या प्रकरणात महाराणी येसूबाईंचे कार्यही महत्वाचे आहे. संभाजी महाराजांच्या वधानंतर महाराष्ट्रात विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. महाराणी येसूबाई, छत्रपती शाहू, राजाराम महाराज, सोयराबाई, अण्णाजी दत्तो, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, जनार्दनपंत हणमंते, राहुजी जाधव, खंडो बल्लाळ, निळोपंत पेशवा, प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण, हिंदुराव घोरपडे इ. मराठा सरदार व राजकीय मंडळी रायगडच्या वेढ्यात अडकली होती. यावेळी स्वराज्य नष्ट होते की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु यावेळी महाराणी येसूबाईनी पती संभाजीराजांच्या निधनाचे दु:ख बाजूस सारून एक सूज्ञ राजकीय सल्ला मराठा सरदार मंडळींना दिला तो असा की, ममरायगडावर सर्वांनी एकत्र राहण्यात धोका आहे. त्यापेक्षा राजारामासह सरदारांनी रायगडाच्या वेढ्यातून बाहेर पडावे; दूर जाऊन जिंजीचा आश्रय घ्यावा व तेथून स्वराज्याचे रक्षण करावे.फ्फ अशी ही योजना महाराणी येसूबाईंनी मांडली. त्यानुसार राजाराम व इतर सरदार मंडळी जिंजीकडे आश्रयास गेली. महाराणी येसूबाई व छत्रपती शाहू यांना अटक झाली. यावेळी महाराणी येसूबाईंनी स्वराज्यासाठी फार मोठा स्वार्थ त्याग केला. एवढेच नव्हे तर मोगलांचा बंदीवासही स्विकारला. आपल्या आयुष्याची जवळजवळ ३० वर्षे त्या मोगली छावणीत कैद म्हणून राहिल्या. त्यांच्या सूज्ञ सल्ल्यामुळेच स्वराज्य वाचले व औरंगजेबाला संपूर्ण आयुष्यात स्वराज्याचा नाश करता आला नाही.

छत्रपती संभाजी महाराजांच्या अटकेनंतर रायगडावर ९ फेब्रुवारी १६८९ रोजी राजाराम महाराजांना छत्रपती पद देण्यात आले होते. संभाजी महाराजांच्या वधानंतर झुल्फीकारखानाने रायगडाचा वेढा अधिक कडक केला होता. या वेढ्यातून महाराणी येसूबाईंच्या सल्ल्याप्रमाणे राजाराम महाराज बाहेर पडले व त्यांनी जिंजी किल्ल्याचा आश्रय घेतला. इ.स.१६८९ ते इ.स १७०० पर्यंत राजाराम महाराजांनी स्वराज्याचे रक्षण केले. कर्नाटक प्रांतातील जिंजी येथे पोहचल्यानंतर राजाराम महाराजांनी प्रथमत: अष्टप्रधान मंडळ निर्माण केले. रामचंद्रपंत आमात्य यांना महकूमतपन्हाफ म्हणजेच मस्वराज्याचा आधारफ असा किताब देऊन महाराष्ट्रातील स्वराज्याचा कारभार त्यांच्याकडे सोपविला. महाराष्ट्रातील वतनदारांना प्रोत्साहन देऊन मोगलांच्या प्रदेशात नवीन वतने जिंकण्यास भाग पाडले. वतनदारी पद्धतीस राजाराम महाराजांनी मान्यता दिल्यामुळे मोगलांना जाऊन मिळालेले अनेक मराठा सरदार स्वराज्याच्या चाकरीत पुन्हा आले. या वतनदारांनी मुघलांच्या ताब्यातील प्रदेश जिंकण्यास सुरूवात केली. त्यामुळे राजाराम महाराजांच्या काळात अनेक मराठा सरदारांचा उदय झाला. त्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर स्वराज्याचा स्वातंत्र्य संग्राम उत्तम रीतीने पुढे चालविला व स्वराज्य ज्योतीचे रक्षण केले. राजाराम महाराजांना हे राज्य दिल्ली पर्यंत वाढावे असे वाटत होते. महाराजांनी प्रत्यक्ष तलवार गाजविली नसली तरी स्वराज्य रक्षण व मराठा सरदारांचा पराक्रम यांचा उपयोग करून स्वराज्यावरील मुघलांचे

संकट यशस्वीपणे टाळले. त्यामुळे छत्रपती राजारामांच्या कार्यालाही इतिहासात महत्वाचे स्थान आहे.

मराठी स्वराज्याच्या अत्यंत कठीण काळामध्ये स्वराज्याचे रक्षण करण्याची महत्वाची जबाबदारी रामचंद्रपंत आमात्यांनी पार पाडली. स्वराज्याच्या छत्रपती राजाराम महाराज हे दूर जिंजीमध्ये असतानाही स्वराज्याचा कारभार रामचंद्रपंत आमात्यांनी यशस्वीपणे सांभाळला. एवढेच नव्हे तर स्वराज्य रक्षणासाठी मुघल सरदारांबरोबर संघर्षही केला. विखुरलेल्या मराठी सरदारांना एकत्र करून स्वराज्य कार्यासाठी प्रेरित केले व त्यांची एकजूट घडवून स्वराज्याच्या रक्षणाचे महत्वपूर्ण कार्य केले. रामचंद्रपंत आमात्यांची सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी लिहिलेला ममआज्ञापत्रफ्फ ग्रंथ होय.

मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारी महत्वाकांक्षी स्त्री म्हणजे मताराबाईफ होय. महाराणी ताराबाईंनी इ.स.१७०० तो इ.स.१७०७ या कालावधीत राज्यकारभार केला. २ मार्च १७०० रोजी सिंहगडावर राजाराम महाराजांचे निधन झाले. यावेळी आपला लहान मुलगा शिवाजी यास गादीवर बसवून महाराणी ताराबाईंने राज्यकारभार हाती घेतला. राजाराम महाराजांनंतर महाराणी ताराबाईने आपला मोगलांबरोबरचा संघर्ष चालू ठेवला होता. सातारा येथील संघर्ष परळीचा संघर्ष, भूषणगडचा संघर्ष, पन्हाळगड व विशाळगड येथील मोगलांची आक्रमणे, सिंहगड व तोरणा किल्ला देखील मोगलांनी जिंकला. महाराणी ताराबाईने ही सर्व आक्रमणे यशस्वीपणे परतवून लावली. मोगली आक्रमणाची पाठ वळताच ताराबाईच्या नेतृत्वाखाली मराठी सरदारांनी लोहगड, सिंहगड, राजमाची, रोहीडा, राजगड, पन्हाळा, पावनगड, सातारा व संतगड हे किल्ले जिंकून घेतले. ताराबाईंनी पराक्रम, शौर्य, धाडस, राजकारणपटुत्व इ. गुणांच्या जोरावर बादशहाला चांगलीच टक्कर दिली. वयाच्या २५व्या वर्षी वैधव्याचे दु:ख बाजूस सारून तिने स्वराज्यावरील संकट दूर केले. मराठी सरदारांमधील मतभेद मिटवून त्यांना स्वराज्यकार्यात सहभागी करून घेतले. महाराणी ताराबाईंच्या पराक्रमामुळेच औरंगजेबाला मराठ्यांचे राज्य नष्ट करता आले नाही. ताराबाईंच्या कार्याविषयी अनेक इतिहासकारांनी गौरवोद्गार काढले आहेत.

संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे मराठा स्वातंत्र्य युद्धातील महान सेनानी होते. संताजी व धनाजी यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम, महाराणी ताराबाई यांच्या कारकीर्दीत अनेक पराक्रम करून स्वराज्याचे रक्षण केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर या दोन्ही पराक्रमी विरांनी अतिशय महत्वाची भूमिका बजावली. संताजी व धनाजी यांनी अनेक मोगली सरदारांना पराभूत केले होते. या दोघांनीही गनिमी काव्याचा वापर करून मोगल सैन्याला त्रासून सोडले होते. गनिमी काव्यामध्ये संताजी व धनाजी हे आपल्या सैन्याच्या अतिशय वेगवान हालचाली करत होते. ते मुगल सैन्याची रसद लुटून नेत असत. त्यामुळे मोगली लष्कर आपला घोडा पाणी पित नसेल तर त्यास मपाण्यात संताजी-धनाजी दिसतो का? असे उपहासाने विचारत. मराठ्यांच्या इतिहासाचे दुर्दैव म्हणजे संताजी घोरपडे व धनाजी जाधव या दोघांमध्ये राजाराम महाराजांच्या काळात सेनापती पदावरून वैर निर्माण झाले. संताजी व धनाजी हे दोघेही स्वत:ला सेनापती समजत होते. प्रथमत: राजाराम महाराजांनी संताजीस सेनापतीपद

दिले व नंतर धनाजीच्या सांगण्यावरून हे पद पुन्हा काढून घेतले. संताजी व धनाजी यांच्या वैरभावातूनच जून १६९७मध्ये संताजी घोरपडेचा खून झाला. ही मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामातील दुर्देवी घटना होय. इ.स.१६९७नंतर धनाजी जाधवाच्या कार्यास चालना मिळाली. महाराणी ताराबाईंच्या कारकीर्दीमध्ये धनाजी जाधवने सेनापती म्हणून अनेक पराक्रम केले. संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या कर्तृत्वामुळेच मोगलांना शेवटपर्यंत मराठ्यांचे राज्य जिंकता आले नाही. त्यामुळेच मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात या दोघांचेही कार्य अविस्मरणीय आहे.

थोडक्यात मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धामध्ये छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, रामचंद्रपंत आमात्य, संताजी घोरपडे व धनाजी जाधव या व्यक्तिंच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

## ८.५ पारिभाषिक शब्द :

१. लष्करी छावणी : मध्ययुगीन काळातील राजे किंवा सरदार यांच्या सैन्याचे राहण्याचे ठिकाण.

२. ज्येष्ठ पुत्र : थोरला मुलगा, वडील (मोठा) मुलगा.

३. बुधभूषणम् : छत्रपती संभाजी महाराजांनी लिहिलेला संस्कृत ग्रंथ.

४. पंचहजारी मनसबदार : औरंगजेबाने संभाजी महाराजांना मुग़लांचा सरदार म्हणून पंचहजारी मनसबदार हे पद दिले. अशा सरदारास पाच हजार घोडेस्वार ठेवण्याची परवानगी होती. सैन्यातील एक पद.

५. गृह कलह : घरातील भांडण.

६. सुभेदार : प्रांताच्या अधिकाऱ्यास सुभेदार असे म्हणतात.

७. जकात : आयात वस्तुवरील कर.

८. मुकर्रबखान : मुकर्रब म्हणजे झडप घालणारा. छत्रपती संभाजींस पकडल्यानंतर औरंगजेबाने शेख निजाम या सुभेदारास ही पदवी दिली..

९. गनिमी कावा : शत्रूच्या सैन्याबरोबर समोरासमोर न लढता अचानक शत्रुसैन्यावर छापा टाकून शत्रु सैन्यास जेरीस आणणे. या पद्धतीस गनिमी कावा असे म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी ही युद्धपद्धती मोठ्या प्रमाणावर वापरली.

१०. पुरोहित : राजास धार्मिकबाबतीत सल्ला देणारा अधिकारी.

११. सुभेदार : सुभा किंवा प्रांताचा अधिकारी.

१२. सखी राज्ञी जयति : महाराणी येसूबाईंची मुद्रा.

१३. काबिला : कुटूंबातील सर्व माणसे व सामान यास काबिला असे म्हटले जाते.

१४ ७. राजारामचरित : छत्रपती राजाराम महाराजांचा पुरोहित केशव याने लिहिलेला

संस्कृत ग्रंथ. या ग्रंथात पन्हाळा ते जिंजी या दरम्यानच्या राजाराम महाराजांचे प्रवास वर्णन आले आहे.

१५. हुकूमतपन्हा : महुकूमतपन्हाफ या शब्दाचा मराठी भाषेत मराज्याचा आधारफ असा अर्थ आहे, छत्रपती राजारामांनी रामचंद्रपंत आमात्यांस हा किताब दिला होता.

१६. वतनदारी पद्धती : वतन या अरबी शब्दाचा अर्थ जमीन किंवा देश असा आहे. एखाद्या पराक्रमाबद्दल किंवा राज्याच्या सेवेच्या मोबदल्यात मिळालेली जमीन, गाव, प्रांत यास वतन असे म्हणत. हे वतन करमाफ किंवा नाममात्र कर असलेले होते. त्याच्या प्रमुखास वतनदार असे म्हणत.

## ८.६ संदर्भग्रंथ सूची

1. कुलकर्णी अ.रा.खरे ग.ह.(संपा)(2006), मराठ्यांचा इतिहास खंड -I,II,कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

2. बनहट्टी श्री.ना.(संपा)(1961) आज्ञापत्र अर्थात शिवाजीची राजनिती, सुविचार प्रकाशन, पुणे.

3. बेंद्रे वा.सी.(1975) राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.

4. बेंद्रे वा.सी. (1960) छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र, वा.सी.बेंद्रे, पुणे.

5. शिवदे सदाशिव (2004) महाराणी येसूबाई, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

6. हेरवाडकर र.वि.(1972) संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे, व्हिनस प्रकाशन, पुणे.

7. बेंद्रे वा.सी.(1960) छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र, वा.सी.बेंद्रे, पुणे.

8. गोखले कमल (2001) शिवपुत्र संभाजी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

9. पगडी सेतू माधवराव (संपा)(1962) मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, जोशी-लोखंडे, पुणे.

10. पवार ज.भा. (1975) महाराणी ताराबाई, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.

11. शहा मुं.बा. (संपा)(1996) इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र सहित्य, खंड -II, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे.

12. देशपांडे प्र.न., देशपांडे वि.प्र.(संपा)(2005) रामचंद्र नीळकंठ आमात्यकृत आज्ञापत्र मराठेशाहीतील राजनिती, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे.

13. सरदेसाई गो.स.(2010) मराठी रियासत, खंड-II, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

14. Sarkar J.N.(1961) Shivaji & his Times, Calcutta.

15. शिवदे सदाशिव (2008) ज्वलज्वलनतेजस संभाजी राजा डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.